# चंद्रपुर महानगरपालिका

# चंद्रपुर

# लेखा परीक्षण अहवाल

# 2016-2017 ते 2017-2018

उपसंचालक, महानगरपालिका लेखा लेखापरीक्षा, उपविभाग - 3, स्थानिक निधी

लेखापरीक्षा कार्यालय, औरंगाबाद

लेखा कोष भवन, तिसरा मजला, जिल्हाधिकारी कार्यालया जवळ

# अस्वीकृती  प्रमाणपत्र

1. सदर लेखापरीक्षण अहवालात नोंदविलेले आक्षेप हे  चंद्रपुर महानगरपालिका यांनी  2016-2017 ते 2017-2018  या  वर्षी साठी लेखापरीक्षणास सादर केलेल्या अभिलेखे व माहितीच्या आधारे नोंदविण्यात आलेले आहेत.

2. जी माहिती /अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाही त्या संबंधातील अनियमितता /अपहार/अफरातफरीस लेखापरीक्षक जबाबदार राहणार नाहीत.

**चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर या संस्थेचा सन 2016-2018 या वित्तीय वर्षाचा लेखापरिक्षण अहवाल.**

क्र.स्था. 18/ब/लेखापरिक्षण अहवाल/2016-17 व 2017-18 / 255 दिनांक 05/10/2021

उपसंचालक,(मनपालेप)
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
औरंगाबाद, उपविभाग-3,
3रा मजला, लेखा कोष भवन,
फाजीलपुरा, औरंगाबाद.

प्रती,
मा.आयुक्त,
चंद्रपूर शहर महानगरपालिका,
चंद्रपूर.

चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर या संस्थेचे सन 2016-17 व 2017-18 या आर्थिक वर्षाचे संयुक्त लेखापरिक्षण श्री विजय विश्वनाथ बागडे , लेखापरीक्षा अधिकारी तथा पथक प्रमुख (मनपालेप), स्थानिक निधी लेखापरिक्षा,औरंगाबाद उपविभाग-3, मुख्यालय नागपूर, पथक चंद्रपूर यांच्या पथकाने दि. 12/10/2020 ते 19/03/2021 या कालावधीत पूर्ण केले. श्रीमती वंदना जोशी, उपसंचालक(मनपालेप), स्थानिक निधी लेखापरिक्षा,औरंगाबाद उपविभाग-3 यांनी प्रारुप अहवालाचे पुनर्विलोकन करून दिनांक 25/08/2021 रोजी आयुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर यांचे सोबत सन 2016-17 व 2017-18 चे प्रारूप लेखापरिक्षण अहवालावर चर्चा करून अंतिमीकरण करण्यात आले.

सन 2016-17 व 2017-18 या लेखापरीक्षण कालावधीमध्ये खालील पदाधिकारी व अधिकारी या संस्थेचे कामकाज पाहत होते.

<u>महापौर</u>

| | |
|---|---|
| सौ. राखी स. कंचलावार | 01/04/2016 ते 30/04/2017 |
| सौ. अंजली घोटेकर | 30/04/2017 ते 31/03/2018 |

<u>आयुक्त</u>

| | |
|---|---|
| श्री. सुधीर शंभरकर | 01/04/2016 ते 18/06/2016 |
| श्री. संजय काकडे | 19/06/2016 ते 31/03/2018 |

# अनुक्रमणिका


विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण ........ 1

**I PART I :मागील लेखा परीक्षण अहवाल ........ 3**

चंद्रपुर महानगरपालिका ........ 3

**PART II ........ 9**

चंद्रपुर महानगरपालिका ........ 9

**कलम ९ अ खालील आक्षेप ........ 10**

1 मनपा चंद्रपूर येथील सन 2016-17 मधील मंजुर अर्थसंकल्पावरील अभिप्राय व आर्थिक स्थितीबाबत. ........ 11

2 मनपा चंद्रपूर येथील सन 2017-18 मधील मंजुर अर्थसंकल्पावरील अभिप्राय व आर्थिक स्थितीबाबत. ........ 15

3 चंद्रपूर शहर मनपाचे लेखे दुहेरी नोंद पद्धतीने न ठेवणेबाबत. ........ 20

4 निवृत्तीवेतनधारकांच्या निवृत्तीवेतनातून आयकर कपात न करणेबाबत. ........ 22

5 मनपा चंद्रपूर येथे अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांना इतरत्र समायोजन झाल्यामुळे कार्यमुक्त केल्यानंतरही भविष्य निर्वाह निधीमधील रक्कम हस्तांतरित न करता विलंबाने परत केल्याने जास्तीचे व्याज प्रदान केल्याबाबत. ........ 24

6 घसारा निधी स्वतंत्रपणे स्थापन करून त्यामध्ये पुरेशी तरतूद केली नसल्याबाबत........ 26

7 विविध बाबीवर केलेल्या गुंतवणुकीवरील प्राप्त व्याजाची नोंद रोखपुस्तकात नसल्याने रु. 4.71 कोटी लेख्याबाहेर असल्याबाबत. ........ 27

8 मनपा चंद्रपूर येथील सन 2016-17 व 2017-18 मधील अखर्चित निधीबाबत. ........ 29

9 वार्षिक लेखे व त्यावरील अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध न केल्याबाबत. ........ 34

10 हुतात्मा स्मारक ग्रंथालयातील वाचन साहित्याच्या देयकामध्ये पुरवठादाराला अतिप्रदान झाल्याबाबत. ........ 35

11 वैयक्तिक शौचालय योजने अंतर्गत रेडीमेड(प्री-कास्ट) शौचालये बांधण्याच्या कामातील अनियमिततेबाबत ........ 38

12 निवडणुक विभागातील वर्ष 2017 मधील निवडणुकी करिता केलेल्या खर्चातील अनियमितताबाबत. ....42
13 शिक्षण विभाग तसेच इतर विभागातील कर्मचाऱ्यांना वेतन प्रदान करतांना वेतनातून 1 रु. मुद्रांकाची रक्कम वसूल न करण्याच्या अनियमिततेबाबत. ....43
14 चंद्रपूर महानगरपालिका अंतर्गत विद्युत विभागातील माहे सप्टेंबर 2016 व मार्च 2017 या महिन्यातील विज देयकांपोटी जास्तीची रक्कम महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ यांना अदा केल्याबाबत. ....45
15 चंद्रपूर महानगरपालिका अंतर्गत विद्युत विभागातील कंत्राटदाराच्या देयकांतून आयकर, VAT कपातीच्या आढळून आलेल्या अनियमिततेबाबत. ....52
16 सार्वजनिक बांधकाम विभागाने ठेवलेल्या विविध नोंदवहयांतील अनियमिततेबाबत ....55
17 गौरी तलाव प्रभागात बायपास रोड ते श्री बुल्लीवर ते वंजारी किराणा पर्यंत सिमेंट कांक्रीट रस्त्यातील बांधकाम अनियमिततेबाबत . ....57
18 मूळ अंदाजपत्रकाच्या 22.60% कमी दराने निविदा स्वीकारून अंदाजपत्रकातील परिमाणात बदल करून 10.80% दराने कंत्राटदारास जादाचे प्रदान करण्याबाबत. ....59
19 मूळ प्राकलणात नमूद नसलेल्या बाबीचे मुल्यांकन करून कंत्राटदारास रक्कमाचे शोधन करणे. ....63
20 प्राकलणीय रकमेच्या 23% कमी दराने काम देवून अंदाजपत्रकीय कामात अतिरिक्त वाढ दर्शवून कंत्राटदारास रु. 940690/- अतिरिक्त प्रदान करणेबाबत. ....64
21 अंचलेश्वर प्रभागात श्री धकाते ते नरुले ते गुलाब ससोदे ते विश्वकर्मा आणि मदरसा ते शेख मुज्जू यांचे घरापर्यंत कांक्रीट रस्ता विकसित करण्याचे कामातील अनियमिततेबाबत. ....68
22 पॉलटेक्नीक कॉलेज ते विश्र्वकर्मा चौक ते विठोबा खिडकी पर्यंत डांबर रस्ता विकसित करण्याचे कामात अनियमितताबाबत ....71
23 BRGF निधी अंतर्गत जटपुरा गेट ते रामाळा तलाव ते पाच देऊळ ते बगड खिडकी वाढीव रस्ता विकसित करण्याचे कामातील अनियमिततेबाबत. ....76
24 रमाई आवास योजनेच्या खात्यावरील व्याज शासनाकडे जमा न करण्याबाबत व योजनेअंतर्गत काम पूर्ण न झालेल्या घरकुलाबाबत ....78
25 रमाई आवास घरकुल योजनेचे रोखपुस्तक व बँक स्टेटमेंट मधील तफावतीबाबत तसेच योजनेच्या अंमलबजावणीतील अनियमिततेबाबत ....80

26 संगणक विभागातील सन 2016-17 व 2017-18 मध्ये दुहेरी लेखे तयार करण्याकरिता अर्थसंकल्पीय तरतुदी नुसार रु.19,04,144/- खर्च निरर्थक केल्याबाबतची अनियमितता. ......................... 82

27 शासन निर्णयानुसार महिला व बालकल्याण कार्यक्रम राबविण्यासाठी महसुली उत्पन्नाच्या 5% खर्च न करण्याची अनियमितता. ......................................................... 83

28 चंद्रपूर महानगरपालिका नगर सचिव विभागांतर्गत घेण्यात आलेल्या बैठकीच्या नियमबाह्य खर्चाबाबत. ......................................................... 86

29 बाजार विभागातील गाळे भाडयाची रक्कम वसुल न केल्याबाबतची अनियमितता ....................... 88

30 बाजार विभागातील सन 2017-18 मधील धनादेश वारंवार अनादरीत झाल्याने मनपाचे आर्थिक नुकसानीबाबत ......................................................... 89

31 बाजार विभागातील कंत्राटदार श्री निर्मल भंडारी यांचेकडून दरमहा नियमित बाजार फी कंत्राटाची रक्कम रु.1,60,203/- मनपा खात्यात जमा होत नसल्याची अनियमितता. ......................... 92

32 स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत व वैयक्तिक घरगुती शौचालय योजने अंतर्गत काम पूर्ण न झालेल्या प्रकरणाबाबत व योजनेची अंमलबजावणी करताना झालेल्या अनियमिततेबाबत ......... 95

**कलम ९ ब खालील आक्षेप ......................................................... 98**

33 भविष्य निर्वाह निधी खात्यावरील शिल्लक रकमेवर विहित दरापेक्षा जास्त दराने व्याज आकारणे तसेच ना परतावा अग्रीमाची रक्कम वजा न करता व्याज आकारणे व इतर अनियमितताबाबत. ............. 99

34 मनपा चंद्रपूर येथे धनादेश वितरण नोंदवही (CHEQUE ISSUE REGISTER) ठेवले नसल्याबाबत. 101

35 म.न.पा.चंद्रपूर येथील अधिकारी / कर्मचारी व इतर फर्मला दिलेल्या अग्रिमाची वसुली न करणे तसेच इतर अनियमिततेबाबत. ......................................................... 102

36 शासन निधी व सामान्य निधीच्या रोखपुस्तक व बँक ताळमेळ मधील तफावतीबाबत. .............. 105

37 मनपा फंडातून भरण्यात आलेली आयकर दंडाची रक्कम रु. 234074/- चे मनपा फंडात समायोजन न केल्याच्या अनियमिततेबाबत. ......................................................... 109

38 शासन निर्णयानुसार कार्यकंत्राटाच्या करारनाम्यावर मुद्रांक शुल्क वसूल न करण्याच्या अनियमितेबाबत. ......................................................... 111

39 विवाह नोंदणी शुल्क व शास्ती, विवाह मंडळ नोंदणी व नुतनीकरण तसेच प्रमाणपत्राची सत्यप्रत पुरवताना आकारलेले शुल्क याद्वारे प्राप्त रक्कम शासनाकडे जमा न केल्याबाबत........................ 113

40 मनपा चंद्रपूर हद्दीतील जाहिरातीच्या होर्डिंग वर जाहिरात व परवाना शुल्क कमी आकारण्याबद्दल 114
41 चंद्रपूर मनपा मधील जन्म-मृत्यू विभागांतर्गत असलेल्या अंत्यविधी अनुदानासंबंधी आढळून आलेल्या अनियमितते बाबत. 116
42 चंद्रपूर महानगरपालिका अंतर्गत विद्‌युत विभागाद्‌वारे आधुनिक इलेक्ट्रिकल्स यांना दिलेल्या विद्‌युत देखभाल दुरुस्तीच्या कामातील अनियमिततेबाबत. 119
43 चंद्रपूर शहरातील स्वयंचलित वाहतूक नियंत्रक देखभाल व दुरुस्ती तसेच इंदिरा गांधी चौक व बंगाली कॅम्प चौक येथील स्वयंचलित वाहतूक नियंत्रक नुतनीकरणाचे कामात अनियमितताबाबत. 121
44 कामगार झोपडपट्टी भागात राजेश मेश्राम ते राजू बनकर,श्री अलोणे ते हंसराज खोब्रागडे ते केशवराव चवरे यांच्या घरापर्यंतच्या कांक्रीट रस्त्यातील बांधकामातील अनियमिततेबाबत. 124
45 मूळ प्रकलनात अनावश्यक बाबीचा अंतर्भाव करून त्यावरील बचतीमधून अन्य बाबीच्या परिमाणात अनावश्यक वाढ दर्शविने तसेच कांक्रीट करणाच्या कामातील एका टप्प्याचे कार्यान्वयन न केल्याच्या शक्यतेबाबत. 128
46 महाराष्ट्र नगरोत्थान योजने अंतर्गत बाजार प्रभागात भालगट ते फुले मार्केट , शहा स्वीटमाट,मेहता, ते पोटदुखे राईस मिल पर्यंतच्या कांक्रीट रस्त्यातील कामामधील अनियमिततेबाबत. 130
47 हिंदुस्थान लालपेठ कॉलोनी प्रभागात विजय यादव ते इटलावार व संजय मिसलवार ते रामय्या जगन्नाथ रोहिदास या परिसरातील कांक्रीट रस्ता विकास कामातील अनियमिततेबाबत. 133
48 जटपुरा गेट ते दवा बाजार ते जुना वरोरा नाक्यापर्यंत रस्ता डांबरीकरणाच्या कामातील अनियमिततेबाबत. 136
49 BRGF योजनेच्या अनुषंगाने पूर्ती बाजार ते फुटका किल्ला, पाचगाव देऊळ कांक्रीट रस्ता विकसित करण्यात आलेल्या कामातील अनियामितेबाबत. 140
50 टिपले किराणा स्टोअर्स श्री खिरटकर ते विठ्ठल मंदिर पर्यंत डांबर रस्ता बांधकामातील अनियमिततेबाबत. 143
51 मनपा हद्दीतील शुश्रूषा-गृह तसेच सोनोग्राफी सेंटर च्या नोंदणी व नूतनीकरनामधील अनियमितताबाबत 146
52 झोन क्र.2 मधील कर विभागातील वसूल झालेली एकूण रक्कम चलनाद्‌वारे रोखपालाकडे जमा करताना कमी जमा करण्यात येत असल्याबद्दल 147

53 पाणी पुरवठा विभागातील पीव्हीसी पाईप लाईन टाकण्याचे कामात झालेल्या अनियमिततेबाबत. 149
54 चंद्रपूर शहरातील पाणी पुरवठा योजना BOT तत्वावर चालविण्यास दिलेल्या कामातील अनियमितता बाबत. ....151
55 बाजार विभागा अंतर्गत किल्ल्याचे मागील व बाहेरील बाजार फी वसुलीबाबतच्या कंत्राटी कामातील अनियमितता. ....153
56 नगर विकास विभागातील बांधकाम परवानगी व इतर अनियमिततेबाबत. ....154
57 अग्निशमन विभागामार्फत इमारतीवरील अग्निसेवा शुल्काची वसुली न केल्याने मनपाचे आर्थिक नुकसान झाल्याबाबत ....157

**कलम ९ क खालील आक्षेप ....159**

**------------------- निरंक ------------------- ....160**

**कलम ९ ड खालील आक्षेप ....162**

58 वैद्यकीय प्रतीपुर्ती देयकासोबत आवश्यक दस्तावेज व प्रमाणपत्रे जोडली नसतांना प्रतीपुर्ती देयकांची रक्कम प्रदान करणे तसेच इतर अनियमितता. ....163
59 मनपा कर्मचारी यांच्या एकूण वेतनामधून 50% या मर्यादेपेक्षा अधिक सक्तीच्या व ऐच्छिक कपाती करून अत्यल्प प्रमाणात वेतन प्रदान करण्यात येत असल्याबाबत. ....165
60 चंद्रपूर महानगरपालिका अंतर्गत सामान्य प्रशासन विभागातील सेवा पुस्तकांतील अनियमितता तसेच वेतन निश्चिती बाबत. ....167
61 रोख तसेच मौल्यवान वस्तु हाताळणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून क्षतीपुर्ती बंधपत्र न घेतल्याबाबत. ....170
62 निवृत्तीवेतनधारकांना सेवानिवृत्तीवेतन विषयक प्रथम लाभाचे प्रदान विलंबाने करणे व इतर अनियमिततेबाबत ....171
63 नवीन परिभाषित योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने योजनेत समाविष्ट कर्मचाऱ्यास वर्षनिहाय जमाचिठ्ठी/अंशदान वार्षिक विवरणपत्र वाटप न करणे तसेच उक्त योजनेचे स्वतंत्र रोखपुस्तक न ठेवण्याच्या अनियमिततेबाबत ....173
64 कर्ज नोंदवहीतील शिल्लक रकमेतील तफावत तसेच इतर अनियमितता. ....175
65 वार्षिक विवरणपत्रे शासनाकडे व महालेखापाल यांना सादर न केल्याबाबत. ....176

66 चंद्रपूर महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थांना ओळखपत्र /गणवेश /बूट मोजे व दप्तर पुरवठा करण्यात झालेल्या अनियमिततेबाबत. ....177
67 शिक्षण विभागामार्फत करण्यात आलेल्या खरेदी प्रक्रीयेतील अनियमिततेबाबत. ....179
68 मनपा चंद्रपूरच्या कर विभागातील वसुल होत असलेल्या महसुलाच्या मागील वर्षीच्या शिल्लक रकमा व पुढील वर्षाच्या मागणीच्या रकमेतील तफावतीबाबत. ....182
69 शिक्षण कर व रोजगार हमी उपकराची वसुली झालेली रक्कम व अंदाजपत्रकात दर्शविलेली प्रत्यक्ष जमा रकमेतील तफावत तसेच इतर अनियमिततेबाबत. ....185
70 कर निर्धारणाच्या नस्त्या लेखा परीक्षण पथकास तपासणीस उपलब्ध न करून देण्याबाबत. ....188
71 मोबाईल टॉवरवरील मालमत्ता कराच्या अनुषंगाने अभिलेखे सादर न करण्याबाबत. ....189
72 मनपा चंद्रपूर मधील विविध विभागात जडवस्तू संग्रह नोंदवही विहित नमुन्यात तसेच अद्यावत नसल्याबाबत. ....190
73 भांडार विभागातील सन 2016-17 व 2017-18 या वित्तीय वर्षातील छापलेल्या पावती पुस्तकाची स्वतंत्र नोंदवही न ठेवण्याबाबत झालेली अनियमितता. ....192
74 उद्यान विभागांतर्गत घेण्यात आलेल्या 'वन महोत्सव' कार्यक्रमासंबंधी असलेल्या खरेदी प्रक्रीयीतील व कार्यवाहीतील अनियमिततेबाबत. ....193
75 बांधकाम विभागात ठेवण्यात आलेल्या साठा नोंदवहीतील अनियमिततेबाबत. ....194
76 क्रिडा क्षेत्रावर एकूण वार्षिक खर्चाच्या 5 % रक्कम खर्च न करणेबाबत. ....195
77 नागरी आरोग्य केंद्राकरिता खरेदी तसेच वितरीत करण्यात येत असलेल्या औषधीमधील अनियमितताबाबत ....197
78 सर्वसाधारण सभा तसेच स्थायी सभा बैठक इतिवृत्त वाचन करताना आढळलेल्या अनियमिततेबाबत . ....198
79 महात्मा ज्योतीबा फुले मार्केट व टिळक मैदान ओटा मार्केट मधील जवळपास 80% गाळे रिक्त असल्याबद्दल ....200
80 चंद्रपूर शहर मनपाने फेरीवाल्यांच्या संदर्भात राष्ट्रीय फेरीवाला धोरण लागु न करण्याबाबतची अनियमितता ....201
81 यांत्रिकी विभागातील वाहनाच्या लॉगबुक मधील अनियमिततेबाबत. ....202
82 कालमर्यादा पुर्ण झालेल्या वाहनावर दुरुस्ती व सुटे भाग यावरील झालेल्या अतिरिक्त खर्चाबाबत. 203

83 शासन निर्णयानुसार अपंग कल्याणाकरिता महसुली उत्पन्नाच्या 3% रक्कम खर्च न करणे तसेच इतर अनियमितते बाबत. ....205
84 चंद्रपूर मनपाच्या नवीन कार्यालयीन इमारतीवर तसेच म.गांधी पुतळा व अशोक स्तंभावर विद्यूत रोषणाई व मंडप सजावट करण्याच्या कामातील अनियमिततेबाबत ....208
85 वैयक्तिक शौचालय बांधकामाचे GEO TAG असलेले फोटो काढून अपलोड करण्याच्या कामातील अनियमिततेबाबत ....209
86 निवडणुकीचे कामाकरिता खरेदी करण्यात आलेल्या स्टेशनरी व लेखनसामग्री खरेदीमधील अनियमितताबाबत. ....211
87 अर्धसमासाच्या अनुषंगाने अभिलेखे/माहिती/खुलासा सादर न करणेबाबत. ....213
88 स्थानिक संस्था कराच्या सन 2016-17 आणि 2017-18 मधील महसुली जमेचे अभिलेखे न मिळण्याबाबत ....215
89 कंत्राटी नागरी पोलिसांमार्फत होत असलेल्या अल्प वसुलीमुळे महानगरपालिकेच्या होणाऱ्या आर्थिक नुकसानीबाबत. ....216
90 मनपा हद्दीतील अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण या विरोधात शासन निर्देशानुसार कार्यवाही न केल्यामुळे होणाऱ्या नुकसानाबाबत ....219
91 स्वच्छता विभागातील फागिंग मशिनच्या परिचलन नोंदवहीतील अनियमिततेबाबत. ....221
92 जैविक कचरा व्यवस्थापन व हाताळणी बाबतच्या अनियमिततेबाबत. ....222
93 अग्निशमन विभागामार्फत शहरातील रुग्णालयाचे फायर ऑडीट प्रमाणपत्र नुतनीकरण न करणे. 223
लेखा परीक्षकनिहाय परिच्छेदांचे विवरणपत्र ....230

**विवरणपत्रे व जोडपत्रे....231**

## विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण

| विभाग | ९अ | ९ब | ९क | ९ड |
|---|---|---|---|---|
| इतर | 10, 11, 12 | 39, 40 | | 84, 85, 86, 87 |
| सामान्य प्रशासन | | | | 58, 59, 60 |
| नगर सचिव | 28 | | | 78 |
| शहर अभियंता किंवा सार्वजनिक बांधकाम | 16, 17, 18, 19, 20, 21, 22, 23 | 44, 45, 46, 47, 48, 49, 50 | | 75 |
| शहर अभियंता आणि विद्युत विभाग | 14, 15 | 42, 43 | | 72 |
| पाणी पुरवठा व मल निसा:रण | | 53, 54 | | |
| लेखा विभाग | 1, 2, 3, 4, 5, 6, 7, 8, 9 | 33, 34, 35, 36, 37, 38 | | 61, 62, 63, 64, 65 |
| नगर रचना | | 56 | | |
| जकात किंवा स्थानिक संस्था कर किंवा उपकर | | | | 88 |
| कर निर्धारण व संकलन | | | | 68, 69, 70, 71 |
| आरोग्य | | 51 | | 77 |
| वाहन विभाग | | | | 81, 82 |
| घन कचरा व्यवस्थापन प्रकल्प | 32 | | | 91, 92 |
| भांडार | | | | 73 |
| परवाना व मंडई विभाग | 29, 30, 31 | 55 | | 79, 80 |
| अनधिकृत बांधकाम प्रतिबंध विभाग | | | | 89, 90 |
| संगणक किंवा माहिती तंत्रज्ञान | 26 | | | |
| शिक्षण विभाग | 13 | | | 66, 67 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| किंवा शिक्षण मंडळ, प्राथमिक शिक्षण मंडळ किंवा माध्यमिक शिक्षण | | | | |
| महिला व बालकल्याण विभाग | 27 | | | |
| क्रिडा विभाग | | | | 76 |
| अग्निशमन विभाग | | 57 | | 93 |
| प्रभाग कार्यालये | | 52 | | |
| उद्यान विभाग | | | | 74 |
| जन्म मृत्यु नोंदणी विभाग | | 41 | | |
| समाज विकास किंवा सामाजिक न्याय विभाग | 24, 25 | | | 83 |

## I Part I :मागील लेखा परीक्षण अहवाल

***चंद्रपुर महानगरपालिका***

**भाग-1**

**(मागील लेखापरीक्षण अहवाल)**

अ)सन 2011-12, 2012-13, 2013-14 व 2014-15 या लेखापरीक्षण अहवालातील एकूण 302 परिच्छेद प्रलंबित असून, प्रलंबित परीच्छेदांची यादी खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | वित्तीय वर्ष | परिच्छेदाचे क्रमांक | एकूण प्रलंबित परिच्छेद |
|---|---|---|---|
| 1 | 2011-12 | 1,2,3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21,22,23,24,25,26,27,28,29,30,31,32,33,34,35,36,37,38,39,40,41,42,43,44,45,46,47,48,49,50,51,52,53,54,55,56,57,58,59,60,61,62,63,64,65,66,67,68,69,70,71,72,73,74,75,76,77,78,79,80,81,82,83 | 83 |
| 2 | 2012-13 | 1,2,3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21,22,23,24,25,26,27,28,29,30,31,32,33,34,35,36,37,38,39,40,41,42,43,44,45,46,47,48,49,50,51,52,53,54,55,56,57,58,59,60,61,62,63,64,65,66,67,68,69,70,71,72,73,74,75,76,77,78,79 | 79 |
| 3 | 2013-14 | 1,2,3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21,22,23,24,25,26,27,28,29,30,31,32,33,34,35,36,37,38,39,40,41,42,43,44,45,46,47,48,49,50,51,52,53,54,55,56,57,58,59,60,61,62,63,64,65,66 | 66 |
| 4. | 2014-15 | 1,2,3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21, 22,23,25,26,27,28,29,30,31,32,33,34,35,36,37,38,39,40,41,42,43, 44,45,46,47,48,49,50,51,52,53,54,55,56,57,58,69,60,61,62,63,64, 65,66,67,68,69,70,71,72,73,74 | 74 |

ब)सन 2015-16 या वित्तीय वर्षातील लेखापरिक्षण अहवालातील प्रलंबित परिच्छेद. (चालू लेखापरीक्षणाचे मागील वित्तीय वर्ष)

| अ. क्र. | परि. क्र. | परिच्छेदाचे शिर्षक | प्रलंबित परिच्छेद / मुद्दे |
|---|---|---|---|
| 1 | 1 | सन 2015-2016 चे मंजूर अर्थसंकल्पातील अनियमितता बाबत. | |
| 2 | 2 | महानगरपालिका चंद्रपूर येथे शासन निर्देशानुसार दुहेरी नोंद लेखापध्दतीने लेखे न ठेवणेबाबत. | |
| 3 | 3 | वार्षिक विवरणपत्रे शासनाकडे व महालेखापाल यांना सादर न केल्याबाबत | |
| 4 | 4 | सन 2015-2016 च्या वार्षिकलेख्यां बाबतची अनियमितता. | |
| 5 | 5 | सन 2015-16 अखेरील अखर्चीत निधी शासनखाती भरणा न करण्याच्या अनियमितते बाबत. | |
| 6 | 6 | रोखपुस्तके बँक ताळमेळसह अदययावत नसणे व इतर | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | अनियमितते बाबत. | |
| 7 | 7 | घसारा निधी स्वतंत्रपणे स्थापन करून त्यामध्ये पुरेशी तरतूद केली नसल्या बाबत. | |
| 8 | 8 | मनपा चंद्रपूर मधील वर्ष 2015-16 च्या मालमत्ता कराच्या थकबाकीबाबत. | |
| 9 | 9 | पठानपूरा गेटजवळील राजीव गांधी उद्यान या बगीच्याचे देखभाल व चालविण्याच्या कामात नवीन निवीदा प्रक्रिया न राबवण्याबाबत व सदर कंत्राटदारकडून फक्त 1% आयकर कपात करण्याबाबत. | |
| 10 | 10 | रोख तसेच मौल्यवान वस्तु हाताळणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून क्षतीपुर्ती बंधपत्र न घेण्याबाबत. | |
| 11 | 11 | भविष्य निर्वाह निधी खात्यातून काढलेल्या परतावा / नापरतावा अग्रीमाची रक्कम वजा न करता व्याजाची गणना केल्याने रु.30,800/- जास्तीचे व्याज दिल्याबाबत. | |
| 12 | 12 | विवाह मंडळाचे नोंदणी शुल्क व प्रमाणपत्राची सत्यप्रत पुरवताना आकारलेल्या शुल्काची रक्कम शासनाकडे जमा न करणे. | |
| 13 | 13 | म.न.पा.चंद्रपूर शहर येथील अधिकारी / कर्मचारी व इतर फर्मला दिलेल्या अग्रिमाबाबत. | |
| 14 | 14 | नवीन परिभाषित योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने योजनेत समाविष्ट कर्मचाऱ्यास वर्षनिहाय जमाचीठ्ठी/अंशदान वार्षिक विवरणपत्र वाटप न करणे तसेच उक्त योजनेचे स्वतंत्र रोखपुस्तक न ठेवण्याच्या अनियमिततेबाबत. | |
| 15 | 15 | महाराष्ट्र नगरपरिषद लेखा साहिंता 2011 मधील तरतूदीनुसार निवृत्तीवेतन प्रदानासंबंधीच्या विहित नमुन्यातील नोंदवहया न ठेवणे व प्रदानांवर उचित नियंत्रण नसल्याने होणाऱ्या अनियमिततेबाबत. | |
| 16 | 16 | महानगरपालिकेला न्यायालयीन प्रकरणामध्ये सेवा देणाऱ्या अधिवक्त्यांच्या शुल्कातून आयकराची उचित दराने कपात न करणे. | |
| 17 | 17 | चंद्रपूर महानगरपालिका येथील बाजार विभागातील धनादेशाची वसुली न केल्याने झालेल्या वित्तहानी बाबत. | |
| 18 | 18 | गाळे भाडयाची रक्कम वसूल केली नसल्याची अनियमितता. | |
| 19 | 19 | निवृत्तीवेतनधारक तसेच कुटुंब निवृत्तीवेतनधारक यांच्या मार्फत सादर करण्यात येणाऱ्या हयातीच्या दाखल्याची तपासणी न करता निवृत्तीवेतनाचे नियमित प्रदान | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | करण्याच्या अनियमिततेबाबत. | |
| 20 | 20 | जन्म-मृत्यू विभागांतर्गत असलेल्या अंत्यविधी अनुदानासंबंधी आढळून आलेल्या अनियमितते बाबत. | |
| 21 | 21 | निवृत्ती वेतनधारकाच्या निवृत्ती वेतनातून आयकर कपात न करणेबाबत. | |
| 22 | 22 | मनपा कर्मचारी यांच्या एकूण वेतनामधून 50% या मर्यादेपेक्षा अधिक सक्तीच्या व ऐच्छिक कपाती करून अत्यल्प प्रमाणात वेतन प्रदान करण्यात येत असल्याबाबत. | |
| 23 | 23 | नवीन खांबाच्या एल.टी.लाईन पथदिव्यासह विद्युतीकरणाच्या कामात प्राकलन मूल्याच्या त्रुटीपुर्ण निर्धारणामुळे झालेल्या अतिरिक्त प्रदानाबाबत. | |
| 24 | 24 | विद्युत देखभाल दुरुस्तीच्या देयकातून आवश्यक कपाती न करणे, वापरलेल्या साहित्य व निकामी साहित्याबाबत उचित नियंत्रण नसणे. | |
| 25 | 25 | भविष्य निर्वाह निधीतील जमा मुदतीठेवी मध्ये गुंतविलेल्या रकमेची नोंद भ.नि.नी. च्या रोखपुस्तकातील एकूण मुदतीठेवी मध्ये नोंद न केल्यामुळे रुपये 1.64 कोटी लेख्याबाहेर असून रोखपुस्तकात तफावत असणे व इतर अनिमीयमितेबाबत. | |
| 26 | 26 | महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) वृक्ष संवर्धन अधिनियम 1975 मधील तरतुदींचे पालन होत नसल्याबद्दल. | |
| 27 | 27 | मनपा चंद्रपूर येथील कार्यरत कर्मचाऱ्याची सेवापुस्तके अद्यावत नसणे तसेच इतर अनियमितता. | |
| 28 | 28 | महानगरपालिका चंद्रपूर येथे द्विनोंद पद्धतीचे लेखे तयार करण्याकरीता सन 2015-2016 मध्ये रु.902613/- निरर्थक खर्च केल्याबाबत. | |
| 29 | 29 | शिक्षण विभागामार्फत शालेय क्रीडा सत्र 2015 -16 या वर्षाकरीता खरेदी करण्यात आलेल्या साहित्य खरेदी प्रक्रियेतील अनियमिततेबाबत. | |
| 30 | 30 | क्रीडा व सांस्कृतिक विभागामार्फत घेण्यात आलेल्या महापौर चषक व सांस्कृतिक कार्यक्रमातील अनियमितताबाबत. | |
| 31 | 31 | सार्वजनिक बाधकाम विभागाने ठेवावयाच्या विविध नोंदवह्यां ठेवल्या नसल्या बाबत. | |
| 32 | 32 | झोन क्र 1 मधील कार्यालयीन इमारतीचे रंगरंगोटीच्या कामामधील अनियमितते बाबत. | |
| 33 | 33 | चंद्रपूर शहरातील रामाळा तलावातील इकॉर्निया वनस्पती काढून तलावाची सफाई करणे कामामधील अनियमितते | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | बाबत. | |
| 34 | 34 | इंदिरानगर प्रभागात विविध ठिकाणी बालोद्यान मध्ये मुलांना खेळण्याचे साहित्य लावण्याचे कामामधील अनियमितता. | |
| 35 | 35 | बिनबा गेट ते रहमतनगर ते महात्मा फुले चौक ते रीव्हेनु कॉलनी पर्यंत कॉक्रीट रोडचे बांधकाम मधील अनियमितता. | |
| 36 | 36 | मनपा हद्दीतील विविध नागरी सुविधांच्या विकास कामांचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करून घेतले नसल्याबाबत. | |
| 37 | 37 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ते मित्रनगर ते आकाशवाणी ते वडगाव रोड पर्यंत कॉक्रीट रोडचे बांधकाम मधील अनियमितता. | |
| 38 | 38 | अंचलेश्वर प्रभागात अंचलेश्वर गेट ते पी.एच.नगर (ताडवन रोड) पर्यंत कॉक्रीट रोडचे बांधकाम मधील अनियमितता. | |
| 39 | 39 | विविध विकास कामाच्या मोजमाप नोंद्वह्यांमधील अनियमितता. | |
| 40 | 40 | जटपुरा प्रभागात श्री रघाताटे ते सवारी बंगला ते महात्मा फुले चौका पर्यंत कॉक्रीट रोडचे बांधकाम मधील अनियमितता. | |
| 41 | 41 | भानापेठ प्रभागामध्ये पोस्ट ऑफिस ते अशोक सम्राट चौक पर्यंत डांबर रस्ता करणे या कामामधील अनियमितता. | |
| 42 | 42 | शास्त्रीनगर प्रभागात तुकूम गुरुद्वारा चौक मधील मेडीकल ते तीर्थरूपनगर पर्यंत डांबरीकरणाचे काम मधील अनियमितता. | |
| 43 | 43 | विविध शासन निधीच्या विकास कामाच्या बांधकामासाठी नेमलेल्या देखरेख सल्लागाराच्या मानधनावरील खर्चा बाबत. | |
| 44 | 44 | चंद्रपूर शहर मनपा मधील बांधकाम विभागातील विविध बांधकामातील सर्वसाधारण अनियमितता. | |
| 45 | 45 | चंद्रपूर शहराची पाणीपुरवठा योजना मे. उज्वल कॅन्सट्रकशन कंपनीला बी.ओ.टी. तत्वावर देण्याच्या करारातील अनियमितता. | |
| 46 | 46 | चंद्रपूर शहर पंचशताब्दी योजना अंतर्गत पाईपलाईन टाकण्याच्या कामातील अनियमितता बाबत. | |
| 47 | 47 | घनकचरा संकलन व घनकचरा वाहतुकीच्या निविदेतील व देयकातील अनियमितता बाबत. | |
| 48 | 48 | जैवीक कचरा विल्हेवाट बाबीची अनियमिततेबाबत . | |
| 49 | 49 | जैविक विविधता व्यवस्थापन समिती स्थापना न करण्याबाबत. | |

| | | | |
|---|---|---|---|
| 50 | 50 | चंद्रपूर शहर मनपाने फेरीवाल्यांच्या संदर्भात राष्ट्रीय फेरीवाला धोरण लागु न करण्याबाबतची अनियमीतता. | |
| 51 | 51 | विदयुत शुल्क माफ असताना विदयुत शुल्कासह देयके अदा केल्यामुळे झालेल्या निधीच्या नुकसानी बाबत. | |
| 52 | 52 | महानगरपालिका चंद्रपूर स्थायी समितीची सभा बैठक इतिवृत्त् अवलोकन करताना आढळलेल्या अनियमितताबाबत. | |
| 53 | 53 | शासन निर्णयानुसार महिला व बालकल्याण कार्यक्रम राबविण्यासाठी महसुली उत्पन्नाच्या 5% या विहित प्रमाणात खर्च न करणे. | |
| 54 | 54 | चंद्रपूर महानगरपालिका कर विभागाचे कोअर प्रोजेक्ट कंपनी सोबत झालेल्या करार नाम्यातील आढळून आलेल्या अनियामिततेबाबत. | |
| 55 | 55 | वैयक्तिक शौचालय योजनेवरील प्राप्त निधीपैकी फक्त 12 टक्के निधी खर्च करून उर्वरित शासन निधी विनाकारण अडकवून ठेवणे तसेच इतर अनियमिततेबाबत. | |
| 56 | 56 | मनपा चंद्रपूर येथील मार्च 2016 उपविभाग क्र.1 च्या थकीत वीज बिलाच्या रक्कमेपोटी झालेल्या अतिप्रदानाबाबत. | |
| 57 | 57 | चंद्रपूर महानगर पालिकेच्या अधिनस्त सर्व प्राथमिक/माध्यमिक शाळांना, शाळा देखभाल दुरुस्तीकरीता पंचायत समितीकडून प्राप्त होत असलेल्या अनुदानाबाबत. | |
| 58 | 58 | संगणक विभागातील अनुषंगिक अभिलेखे व दस्तावेज लेखा परीक्षणास उपलब्ध न करण्याबाबत. | |
| 59 | 59 | वैद्यकीय प्रतिपूर्ती देयकासोबत आवश्यक दस्ताऐवज व प्रमाणपत्रे जोडली नसताना प्रतिपूर्ती देयकाची रक्कम प्रदान करणे तसेच इतर अनियमितता असणेबाबत. | |
| 60 | 60 | मनपा चंद्रपूर अंतर्गत नागरी आरोग्य केंद्रातील बाह्यरुग्ण नोंदवही (OPD Ragister) मधील अनियमिततेबाबत तसेच औषध साठा व पुरवठा नोंदवही लेखापरीक्षणास सादर न केल्याबाबत. | |
| 61 | 61 | चंद्रपूर महानगरपालिका येथील बाजार विभागातील अनादरीत धनादेशाची वसुली न केल्याने झालेल्या नुकसाणीबाबत. | |
| 62 | 62 | मोकाट जनावरे उपद्रव प्रतिबंधन अंतर्गत उज्वल गौरक्षण संस्थेला दिलेल्या कामातील वसूल दंड जमा करण्याच्या अनियमिततेबाबत. | |
| 63 | 63 | मनपा चंद्रपूर मधील विविध विभागात जडवस्तू संग्रह नोंदवही | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | विहित नमुन्यात तसेच अद्‌यावत नसल्याबाबत. | |
| 64 | 64 | मनपा चंद्रपूर यांनी अपंग नोंदणी रजिस्टर न ठेवण्याबाबत. | |
| 65 | 65 | मनपा चंद्रपूर येथील लेख्याची छाननी व लेखापरीक्षण न होण्याबाबत . | |
| 66 | 66 | सुरक्षा गार्डचा पुरवठा करणाऱ्या कंत्राटदाराचे मंजूर दर हे सेवा करासह असताना देयकात पुन्हा सेवा कराची रक्कम प्रदान केल्याने अतिप्रदान तसेच इतर अनियमिततेबाबत. | |
| 67 | 67 | महानगरपालिकेतील वाहनाचे लागबुक, इतिहास बुक(History book) आणि घसारा आकारणी नोंदवही अद्‌यावत नसणेबाबत. | |
| 68 | 68 | महात्मा गांधी व हुतात्मा स्मारक या दोन्ही वाचनालयामधील वाचन साहित्य खरेदी व इतर अनियमितताबाबत. | |
| 69 | 69 | स्थानिक स्वराज्य संस्था करासाठी नोंदणीकृत व्यापाऱ्याकडून वार्षिक विवरणपत्र मुदतीत प्राप्त न झाल्याने शास्तीची वसुली करण्याबाबत. | |
| 70 | 70 | BRGF निधी अंतर्गत श्रीकृष्ण टॉकिज ते बँक ऑफ़ इंडीया पर्यंत कॉक्रीट रस्ता विकसित करणे कामातील अनियमितता. | |
| 71 | 71 | नगर रचना विभाग- बांधकाम परवानगी, अभिन्यास परवानगी व इतर बाबत आक्षेप. | |

**पुनर्विलोकन अहवालामध्ये समाविष्ट परीच्छेदांचा तपशील**

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेख्यावरील लेखापरिक्षण पुनर्विलोकन अहवालामध्ये समाविष्ट परीच्छेदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | लेखापरिक्षण वर्ष | परिच्छेद क्र. | एकूण |
|---|---|---|---|
| 1. | 2011-12 | 17(2.319), 20(2.320), 25(2.321), 60(2.322), 57(2.324) | 05 |
| 2. | 2012-13 | 16(2.416),18(2.417),21(2.418),22(2.419), 27(2.420),41(2.421) तक्तांकन परि.क्र.2(2.422),14(2.423),15(2.425) | 09 |
| 3. | 2013-14 | 01,04,07,08,09,14,15,21,23,27,35,43,,38 | 13 |

# Part II

## *चंद्रपुर महानगरपालिका*

## भाग एक

## गंभीर अनियमितता

## कलम ९ अ, ब, क खालील आक्षेप

# कलम ९ अ खालील आक्षेप

लेखापरीक्षकाच्या दृष्टीने जे प्रदान कायद्याविरुद्ध आहे असे प्रत्येक प्रदान

## *1 मनपा चंद्रपूर येथील सन 2016-17 मधील मंजुर अर्थसंकल्पावरील अभिप्राय व आर्थिक स्थितीबाबत.*

**ACCOUNT DEPARTMENT**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 9**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

चंद्रपूर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने सुधारणा व दुरुस्त्या करून सन 2016-17 करिताचा मुळ अर्थसंकल्प जमा रक्कम रु. 400,27,07,889 व खर्च रक्कम रु.399,68,70,000 सह शिल्लक रक्कम रु.58,37,889 या अर्थसंकल्पास मंजुरी प्रदान केली आहे. अर्थसंकल्पीय अंदाज तयार करतांना वर्ष 2016-17 चे मूळ अर्थसंकल्पीय, सुधारित अर्थसंकल्प व प्रत्यक्ष जमा खर्चाच्या रक्कमा पाहता अर्थसंकल्प तयार करतांना प्रत्यक्ष अपेक्षित जमा व त्या आधारावर खर्च रकम मोठया प्रमाणावर वाढवून दाखविण्यात आल्या. परंतु प्रत्यक्ष जमा व खर्च फारच कमी दिसून येते. विशेष राखीव निधी तसेच सामाजिक घटकांच्या कल्याणसाठी करावयाच्या तरतुदीकडे दुर्लक्ष केले आहे. वर्ष अखेर मोठया प्रमाणावर शिल्लक जमा असून त्यामध्ये शासकीय अनुदानाच्या अखर्चित निधीचा समावेश असला तरी मनपाची वर्ष अखेर आर्थिक स्थिती असमानधारक नसल्याचे दिसून येते. परंतु मोठया प्रमाणावरील शासकीय अखर्चित निधी खर्च करण्याबाबत अपेक्षित कार्यवाही करण्यात आली नाही.

मनपाचा अर्थसंकल्प हा पुढील वर्षातील अपेक्षित खर्च व तो भागविण्यासाठी आवश्यक स्त्रोताच्या नियोजनाचा आराखडा असून त्यामध्ये भांडवली व महसुली स्वरूपाचे अपेक्षित जमा व खर्च या समावेश असतो. त्यामुळे तो मनपाच्या सर्व प्रकारच्या वित्तीय कार्यवाहीमध्ये अर्थसंकल्प महत्वाचा दस्तावेज समजला जातो. यासंबंधीच्या मार्गदर्शक तरतुदी राष्ट्रीय महानगरपालिका लेखा नियमावलीच्या प्रकरण 33 मध्ये विस्तृतपणे मांडण्यात आल्या आहेत.

मनपा चंद्रपूर येथील वर्ष 2016-17 या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणात मंजूर अर्थसंकल्पाचे अवलोकन केले असता मा. आयुक्त चंद्रपूर महानगरपालिका यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 95 नुसार सन 2016-17 चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाज स्थायी समितीस सादर केले. स्थायी समितीने दि. 17/2/2016 ठराव क्र. 315 नुसार सर्वसाधारण सभेसमोर सादर केला. महानगरपालिका चंद्रपूर यांच्या सर्वसाधारण सभेत विचार

विनिमय करून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 100 प्रमाणे दि. 25/02/2016 रोजी विशेष अर्थसंकल्पीय सर्वसाधारण सभा ठराव क्र. 74 नुसार सन 2016-17 करिताचा मागील शिल्लक रु.107,86,40,889/- व जमा रक्कम रु.292,40,67,000/- असे एकूण रु. 400,27,07,889/- जमा व खर्च रक्कम रु.399,68,70,000/- सह अखेरची शिल्लक रु.58,37,889/- या अर्थसंकल्पास मंजुरी प्रदान करण्यात आली.

चंद्रपूर महानगरपालिकेच्या सन 2016-17 या वित्तीय वर्षासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम 96 व 100 नुसार सर्वसाधारण सभेने मंजूर केलेले 2016-17 चा सुधारित अर्थसंकल्पीय प्रत्यक्ष जमा खर्चाच्या रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

वर्ष 2016-17 चा प्रत्यक्ष व अंदाजे जमा खर्च

(रुपये कोटीत)

| बाब | अंदाज जमा/खर्च | प्रत्यक्ष जमा /खर्च |
|---|---|---|
| प्रारंभीक शिल्लक | 107,86,40,889 | 169,18,33,783 |
| जमा भाग -1 | -- | -- |
| एकूण महसुली उत्पन्न | 176,71,50,000 | 31,64,40,408 |
| शासकीय योजना (भांडवली अनुदाने) | 98,36,17,000 | 141,19,77,994 |
| एकूण भाग-1 | 275,07,67,000 | 172,84,18,402 |
| बाब | अंदाज जमा/खर्च | प्रत्यक्ष जमा /खर्च |
| भाग 2 कर्ज व भांडवली उत्पन्न | 3,01,00,000 | -- |
| भाग 3 असाधारण ऋण | 14,32,00,000 | -- |
| एकूण भाग 1,2,3 | 292,40,67,000 | 172,84,18,402 |
| एकूण जमा सुरुवातीच्या शिल्लकेसह | 400,27,07,889 | 342,02,52,185 |

खर्च

| | | |
|---|---|---|
| भाग-1 महसुली खर्च | 121,29,70,000 | 101,59,58,364 |
| भाग-2 भांडवली खर्च | 262,79,00,000 | 49,65,41,413 |
| भाग-3 असाधारण खर्च | 156,00,000 | 129,05,108 |
| एकूण खर्च भाग 1,2,3 | 399,68,70,000 | 152,54,04,885 |
| अखेरची शिल्लक | 58,37,889 | 189,48,47,300 |

अंदाजपत्रकामध्ये दर्शविलेली प्रत्यक्ष अखेरची शिल्लक 194,99,85,544

यावरील अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) अर्थसंकल्पीय अंदाज तयार करतांना सन 2016-17 चे मूळ अर्थसंकल्प, सुधारित अर्थसंकल्प व प्रत्यक्ष जमा व खर्चाच्या रकमा पाहता अर्थसंकल्प तयार करतांना प्रत्यक्ष अपेक्षित जमा रक्कमा व त्या आधारावर खर्च रकम मोठया प्रमाणात वाढवून दाखविण्यात आल्या आहेत. परंतु प्रत्यक्ष खर्चाचे प्रमाण मात्र फारच कमी दिसून येते.

वर्ष 2016-17 मध्ये अंदाजपत्रकीय जमा रक्कमा रु. 400.27 कोटी व अंदाजपत्रकीय खर्च 399.68 कोटी दाखविण्यात आला मात्र प्रत्यक्ष खर्च रु. 152.54 कोटी आहे.

2) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 2011 चे नियम 26 अन्वये व स्थायी निर्देश परिपत्रक क्र. नपसु/प्रक्र24/2000 1/दि.13-10-2020 नुसार अर्थसंकल्पीय अदांजपत्रक तयार करतांना महानगरपालिकेचे प्रत्यक्ष उत्पन्नाचे व प्रत्यक्ष खर्चाचे अंदाज मागील तीन वर्षाच्या उत्पन्न व खर्चाच्या सरासरीवर आधारित असावयास पाहिजे. मागील तीन वर्षाच्या प्रत्यक्ष जमा व प्रत्यक्ष खर्च याबाबत आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | सन | प्रत्यक्ष जमा | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|---|
| 1 | 2013-14 | 162,26,37,998 | 86,91,40,930 |
| 2 | 2014-15 | 117,44,21,583 | 132,59,26,352 |
| 3 | 2015-16 | 207,85,41,478 | 99,98,15,057 |

वरीलप्रमाणे मागील तीन वर्षाची आकडेवारी व सन 2016-17 ची प्रत्यक्ष जमा व खर्च पाहता मूळ व सुधारित अर्थसंकल्प तयार करतांना शासनाच्या निर्देशाप्रमाणे कार्यवाहीचा अवलंब करून अर्थसंकल्पीय अंदाज तयार केल्याचे दिसून येत नाही.

3) मुंबई अर्थ संकल्पीय नियम पुस्तिकेच्या कलम 31 नुसार कर व शुल्क इत्यादीची आकारणी प्रचलित किंवा

सुधारित मान्य दरानुसार गृहीत धरून अपेक्षित जमेचे अंदाजपत्रकात समावेश होणे अपेक्षित आहे. त्यानुसार मनपा कर व दर या अंतर्गत रु.58.76 कोटी अंदाज वर्तविण्यात आला होता. परंतु त्या सदराखाली प्रत्यक्ष जमा रु.25.38 कोटी म्हणजे अंदाजपेक्षा 50% पेक्षाही कमी प्रत्यक्ष जमा झाल्याचे दिसुन येते.

4) इतर मिळकतीचे उत्पन्नही अंदाजपेक्षा बरेच कमी मिळाले असल्याचे अंदाजपत्रकावरून दिसुन येते.

5) मनपाच्या मालमत्तेतून मिळकती पासूनच्या उदा. वाढीव चटईक्षेत्र, गुंठेवारी, विकास शुल्क, इत्यादीबाबत अंदाजपत्रकानुसार 14 कोटी उत्पन्न अपेक्षित असतांना केवळ 2.73 कोटी महसूल जमा झाला. यामध्ये नगररचना विभागाकडील वसुली अत्यल्प आहे.

(रक्कम कोटीत)

| बाब | अंदाजीत जमा होणारी रक्कम | प्रत्यक्ष जमा |
|---|---|---|
| गुंठेवारी | 5.00 | -- |
| वाढीव चटई क्षेत्र | 5.00 | 0.39 |
| विकास शुल्क | 4.00 | 2.34 |
| एकूण | 14.00 | 2.73 |

6) नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. GEN-1093/325/प्रक्र24-नवी-32, दिनांक 17/04/1993 नुसार महिला व बाल कल्याणकारी 5 टक्के अर्थसंकल्पाच्या निधी राखीव ठेवणे आवश्यक असतांना अशा प्रकारची कार्यवाही करण्यात आली नाही.

7) नगर विकास विभागाने शासन निर्णय क्र. GEN-1655/प्रक्र 46/325/न.वि.-33 दि. 14/02/2002 नुसार अपंगासाठी 3% अर्थ संकल्पात तरतूद करणे आवश्यक आहे. असे असतांना अर्थसंकल्पात विविध घटकांच्या विकासासाठी नगण्य तरतूद केली असुन त्यातुन केलेला खर्च त्याहूनही कमी आहे.

8) नगर विकास विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक 14200/2264/प्रक्र-144/नवि-24, दिनांक 26/02/2001 नुसार आर्थिक दुर्बल घटकाकरिता 5% राखीव ठेवणे आवश्यक आहे.

9) राखीव निधी व वृक्ष संवर्धन निधी मधील तरतुदीकरिता आवश्यक निधी जमा करण्यात आला नाही.

आर्थिक स्थिती

अंदाजपत्रकातील आकडेवारीनुसार वर्ष 2016-17 अखेर मनपाकडे रु.189.48 कोटी एवढी रक्कम शिल्लक दिसत असली तरी विविध शासकीय अनुदानाच्या अखर्चित रक्कमाचा त्यात मोठया प्रमाणात समावेश आहेत. सदर

अखर्चित रकमा बँकामध्ये विविध गुंतवणुकीच्या स्वरुपात जमा आहेत. वर्ष 2016-17 मध्ये अंदाजापेक्षा अतिशय कमी प्रमाणात मनपा कर तसेच इतर मिळकतीचे उत्पन्न प्राप्त झाले. प्राप्त अनुदानात जास्त भर पडल्यामुळे व मागील वर्षाची शिल्लक मोठया प्रमाणात असल्यामुळे प्रत्यक्ष जमा होणाऱ्या रकमेत वाढ झाली. परंतु त्या तुलनेत महसुली व भांडवली खर्चाचे प्रमाण कमी असल्यामुळे त्या वर्षात अखेर रु.189.48 कोटी येवढी मोठी रक्कम अखेरची शिल्लक होती.

शासकीय अनुदानाच्या अखर्चित रकमा मोठया प्रमाणात शिल्लक असल्यामुळे त्या वर्षात बरीच विकासाची कामे करून अनुदान खर्ची पडू शकले असते परंतु याबाबत अपेक्षित कार्यवाही करण्यात आली नाही.

याबाबत अर्धसमास पत्र क्र.133 दिनांक 10/02/2021 नुसार अन्वये खुलासा विचारला असता कोणताही खुलासा उपलब्ध झाला नाही. तरी उपरोक्त मुद्दा क्रमांक 1 ते 9 बाबतचे अनुपालन सादर करावे.

DATVVBM6301 (Ref No : 57, Hmm No : 133)

## *2 मनपा चंद्रपूर येथील सन 2017-18 मधील मंजुर अर्थसंकल्पावरील अभिप्राय व आर्थिक स्थितीबाबत.*

**ACCOUNT DEPARTMENT**
**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**
**अनियमितता संख्या : 10**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व-निधी व शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

चंद्रपूर महानगरपालिकेला सर्वसाधारण सभेने सुधारणा व दुरुस्त्या करून सन 2017-18 करिताचा मूळ अर्थसंकल्प जमा रक्कम रु. 388,63,19,783 व खर्च रक्कम रु. 388,43,20,000 सह शिल्लक रक्कम रु.19,99,783 या अर्थसंकल्पास मंजुरी प्रदान करण्यात आली. अर्थसंकल्प तयार करतांना वर्ष 2017-18 चे मूळ अर्थसंकल्प, सुधारित अर्थसंकल्प व प्रत्यक्ष जमा व खर्चाच्या रकमा पाहता या मध्ये मोठया प्रमाणावर तफावत दिसून येते. मनपाने जुन्याच पध्दतीने singal entry पध्दतीने लेखे ठेवले आहेत. सदर लेख्यावरून वर्ष 2017-18 चा अर्थ संकल्प तयार केला आहे. मनपाने अंदाजपत्रक तयार करतांना विशेष/राखीव निधी, घसारा निधी तसेच विशिष्ट सामाजिक घटकांच्या कल्याणसाठी करावयाच्या तरतुदीकडे दुर्लक्ष केले आहे. वर्ष अखेर मोठ्या प्रमाणावर शिल्लक जमा असून त्यामध्ये शासकीय अनुदानाच्या अखर्चित निधीचा समावेश आहे. मोठया प्रमाणावर अखर्चित निधी शिल्लक असल्यामुळे मनपाची आर्थिक स्थिती कमकुवत नसल्याचे चित्र आहे. परंतु शासकीय अखर्चित निधी खर्च करण्याबाबत अपेक्षित कार्यवाही करण्यात आली नाही.

मनपाचा अर्थसंकल्प हा पुढील वर्षातील अपेक्षित खर्च व तो भागविण्यासाठी आवश्यक स्त्रोताच्या नियोजनाचा आराखडा असून त्यामध्ये भांडवली व महसुली स्वरूपाचे अपेक्षित जमा व खर्चचा समावेश असतो. त्यामुळे मनपाच्या सर्व प्रकारच्या वित्तीय कार्यवाहीमध्ये अर्थसंकल्प महत्वाचा दस्तावेज समजला जातो. यासंबंधीच्या मार्गदर्शक तरतुदी राष्ट्रीय महानगरपालिका लेखा नियमावलीच्या प्रकरण 33 मध्ये विस्तृतपणे मांडण्यात आल्या आहेत.

मनपा चंद्रपूर येथील वर्ष 2017-18 या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणात मंजूर अर्थसंकल्पाचे अवलोकन केले असता मा. आयुक्त चंद्रपूर महानगरपालिका यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 95 नुसार सन 2017-18 चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाज स्थायी समितीस सादर केले. स्थायी समितीने दि. 04/03/2017 ठराव क्र. 212 नुसार शिफारशीसह विशेष अर्थसंकल्पीय सर्वसाधारण सभेसमोर सादर केला. महानगरपालिका चंद्रपूर यांच्या सर्वसाधारण सभेत विचार विनिमय करून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 100 प्रमाणे दि. 22/06/2017 रोजी विशेष अर्थसंकल्पीय सर्वसाधारण सभा ठराव क्र. 9 नुसार सन 2017-18 करिताचा मागील शिल्लक रु.8,19,783/- व जमा रक्कम रु.388,55,00,000/- असे एकूण रु. 388,63,19,783/- जमा व खर्च रक्कम रु.388,43,20,000/- सह अखेरची शिल्लक रु.19,99,783/- या अर्थसंकल्पास मंजुरी प्रदान करण्यात आली.

चंद्रपूर महानगरपालिकेच्या सन 2017-18 या वित्तीय वर्षासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम 96 व 100 नुसार सर्वसाधारण सभेने मंजूर केलेले 2017-18 चे मूळ वार्षिक अंदाजपत्रकामध्ये प्रत्यक्ष जमा खर्चाच्या रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

वर्ष 2017-18 चा प्रत्यक्ष व अंदाजे जमा खर्च

(रुपये कोटीत)

| बाब | अंदाज जमा/खर्च | प्रत्यक्ष जमा /खर्च |
|---|---|---|
| प्रारंभीक शिल्लक | 8,19,783 | 259,18,95,917 |
| जमा भाग -1 | -- | -- |
| एकूण महसुली उत्पन्न | 87,24,30,000 | 30,72,05,119 |
| शासकीय योजना (भांडवली अनुदाने) | 282,96,70,000 | 210,81,17,446 |
| एकूण भाग-1 | 370,21,00,000 | 241,53,22,565 |

| | | |
|---|---|---|
| भाग 2 कर्ज व भांडवली उत्पन्न | 2,02,00,000 | -- |
| भाग 3 असाधारण ऋण | 16,32,00,000 | 21,96,14,384 |
| एकूण भाग 1,2,3 | 388,55,00,000 | 263,49,36,949 |
| एकूण जमा सुरुवातीच्या शिल्लकेसह | 388,63,19,783.00 | 522,68,32,866.00 |

खर्च

| | | |
|---|---|---|
| भाग-1 महसुली खर्च | 133,64,70,000 | 86,31,11,645 |
| भाग-2 भांडवली खर्च | 225,88,50,000 | 84,88,71,549 |
| भाग-3 असाधारण खर्च | 28,90,00,000 | 19,98,97,586 |
| एकूण खर्च भाग 1,2,3 | 388,43,20,000 | 191,18,80,780 |
| सुरुवातीची शिल्लक धरून एकूण जमा | 388,63,19,783 | 522,68,32,866 |
| अखेरची शिल्लक | 19,99,783 | 331,49,52,080 |

यावरील अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1. अर्थसंकल्पीय अंदाज तयार करतांना सन 2017-18 चे मूळ अर्थसंकल्प, सुधारित अर्थसंकल्प व प्रत्यक्ष जमा व खर्चाच्या रकमा पाहता अर्थसंकल्प तयार करतांना प्रत्यक्ष अपेक्षित जमा रक्कमा व त्या आधारावर खर्च रक्कम मोठया प्रमाणात वाढवून दाखविण्यात आल्या आहेत. परंतु प्रत्यक्ष खर्चाचे प्रमाण मात्र फारच कमी दिसून येते.

वर्ष 2017-18 मध्ये अंदाजपत्रकीय जमा रक्कमा रु. 388.55 कोटी व अंदाजपत्रकीय खर्च 388.63 कोटी दाखविण्यात आला मात्र प्रत्यक्ष खर्च रु. 191.18 कोटी आहे.

2. महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 2011 चे नियम 26 अन्वये व स्थायी निर्देश परिपत्रक क्र. नपसु/प्रक्र24/2000 1/दि.13-10-2020 नुसार अर्थसंकल्पीय अदांजपत्रक तयार करतांना महानगरपालिकेचे प्रत्यक्ष उत्पन्नाचे व प्रत्यक्ष खर्चाचे अंदाज मागील तीन वर्षाच्या उत्पन्न व खर्चाच्या सरासरीवर आधारित असावयास पाहिजे. मागील तीन वर्षाच्या प्रत्यक्ष जमा व प्रत्यक्ष खर्च याबाबत आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | सन | प्रत्यक्ष जमा | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|---|
| 1 | 2014-15 | 117,44,21,583 | 132,59,26,352 |
| 2 | 2015-16 | 207,85,41,478 | 99,98,15,057 |
| 3 | 2016-17 | 172,84,18,402 | 152,54,04,885 |

वरीलप्रमाणे मागील तीन वर्षाची आकडेवारी व सन 2017-18 ची प्रत्यक्ष जमा व खर्च पाहता मूळ व सुधारित अर्थसंकल्प तयार करतांना शासनाच्या निर्देशाप्रमाणे कार्यवाहीचा अवलंब करून अर्थसंकल्पीय अंदाज तयार केल्याचे दिसून येत नाही.

3. महानगरपालिकेचे उत्पन्नाचे महत्वाचे साधन म्हणजे मालमत्ता कर आहे. महानगरपालिकेचे कर व दर या बाबीची मालमत्ता करापोटी अर्थसंकल्पात एकूण रु.57.96 कोटी वसुलीचे उदिष्ट असतांना प्रत्यक्षात मात्र रु.20.61 कोटी जमा झाले म्हणजे अंदाजापेक्षा 50% पेक्षाही कमी प्रत्यक्ष जमा झाल्याचे दिसून येते.

4. इतर मिळकतीचे उत्पन्नही अंदाजपेक्षा बरेच कमी मिळाले असल्याचे अंदाजपत्रकावरून दिसुन येते.

5. मनपाच्या मालमत्तेतून मिळकती पासूनच्या उदा. वाढीव चटईक्षेत्र, गुंठेवारी, विकास शुल्क, इत्यादीबाबत अंदाजपत्रकानुसार 9 कोटी उत्पन्न अपेक्षित असतांना केवळ 1.16 कोटी महसूल जमा झाला. यामध्ये नगररचना विभागाकडील वसुली अत्यल्प आहे.

(रक्कम कोटीत)

| बाब | अंदाजीत जमा होणारी रक्कम | प्रत्यक्ष जमा |
|---|---|---|
| गुंठेवारी | 2.00 | -- |
| वाढीव चटई क्षेत्र | 3.00 | 0.26 |
| विकास शुल्क | 4.00 | 0.90 |
| एकूण | 9.00 | 1.16 |

6. नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. GEN-1093/325/प्रक्र24-नवी-32, दिनांक 17/04/1993 नुसार महिला व बाल कल्याणकारी 5 टक्के अर्थसंकल्पाच्या निधी राखीव ठेवणे आवश्यक असतांना अशा प्रकारची कार्यवाही करण्यात आली नाही.

7. नगर विकास विभागाने शासन निर्णय क्र. GEN-1655/प्रक्र 46/325/न.वि.-33 दि. 14/02/2002 नुसार अपंगासाठी 3% अर्थसंकल्पात तरतूद करणे आवश्यक आहे. असे असतांना अर्थसंकल्पात विविध घटकांच्या विकासासाठी नगण्य तरतूद केली असुन त्यातुन केलेला खर्च त्याहूनही कमी आहे.

8. नगर विकास विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक 14200/2264/प्रक्र-144/नवि-24, दिनांक 26/02/2001 नुसार आर्थिक दुर्बल घटकाकरिता 5% राखीव ठेवणे आवश्यक आहे.

9. राखीव निधी व वृक्ष संवर्धन निधी मधील तरतुदीकरिता आवश्यक निधी जमा करण्यात आला नाही.

10. वर्ष 2017-18 च्या अंदाजपत्रकामध्ये वर्षाचे सुरुवातीची प्रत्यक्ष शिल्लक रु.2.59 कोटी येवढी असल्याचे नमूद आहे. परंतु वर्ष 2016-17 मात्र अखेरची प्रत्यक्ष शिल्लक रु.1.94 कोटी दर्शविण्यात आली आहे. प्रत्यक्ष असलेली अखेरची शिल्लक व पुढील वर्षीच्या प्रारंभिक शिल्लकमध्ये रु. 0.65 कोटीची तफावत दिसून येते.

आर्थिक स्थिती

अंदाजपत्रकातील आकडेवारीनुसार वर्ष 2017-18 अखेर मनपाकडे रु.331.49 कोटी एवढी रक्कम शिल्लक दिसत असली तरी विविध शासकीय अनुदानाच्या अखर्चित रक्कमाचा त्यात मोठया प्रमाणात समावेश आहेत. सदर अखर्चित रकमा बँकामध्ये विविध गुंतवणुकीच्या स्वरुपात जमा आहेत. वर्ष 2017-18 मध्ये अंदाजापेक्षा अतिशय कमी प्रमाणात मनपा कर तसेच इतर मिळकतीचे उत्पन्न प्राप्त झाले. प्राप्त अनुदानात जास्त भर पडल्यामुळे व मागील वर्षाची शिल्लक मोठया प्रमाणात असल्यामुळे प्रत्यक्ष जमा होणाऱ्या रकमेत वाढ झाली. परंतु त्या तुलनेत महसुली व भांडवली खर्चाचे प्रमाण कमी असल्यामुळे त्या वर्षात अखेर रु.331.49 कोटी येवढी मोठी रक्कम अखेरची शिल्लक दिसून आली.

शासकीय अनुदानाच्या अखर्चित भांडवली अनुदानाच्या रकमा मोठया प्रमाणात शिल्लक असल्यामुळे त्या वर्षात बरीच विकासाची कामे करून अनुदान खर्ची पडू शकले असते परंतु याबाबत अपेक्षित कार्यवाही करण्यात आली नाही.

शासकीय भांडवली अनुदान मोठया प्रमाणात शिल्लक असल्यामुळे मनपा ची आर्थिकस्थिती कमकुवत नसल्याचे चित्र आहे. परंतु शासकीय अनुदानावर अवलंबुन न राहता मनपाचे आपले स्व:ताचे उत्पन्न वाढविण्याकरिता प्रयत्न करणे आवश्यक आहे.

याबाबत अर्धसमास पत्र क्र.144 दिनांक 16/02/2021 नुसार अन्वये खुलासा विचारला असता कोणताही खुलासा उपलब्ध झाला नाही. तरी उपरोक्त मुद्दा क्रमांक 1 ते 10 बाबतचे अनुपालन सादर करावे.

DATVVBM6301 (Ref No : 66, Hmm No : 144)

## *3 चंद्रपूर शहर मनपाचे लेखे दुहेरी नोंद पद्धतीने न ठेवणेबाबत.*

**लेखा विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**
**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :7 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

परिच्छेदमहाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.लेखासं-10/2004/71/प्र.क्र.5/04/नवि-31,दिनांक 6.7.2005 नुसार स्थानिक स्वराज्य संस्थांचे लेखे दुहेरी नोंद पध्दतीने (Accrual Based Double Entry Accounting System) ठेवण्याबाबत सुधारणात्मक बाब म्हणून आदेशीत केले आहे. तथापि, महानगरपालिका चंद्रपूर येथे दुहेरी नोंद पद्धतीने लेखे ठेवण्यात आलेले नाहीत.

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.लेखासं-10/2004/71/प्र.क्र.5/ 04/नवि-31, दिनांक 6.7.2005 नुसार स्थानिक स्वराज्य संस्थांचे लेखे दुहेरी पध्दतीने (Accrual Based Double Entry Accounting System) ठेवण्याबाबत आदेशीत केले आहे. सदर नोंदवहया राष्ट्रीय महानगरपालिका लेखा नियम पुस्तिका (NMAM) मधील विहीत नमुन्यात ठेवणे आवश्यक आहे. परंतु मनापा चंद्रपूर येथे खालील नोंदवहया विहीत नमुन्यात ठेवण्यात आलेल्या नाहीत.

| Sr.No. | CONTENTS | FORM |
|---|---|---|
| 1 | Cash Book | GEN-1 |
| 2 | Journal Book | GEN-2 |
| 3 | Ledger | GEN-3 |
| 4 | Cash Bank Receipt voucher | GEN-4 |
| 5 | Cash bank payment voucher | GEN-5 |
| 6 | Contra voucher | GEN-6 |
| 7 | Journal voucher | GEN-7 |
| 8 | Receipt | GEN-8 |

| | | |
|---|---|---|
| 9 | Receipt register | GEN-9 |
| 10 | Statement on status of cheque received | GEN-10 |
| 11 | Collection register | GEN-11 |
| 12 | Summary of daily collection | GEN-12 |
| 13 | Registers of bills for payments | GEN-13 |
| 14 | Payment order | GEN-14 |
| 15 | Cheque issue register | GEN-15 |
| 16 | Register of advance | GEN-16 |
| 17 | Register of permanent advance | GEN-17 |
| 18 | Deposit register | GEN-18 |
| 19 | Summary statement of deposits adjusted | GEN-19 |
| 20 | Demand Register | GEN-20 |
| 21 | Bill of hellip;hellip;hellip;..income | GEN-21 |
| 22 | Summary statement of bills raised | GEN-22 |
| 23 | Register of notice fee, warrants fees, other fee | GEN-23 |
| 24 | Summary statement of notice fee, warrants fees, other fee | GEN-24 |
| 25 | Register of refunds, remissions and write off | GEN-25 |
| 26 | Summary statement refunds and remissions | GEN-26 |
| 27 | Summary statement write ndash; off | GEN-27 |
| 28 | Statement of outstanding liability for expenses | GEN-28 |
| 29 | Documents control register + stock account of receipt / cheque book | GEN-29 |

उपरोक्त शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनांनुसार दुहेरी नोंद लेखा पध्दत अंमलबजावणीसाठी राज्य विनिर्दिष्ट लेखा संहिता तयार होईपर्यंत राष्ट्रीय लेखा नियम पुस्तिकेतील तत्वांना बाधा न आणता नगर विकास संचालनालयातील लेखा सुधारणा कक्षाचे पूर्ण संमतीने आवश्यक असल्यास त्यात किरकोळ बदल करणे व त्या अनुसार कोडींग पध्दतीचा वापर करणे अनिवार्य केले असून वार्षिक अंदाजपत्रक, ताळेबंद व

Income and Expenditure Statement हे उपरोक्त सुचनेनुसार ठेवणे गरजेचे आहे. नागरी प्रशासनास सुधारणा घडवून आणणे व स्थानिक स्वराज्य संस्थांना आर्थिकदृष्टया सक्षम बनविणे व त्यांची बाजारातील पत सुधारण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना केंद्र शासनाने ज्या सुधारणा करणे बंधनकारक केले आहे त्यातील अनिवार्य सुधारणामध्ये आधुनिक दुहेरी पध्दतीने लेखे सर्व महानगरपालिकेत ठेवणेबाबत बंधनकारक करण्यात आले आहे. उपरोक्त शासन निर्णयानुसार राज्यातील सर्व महानगरपालिका या स्थानिक स्वराज्य संस्थांना आपले लेखे दुहेरी नोंद पध्दतीने अद्यावत ठेवण्याबाबत स्पष्ट सुचना असून महानगरपालिकांना अशा दुहेरी नोंद पध्दतीची अंमलबजावणी दिनांक1 एप्रिल 2005 पासून अनिवार्य केली असताना महानगरपालिका, चंद्रपूर येथे सन 2016-17 व 2017 -18 या वित्तीय वर्षाअखेरपर्यंत उपरोक्त लेखे दुहेरी नोंद पध्दतीने ठेवले नसल्याचे आढळून आले.

सदर अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र 21 ,दि. 02.11.2020 नुसार विभागास खुलासा सादर करण्यास कळविले होते. तथापि विभागाकडून खुलासा/ अनुपालन प्राप्त न झाल्यामुळे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATSMBM7501 (Ref No : 1, Hmm No : 21)

## *4 निवृत्तीवेतनधारकांच्या निवृत्तीवेतनातून आयकर कपात न करणेबाबत.*

**ACCOUNT**
**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**
**अनियमितता संख्या : 1**

*महानगरपालिका स्व- निधी*
*अनियमितता कलम : 9अ*

चंद्रपूर शहर महानगरपालिका महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र. आयकर 1007/प्र.क्र.105/कोषा-प्र 5 दिनांक 22 फब्रूवारी 2008 तसेच आयकर अधिनियम 1961 कलम 192 च्या तरतूदीनुसार वित्तीय वर्ष 2016-17 करिता केन्द्र शासन वित्त विभाग परिपत्रक क्रमांक 01/2017 दिनांक 02/01/2017 व वित्तीय वर्ष 2017-18 करिता केन्द्र शासन वित्त विभाग परिपत्रक क्रमांक 29/2017 दिनांक 05/12/2017 नुसार विहीत दराने आहरण व संवितरण अधिकारी यांनी काही सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे आयकर रकमांची कपात करून शासन निधीत जमा केल्याचे दिसून येत नाही.

चंद्रपूर शहर महानगरपालीकेच्या सन 2016-17 व 2017-18 या वित्तीय वर्षात प्रदान करण्यात आलेल्या निवृत्तीवेतनधारकांच्या मासिक निवृत्ती वेतन देयकाची पडताळणी केली असता आयकर अधिनियम 1961

कलम 192 नुसार काही सेवानिवृत्त वेतनधारकाच्या निवृत्ती वेतनातून नियमानुसार आयकराची रक्कम कपात करुन शासनाकडे भरणा करणे आवश्यक होते.

महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र. आयकर 1007/प्र.क्र.105/कोषा-प्र 5 दि. 22 फेब्रूवारी 2008 तसेच आयकर अधिनियम 1961 कलम 192 च्या तरतूदीनुसार वित्तीय वर्ष 2016-17 करिता केन्द्र शासन वित्त विभाग परिपत्रक क्रमांक 01/2017 दि. 02/01/2017 व वित्तीय वर्ष 2017-18 करिता केन्द्र शासन वित्त विभाग परिपत्रक क्रमांक 29/2017 दिनांक 05/12/2017 नुसार विहीत दराने आहरण व संवितरण अधिकारी यांनी आयकर कपात करणे बंधनकारक आहे. तरी पुढील काही सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांचे आयकर रकमांची कपात केल्याचे दिसून येत नाही.

1) वित्तीय वर्ष 2016-17 :-

| अ.क्र. | सेवानिवृत्त कर्मचारी | खाते क्रमांक | वार्षिक वित्तलब्धी(2016-17) |
|---|---|---|---|
| 1 | मकसद अहमद शेख मन्नु | 11014630662 | 4,38,574 |
| 2 | प्रकाश नारायण खोब्रागडे | 11014624773 | 3,97,274 |
| 3 | बाळकृष्ण यादवराव ठाकरे | 11014632762 | 3,36,570/- |
| 4 | मनोहर निळकंठ नन्नोरे | 110146228042 | 3,32,466/- |

2) वित्तीय वर्ष 2017-18 :-

| अ.क्र. | सेवानिवृत्त कर्मचारी | खाते क्रमांक | वार्षिक वित्तलब्धी(2017-18) |
|---|---|---|---|
| 1 | मकसद अहमद शेख मन्नु | 11014630662 | 4,56,731/- |
| 2 | प्रकाश नारायण खोब्रागडे | 11014624773 | 4,17,173/- |
| 3 | बाळकृष्ण यादवराव ठाकरे | 11014632762 | 3,51,810/- |
| 4 | मनोहर निळकंठ नन्नोरे | 110146228042 | 3,48,148/- |

तरी उपरोक्त वर दर्शविलेल्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्याची आयकर कपातीची गणना करून आयकराची कपात करावी व कपात केलेला आयकर शासन निधीत जमा करून तसे अनुपालन सादर करावे. सदर बाबीकरिता अर्धसमास पत्र क्रमांक 52 , दिनांक 04/12/2020 ला निर्गमित करण्यात आले असता आजपावेतो खुलासा प्राप्त

न झाल्यामुळे आक्षेप घेण्यात येत आहे.

DLFIBBM9301 (Ref No : 2, Hmm No : 52)

## *5 मनपा चंद्रपूर येथे अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांना इतरत्र समायोजन झाल्यामुळे कार्यमुक्त केल्यानंतरही भविष्य निर्वाह निधीमधील रक्कम हस्तांतरित न करता विलंबाने परत केल्याने जास्तीचे व्याज प्रदान केल्याबाबत.*

**लेखा विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 181906.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 181906.00/-

शिक्षण उपसंचालक नागपूर यांचे आदेशाने मनपा चंद्रपूर येथील काही सहाय्यक शिक्षक अतिरिक्त ठरल्याने त्यांना इतर नगर परिषदेमध्ये समायोजित करण्यात आले. महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 मधील नियम 25 (2),31 मधील तरतुदीनुसार शासनाच्या मालकीच्या आणि नियंत्रणाखाली असलेल्या निगमाच्या किंवा स्वायत्त संस्थेतील भविष्य निर्वाह निधीचा वर्गणीदार असेल तर बदली झाल्यास अशा वर्गणीदाराच्या नावे जमा रक्कम त्या निगमच्या संमतीने निधीत त्याचे नावे हस्तांतरित करण्यात यावी असे नमूद आहे. परंतु मनपा चंद्रपूर येथील सहा सहाय्यक शिक्षकांना इतर नगर परिषदेमध्ये समायोजित केल्यानंतर त्यांचे नावे भविष्य निर्वाह निधी मधील जमा रक्कम त्यांचे नवीन ठिकाणी त्यांचे संमतीनुसार त्याचे नावे हस्तांतरित न करता 3 ते 5 वर्ष विलंबाने शिक्षकांना व्याजासह परत करण्यात आली त्यामुळे त्यांना रु. 181906/- येवढे जास्तीचे व्याज प्रदान करण्यात आल्याने मनपाची हानी झाली आहे.

महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 मधील नियम 25 (2) व 32 नुसार भविष्य निर्वाह निधीचे लाभ मिळत असलेला एखादा कर्मचारी जर यापूर्वी शासनाच्या मालकीच्या आणि नियंत्रणाखाली असलेल्या नियमाच्या किंवा संस्था नोंदणी अधिनियम 1960 अन्वये नोंदणीकृत स्वायत्ता संघटनेच्या भविष्य निर्वाह निधीच्या वर्गणीदार असेल तर अशा वर्गणीदाराची इतरत्र बदली झाल्यास त्याच्या भविष्य निर्वाह निधीतील त्याच्या नावे जमा रक्कम त्या निगमाच्या संमतीने निधीत त्याच्या नावे हस्तांतरित केले जाईल असे नमूद आहे.

असे असतांना मनपा चंद्रपूर येथील शिक्षण उपसंचालक नागपूर विभाग यांचे आदेशाने तेथील अतिरिक्त ठरलेल्या सहाय्यक शिक्षकांना इतर नगर परिषदे मध्ये समायोजित करण्यात आले. समायोजित केलेल्या शिक्षकांना कार्यमुक्त केल्यानंतर मनपा चंद्रपूर येथील कार्यरत कालावधीत भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा असलेली व्याजासह रक्कम त्यांचे नव्याने समायोजनेने पदस्थापित केलेल्या ठिकाणी त्यांचे नावे व निगमांच्या संमतीने निधीत त्याचे नावे हस्तांतरित करणे आवश्यक होते. परंतु मनपा चंद्रपूर यांनी खाली दर्शविलेल्या एकूण 6 कर्मचाऱ्यांना त्यांच्या भविष्य निर्वाह निधीमधील रक्कम दीर्घकाळ मनपा मध्ये ठेऊन शिक्षकांच्या नवीन समायोजित ठिकाणी तेथील भविष्य निर्वाह निधी खात्यात हस्तांतरित न करता उशिराने 3 ते 5 वर्ष विलंबाने शिक्षकांना व्याजासह रक्कम परत करण्यात आली.

खालील दर्शविलेल्या सहाय्यक शिक्षक यांना कार्यमुक्त केल्यानंतरही बऱ्याच विलंबाने भविष्य निर्वाह निधीची रक्कम व्याजासह परत करण्यात आल्याने जास्तीचे व्याज अदा करण्यात आले.

| अ. क्र. | समायोजित शिक्षकांचे नाव | भविष्य निर्वाह निधी खाते क्रमांक | कार्यमुक्त दिनांक | भविष्य निर्वाह निधी शिल्लक परत केल्याच्या दिनांक | 2016-17 व 2017-18 मध्ये दिलेले व्याज |
|---|---|---|---|---|---|
| 1 | श्रीपाद धर्मदास बन्सोड | 2304 | 15.05.2014 | 31.01.2018 | 29735 |
| 2 | राजेंद्र घाशीराम पेंदाम | 2312 | 15.05.2014 | 31.01.2018 | 14398 |
| 3 | प्रशांत आकनुरवार | 2305 | 15.05.2014 | 31.01.2018 | 38547 |
| 4 | श्री पांडुरंग पारखी | 2293 | 31.08.2012 | 31.01.2018 | 96464 |
| 5 | शत्रुघंन मरसकोल्हे | 2316 | 31.08.2012 | 31.01.2018 | 1381 |
| 6 | कु. शामला कुळमेथे | 2317 | 31.08.2012 | 31.01.2018 | 1381 |
| एकूण रुपये : 181906 | | | | | |

उपरोक्त वर दर्शविलेल्या सहाय्यक शिक्षकांना त्यांचे भविष्य निर्वाह निधी खात्यावरील रक्कम त्यांना समायोजित केलेल्या ठिकाणी त्यांचे नावे हस्तांतरित न करता 3 ते 5 वर्ष विलंबाने संबंधित शिक्षकांना व्याजासह परत करण्यात आली. प्रदान विलंबाने केल्याने जास्तीचे व्याज प्रदान करण्यात आले व मनपाची रु.

181906/- येवढी हानी झाली आहे.

याबाबत अर्धसमास पत्र क्र. 32 दिनांक 09/11/2020 नुसार खुलासा प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATVVBM6301 (Ref No : 8, Hmm No : 32)

## *6 घसारा निधी स्वतंत्रपणे स्थापन करून त्यामध्ये पुरेशी तरतूद केली नसल्याबाबत*

**ACCOUNT**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 1**

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

चंद्रपूर शहर महानगरपालिकेकडे असलेल्या एकूण मालमत्तेची खरेदी मुल्ये विचारात घेवून घसारा निधीची तरतूद करणे आवश्यक आहे. यामुळे वाहने तसेच मालमत्ता, इमारती यांच्या नूतनीकरणाच्या उद्दिष्टाने या निधीचा योग्य वेळी वापर करणे शक्य होते. नियमानुसार घसारा निधी उभारणे आवश्यक असून मनपाने घसारा निधी मध्ये तरतुद केली नाही.तसेच महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका 1984 नियम 415 प्रमाणे घसारा निधीमध्ये नमूद केलेल्या दरानुसार रक्कम जमा करणे आवश्यक आहे.संयंत्रे व यंत्रसामुग्रीसाठी यंत्राच्या प्रकारानुसार 10 ते 20 टक्के,हत्यारे 20 टक्के,फर्निचर 06 टक्के,वाहने 15 टक्के,विद्युत मोटारी व संयंत्रे 05 टक्के अश्या तरतुदी आहेत. मनपाने घसारा निधी स्थापन करून त्यात पुरेशी तरतुद केली नसल्याची अनियमितता केली आहे.

सन 2016-17 व 2017-18 मध्ये चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या लेखा विभागाने घसारा निधीबाबत नियमानुसार तरतूद केली नसल्याचे आढळून आले आहे. अर्थसंकल्पात घसारा निधीच्या बाबीचा उल्लेख केला आहे पण तरतूद व खर्च निरंक आहे. मुंबई वित्तीय नियम मधिल नियम क्र. 146 मधील टिपणी क्रमांक-2 च्या तरतुदी नुसार महानगरपालिका मालकीच्या मालमत्तांच्या सुरक्षितता व देखभाल दुरुस्ती करिता घसारा निधी या नावाने स्वतंत्र निधी उभारणे आवश्यक आहे.

रस्ते, पूल, इमारती, वाहने, सयंत्र, कार्यालयीन फर्निचर इत्यादीची नित्यनियमाने देखभाल दुरुस्तीसाठी दरवर्षी आर्थिक तरतूद करणे आवश्यक असून विहित मुदतीनंतर या मालमत्तांचे आयुमर्यादा संपते. त्यानंतर नवीन प्रकल्प उभारणीस किंवा मालमत्ता विकत घेणेस निधी उपलब्ध नसतो. त्यासाठी दरवर्षी नियमाप्रमाणे घसारा

निधी स्वत्रंत तयार करून त्यामध्ये पुरेशी तरतूद करणे गरजेचे आहे. मालमत्तेच्या खरेदी मूल्यावर निश्चित प्रतिशत घसाऱ्याची तरतूद करून रक्कम घसारा निधीमध्ये असणे आवश्यक आहे. मालमत्तेची किंमत, मालमत्तेचे आयुष्य, मालमत्तेच्या नुतनीकरणावर झालेला खर्च, निरुपयोगी ठरलेल्या मालमत्तेच्या लिलावपासून मिळणारी विक्रीची रक्कम इत्यादीवर घसारा रक्कम अवलंबून आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका 1984 नियम 415 प्रमाणे घसारा निधीमध्ये नमूद केलेल्या दरानुसार रक्कम जमा करणे आवश्यक आहे.संयंत्रे व यंत्रसामुग्रीसाठी यंत्राच्या प्रकारानुसार 10 ते 20 टक्के,हत्यारे 20 टक्के,फर्निचर 06 टक्के,वाहने 15 टक्के,विद्युत मोटारी व संयंत्रे 05 टक्के अश्या तरतुदी आहेत.

महानगरपालिकेकडे असलेल्या एकूण मालमत्तेची खरेदी मुल्ये विचारात घेवून घसारा निधीची तरतूद करणे आवश्यक आहे. यामुळे सदरची वाहने तसेच मालमत्ता, इमारती यांच्या नूतनीकरणाच्या उद्दिष्टाने या निधीचा योग्य वेळी वापर करणे शक्य होते. नियमानुसार घसारा निधी उभारणे आवश्यक असून मनपाने घसारा निधी मध्ये तरतुद केली नाही.

उपरोक्त अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 136 दिनांक 10/02/2021 नुसार लेखा विभागास अनुपालन सादर करण्यास कळविण्यात आले होते परंतु अनुपालन प्राप्त न झाल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

DLFIBBM9301 (Ref No : 45, Hmm No : 136)

## *7 विविध बाबीवर केलेल्या गुंतवणुकीवरील प्राप्त व्याजाची नोंद रोखपुस्तकात नसल्याने रु. 4.71 कोटी लेख्याबाहेर असल्याबाबत.*

**ACCOUNT DEPARTMENT**
**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**
**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 47138629.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 47138629.00/-

नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील अधिसुचना दि. 23 जाने 2013 राजपत्र असाधारण भाग एक अ मध्य उपविभाग मधील प्रकरण 14 नियम 62 नुसार नमूना 93 मध्ये गुंतवणूक नोंदवही ठेवण्याची तरतूद आहे. त्यातीलच नियम 213 नुसार शासनाने वेळोवेळी केलेल्या बदलाच्या अनुषंगाने गुंतणूक करण्यात येते. याच अधिसुचनेतील प्रकरण 14 मध्ये नमुद असल्याप्रमाणे नियम 219 ते 221 नुसार गुंतवणुकीच्या संदर्भात नोंदी

ताळमेळ व पडताळणी याबाबत कार्यवाही करिता नियम नमूद केले आहेत. परंतु त्यानुसार मनपाने कार्यवाही केलेली नसुन विविध बाबीवर केलेल्या गुंतवणुकीवरील प्राप्त व्याजाची नोंद रोखपुस्तकात दिसून आली नसल्याने रु.4.71 कोटी लेख्याबाहेर आहेत.

मनपा चंद्रपूर येथील वर्ष 2016-17 व 2017-18 मधील गुंतणूक नोंदवहीनुसार वेतन राखीव निधी, रोड कटींग , एन.टी. सॅलरी, निवृत्ती वेतन अंशदान, संयुक्त वेतन खाते इत्यादी बाबीवर गुंतवणूक करण्यात आलेल्या ठेवीवर खालीलप्रमाणे व्याज प्राप्त झाले.

वर्ष 2016-17

| अ.क्र. | ठेवी | प्राप्त व्याज (रुपये) |
|---|---|---|
| 1. | वेतन राखीव निधी | 35,54,459/- |
| 2. | निवृत्ती वेतन अंशदान | 5,52,956/- |
| 3. | संयुक्त वेतन खाते | 1,43,50,472/- |
| 4. | एन.टी. सॅलरी | 10,97,355/- |
| एकूण | | 1,95,55,242/- |

वर्ष 2017-18

| अ.क्र. | ठेवी | प्राप्त व्याज (रुपये) |
|---|---|---|
| 1. | वेतन राखीव निधी | 35,23,722/- |
| 2. | रोड कटींग | 27,41,484/- |
| 3. | विकास योजना | 8,65,021/- |
| 4. | सिकिंग फंड | 8,65,021/- |
| 5. | संयुक्त वेतन खाते | 1,20,59,541/- |
| 6. | एन.टी. सॅलरी | 75,28,598 |

| | |
|---|---|
| एकूण | 2,75,83,387/- |

उपरोक्त तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे वर्ष 2016-17 व 2017-18 मध्ये गुंतवणुकीवर अनुक्रमे रु.1,95,55,242/- व 2,75,83,387/- असे एकूण 4,71,38,629/- व्याज प्राप्त झाले. परंतु उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे प्राप्त व्याजाची नोंद रोखपुस्तकामध्ये दिसून आली नाही. त्यामुळे हि रक्कम लेख्या बाहेर असल्याचे दिसून येते.

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग -1 मधील अधिसुचनेतील नियम 220 व 221 मधील तरतुदीनुसार केलेल्या गुंतवणूका मुदती समाप्तीचे वेळी त्याचे रोखीकरण करण्यात येऊन त्यावर मिळालेल्या लाभाची नोंद जमा खर्च विवरण पत्रान्वये घेणे आवश्यक आहे. तसेच सक्षम प्राधिकाऱ्याद्वारे त्या वित्तीय वर्षातील सप्टेंबर अखेर व वर्षा अखेर गुंतवणुकीची प्रत्यक्ष पडताळणी करून गुंतणूक नोंदवहीतील शिल्लक आणि खाते नोंदवहीतील शिल्लक याचा ताळमेळ करणे आवश्यक आहे.

परंतु मनपाद्वारे अशा प्रकारची पडताळणी व शिल्लक रकमेचा ताळमेळ घेण्यात आलेला नाही. तसेच विविध बाबीतील केलेल्या गुंतवणुकीच्या रकमेतील मनपास प्राप्त झालेल्या त्या व्याजाची नोंद संबंधित बाबीच्या रोखपुस्तकात दिसून आली नाही. त्यामुळे गुंतवणुकीवरील प्राप्त व्याज रु.4.71 कोटी हे लेख्याबाहेर असल्याचे दिसून येते.

याबाबत अर्धसमास पत्र क्र.82 दिनांक 04/01/2021 नुसार अन्वये खुलासा मागितला असता तो प्राप्त न झाल्यामुळे आक्षेप नोंदविण्यात येत आहे. तरी उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे कार्यवाही करून अनुपालन सादर करावे.

DATVVBM6301 (Ref No : 56, Hmm No : 82)

## *8 मनपा चंद्रपूर येथील सन 2016-17 व 2017-18 मधील अखर्चित निधीबाबत.*

**लेखा विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 3**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व-निधी व शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

| |
|---|
| शासन निर्णय वित्त विभाग संकीर्ण/1002/प्र.क्र.28/अर्थोपाय, दी.06/06/2008, शासन निर्णय वित्त विभाग संकीर्ण /1002/प्र.क्र.-128/दी. 06/06/2017 तसेच शासन निर्णय वित्त विभाग संकीर्ण-10-17//प्र.क्र.-64/अर्थोपाय |

, दी. 21/09/2017 मध्ये निर्देशित केल्यानुसार अखर्चित निधी लगतच्या आर्थिक वर्षाच्या आधी मुक्त केलेल्या व पुढील एका आर्थिक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी अखर्चित राहिलेला निधी स्वायत्त संस्थांनी शासनाकडे परत करणे बंधनकारक आहे. मात्र अशी कार्यवाही मनपा चंद्रपूर कडून करण्यात येत नसल्यामुळे बऱ्याच मोठ्या प्रमाणात अखर्चित निधी पडून असल्याचे आढळले.

1) शासन निर्णय वित्त विभाग संकीर्ण/1002/प्र.क्र.28/अर्थोपाय, दी.06/06/2008, शासन निर्णय वित्त विभाग संकीर्ण /1002/प्र.क्र.-128/दी. 06/06/2017 तसेच शासन निर्णय वित्त विभाग संकीर्ण-10-17//प्र.क्र.-64/अर्थोपाय , दी. 21/09/2017 मध्ये निर्देशित केल्यानुसार अखर्चित निधी लगतच्या आर्थिक वर्षाच्या आधी मुक्त केलेल्या व पुढील एका आर्थिक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी अखर्चित राहिलेला निधी स्वायत्त संस्थांनी शासनाकडे परत करणे बंधनकारक आहे. मात्र अशी कार्यवाही मनपा चंद्रपूर कडून करण्यात येत नसल्यामुळे बऱ्याच मोठ्या प्रमाणात अखर्चित निधी पडून असल्याचे आढळले.

2)मनपा चंद्रपूर येते सन 2016 -2017 मध्ये वर्षाअखेर रु. 1190708236/- व 2017-2018 या वर्षाअखेर रु. 1916559423/- एवढ्या मोठ्या प्रमाणात निधी शिल्लक असल्याचे दिसून आले. योजना निहाय शिल्लक अखर्चित रकमेचा तपशील खालील प्रमाणे आहे.

अखर्चित निधी सन 2016-17

| अं.क्र. | योजनेचे नाव | व्याज व इतर जमा | कॅश बुक नुसार अखर्चित निधी |
|---|---|---|---|
| 1 | मुलभूत सोई सुविधा पायाभूत | 7394148 | 111853453 |
| 2 | अतिवृष्टीमुळे रस्त्यासाठी विशेष निधी | 3554904 | 40679581 |
| 3 | अनु. जाती व नवबौध्द घटकांचे घरकुल | 989269 | 103647274 |
| 4 | पंचशताब्दी महोत्सव | 782293 | 15588558 |
| 5 | ना.द.व. | 6393305 | 136728491 |
| 6 | बी.आर.जी.एफ. | 1162438 | 6794421 |
| 7 | महा. सुजल निर्मल अभि. अंतर्गत अनु.जाती व नवबौध्द घटकातील नळ जोडणी व वैयक्तिक शौचालय | 0 | 32240047 |

| | | | |
|---|---|---|---|
| 8 | रस्ता अनुदान | 2029485 | 28869067 |
| 9 | बरीष्टर राजाभाऊ खोब्रागडे हॉल | 398014 | 6369629 |
| 10 | आय.एच.एस.डी.पी. | 643709 | 16447054 |
| 11 | कमी खर्चाची स्वच्छता योजना | 0 | 13154267 |
| 12 | महा. नगरोत्थान | 9661187 | 181013816 |
| 13 | महा. सुजल निर्मल अभि. अंतर्गत घा.पु.विकास निधी | 0 | 3072210 |
| 14 | आय.डी.एस.एम.टी. | 46255 | 1018767 |
| 15 | पर्यटन निधी | 0 | 4470198 |
| 16 | इरई व झरपट नदी संवर्धन | 0 | 1488760 |
| 17 | 13 वा वित्त आयोग | 235136 | 2627016 |
| 18 | खासदार निधी | 234990 | 5112455 |
| 19 | ना.द.व. व पाणी पुरवठा | 0 | 1503423 |
| 20 | खनिज विकास निधी | 130809 | 1773446 |
| 21 | आमदार निधी | 297334 | 6798065 |
| 22 | पंतप्रधान आवास निधी | 48213 | 1235581 |
| 23 | अल्पसंख्यांक | 148253 | 1663268 |
| 24 | नागरी दलीतत्तेर | 0 | 18548 |
| 25 | जिल्हा वार्षिक सर्वसाधारण | 0 | 9392231 |
| 26 | 14 वा वित्त आयोग | 3880393 | 83881554 |
| 27 | बाबुपेठ उडाणपुल | 1269717 | 31480087 |

| | | | |
|---|---|---|---|
| 28 | अमृत अभियान | 9296959 | 334742773 |
| 29 | स्वच्छ महाराष्ट्र अभियान | 1394640 | 4984685 |
| 30 | महाराष्ट्र ऊर्जा विकास अभि. | 0 | 2059511 |
| | सन 2016-17 एकूण मधील अखर्चित निधी | 50378528 | 1190708236 |

अखर्चित निधी सन 2017-18

| अं.क्र. | योजनेचे नाव | व्याज व इतर जमा | कॅश बुक नुसार अखर्चित निधी |
|---|---|---|---|
| 1 | मुलभूत सोई सुविधा पायाभूत | 5663783 | 143257501 |
| 2 | अतिवृष्टीमुळे रस्त्यासाठी विशेष निधी | 1690156 | 39548839 |
| 3 | अनु. जाती व नवबौध्द घटकांचे घरकुल | 12305393 | 307670788 |
| 4 | पंच शताब्दी महोत्सव | 637770 | 16226328 |
| 5 | यु.आय.डी.एस.एस.एम.टी. | 343029 | 3961419 |
| 6 | ना.द.व. | 4703127 | 51217388 |
| 7 | बी.आर.जी.एफ. | 314291 | 2474260 |
| 8 | महा. सुजल निर्मल अभि. अंतर्गत अनु.जाती व नवबौध्द घटकातील नळ जोडणी व वैयक्तिक शौचालय | 0 | 32241247 |
| 9 | रस्ता अनुदान | 1124110 | 22010388 |
| 10 | बरीष्टर राजाभाऊ खोब्रागडे हॉल | 216238 | 3255517 |
| 11 | आय.एच.एस.डी.पी. | 669409 | 15900805 |
| 12 | कमी खर्चाची स्वच्छता योजना | 0 | 3401267 |
| 13 | महा. नगरोत्थान | 6087645 | 110164183 |

| | | | |
|---|---|---|---|
| 14 | महा. सुजल निर्मल अभि. अंतर्गत घा.पु.विकास निधी | 501823 | 574033 |
| 15 | आय.डी.एस.एम.टी. | 0 | 1018767 |
| 16 | पर्यटन स्थळ विकास निधी व इरई झरपट नदी संवर्धन निधी | 0 | 5829668 |
| 17 | 13 वा वित्त आयोग | 92391 | 825407 |
| 18 | खासदार निधी | 216841 | 6139620 |
| 19 | ना.द.व. व पाणी पुरवठा | 0 | 1503423 |
| 20 | खनिज विकास निधी | 112221 | 1885668 |
| 21 | आमदार निधी | 312498 | 8504547 |
| 22 | पंतप्रधान आवास निधी | 96127 | 1283495 |
| 23 | अल्पसंख्यांक | 0 | 447788 |
| 24 | महाराष्ट्र वार्षिक सर्वसाधारण अनुदान (रामाळा तलाव) | 0 | 9392231 |
| 25 | 14 वा वित्त आयोग | 3378742 | 47403404 |
| 26 | बाबुपेठ उडाणपुल | 1274663 | 32754750 |
| 27 | अमृत अभियान | 18147651 | 950854633 |
| 28 | स्वच्छ महाराष्ट्र अभियान | 1289571 | 17129789 |
| 29 | वैशिष्ठपुर्ण कामासाठी विशेष अनुदान विविध विकास कामे याकरिता ठोक तरतुद | 498724 | 76822739 |
| 30 | अमृत ग्रिनपेसेस | 12250 | 2202250 |
| 31 | महाराष्ट्र ऊर्जा विकास अभियान | 86395 | 657281 |
| सन 2017 - 18 एकूण मधील अखर्चित निधी | | 59774848 | 1916559423 |

3) शासनाकडून एखादी योजना राबवितांना कोट्यावधी रुपयाचा निधी / तरतूद निर्देशासह शासनाकडून प्राप्त

होत असते. असा निधी विहित मुदतीत खर्च केला जात नाही. व अखर्चित राहिलेला निधी शासन खाती जमा देखील केला जात नाही. त्यामुळे वित्तीय बाबतीत मोठ्या प्रमाणावर अनियमितता होत असून रकमा वेळीच खर्च करण्याबाबत दक्ष राहून कार्यवाही केली जात नाही. अखर्चित रकमामुळे शासनाला निधी आवश्यक असणाऱ्या अन्य महत्वाच्या योजनावर खर्च करता येत नाही. व याच कारणामुळे अखर्चित रकमा शासन खाती विहित वेळेत जमा करणे गरजेचे आहे आहे. शासनाकडील प्राप्त अनुदानाचे योग्य अंदाज व नियोजन तसेच सनियंत्रण मनपा स्तरावर न ठेवल्यामुळे अखर्चित रकमा मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहेत.

उपरोक्त तक्त्यात नमूद अखर्चित रक्कमा, रोखवही व अर्धसमास ज्ञापण क्र-36 चे अनुषंगाने लेखा विभागाने सादर केलेल्या माहितीवरून काढण्यात आलेल्या आहेत. सदर रकमचे ताळमेळ घेऊन शासन खाती जमा करणे आवश्यक आहे. सदर अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र 36 ,दि. 10.11.2020 नुसार विभागास अनुपालन अभिप्राय सादर करण्यास कळविले होते. तथापि विभागाकडून समर्पक अभिप्राय प्राप्त न झाल्यामुळे परिच्छेद नोंदविण्यात येत आहे.

DATSMBM7501 (Ref No : 63, Hmm No : 36)

## *9 वार्षिक लेखे व त्यावरील अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध न केल्याबाबत.*

**लेखा विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी व शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

मनपाच्या वार्षिक लेख्यातील वित्तीय विवरणपत्र व त्यावरील महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक मनपा आयुक्त व स्थायी समिती यांचे अहवाल लेखापरीक्षणास प्रमाणीकीरणाकरिता उपलब्ध झाले नाही.

महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र. स्थानिले-1010/प्रक्र.26-ब/विमाशा, दि.31/03/2011 व महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्र. लेखाप-2016/सक्र 25/नवि-31, दि.18/06/2016 नुसार तेराव्या वित्त आयोगाच्या शिफारसीस अनुसरून महानगरपालिकेकडील स्थायी समितीने मंजूर केलेले वार्षिक लेखे प्रमाणिकीकरणासाठी मनपाच्या लेखापरीक्षण विभागाकडे सादर करावयाचे बंधनकारक केले आहे. (महाराष्ट्र महानगपालिका अधिनियम कलम 107-अ)

अर्धसमास पत्र क्र.1, दि.13/10/2020 नुसार मनपाचे वर्ष 2016-17 व 2017-18 चे वार्षिक लेखे उपलब्ध करण्यास

कळविण्यात आले होते. परंतु मनपा चंद्रपूर येथील लेखापरिक्षण सुरु असलेल्या कालावधी पर्यंत मनपाने वर्ष 2016-17 व 2017-18 या वर्षातील स्थायी समितीने मंजूर केलेले पूर्ण वार्षिक लेखे प्रामाणिकरणासाठी उपलब्ध झाले नाही.

DATVVBM6301 (Ref No : 94, Hmm No : 01)

## *10 हुतात्मा स्मारक ग्रंथालयातील वाचन साहित्याच्या देयकामध्ये पुरवठादाराला अतिप्रदान झाल्याबाबत.*

**Library**
**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**
**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :277 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 36484.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 4366.00/-

| |
|---|
| चंद्रपूर महानगरपालिकेकडून सन 2016-17 आणि 2017-18 मध्ये हुतात्मा स्मारक ग्रंथालयाला वाचन साहित्य पुरवठा करणाऱ्या विजय रिठे न्यूज एजन्सी यांना 4366 रुपयाचे अतिप्रदान झाले आहे. |

चंद्रपूर महानगरपालिकेच्या ग्रंथालयांना वाचन साहित्याचा पुरवठा करण्याचे काम खाजगी पुरवठादाराला देण्यात येते त्यासंदर्भात आदेश क्र. जा.क.चंशमनपा/वा.वि./2016-17/3970 दिनांक 23/03/2016 नुसार विजय रिठे न्यूज पेपर एजन्सी ला महानगरपालिकेच्या वाचनालयात वृत्तपत्रे, मासिके, पाक्षिके, साप्ताहिके, दिवाळी अंक पुरवठा करायचे काम मार्च 2016 ते एप्रिल 2017 असे एक वर्षासाठी देण्यात आले असून या आदेशा अंतर्गत सदर करारनाम्यानुसार एकूण बिलामध्ये 5% सूट देण्याची तरतूद आहे. तसेच आदेश क्र. चंशमनपा/ग्रंथालय/3103/2017 दिनांक 26/10/2017 नुसार विजय रिठे न्यूज पेपर एजन्सी ला महानगरपालिकेच्या वाचनालयात वृत्तपत्रे, मासिके, पाक्षिके, साप्ताहिके, दिवाळी अंक पुरवठा करायचे काम नोव्हेंबर 2017 ते एप्रिल 2018 पर्यंत देण्यात आले.या आदेशा अंतर्गत सदर करारनाम्यानुसार एकूण बिलामध्ये 15% सूट देण्याची तरतूद आहे.

हुतात्मा स्मारक ग्रंथालय, चंद्रपूर येथील दस्ताऐवज लेखापरीक्षणादरम्यान तपासताना उपरोक्त पुरवठादाराने दिलेल्या देयकामध्ये आणि ग्रंथालयाच्या वृत्तपत्रे, मासिके, पाक्षिके, साप्ताहिके नोंदणी रजिस्टर मधील नोंदीमध्ये मध्ये तफावत आढळली असून पुरावठादाराला अतिप्रदान झाल्याचे निदर्शनास आले आहे. सदर तफावत सविस्तरपणे पुढील तक्त्यात नोंदवली आहे.

चंद्रपुर महानगरपालिका, 2016-2017 ते 2017-2018

| अ.क्र. | महिना | नोंदणी रजिस्टर नुसार झालेले एकूण बिल | करारानुसार सुट देऊन येणारी देय रक्कम | प्रदान केलेली रक्कम | प्रमाणक क्र. | अतिप्रदान झालेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | एप्रिल 2016 | 1196 | 1136 | 1336 | 332 | 200 |
| 2 | मे 2016 | 1083 | 1028 | 1338 | 438 | 310 |
| 3 | जून 2016 | 1195 | 1135 | 1334 | 709 | 199 |
| 4 | जुलै 2016 | 1723 | 1636 | 1764 | 1119 | 128 |
| 5 | ऑगस्ट 2016 | 1309 | 1244 | 1481 | 1282 | 237 |
| 6 | सप्टेंबर 2016 | 1428 | 1357 | 1538 | 1560 | 181 |
| 7 | ऑक्टोबर2016 | 1605 | 1525 | 1722 | 1839 | 197 |
| 8 | नोव्हेंबर 2016 | 1200 | 1140 | 1554 | 1992 | 414 |
| 9 | डिसेंबर 2016 | 1366 | 1298 | 1446 | 2427 | 148 |
| 10 | जानेवारी 2017 | 1591 | 1511 | 1649 | 2710 | 138 |
| 11 | फेब्रुवारी 2017 | 1327 | 1260 | 1442 | 3047 | 182 |
| 12 | मार्च 2017 | 1384 | 1314 | 1491 | 73 | 177 |
| 13 | एप्रिल 2017 | 1287 | 1223 | 1552 | 317 | 329 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 14 | मे 2017 | 1393 | 1323 | 1582 | 544 | 259 |
| 15 | जून 2017 | 1340 | 1273 | 1535 | 811 | 262 |
| 16 | जुलै 2017 | 1400 | 1190 | 1190 | 1397 | 0 |
| 17 | ऑगस्ट 2017 | 1352 | 1150 | 1150 | 1398 | 0 |
| 18 | सप्टेंबर 2017 | 1472 | 1258 | 1258 | 1893 | 0 |
| 19 | ऑक्टोबर2017 | 1471 | 1261 | 1261 | 1894 | 0 |
| 20 | नोव्हेंबर 2017 | 4080 | 3468 | 3855 | 2437 | 387 |
| 21 | डिसेंबर 2017 | 1774 | 1508 | 1698 | 2436 | 190 |
| 22 | जानेवारी 2018 | 1661 | 1412 | 1628 | 2887 | 216 |
| 23 | फेब्रुवारी 2018 | 1727 | 1468 | 1680 | 3199 | 212 |
| | | | | | | |
| | एकूण | 35362 | 32118 | 36484 | | 4366 |

उपरोक्त माहितीनुसार पुरवठादार विजय न्यूज एजन्सी यांना 4366 रुपयाचे अतिप्रदान झाले असून सदर रक्कम वसूलपात्र ठरते. सदर प्रकरणी अर्धसमासपत्र क्र.49 दिनांक 03/12/2020 मध्ये उपरोक्त विषयासंबंधी विचारणा केली असता त्याबाबत परिच्छेद अंतिम करेपर्यंत कोणतेही उत्तर प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DLFARKM9301 (Ref No : 3, Hmm No : 49)

## *11 वैयक्तिक शौचालय योजने अंतर्गत रेडीमेड(प्री-कास्ट) शौचालये बांधण्याच्या कामातील अनियमिततेबाबत*

**वैयक्तिक शौचालय योजना**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 3**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व-निधी व शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 101381086.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 7590000.00/-

मनपातर्फे शासन निर्णय क्र.स्वभाअ/2015/ प्र.क्र.23/नवि-34/ दि.15 मे 2015 नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक शौचालय योजने अंतर्गत अनुदानाची रक्कम लाभार्थ्यांना शासन निर्णयातील मुद्दा क्र.3.3(अ)(17)नुसार सदर अनुदान लाभार्थी कुटुंबाच्या खात्यावर थेट जमा करण्याची तरतूद असून चंद्रपूर महानगरपालिकेने काही प्रकरणामध्ये रेडीमेड(प्री-कास्ट) शौचालय बांधण्याचे काम D.S.P CEMENT CONSTRUCTION यांना कोणताही करारनामा न करता दिले असून अनुदानाची रक्कम लाभार्थ्यांना न देता कंत्राटदारास दिली आहे. सन 2016-17 व 2017-18 या वित्तीय वर्षामध्ये एकूण 460 रेडीमेड(प्री-कास्ट) शौचालये बांधली आहेत. त्यामुळे त्यावरील खर्च रुपये 7590000 अक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| कामाचे नाव: | वैयक्तिक शौचालय योजने अंतर्गत रेडीमेड(प्री-कास्ट) शौचालये बांधणे. |
| कंत्राटदाराचे नाव: | D.S.P CEMENT CONSTRUCTION |
| कोटेशन नोटीस: | चंशमनपा/स्वच्छता विभाग/2505(अ)/2016 दि.08/11/2016 |
| प्रशासकिय मंजूरी: | नस्तीत अभिलेखे उपलब्ध नाही. |
| स्थायी समिती मंजुरी: | नस्तीत अभिलेखे उपलब्ध नाही. |
| तांत्रिक मंजुरी | नस्तीत अभिलेखे उपलब्ध नाही. |
| कार्यादेश: | चंशमनपा/स्वच्छता विभाग/2505(अ)/2016 दि.16/11/2016 |
| अंदाज पत्रकिय रक्कम: | नस्तीत अभिलेखे उपलब्ध नाही. |

महानगरपालिका चंद्रपूर येथील सन 2016-17 व 2017-18 या वित्तीय वर्षामध्ये मनपातर्फे शासन निर्णय क्र.स्वभाअ/2015/ प्र.क्र.23/नवि-34/ दि.15 मे 2015 नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) राबविण्यात येते. त्यांतर्गत येणाऱ्या वैयक्तिक घरगुती शौचालय योजनेसाठी उपरोक्त शासन निर्णयातील मुद्दा क्र.3.3(अ)(2) नुसार प्रत्येक लाभार्थ्याला केंद्र शासनाचे 4000 रुपये व राज्य शासनाचे 8000 रुपये असे 12,000 इतके अनुदान अनुज्ञेय आहे.तसेच चंद्रपूर महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या ठराव क्र.82 दिनांक 22/07/2016 अन्वये प्रत्येक लाभार्थ्यास शौचालय बांधणीसाठी 5000 रुपये अनुदान देण्याची तरतूद आहे. असे एकूण 17000 रुपये प्रती लाभार्थी अनुदान खर्च होत आहे. सदर योजनेवर सन 2016-17 मध्ये 80515198 रुपये व 2017-18 मध्ये 20865888 रुपये असे एकूण 101381086 रुपये खर्च झाले आहेत.

महानगरपालिका चंद्रपूर येथील सन 2016-17 व 2017-18 या वित्तीय वर्षात स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत सुरु असलेल्या वैयक्तिक शौचालय योजना राबवताना रेडीमेड(प्री-कास्ट) शौचालय बांधण्यासाठी D.S.P CEMENT CONSTRUCTION यांना काम देण्यात आल्याचे निदर्शनास आले. त्यासाठी प्रती लाभार्थी / प्रती शौचालय 16,500 रुपये दर निश्चित करण्यात आला आहे. या व्यतिरिक्त मंजूर दरानुसार शौचालय बांधून देणाऱ्या इतर कंत्राटदाराकडूनसुध्दा काम करून घेण्यात आले आहे. सदर कामात पुढील प्रमाणे अनियमितता दिसून आल्या.

1)सदर योजना शासन निर्णय क्र.स्वभाअ/2015/ प्र.क्र.23/नवि-34/ दि.15 मे 2015 राबविण्यात येते. त्यासाठी शासन निर्णयातील मुद्दा क्र.3.3(अ)(2) नुसार प्रत्येक लाभार्थ्याला केंद्र शासनाचे 4000 रुपये व राज्य शासनाचे 8000 रुपये असे 12,000 इतके अनुदान अनुज्ञेय आहे. तसेच चंद्रपूर महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या ठराव क्र.82 दिनांक 22/07/2016 अन्वये प्रत्येक लाभार्थ्यास शौचालय बांधणीसाठी 5000 रुपये अनुदान देण्याची तरतूद आहे. असे एकूण 17000 रुपये प्रती लाभार्थी अनुदान खर्च होत आहे. उपरोक्त शासन निर्णयातील मुद्दा क्र.3.3(17) नुसार अनुदान फक्त लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्याची तरतूद आहे. परंतु चंद्रपूर महानगरपालिकेने रेडीमेड(प्री-कास्ट) शौचालय लाभार्थ्याएवजी अनुदानाची रक्कम कंत्राटदारास दिली आहे. सन 2016-17 व 2017-18 या वित्तीय वर्षामध्ये एकूण 460 रेडीमेड(प्री-कास्ट) शौचालये बांधली आहेत. त्याबाबतची माहिती पुढील विवरणपत्रात दिली आहे. त्यानुसार डीमेड(प्री-कास्ट) शौचालयावर 7590000 रुपये खर्च झाला आहे. त्यामुळे त्यावरील खर्च रुपये 7590000 आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

| अ.क्र. | प्रमाणक नं. | दिनांक | रक्कम | खर्चाचा तपशील | लाभार्थी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1798 | 15/12/2016 | 544500 | 33 Pre-cast Toilet | Paramvir Lahuji Khobragade |
| 2 | 1830 | 2/01/2017 | 330000 | 20 Pre Cast Toilet | Prabhu Group |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 3 | 1840 | 2/01/2017 | 49500 | 3 Pre Cast Toilet | Prabhu Group |
| 4 | 1849 | 16/01/2017 | 891000 | 54 Pre Cast Toilet | Paramvir Lahuji Khobragade |
| 5 | 1888 | 04/02/2017 | 231000 | 14 Pre Caste Toilet | Prabhu Group |
| 6 | 1909 | 15/02/2017 | 940500 | 57 Pre Cast Toilet | Paramvir Lahuji Khobragade |
| 7 | 1953 | 07/03/2017 | 49500 | 3 Pre Cast Toilet | Prabhu Group |
| 8 | 1961 | 15/03/2017 | 198000 | 12 Pre Cast Toilet | Paramvir Lahuji Khobragade |
| 9 | 1962 | 15/03/2017 | 297000 | 18 Pre Cast Toilet | Paramvir Lahuji Khobragade |
| 10 | 1973 | 30/03/2017 | 297000 | 18 Pre Cast Toilet | Paramvir Lahuji Khobragade |
| 11 | 4 | 03/05/2017 | 264000 | 16 Pre Cast Toilet | Paramvir Lahuji Khobragade |
| 12 | 5 | 03/05/2017 | 297000 | 18 Pre Cast Toilet | Paramvir Lahuji Khobragade |
| 13 | 8 | 8/05/2017 | 165000 | 10 Pre Cast Toilet | Prabhu Group |
| 14 | 13 | 19/05/2017 | 247500 | 15 Pre Cast Toilet | Sunil Tanaji Vairagade |
| 15 | 19 | 29/05/2017 | 247500 | 15 Pre Cast Toilet | Paramvir Lahuji Khobragade |
| 16 | 43 | 17/07/2017 | 181500 | 11 Pre Cast Toilet | Shivshakti Traders |
| 17 | 52 | 04/08/2017 | 495000 | 30 Pre Cast Toilet | Paramvir Lahuji Khobragade |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 18 | 60 | 29/08/2017 | 231000 | 14 Pre Cast Toilet | Paramvir Lahuji Khobragade |
| 19 | 61 | 29/08/2017 | 214500 | 13 Pre Cast Toilet | Paramvir Lahuji Khobragade |
| 20 | 113 | 14/12/2017 | 181500 | 11 Pre Cast Toilet | Paramvir Lahuji Khobragade |
| 21 | 121 | 04/01/2018 | 198000 | 12 Pre Cast Toilet | Paramvir Lahuji Khobragade |
| 22 | 126 | 11/01/2018 | 297000 | 18 Pre Cast Toilet | Paramvir Lahuji Khobragade |
| 23 | 142 | 31/01/2018 | 247500 | 15 Pre Cast Toilet | Paramvir Lahuji Khobragade |
| 24 | 162 | 28/03/2018 | 247500 | 15 Pre Cast Toilet | Paramvir Lahuji Khobragade |
| 25 | 163 | 28/03/2018 | 247500 | 15 Pre Cast Toilet | Shivshakti Traders |
| | | | | | |
| | | एकूण | 7590000 | 460 Pre CasteToilet | |

2)महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 च्या प्रकरण 9 मधील नियम 121 नुसार उपरोक्त कामाचा कोणताही आराखडा व अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले नसून नियम 123 अंतर्गत प्रशासकीय मंजुरी व नियम 124 अंतर्गत व तांत्रिक मंजुरी घेतलेली नाही. त्यामुळे रेडीमेड(प्री-कास्ट) शौचालय बांधकामाच्या दर्जाबाबत कोणतेही मापदंड निश्चित न करता कंत्राटदाराला काम दिलेले आहे.

3)महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 च्या प्रकरण 9 मधील नियम 134 नुसार कंत्राटदारास मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 अन्वये आवश्यक असलेल्या मुद्रांक कागदावर, कंत्राटाच्या अटी व शर्ती नमूद असलेला करारनामा करणे आवश्यक आहे. परंतु सदर काम देताना असा कोणताही करारनामा केलेला नाही. त्यामुळे काम विहित पद्धतीने पूर्ण झाले कि नाही याची पडताळणी करता येत नाही तसेच शासनखाती मुद्रांक शुल्क भरले गेले नाही.

या प्रकरणी अर्धसमासपत्र क्र.130 दिनांक 05/02/2021 नुसार विचारणा केली असता संयुक्तिक उत्तर न

मिळाल्यामुळे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DLFARKM9301 (Ref No : 61, Hmm No : 130)

## *12 निवडणुक विभागातील वर्ष 2017 मधील निवडणुकी करिता केलेल्या खर्चातील अनियमिततांबाबत.*

**निवडणुक विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 2758768.00/-

| |
|---|
| मनपा चंद्रपूर येथील वर्ष 2017 मधील निवडणुकीकरिता विविध बाबीवर फार मोठया प्रमाणात खर्च करण्यात आला. मानधन भत्ता वाटपाकरिता घेतलेल्या अग्रिम रु.50 लक्ष पैकी रु.2,50,000/- चे अग्रीमाचे प्रमाणक समायोजन नस्तीत दिसून आले नाही. ज्यांना अग्रिम दिले त्यांनी पुढे दुसऱ्यांना अग्रिम दिल्याचे नमूद आहे. निवडणुकीकरिता वाहन उपलब्ध करण्याकरिता निविदा प्रक्रियेद्वारे कंत्राटदार नेमूण वाहने उपलब्ध करण्यात आली असे असतांना पुन्हा दुसऱ्या कंत्राटदाराकडून वाहने मागवून 25 वाहनावर रु.2,25,000/- चा अनाधिकृत खर्च करण्यात आला. तसेच निवडणूकीच्या कामाकरिता आलेल्या कर्मचाऱ्यांना चहापान,नास्ता,जेवण इत्यादी करिता केलेल्या खर्च हा निवडणुकीपूर्वी दोन महिने अगोदर पासून दर्शवून नियमबाह्य खर्च करण्यात आला. |

मनपा चंद्रपूर येथील वर्ष 2017 मधील सर्वसाधारण निवडणूका ह्या 19/04/2017 रोजी घेण्यात आल्या व मतमोजणी दिनांक 21/04/2017 रोजी करण्यात आली. निवडणुका दरम्यान विविध बाबीवर फार मोठया प्रमाणात खर्च करण्यात आला. त्यामध्ये काही खर्चामध्ये खाली दर्शविल्याप्रमाणे अनियमितता झाल्याचे दिसून आले.

1. निवडणुकीचे कामाकरिता असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांना मानधन वाटपाकरिता रु.50 लक्ष अग्रिम रोखपाल यांना देण्यात आले. त्यांनी रु.30,57,520/- या खर्चाचा हिशेब देऊन उर्वरित अग्रिम मनपा फंडात जमा केल्याचे नमूद आहे. परंतु त्यांनी खर्च केलेल्या रकमेपैकी रु.2,50,000/- चे अग्रीमाचे खर्चाची प्रमाणके समायोजन नस्तीत दिसून आले नाही. हा खर्च श्री महेश बुटले वाटर कॅन पुरवठा रु.1,00,000/- तर श्री पुंडलिकराव लांजेवार वाहनपुरवठा रु.1,50,000/- अशा प्रकारचे अग्रिम दिल्याचे नमूद आहे. परंतु त्याबाबतची खर्चाची प्रमाणके नस्तीत नाही. यावरून हा खर्च प्रत्यक्षात केला किंवा नाही याचा बोध होत नाही. खर्चाची

प्रमाणके नस्तीत नसल्यामुळे हा खर्च रु.2,50,000/- आपेक्षित ठेवण्यात येत आहे.

2. मनपा निवडणुकीकरिता चार चाकी वाहने उपलब्ध करण्याकरिता निविदा प्रक्रिया पुर्ण करून मे.डी.के.ट्रान्सपोर्ट यांना दि.25/03/2017 ते 22/04/2017 या कालावधी करिता एकूण 55 वाहने प्रती वाहन रु.3000/- प्रमाणे वाहन पुरवठा करण्याचे कंत्राट देण्यात आले. व त्याकरिता त्यांना रु.22,83,768/- एवढे प्रदान करण्यात आले. असे असतांना कोणतीही निविदा प्रक्रिया न राबविता श्री.अजय पुंडलिक लांजेवार यांचेकडून दि.17/04/2017 ते 19/04/2017 या कालावधीकरिता 25 वाहने किरायाने घेऊन त्यांना रु.2,25,000/- चे प्रदान करण्यात आल्याचे प्रमाणकावरून दिसून येते. त्याबाबतची कोणतीही निविदा प्रक्रिया किंवा तपशीलवार मागणी देयक नस्तीत दिसून आले नाही. निवडणुकीकरिता वाहनाची निविदा प्रक्रिया पूर्वीच केली असतांना व त्यांचेकडून एकूण 55 वाहने पुरवठा केला असतांना पुन्हा नियमबाह्यपणे निविदा प्रक्रिया न करता 25 वाहने निवडणुकीच्या कामात वापरली असे दर्शवून संबंधिताना रु.2,25,000/- चे प्रदान नियमबाह्य करण्यात आले.

3. निवडणुकीचे कामाकरिता आलेल्या कर्मचाऱ्यांना चहापान, नास्ता व जेवण ईत्यादीचा पुरवठा करण्याकरिता निविदा प्रक्रिया पुर्ण करून त्याबाबतचे कमी दराचे निविदाधारक मे. आस्वाद कॅटरिंग चंद्रपूर यांना पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आले.

मे. आस्वाद कॅटरिंग यांनी दिनांक 17/02/2017 ते 21/04/2017 पर्यंत चहा, कॉपी, नास्ता, बिसलरी, जेवण याचा पुरवठा केला व त्याबाबत त्यांना रु. 17,91,800/- एवढ्या रकमेचे प्रदान करण्यात आले. मनपाची सार्वत्रिक निवडणुक दिनांक 19/04/2017 व मतमोजणी दिनांक 21/04/2017 असतांना दोन महिने पूर्वीपासून म्हणजे दिनांक 17/02/2017 पासून चहा, नास्ता, जेवण यावरील खर्च करण्यात आला हे संयुक्तिक वाटत नाही. तसेच याबाबत पुरवठादारांनी दिलेले खर्चाचे विवरण पत्र व प्रमाणक यावर सक्षम प्राधिकाऱ्यांची स्वाक्षरी नाही. तसेच प्रमाणपत्र नमूद केले नाही.

4. निवडणुकीचे कामाकरिता खर्चाच्या प्रमाणकासोबत जोडलेली उपप्रमाणके यावर प्रदानार्थ रक्कम मंजूर केल्याचे कोणत्याही उपप्रमाणकावर दिसून आले नाही. तसेच साठापुस्तक क्रमांक व आवश्यक प्रमाणपत्र नमूद करून त्यावर सक्षम प्राधिकाऱ्यांची स्वाक्षरी घेतलेली नाही.

उपरोक्त बाबी संदर्भात अर्धसमास पत्र क्र.149 दि. 17/02/2021 नुसार खुलासा विचारला असता कोणताही खुलासा प्राप्त न झाल्यमुळे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATVVBM6301 (Ref No : 92, Hmm No : 149)

## *13 शिक्षण विभाग तसेच इतर विभागातील कर्मचाऱ्यांना वेतन प्रदान करतांना वेतनातून 1 रु. मुद्रांकाची रक्कम वसूल न करण्याच्या अनियमिततेबाबत.*

**शिक्षण विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :7 महानगरपालिका स्व-निधी व शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 19200.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 19200.00/-

| |
|---|
| महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक 19/04/2004 तसेच वित्त विभाग शासन परिपत्रक संकीर्ण 1013/प्र.क.64/ दिनांक 26/10/2015 अन्वये रुपये 5000/- व त्यापेक्षा जास्त प्रदानाकरीता 1 रु.मुद्रांकाच्या तिकिटावर अदात्याची`स्वाक्षरी घेणे गरजेचे आहे. परंतु संगणकीय प्रणालीच्या अनुषंगाने वेतन पट ठेवत नसल्यामुळे 1 रु. मुद्रांक तिकिटाऐवजी कर्मचाऱ्याच्या वेतनातून 1 रु. वजा करून ते शासन खाती जमा करण्याचे स्पष्ट निर्देशित असून सुद्धा शिक्षण विभागात तसेच इतर सर्व विभागातील कर्मचाऱ्याच्या वेतनातून सन 2016-17 व 2017-18 या आर्थिक वर्षांत 1 रु. मुद्रांकाची रक्कम वसूल करून शासन खाती जमा करण्यात आलेली नाही. |

चंद्रपूर महानगरपालिकेच्या सन 2016-17व 2017-18 या वर्षातील शिक्षण विभाग तसेच इतर विभागातील काही निवडक महिन्यातील वेतन देयकाची तपासणी केली असता महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना देय असणाऱ्या वेतन देयकातून महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक 19/04/2004 तसेच वित्त विभाग शासन परिपत्रक संकीर्ण 1013/प्र.क.64/ दिनांक 26/10/2015 अन्वये 1 रुपये मुद्रांक शुल्काची कपात केली जात नसल्याचे निदर्शनास आले. लेखापरीक्षणासाठी निवडण्यात आलेल्या काही निवडक महिण्याचे लेखापरीक्षण केले असता शिक्षण विभाग तसेच इतर विभागातील अंदाजे एकूण 800 कर्मचाऱ्यांचे प्रतिवर्षी (800*12) = 9600 प्रमाणे दोन वर्षातील रु. 19200/- वसुली करणे क्रमप्राप्त ठरते.

वरील शासन निर्णयानुसार रुपये 5000/- व त्यापेक्षा जास्त प्रदानाकरीता 1 रु.मुद्रांकाच्या तिकिटावर अदात्याची`स्वाक्षरी घेणे गरजेचे आहे. परंतु संगणकीय प्रणालीच्या अनुषंगाने वेतन पट ठेवत नसल्यामुळे 1 रु. मुद्रांक तिकिटाऐवजी कर्मचाऱ्याच्या वेतनातून 1 रु. वजा करून ते शासन खाती जमा करण्याचे स्पष्ट निर्देशित असून सुद्धा शिक्षण विभागातील कर्मचाऱ्याच्या वेतनातून सन 2016-17 व 2017-18 या आर्थिक वर्षांत 1 रु. मुद्रांकाची रक्कम वसूल करण्यात आलेली नाही. तरी वरीलप्रमाणे कार्यवाही करून मुद्रांकाची रक्कम वसूल करून खालील नमूद लेखाशीर्षकात भरणा करावी व चलनाच्या प्रतीसह अनुपालन सादर करावे.

0030 - मुद्रांक व नोंदणी फी

02 - मुद्रांक न्यायीकेत्तर , 102 - मुद्रांकाची विक्री

02 - इतर न्यायीकेत्तर मुद्रांकाची विक्री

(01)(02) नोंदणी महानिरीक्षक (00300464) उर्वरित महाराष्ट्राकरिता.

सदर अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र 12 ,दि.22.10.2020 नुसार विभागास अनुपालन अभिप्राय सादर करण्यास कळविले होते. तथापि विभागाकडून समर्पक अनुपालन / अभिप्राय प्राप्त न झाल्यामुळे परिच्छेद नोंदविण्यात येत आहे.

DATSMBM7501 (Ref No : 6, Hmm No : 12)

## *14 चंद्रपूर महानगरपालिका अंतर्गत विद्युत विभागातील माहे सप्टेंबर 2016 व मार्च 2017 या महिन्यातील विज देयकांपोटी जास्तीची रक्कम महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ यांना अदा केल्याबाबत.*

**विद्युत विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 2**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व-निधी व शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 2793610.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2786460.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 7150.00/-

मनपा चंद्रपूर अंतर्गत महाराष्ट्र राज्य विद्युत विभाग केंद्र यांचे उपविभाग क्र.1 कडून प्राप्त विजदेयके सप्टेंबर 2016 नुसार रु.6160/- जास्तीची भरणा करण्यात आलेली आहे. तसेच माहे मार्च 2017 चे लोकमान्य टिळक शाळा यांचे विज देयक रु.00.00 असतांना रु.990/- जास्तीची अदा करण्यात आलेली आहे.

महानगरपालिका चंद्रपूर अंतर्गत इमारतीचे तसेच शाळांचे महाराष्ट्र राज्य विद्युत विभाग केंद्र यांचे उपविभाग क्र. 1 कडून मनपाला प्राप्त विज देयकांपोटी जास्तीची भरण्यात आल्याने खालील प्रमाणे अनियमितता आढळून आलेल्या आहेत.

1. महानगरपालिका चंद्रपूर अंतर्गत विद्युत विभागातील माहे सप्टेंबर 2016 च्या प्राप्त विज देयकांची तपासणी केली असता विज बिल विभागाद्वारे प्राप्त माहितीनुसार खालील दर्शविलेल्या ग्राहक क्रमांकानुसार विज देयकाचा एकत्रित भरणा केलेला आहे. त्यानुसार देयकाची एकत्रित बेरीज रु.12,38,450/- येते परंतु देयकाचा भरणा करतांना एकूण रु.12,44,610/- येवढी रक्कम भरल्याचे दिसुन येते. त्यामुळे मनपाचे रु. 6160/- ची वित्तीय हानी झालेली आहे. सदरची रक्कम म.रा.वि.वि. यांचे कडून वसूल करून मनपाचा फंडात जमा करावी.

| अ. क्र. | ग्राहक क्रमांक | कार्यालय / पाइंटचे नाव | रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | 900010008060 | गंज वार्ड | 29350 |
| 2 | 900030002033 | ट्राफिक सिग्नलआझाद | 40 |
| 3 | 450010781898 | कस्तुरबा रोड | 13380 |
| 4 | 450011391953 | हायमास्ट जयंत टोकी | 1650 |
| 5 | 450010720155 | रेडकॉस भवन | 26270 |
| 6 | 900010008132 | जटपुरा पाइंट नं. २ | 9200 |
| 7 | 900030002009 | ट्राफिक सिग्नल छोटाबा | 630 |
| 8 | 450011391929 | हयमास्ट पंचशीलचौक | 1430 |
| 9 | 900010008116 | घुटकाळा पाइंट | 16710 |
| 10 | 900010008299 | न्यु बगडखीडकी | 13790 |
| 11 | 900010008256 | सिद्धार्थ नगर | 6980 |
| 12 | 900010008302 | हिग्लांज भवानी | 10330 |
| 13 | 900010008230 | जुनोना रोडपाइंट | 15760 |
| 14 | 450011390515 | पंचशील नगर | 1080 |
| 15 | 900010712611 | दीनदयाल नगर | 18410 |

| | | | |
|---|---|---|---|
| 16 | 450011390523 | विकास नगर | 1460 |
| 17 | 900010008515 | मराठा चौक | 12600 |
| 18 | 900010008167 | विकास चौक | 28180 |
| 19 | 450011390507 | हायमास्ट नेताजीपुतळा | 1550 |
| 20 | 900010008141 | सुपरमार्केट पाइंट | 00 |
| 21 | 900010008574 | बागला चौक | 11440 |
| | | एकूण | 220240 |
| 22 | 900010008507 | दसरा ग्राउंड | 15710 |
| 23 | 900010008183 | महाकाली वार्ड | 16510 |
| 24 | 900030002025 | ट्राफिक सिग्नलगिरनार | 360 |
| 25 | 900010007926 | गांधीचौक पाइंट | 13210 |
| 26 | 900010008558 | गांधी चौक पाइंट | 7350 |
| 27 | 900010008213 | हनुमान मंदीर पाइंट | 5300 |
| 28 | 900010008566 | रहमत नगर | 1600 |
| 29 | 900010008001 | रहमतनगर पाइंट | 16090 |
| 30 | 900010008043 | जुना समाधी पाइंट | 31920 |
| 31 | 900010007977 | पठानपुरा गेट पाइंट | 4530 |

| | | | |
|---|---|---|---|
| 32 | 900010104123 | हायमास्ट पठाणपुरा | 1380 |
| 33 | 900010008264 | इंदीर नगर पाइंट | 3370 |
| 34 | 900010008086 | आझाद बगीचा | 6680 |
| 35 | 900010008094 | जयंत टाकीज | 31590 |
| 36 | 900010008108 | नेहरू स्कुल पाइंट | 35720 |
| 37 | 900010008191 | नरमल स्कुल पाइंट | 17690 |
| 38 | 9000100082058205 | नेताजी चौक पाइंट | 11560 |
| 39 | 900010008248 | मेक्ल कॅम्प पाइंट | 9580 |
| 40 | 90001000175 | लोखंडी पुलीया | 21430 |
| 41 | 900010008493 | शनी मंदीर | 20080 |
| 42 | 900010008523 | गौतम नगर | 35520 |
| 43 | 900010008027 | अंचलेश्वर वार्ड | 26490 |
| 44 | 900010008035 | दादमहल वार्ड | 27460 |
| 45 | 900010008078 | सोरते सम्राट चौक | 40520 |
| | | एकुण | 401650 |
| 46 | 900010008051 | गिरनार चौक | 15200 |
| 47 | 900010008272 | आंबेडकर पाइंट | 21780 |

| | | | |
|---|---|---|---|
| 48 | 900010008311 | एकोरी पाइंट | 32670 |
| 49 | 900010008221 | लालपेठ पाइंट | 4940 |
| 50 | 900010008124 | जटपुरा पाइंट नं. १ | 7320 |
| 51 | 900010007969 | विठ्ठल मंदीर | 31980 |
| 52 | 900010008019 | गोपालपुरी पाइंट | 35140 |
| 53 | 900010007934 | पालीटेक्नीक | 29250 |
| 54 | 900010008281 | न्यु दादमहल वार्ड | 25190 |
| 55 | 900010007951 | जोड देउळ | 19820 |
| 56 | 900010007993 | टागोर स्कुल | 18550 |
| 57 | 900010007985 | गडला मारोती | 18520 |
| 58 | 900010007942 | कात्यानी हॉस्पीटल | 18890 |
| 59 | 900010008159 | बि.एन.आर.चौक | 31220 |
| 60 | 900010008485 | श्री.टाकीज | 00 |
| 61 | 450018727141 | विठ्ठल मंदिर हायमास्ट | 1630 |
| 62 | 450018722041 | मानवटकर हॉस्पीटल | 9930 |
| 63 | 450018722068 | पुर्ती बाजार जटपुरा | 23400 |
| 34 | 900030002017 | जयंत टाकीज ट्राफिक | 20 |

| | | | |
|---|---|---|---|
| 65 | 450018722050 | आंबेकर लेआउट | 10480 |
| 66 | 450018722033 | पंचशील पाइंट | 28180 |
| 67 | 450018721878 | बिनबा गेट घुटकाळा | 500 |
| 68 | 450018721975 | स्कुल पाइंट क्वीदवाई | 15810 |
| 69 | 450018721908 | भावसार पाइंट | 14020 |
| 70 | 90017000120 | कमीशनर माना | 00 |
| 71 | 450018795316 | नेहरू पाइंट हायमास्ट | 1940 |
| 72 | 450018795308 | बालाजी पाइंट हायमास्ट | 1810 |
| | | एकूण | 418190 |
| 73 | 450018791442 | रामा दडया सवारी | 14980 |
| 74 | 450018791388 | विठ्ठल मंदिर वार्ड | 7910 |
| 75 | 450018791396 | गोपालपूरी बालाजी वार्ड | 5870 |
| 76 | 450018791434 | बावीस चौक | 9370 |
| 77 | 450018791418 | विश्वकर्मा चौक बालाजी | 11110 |
| 78 | 450018791400 | एस.पी.कॉलेज बालाजी | 27920 |
| 79 | 797110 | हयमास्ट छोटाबाजार | 00 |
| 80 | 450018790080 | रामटेके नगरसेवक पाइंट | 9560 |

| | | | |
|---|---|---|---|
| 81 | 450018792163 | हनुमान मंदिर | 3010 |
| 82 | 450018790063 | आर के बार चौक | 5290 |
| 83 | 450018792201 | उके नगरसेवक पाइंट | 15650 |
| 84 | 450018790071 | महाकाली मंदिर भिवापूर | 10700 |
| 85 | 450018792139 | सेन्ट्रल रेल्वे स्टेशन लालपेठ | 6160 |
| 86 | 450018792171 | साई मंदिर | 4710 |
| 87 | 450018792147 | डीएड कॉलेज बाबुपेठ | 3300 |
| 88 | 450018792198 | राघकृष्ण चौक बाबुपेठ | 17370 |
| 89 | 450018790047 | मातानगर चौक | 19140 |
| 90 | 450018790039 | बंगालीकॅम्प दुर्गामंदिर जवळ | 5490 |
| 91 | 450018790055 | भंगाराममंदिर भिवापूर | 6750 |
| 92 | 450014796938 | हयमास्ट बोहराकब्रस्थान | 90 |
| 93 | 450018792112 | सोनझरी मोहल्ला बाबुपेठ | 9450 |
| 94 | 450018792139 | लालपेठ | 00 |
| 95 | 450017595682 | दसरा ग्राऊन्ड हयमास्ट | 1220 |
| 96 | 450017595674 | झरपटी नदी हायमास्ट | 240 |
| 97 | 450015797431 | ज्योतीबा फुले चौक | 470 |

| | | | |
|---|---|---|---|
| | | हायमास्ट | |
| 98 | 450014807859 | हायमास्ट जोडदेउळ चौक | 2610 |
| | | एकूण | 1238450 |

2. मनपा चंद्रपूर अंतर्गत विद्युत विभागातील माहे मार्च 2017 च्या ग्राहक क्र.450015799337 या क्रमांकाचे विज देयक रक्कम रु.00.00 असतांना त्या विज देयकाची रक्कम रु. 990/- म.रा.वि.वि. केंद यांचेकडे कशाचे आधारे भरण्यात आली. सदरची रक्कम रु. 990/- विज केंद्राकडून वसूल करून मनपा फंडात जमा करण्यात यावी व तसे अनुपालन सादर करावे.
या कार्यालयाचे अर्धसमास पत्र क्र.10 दिनांक 22/10/2020 नुसार खुलासा विचारला असता संयुक्तिक खुलासा नसल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATDRMM6701 (Ref No : 13, Hmm No : 10)

## *15 चंद्रपूर महानगरपालिका अंतर्गत विद्युत विभागातील कंत्राटदाराच्या देयकांतून आयकर, Vat कपातीच्या आढळून आलेल्या अनियमिततेबाबत.*

**Electrical Department**
**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**
**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 23756892.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 23510699.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 246193.00/-

शासन निर्णय क्र. आयकर 1007/प्रक्र-105/लेखा प्र-5 दिनांक 22 फेब्रुवारी 2008 मधील आयकर कपातीचे कलम 194-C नुसार संबंधित कंत्राटदारांचा देयकातून 2% आयकर कपात करणे आवश्यक होते परंतु.महानगरपालिका चंद्रपूर येथील वर्ष 2016-17 व 2017-18 या वित्तीय वर्षामध्ये विद्युत विभागातील कंत्राटदाराच्या देयकांतून आयकर 1% कपात केल्याचे दिसून आले. त्यामुळे शासनाची रु.2,46,199/- आर्थिक नुकसान झाले.

शासन निर्णय क्र. आयकर 1007/प्रक्र-105/लेखा प्र-5 दिनांक 22 फेब्रुवारी 2008 मधील आयकर कपातीचे कलम 194-C नुसार संबंधित कंत्राटदारांच्या देयकातून 2% आयकर कपात करण्याबाबत आदेशीत असतांना मनपा

चंद्रपूर येथील वर्ष 2016-17 व 2017-18 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षण केले असता खालील दर्शविलेल्या कंत्राटदाराच्या देयकामधून 1% टक्के दराने आयकराची कपात करण्यात आली. त्यामुळे शासनाच्या महसुलाची हानी झाली आहे.

कंत्राटदारांचा कामाचे देयकाची यादी खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | मोजमाप पुस्तिका क्र. | कंत्राटदार / फर्मचे नाव | देयकाची रक्कम (रुपये) | कपात करावयाचे आयकर 2% (रुपये) | कपात केलेले आयकर 1% (रुपये) | वसूलपात्र रक्कम1% (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 158/ 10/05/2016 | आधुनिक इलेक्ट्रिकल्स | 397603<br>614572<br>813993<br>466648 | 7952<br>12291<br>16280<br>9333 | 3976<br>6146<br>8140<br>4667 | 3976<br>6146<br>8140<br>4667 |
| 2. | 161/ 10/05/2016 | बालाजी आसोसीएटस | 675018<br>594255<br>291447<br>187161<br>387773<br>153683 | 13500<br>11885<br>5829<br>3743<br>7755<br>3074 | 6750<br>5943<br>2914<br>1872<br>3878<br>1537 | 6750<br>5943<br>2914<br>1872<br>3878<br>1537 |
| 3. | 235/ | आधुनिक इलेक्ट्रिकल्स | 496733<br>707002<br>228000 | 9935<br>14140<br>4560 | 4967<br>7070<br>2280 | 4967<br>7070<br>2280 |
| 4. | 160 10/05/2016 | MSR Murthy | 581831<br>566707 | 11637<br>10534 | 5818<br>5267 | 5818<br>5267 |
| 5. | 232 | सुयोग ट्रेडिंग कार्पोरेशन | 1904242<br>37711 | 38085<br>754 | 19043<br>377 | 19043<br>377 |
| 6. | 35 | BK ट्रेडर्स | 1328276 | 26566 | 13283 | 13283 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 387284<br>371306<br>497169<br>283004<br>396433<br>311665 | 7746<br>7426<br>9943<br>5660<br>7929<br>6233 | 3873<br>3713<br>4972<br>2830<br>3964<br>3117 | 3873<br>3713<br>4972<br>2830<br>3954<br>3117 |
| 7. | 84 | सुयोग ट्रेडींग | 459109<br>102749<br>108759<br>684411<br>587887 | 9182<br>2055<br>2175<br>13688<br>11758 | 4591<br>1027<br>1088<br>6844<br>5879 | 4591<br>1027<br>1088<br>6844<br>5879 |
| 8. | 234<br>10/05/2016 | BK ट्रेडर्स | 682651<br>1428619<br>190174<br>330410<br>1859274<br>442123 | 12853<br>28572<br>3803<br>6608<br>37185<br>8842 | 6427<br>14286<br>1902<br>3304<br>18593<br>--- | 6427<br>14286<br>1902<br>3304<br>18593<br>8842 |
| 9. | 157<br>10/05/2016 | बालाजी असोसीएटस | 149535<br>1321641<br>541383<br>583829 | 2991<br>26433<br>10828<br>11677 | 1496<br>13216<br>5414<br>5838 | 1496<br>13216<br>5414<br>5838 |
| 10. | 86 | आधुनिक इलेक्ट्रिकल्स | 255295<br>306981<br>1542546 | 5106<br>6140<br>30851 | 2553<br>3070<br>15425 | 2553<br>3070<br>15425 |
| | एकूण | | 23756892 | 483537 | --- | 246193 |

तरी वर दर्शविल्याप्रमाणे कंत्राटदाराचे देयाकामधून 1% दराने आयकर कमी कपात केल्यामुळे रु.2,46,193/- एवढी रक्कम वसूलपात्र ठरते. तरी सदरची रक्कम वसुलीबाबत कार्यवाही करून अनुपालन सादर करावे.

याबाबत अर्धसमास पत्र क्र.20, दिनांक 02/11/2020 नुसार खुलासा मागितला असता तो प्राप्त न झाल्यामुळे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATDRMM6701 (Ref No : 28, Hmm No : 20)

## *16 सार्वजनिक बांधकाम विभागाने ठेवलेल्या विविध नोंदवह्यांतील अनियमिततेबाबत .*

**बांधकाम विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 4**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व-निधी व शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका व महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011मधिल प्रकरण क्रमांक-9 मधील तरतूदीनुसार मनपा चंद्रपूर येथे सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रशासकीय मान्यता नोंदवही, तांत्रिक मान्यता नोंदवही, कार्यादेश नोंदवही इत्यादी नोंदवह्या विहित नमुन्यात ठेवलेल्या नाहीत

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका व महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधिल तरतूदी यानुसार चंद्रपूर मनपा सार्वजनिक बांधकाम विभागाने खालील नोंदवह्या शासनाने विहीत केल्या प्रमाणे ठेवणे आवश्यक आहे.

नोंदवह्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | नोंदवहीचा नमुना | नियम | नोंदवहीचे नाव | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका नियम 132 व महारष्ट्र लेखा साहिंता 2011 मधील नियम 123 | --- | प्रशासकीय मान्यता नोंदवही | वर्ष निहाय देण्यात आलेल्या प्रशासकीय मान्यतेच्या तरतुदीनुसार. निधी निहाय |
| 2 | महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका नियम 135 व | ---- | तांत्रिक मान्यता | वर्ष निहाय देण्यात आलेल्या तांत्रिक |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र लेखा साहिंता 2011 मधील नियम 124 | | नोंदवही | मान्यतेच्या तरतुदीनुसार. निधी निहाय |
| 3 | महाराष्ट्र लेखा साहिंता 2011 मधील नियम 121 | ---- | आराखडा व अंदाजपत्रक तयार करणे | अंदाजपत्रकाच्या मूळ मंजूर प्रती दप्तरी ठेवून त्याची सूची ठेवणे . |
| 4 | महाराष्ट्र लेखा साहिंता 2011 मधील नियम 120 | 12 | कार्यादेश नोंदवही | विविध कामाचा तपशील, कंत्राटदारचे नाव,कार्यादेश क्र. काम पूर्ण होण्याच्या संभाव्य दिनांकासह. |
| 5 | महाराष्ट्र लेखा साहिंता 2011 मधील नियम 63 | 33 | मोजमाप पुस्तिका नोंदवही | वर्षनिहाय मोजमाप पुस्तिका नोंदवही ठेवणे |
| 6 | महाराष्ट्र लेखा साहिंता 2011 मधील नियम 62 व 191 | 16 | स्थावर मालमत्ता नोंदवही | स्थावर मालमत्ता नोंदवही |
| 7 | महाराष्ट्र लेखा साहिंता 2011 मधील नियम 62 व 191 | 17 | जंगम मालमत्ता नोंदवही | जंगम मालमत्ता नोंदवही |
| 8 | महाराष्ट्र लेखा साहिंता 2011 मधील नियम 62 व 250 | 21 | वस्तुसुची नोंदवही | -------- |

1)वरील सर्व नोंदवह्या शासनाने विहित केलेल्या नमुन्यात ठेवण्यात आलेल्या नाहीत.

2)वरील सर्व नोंदवह्यात अंदाजित रकमेस, प्रशासकीय मंजुरी आदेश,तांत्रिक मंजुरी आदेश दिनांक नमूद नाहीत.

3) सर्व नोंदवहीत मासिक गोषवारे काढण्यात आलेले नाहीत.

4) सर्व नोंदवहया ह्या सक्षम प्राधिकारी यांच्या स्वाक्षरी व शिक्क्यासह प्राधिकृत करण्यात आलेल्या नाहीत त्यामुळे उक्त नोंदवह्या लेखापरीक्षणासाठी अधिकृत नाहीत.

सदर अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र 33 ,दि. 05.11.2020 नुसार विभागास अनुपालन अभिप्राय सादर करण्यास कळविले होते. तथापि विभागाकडून समर्पक अनुपालन / अभिप्राय प्राप्त न झाल्यामुळे परिच्छेद नोंदविण्यात येत आहे.

DATSMBM7501 (Ref No : 20, Hmm No : 33)

## *17 गौरी तलाव प्रभागात बायपास रोड ते श्री बुल्लीवर ते वंजारी किराणा पर्यंत सिमेंट कांक्रीट रस्त्यातील बांधकाम अनियमिततेबाबत .*

**बांधकाम विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 9**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व-निधी व शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 3419296.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 41647.00/-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 470 नुसार निविदा जास्त खपाच्या वर्तमानपत्रात प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र नगरोत्थान महाभियान अंतर्गत गौरी तलाव प्रभागात बायपास रोड ते श्री बुल्लीवर ते वंजारी किरणा पर्यंत कांक्रीट रस्त्याच्या बांधकामाबाबतच्या नस्तीचे परीक्षण केले असता 55 विकास कामाचा समावेश असणाऱ्या एकूण रु.15,67,62,366/- रुपये किमतीच्या निवेदेची जाहिरात वर्तमान पत्रकात देणे गरजेचे असतांना नवभारत,देशोन्नती,खालसा संदेश, बुलंद आवाज या वर्तमानपत्रात दिल्यामुळे निविदेस व्यापक प्रसिद्धी प्राप्त झाली नसून अल्प प्रतिसाद मिळालेला आहे. त्यामुळे महापालिकेस स्पर्धात्मक दराचा लाभ मिळालेला नाही.निविदेच्या अटी शर्ती संचिकेत नाहीत. तसेच वृत्तपत्राच्या निविदेच्या अटीशर्तीत कंत्राटदाराची आर्थिक परिस्थिती, कामाचा अनुभव, त्याच्याकडील उपलब्ध मनुष्यबळ, मशिनरी, इत्यादी महत्वपूर्ण बाबींचा समावेश केला नाही. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता-2011 चे नियम 182 नुसार नमुना क्रमांक 139 मध्ये कामाची नोंद घेणे आवश्यक आहे. विभागाने विहित नमुन्यात नोंदवही ठेवलेली नाही.

| | |
|---|---|
| कामाचे नाव | गौरी तलाव प्रभागात बायपास रोड ते श्री बुल्लीवर ते वंजारी किरणा पर्यंत कांक्रीट रस्ता विकसित करण्याचे काम. |

| | |
|---|---|
| प्रमाणक क्रमांक दिनांक व देयकाची रक्कम | प्रमाणक क्र.103 दिनांक:28/10/16 प्रथम व अंतिम देयक रक्कम रु. 34,19,297/- |
| अंदाजपकीय तरतुद | 35,42,410/- |
| कामाचा आदेश | जा.क्र.चंशमनपा/बांध/झोन-3/2016/249 दिनांक:24/02/2016 |
| कंत्राटदाराचे नाव | मोहन नामनवार चंद्रपूर. |
| कामाची मुदत | 8 महिने |
| मोजमाप पुस्तक क्रमांक | क्र.207 |
| काम पूर्णत्वाचा दिनांक | 10/06/2016 |
| प्रशाकीय मान्यता | जिल्हाधिकारी चंद्रपूर यंचे पत्र जा.क्र.3734 दिनांक:08/09/2015 |
| तांत्रिक मान्यता | क्र.44 दिनांक 28/05/2015 |

कामातील अनियमितता खालीलप्रमाणे आहेत :-

1)महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 470 नुसार निविदा जास्त खपाच्या वर्तमानपत्रात प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र नगरोत्थान महाभियान अंतर्गत गौरी तलाव प्रभागात बायपास रोड ते श्री बुल्लीवर ते वंजारी किराणा पर्यंत कांक्रीट रस्त्याच्या बांधकामाबाबतच्या नस्तीचे परीक्षण केले असता 55 विकासकामाचा समावेश असणाऱ्या एकूण रु.15,67,62,366/- रुपये किमतीच्या निवेदेची जाहिरात जास्त खपाच्या वर्तमान पत्रकात देणे गरजेचे असतांना देशोन्नती,खालसा संदेश, बुलंद आवाज या वर्तमानपत्रात दिल्यामुळे निविदेस व्यापक प्रसिद्धी प्राप्त झाली नसून अल्प प्रतिसाद मिळालेला आहे. त्यामुळे महापालिकेस स्पर्धात्मक दराचा लाभ मिळालेला नाही.

2)निविदेच्या अटी शर्ती संचिकेत नाहीत. तसेच वृत्तपत्राच्या निविदेच्या अटीशर्तीत कंत्राटदाराची आर्थिक परिस्थिती, कामाचा अनुभव, त्याच्याकडील उपलब्ध मनुष्यबळ, मशिनरी, इत्यादी महत्वपूर्ण बाबींचा समावेश केला नाही.

3)निविदा छाननी समितीत विभाग प्रमुखांचा समावेश असणे आवश्यक आहे.यात लेखा विषयक अधिकारी यांचा समावेश असणे आवश्यक आहे. अशी समिती गठीत करून निविदा छाननी तक्ता करून, निविदा समितीचे स्वयंस्पष्ट अभिप्राय संचिकेत नाहीत.

4)महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 10 (फ) नुसार महापालिकेबरोबर किंवा महानगरपालिकेच्या

वतीने केलेल्या कोणत्याही करारात पालिका सदस्याचा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही भाग किंवा हितसबंध नाही अश्या आशयाचे तपशीलवार प्रमाणपत्र निविदाधारका कडून घेण्यात आल्याचे नस्तीत दिसत नाही.

5)मा.जिल्हाधिकारी यांच्या प्रशासकीय आदेशानुसार प्रस्तावित रस्ते हे विकास नियंत्रण नियमावलीशी .सुसंगत आहेत याची खात्री मनपाने करणे आवश्यक होते त्यासाठी नगररचना विभागाचे अभिप्राय घेणे क्रमप्राप्त असताना नगररचना विभागाचे अभिप्राय घेण्यात आलेले नाही.

6)विवीध गौण खनिज जसे रेती, मुरूम यासाठी लीड चार्जेस काढण्यासाठी कामाचे ठिकाण ते खदाणीचे अंतर दर्शवणारे कार्यकारी अभियंता यांचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्याचे प्रमाणपत्र न घेता लीड चार्जेस कश्याच्या आधारावर काढले याचा खुलासा करावा.

7)निविदेच्या अटीशर्तीनुसार कंत्राटदाराचा EPF नोंदणी बंधनकारक असून त्यशिवाय देयक अदा केले जाणार नाही अशी अट आहे. तथापि EPF नोंदणी प्रमाणपत्राशिवाय देयक अदा केल्याचे दिसते याबाबत खुलासा करावा.

8)महानगरपालिकेकडे उपयुक्त तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध असतांना उक्त कामाच्या पर्यवेक्षणासाठी मनपाने मुकेश इन्फ्रास्टक्चर नियुक्ती करून पर्यवेक्षणासाठी रु. 41647/- प्रदान केले आहे. याबाबत विभागाने खुलासा करावा तोपर्यंत सदर खर्च अक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

9)महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता-2011 चे नियम 182 नुसार नमुना नंबर 139 मध्ये कामाची नोंद घेणे आवश्यक आहे. विभागाने विहित नमुन्यात नोंदवही ठेवून त्यात नोंद घेतल्याचे आढळले नाही.

सदर अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र 68 ,दि. 16.12.2020 नुसार विभागास अनुपालन अभिप्राय सादर करण्यास कळविले होते. तथापि विभागाकडून समर्पक अनुपालन / अभिप्राय प्राप्त न झाल्यामुळे परिच्छेद नोंदविण्यात येत आहे.

DATSMBM7501 (Ref No : 32, Hmm No : 68)

## *18 मूळ अंदाजपत्रकाच्या 22.60% कमी दराने निविदा स्वीकारून अंदाजपत्रकातील परिमाणात बदल करून 10.80% दराने कंत्राटदारास जादाचे प्रदान करण्याबाबत.*

**बांधकाम विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 7**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व-निधी व शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 7491263.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 730599.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 135000.00/-

मूळ अंदाजपत्रकातील कामास बगल देऊन, कमी रकमेच्या परिमाणाचे कार्यान्वय शून्य करण्यात आले असून कमी किंमतीच्या परिमाणात घट करून अधिक किंमतीच्या परिमाणात 25 % वाढ दर्शवून अंदाजकीय रक्कम वाढवून त्यावर 22.60% दराने निविदेची किमत कमी दाखवून कंत्राट दारास 7,30,599/- चे जादाचे प्रदान करण्यात आले आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक संकीर्ण 2004/प्र.क्र.85/रस्ते दिनांक 11/06/2004 नुसार एखाद्या बाबीच्या परिमाणात 25% अथवा 5000/- वर वाढ होत असल्यास निविदेतील अनुच्छेद क्र.38(2) नुसार तांत्रिक मंजुरी प्रदान करणाऱ्या अधिकाऱ्याच्या निदर्शनास हि बाब तात्काळ आणून पूर्व मंजुरी प्राप्त करून निविदा अनुच्छेद क्र.14 नुसार कार्यकारी अभियंता यांचे लिखित आदेश असणे आवश्यक आहे.असे स्पष्ट नमूद असून सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्व मंजुरीशिवाय प्राकलणातील अंदाजपत्रकीय बाबीवर जादा परिमाण नोंदविल्याने शासन निर्देशाचे तसेच नियमाचे उल्लघन झाले आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका मधील नियम क्र. 227 व 228 चे उल्लंघन करण्यात आले असून सदर बाब मनपाचे विद्युत बांधकामविषयक सल्लागार डी.एच. महादानी किंवा अन्य कोणत्याही स्तरावरून प्रशासनाच्या निदर्शनास न आणता काम परीमाणासह योग्य प्रकारे झाल्याचे चुकीचे प्रमाणित करण्यात आले. पर्यायाने कंत्राटदारास अनियमितपणे आर्थिक लाभ पोहचवून शासन निधीचे नुकसान करण्यात आले आहे.

कामाचे नाव ; अंचलेश्वर मंदिर ते महाकाली मंदिर ते राजीव गांधी इंजीनीअरींग कॉलेज पर्यंत स्ट्रीट लाईट लावण्याचे काम.

कंत्राटदाराचे नाव :- मे. आधुनिक इलेक्टीकल चंद्रपूर

प्रमाणक क्रमांक :- 71 दिनांक 01/03/2018.

अंदाजपत्रकीय रक्कम - 8734708/-

मोजमाप पुस्तक - 23

---

जिल्हाधिकारी चंद्रपूर यांचे पत्र क्र. कार्या-10/नाविशा/नादवयो /प्र.मा./2016/115 दिनांक 07/12/2016 अन्वये नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेच्या अनुषंगाने सन 2016-17 या वर्षात रु. 7,37,08,000/- उपलब्ध अनुदानातून मनपाच्या एकूण 14 कामास रु. 6,39,29,203/- बाबत प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आली.त्यातील अ.क्र.-2 वरील रु. 87,34,708/- कामाच्या अंदाजपत्रकास शहर अभियंता मनपा चंद्रपूर यांनी क्र.146 दिनांक 07/10/2016 रोजी तांत्रिक मंजुरी प्रदान केलेली आहे.दिनांक 09/12/16 च्या ई-निविदा जाहिरातीच्या अनुषंगाने उक्त कामाचे कंत्राट मे. आधुनिक इलेक्टीकल चंद्रपूर यांना 22.60% कमी दराने देण्यात आले. व यास स्थायी समितीच्या ठराव क्र.206 दिनांक 17/02/17 रोजी मंजुरी देऊन शहर अभियंता

यांनी पत्र क्र 404 दिनांक 23/02/17 रोजी कार्यारंभ आदेश नार्गमित केले.

| | |
|---|---|
| कामाचे मूळ अंदाजपत्रक रु. 87,34,708/- | निविदा 22.60% कमी - 19,74,044/ |
| कंत्राट दारास प्रदान करावयाची एकूण रक्कम रु | 67,60,664/ |
| ळ अंदाजपत्रकात बदल करून/अतिरिक्त कामात वाढ दाखवून करण्यात आलेली कामे रु. 96,78,634/- | निविदा 22.60% दराने कमी दाखवून - 21,87,371/ |
| कंत्राट दारास प्रदान करण्यात आलेली एकूण रक्कम रु | 4,91,263/- |

कामातील अनियमितता खालीलप्रमाणे आहेत :-

01) सदर कामात मूळ अंदाजपत्रकातील कामास बगल देऊन , कमी रकमेच्या परिमाणाचे कार्यान्वय शून्य करण्यात आल्याचे दिसून येते. कमी किंमतीच्या परिमाणात घट करून अधिक किंमतीच्या परिमाणात 25 % वाढ दर्शवून अंदाजकीय रक्कम वाढवून त्यावर 22.60% दराने निविदेची किंमत कमी दाखवून कंत्राट दारास 7,30,599/- चे जादाचे प्रदान करण्यात आले आहे.

2)महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका मधील नियम क्र. 227 व 228 चे उल्लंघन करण्यात आले असून सदर बाब मनपाचे विद्युत बांधकामविषयक सल्लागार डी.एच. महादानी किंवा अन्य कोणत्याही स्तरावरून प्रशासनाच्या निदर्शनास न आणता काम परीमाणासह योग्य प्रकारे झाल्याचे चुकीचे प्रमाणित करण्यात आले. पर्यायाने कंत्राटदारास अनियमितपणे आर्थिक लाभ पोहचवून शासन निधीचे नुकसान करण्यात आले आहे. ते वसुलपात्र असून शासन जमा होणे आवश्यक आहे. मनपाच्या विविध प्रकारच्या मोजमापांतर्गत कामाच्या नस्त्याचे लेखापरीक्षण करतांना अनियमित वाढीव कामासंदर्भातील वरील बाब समान आढळून येत आहे.परिणामी शासनाकडून प्राप्त होणारे अनुदानाचे मोठ्या प्रमाणात गैरवीनियोग होण्याची श्यकता नाकारता येत नाही.

3)सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक संकीर्ण 2004/प्र.क्र.85/रस्ते दिनांक 11/06/2004 नुसार एखाद्या बाबीच्या परिमाणात 25% अथवा 5000/- वर वाढ होत असल्यास निविदेतील अनुच्छेद क्र. 38(2) नुसार तांत्रिक मंजुरी प्रदान करणाऱ्या अधिकाऱ्याच्या निदर्शनास हि बाब तात्काळ आणून पूर्व मंजुरी प्राप्त करून निविदा अनुच्छेद क्र.14 नुसार कार्यकारी अभियंता यांचे लिखित आदेश असणे आवश्यक आहे. असे स्पष्ट नमूद असून सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्व मंजुरीशिवाय प्राकलणातील अंदाजपत्रकातील बाबीवर जादा परिमाण नोंदविल्याने शासन निर्देशाचे तसेच नियमाचे उल्लघन झाले आहे.

4)महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका मधील नियम क्र. 263 ते 265 मध्ये नमूद केल्यानुसार मूळ मंजुरी देण्याऱ्या अधिकाऱ्याच्या मान्यते शिवाय अधिक खर्च अंतर्भूत असणाऱ्या कुठल्याही महत्वाच्या

फेरफारास सुधारित किंवा पूरक अंदाजपत्रक सादर करण्याची तरतूद आहे. तसेच वाढीव खर्चासाठी मूळ मंजुरी देणाऱ्या अधिकाऱ्याचे आदेश अनिवार्य आहे. मात्र असे कुठलेही अंदाजपत्रक व आदेश नसताना मूळ अंदाजपत्रकातील परिमाणात व खर्चात अतिरिक्त वाढ करण्यात आलेली आहे.

5) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका मधील नियम क्र. 289 नुसार बांधकामावरील खर्च 10 लाखापेक्षा अधिक असल्यास बांधकामाचा प्रगती अहवाल प्रत्येक तिमाहीला सादर करणे गरजेचे आहे. असा अहवाल नस्तीत नाही. तसेच उक्त कामाच्या मोजमाप पुस्तिकेचे अवलोकन केले असता मोजमाप पुस्तिकेवर प्रगती कामाच्या दिनांक निहाय नोंदी घेण्यात आलेल्या नसून एकमुस्त घेण्यात आलेल्या आहेत. यावरून मोजमाप पुस्तिका एकाच तारखेस भरण्यात आल्याचे निष्पन्न होते. मोजमाप पुस्तिकेवर कामाच्या प्रगतीन्वये शहर अभियंता व शाखा अभियंता यांच्या स्वाक्षरी शिक्यासह नमूद नाहीत.

6)दिनांक 23/02/2017 च्या कार्यआदेशानुसार 6 महिन्याच्या कालावधीत किती काम झाले हे स्पष्ट होत नाही.वाढीव मुदतवाढ न घेता त्यापुढेही सुमारे 05 महिन्यानंतर काम पूर्ण झाल्याचे बांधकाम सल्लागार यांचे पत्र दिनांक 06/01/18 , शहर अभियंता यांचे पत्र दिनांक 25/01/18 तसेच शाखा अभियंता यांच्या दिनांक 22/01/18 च्या प्रमाणपत्रावरून दिसून येते.या प्रकरणी मुदतीनंतरच्या कालावधीतील विलंबापोटी करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार नुसार दंड वसूल पात्र आहे.

| | |
|---|---|
| एक महिना 500/- प्रती दिवस | एक महिना = 15000/- |
| पुढे बांधकाम सल्लागार व शहर अभियंता यांच्या काम पूर्ण प्रमाणपत्रा नुसार | 04 महिने = 120000/- |
| दिनांक 25/01/18 पर्यंत | वसूलपात्र रक्कम = 135000/- |

7)सदर काम हे 22.60% कमी दराने घेण्यात आल्याचे नस्तीवरून दिसून येते.त्यामुळे उक्त कामात वापरण्यात आलेल्या साहित्याची चाचणी करवून घेणे अनिवार्य होते.मात्र त्याबाबतचा Material Testing Report नस्तीमध्ये नाही. यावरून सदरील बांधकामावर शासकीय मानकानुसार साहित्याच्या वापर करण्यात आला याबतची पडताळणी करता येत नाही. विना चाचणी साहित्याचा वापर करण्यात आल्यामुळे उक्त कामे निकृष्ट दर्जाची असण्याची श्यक्यता नाकारता येत नाही.

सदर अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र 147 ,दि.16.02.2021 नुसार विभागास अनुपालन अभिप्राय सादर करण्यास कळविले होते. तथापि विभागाकडून समर्पक अभिप्राय प्राप्त न झाल्यामुळे परिच्छेद नोंदविण्यात येत आहे.

DATSMBM7501 (Ref No : 51, Hmm No : 147)

## *19 मूळ प्राकलणात नमूद नसलेल्या बाबीचे मुल्यांकन करून कंत्राटदारास रक्कमाचे शोधन करणे.*

**बांधकाम विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**
**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व-निधी व शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

वसूलपात्र रक्कम रु. 763639.00/-

| |
|---|
| चंद्रपूर महानगरपालिकेने केलेल्या बांधकामाच्या अंदाजपत्रकामध्ये विशिष्ट बाबी समाविष्ठ नसताना तांत्रिक अधिकाऱ्यांनी मोजमाप नोंदी घेऊन मुल्यांकन नोंदविले आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका, परिच्छेद 312 अनुसार एखाद्या बांधकाम काम चालू असतांना त्यात जी सुधारणा करणे आवश्यक असेल आणि प्रथम मंजूर केलेल्या बांधकामाच्या अंबलबजावणीसाठी जी सुधारणा फारशी आकस्मिक स्वरुपाची नसेल अशा सुधारणेचा समावेश पूरक अंदाजपत्रकात करणे आवश्यक आहे. परंतु उक्त कार्यवाही न करताच तांत्रिक अधिकाऱ्यांनी अंदाजपत्रकात समाविष्ट नसलेल्या बाबींचे मोजमाप पुस्तकात मोजमाप व मूल्यांकनाच्या नोंदी घेतल्याने अनावश्यक बाबींचे कार्यान्वयन केल्याची शक्यता नाकारता येत नाही. पर्यायाने शासन निधीचा अपव्यय झालेला आहे. |

चंद्रपूर महानगरपालिकेने केलेल्या बांधकामाच्या अंदाजपत्रकामध्ये विशिष्ट बाबी समाविष्ठ नसताना तांत्रिक अधिकाऱ्यांनी मोजमाप नोंदी घेऊन मुल्यांकन नोंदविले आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका, परिच्छेद 312 अनुसार एखाद्या बांधकामाचे काम चालू असतांना त्यात जी सुधारणा करणे आवश्यक असेल आणि प्रथम मंजूर केलेल्या बांधकामाच्या अंबलबजावणीसाठी जी सुधारणा फारशी आकस्मिक स्वरुपाची नसेल अशा सुधारणेचा समावेश पूरक अंदाजपत्रकात करणे आवश्यक आहे. परंतु उक्त कार्यवाही न करताच तांत्रिक अधिकाऱ्यांनी अंदाजपत्रकात समाविष्ट नसलेल्या बाबींचे मोजमाप पुस्तकात मोजमाप व मूल्यांकनाच्या नोंदी घेतल्याने अनावश्यक बाबींचे कार्यान्वयन केल्याची शक्यता नाकारता येत नाही. पर्यायाने शासन निधीचा अपव्यय झाल्याची शक्यता आहे. सबब विनामंजुरी नोंदविलेल्या व शोधन केलेल्या रकमांबाबत जबाबदारी निश्चित करून खालीलप्रमाणे रक्कम रुपये 763639 /- वसूल होणे आवश्यक आहे.

(आकडे रुपयांत)

| अ.क्र. | कामाचे नांव | मोजमाप पुस्तकांत मूल्यांकन | मोजमाप | प्रदान |
|---|---|---|---|---|

| | | | | | | पुस्तक | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | बाब क्र. | परिमाण | दर | रक्कम | क्रमांक | पान क्रमांक | प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम |
| 1 | बिनबा गेट ते विदर्भ हाउसिंग सोसायटी पर्यंत स्ट्रीट लाईट लावण्यचे काम . | 31 | 85 no | 3500 | 297500 | 21 | 90 | 77 | 27.03.18 | 313639 |
| | | 32 | 3 no | 5213.04 | 15639.12 | 21 | 90 | | | |
| 2 | नेताजी सुभाष चंद्र बोस ते जयश्री क्लब पर्यंत स्ट्रीट लाईट लावण्यचे काम . | 31 | 60 Mtr | 4500 | 270000 | 22 | 32 | 73 | 16.03.18 | 450000 |
| | | 32 | 80 | 2250 | 180000 | 22 | 33 | | | |
| | एकूण वसूलपात्र रक्कम | | | | | | | | | 763639/- |

सदर अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र 126 ,दि. 05.02.2021 नुसार विभागास अनुपालन / अभिप्राय सादर करण्यास कळविले होते. तथापि विभागाकडून समर्पक अनुपालन प्राप्त न झाल्यामुळे परिच्छेद नोंदविण्यात येत आहे.

DATSMBM7501 (Ref No : 59, Hmm No : 126)

## *20 प्राकलणीय रकमेच्या 23% कमी दराने काम देवून अंदाजपत्रकीय कामात अतिरिक्त वाढ दर्शवून कंत्राटदारास रु. 940690/- अतिरिक्त प्रदान करणेबाबत.*

**बांधकाम विभाग (नागरी दलीत वस्ती सुधार योजना)**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 8**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व-निधी व शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 4069830.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 135000.00/-

नागरी दलीत वस्ती सुधार योजनेच्या अनुषंगाने मनपा चंद्रपूर तर्फे स्ट्रीट लाईट लावण्याचे काम मे. पवार माईन इंटरप्राईजेस वर्धा यांना देण्यात आले. सदर कामाच्या अंदाजपत्रकात एकूण 30 बाबीचा समावेश असून मोजमाप पुस्तकीप्रमाणे काही बाबीवर अनावश्यक वाढ नोंदवून रु. 627051/- इतका निधी अनियमितपणे खर्च करून कंत्राटदारास अतिरिक्त लाभाचे प्रदान करण्यात आले आहे. वाढीव व अतिरिक्त कामात महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका मधील नियम क्र. 227 व 228 चे उल्लंघन करण्यात आले असून सदर बाब मनपाचे विद्युत बांधकामविषयक सल्लागार डी.एच. महादानी किंवा अन्य कोणत्याही स्तरावरून प्रशासनाच्या निदर्शनास न आणता काम परीमाणासह योग्य प्रकारे असल्याचे चुकीचे प्रमाणित करण्यात आले. पर्यायाने कंत्राटदारास अनियमितपणे आर्थिक लाभ पोहचवून शासन निधीचे नुकसान करण्यात आले आहे. ते वासुलपात्र असून शासन जमा होणे आवश्यक आहे. मनपाच्या विविध प्रकारच्या मोजमापांतर्गत कामाच्या नस्त्याचे लेखापरीक्षण करतांना अनियमित वाढीव कामासंदर्भातील वरील बाब समान आढळून येत आहे.परिणामी शासनाकडून प्राप्त होणारे अनुदान व मनपा निधीचा मोठ्या प्रमाणात गैरवीनियोग होण्याची श्याकता आहे. मूळ अंदाजपत्रकात Extra Item ची तरतूद केली नसतानाही मोजमाप पुस्तक क्र.31 मधील पृष्ठ क्र.90 वर अ.क्र. 31 व 32 वर अतिरिक्त बाबीबाबत नोंदी घेवून कंत्राट दारास रु. 313639/- चे अतिरिक्त प्रदान करण्यात आलेले आहे.

कामाचे नाव :- बिनबा गेट ते विदर्भ हाउसिंग सोसायटी पर्यंत स्ट्रीट लाईट लावण्याचे काम.

कंत्राट दाराचे नाव :- मे. पावर माईन इंटरप्राईजेस वर्धा .

प्रमाणक क्रमांक :- 77 दिनांक 27/03/2018. रु- 4069830/-

अंदाजपत्रकीय रक्कम :- 4673355/-

मोजमाप पुस्तक - 21

मा.जिल्हाधिकारी चंद्रपूर यांचेकडून आदेश क्र. 10/2016-17 दिनांक 07/12/16 अन्वये महानगरपालिकेस नागरी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत प्रशासकीय मंजुरीसह शासन निधीचे वितरण करण्यात आले. त्यापैकी रु. 4673355/-अंदाजपत्रकीय मुल्याचे कामास क्र.180 दिनांक 25/10/16 रोजी तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आली आहे.सदर कामाच्या निविदेस स्थायी समितीने दिनांक 16/02/17 रोजी मान्यता दिली असून दिनांक 23/02/17 आदेशान्वये 23% कमी दराने काम करण्यास मे. पावर माईन इंटरप्राईजेस वर्धा. यांना कार्यादेश देण्यात आला. सदर कामासाठी अंदाजपत्रकीय मुल्यापेक्षा 13.09% जादा रु. 5285494/- चा खर्च करण्यात आला असून मोजमाप 21 क्रमांकाच्या पुस्तकात नोंदविले आहे. यावरील अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1)सदर कामाच्या अंदाजपत्रकात एकूण 30 बाबीचा समावेश असून मोजमाप पुस्तकीप्रमाणे काही बाबीवर अनावश्यक वाढ नोंदवून रु. 627051/- इतका निधी अनियमितपणे खर्च करून कंत्राटदारास अतिरिक्त लाभाचे

प्रदान करण्यात आले आहे.

| बाब क्र. | बाबीचा तपशील | प्राकलीत परिमाण | अतिरिक्त परिमाण | दर | वाढीव टक्केवारी | जादा कामाचे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Providing 8m high pole | 80 unit | 85 | 15111.32 | 6.25 | 75556 |
| 2 | Providing Erecting bracket | 80 unit | 85 | 3256.35 | 6.25 | 16282 |
| 3 | Providing casting M-20 | 80 unit | 95 | 6110.14 | 18.75 | 91652 |
| 4 | Supplying spmcb | 80 unit | 85 | 165.22 | 6.25 | 826 |
| 5 | Supplying led street light | 80 unit | 95 | 14934.00 | 18.75 | 224010 |
| 6 | Supplying cable | 2252 meter | 2790 | 197.80 | 23.88 | 106416 |
| 7 | Supplying laying | 1952 meter | 2486 | 195.48 | 27.35 | 104386 |
| 9 | Providing pipe | 80 no | 85 | 1584.72 | 6.25 | 7923 |
| वाढीव कामाचे एकूण मूल्य रु | | | | | | 627051/- |

वाढीव व अतिरिक्त कामात महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका मधील नियम क्र. 227 व 228 चे उल्लंघन करण्यात आले असून सदर बाब मनपाचे विद्युत बांधकामविषयक सल्लागार डी.एच. महादानी किंवा अन्य कोणत्याही स्तरावरून प्रशासनाच्या निदर्शनास न आणता काम परीमाणासह योग्य प्रकारे असल्याचे चुकीचे प्रमाणित करण्यात आले. पर्यायाने कंत्राटदारास अनियमितपणे आर्थिक लाभ पोहचवून शासन निधीचे नुकसान करण्यात आले आहे. ते वासुलपात्र असून शासन जमा होणे आवश्यक आहे.मनपाच्या विविध प्रकारच्या मोजमापांतर्गत कामाच्या नस्त्याचे लेखापरीक्षण करतांना अनियमित वाढीव कामासंदर्भातील वरील बाब समान आढळून येत आहे.परिणामी शासनाकडून प्राप्त होणारे अनुदान व मनपा निधीचा मोठ्या प्रमाणात गैरवीनियोग होण्याची श्यकता आहे.

2)मूळ अंदाजपत्रकात Extra Item ची तरतूद केली नसतानाही मोजमाप पुस्तक क्र.31 मधील पृष्ठ क्र.90 वर अ.क्र. 31 व 32 वर अतिरिक्त बाबीबाबत नोंदी घेवून कंत्राट दारास रु. 313639/- चे अतिरिक्त प्रदान करण्यात आलेले आहे.

3)सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक संकीर्ण 2004/प्र.क्र.85/रस्ते दिनांक 11/06/2004 नुसार एखाद्या बाबीच्या परिमाणात 25% अथवा 5000/- वर वाढ होत असल्यास निविदेतील अनुच्छेद क्र.38(2)

नुसार तांत्रिक मंजुरी प्रदान करणाऱ्या अधिकाऱ्याच्या निदर्शनास हि बाब तात्काळ आणून पूर्व मंजुरी प्राप्त करून निविदा अनुच्छेद क्र.14 नुसार कार्यकारी अभियंता यांचे लिखित आदेश असणे आवश्यक आहे.असे स्पष्ट नमूद असून सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्व मंजुरीशिवाय प्राकलणातील अंदाजपत्रकातील बाबीवर जादा परिमाण नोंदविल्याने शासन निर्देशाचे तसेच नियमाचे उल्लंघन झाले आहे.

4) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका मधील नियम क्र. 263 ते 265 मध्ये नमूद केल्यानुसार मूळ मंजुरी देण्याऱ्या अधिकाऱ्याच्या मान्यते शिवाय अधिक खर्च अंतर्भूत असणाऱ्या कुठल्याही महत्वाच्या फेरफारास सुधारित किंवा पूरक अंदाजपत्रक सादर करण्याची तरतूद आहे. तसेच वाढीव खर्चासाठी मूळ मंजुरी देणाऱ्या अधिकाऱ्याचे आदेश अनिवार्य आहे. मात्र असे कुठलेही अंदाजपत्रक व आदेश नसताना मूळ अंदाजपत्रकातील परिमाणात व खर्चात अतिरिक्त वाढ करण्यात आलेली आहे.

5) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका मधील नियम क्र. 289 नुसार बांधकामावरील खर्च 10 लाखापेक्षा अधिक असल्यास बांधकामाचा प्रगती अहवाल प्रत्येक तिमाहीला सादर करणे गरजेचे आहे. असा अहवाल नस्तीत नाही. तसेच उक्त कामाच्या मोजमाप पुस्तिकेचे अवलोकन केले असता मोजमाप पुस्तिकेवर प्रगती कामाच्या दिनांक निहाय नोंदी घेण्यात आलेल्या नसून एकमुस्त घेण्यात आलेल्या आहेत. यावरून मोजमाप पुस्तिका एकाच तारखेस भरण्यात आल्याचे निष्पन्न होते. मोजमाप पुस्तिकेवर कामाच्या प्रगतीन्वये शहर अभियंता व शाखा अभियंता यांच्या स्वाक्षरी शिक्यासह नमूद नाहीत.

6)दिनांक 23/02/2017 च्या कार्याआदेशानुसार 6 महिन्याच्या कालावधीत किती काम झाले हे स्पष्ट होत नाही.वाढीव मुदतवाढ न घेता त्यापुढेही सुमारे 05 महिन्यानंतर काम पूर्ण झाल्याचे बांधकाम सल्लागार यांचे पत्र दिनांक 29/01/18 , शहर अभियंता यांचे पत्र दिनांक 15/02/18 तसेच शाखा अभियंता यांच्या दिनांक 07/02/18 च्या प्रमाणपत्रावरून दिसून येते.या प्रकरणी मुदतीनंतरच्या कालावधीतील विलंबापोटी करानाम्यातील अटी व शर्तीनुसार नुसार दंड वसूल पात्र आहे.

| | |
|---|---|
| एक महिना 500/- प्रती दिवस | एक महिना = 15000/- |
| त्यापुढे बांधकाम सल्लागार व शहर अभियंता यांच्या काम पूर्ण प्रमाणपत्रा नुसार | 04 महिने = 120000/- |
| दिनांक 29/01/18 पर्यंत | वसूलपात्र रक्कम = 135000/- |

7) शासन निर्णय उद्योग व ऊर्जा व कामगार विभाग क्र- भाकस-2014/प्र.क-82/भाग3/उद्योग 4 दिनांक 01/12/16 मधील परीच्चेद क्र. 4.4.2 नुसार 25 लाखावरील रकमेच्या निविदेस प्रसिद्धी मिळण्याबाबत विभागीय स्तरीय वर्तमानपत्र तसेच राज्यस्तरीय वर्तमानपत्रात प्रसिद्धी देणे अनिवार्य असतांना उक्त कामाची निविदा फक्त जिल्हा स्तरावरील वर्तमानपत्रात दिल्याचे निदर्शनास येते.(दै.लोकशाही,दै.मजदूर टाईम्स,चंद्रपूर जरब)

अश्या स्थानिक वृत्तपत्रात देण्यात आली असल्यामुळे त्यामुळे मनपास स्पर्धात्मक दराचा लाभ मिळालेला नाही.

8) उक्त कामावर वापरण्यात आलेल्या साहित्याची चाचणी करवून घेतल्याचा Material Testing Report नस्तीमध्ये आढळले नाही. यावरून सदरील बांधकामावर शासकीय मानकानुसार साहित्याच्या वापर करण्यात आला याबतची पडताळणी करता येत नाही. विना चाचणी साहित्याचा वापर करण्यात आल्यामुळे उक्त कामे निकृष्ट दर्जाची असण्याची श्यक्यता नाकारता येत नाही.

सदर अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र 125,दि. 05.02.2021 नुसार विभागास अनुपालन अभिप्राय सादर करण्यास कळविले होते. तथापि विभागाकडून समर्पक अभिप्राय प्राप्त न झाल्यामुळे परिच्छेद नोंदविण्यात येत आहे.

DATSMBM7501 (Ref No : 62, Hmm No : 125)

## *21 अंचलेश्वर प्रभागात श्री धकाते ते नरुले ते गुलाब ससोदे ते विश्वकर्मा आणि मदरसा ते शेख मुज्जू यांचे घरापर्यंत कांक्रीट रस्ता विकसित करण्याचे कामातील अनियमिततेबाबत.*

**बांधकाम विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 08**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 30786.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 133000.00/-

अंचलेश्वर प्रभागात श्री धकाते ते नरुले ते गुलाब ससोदे ते विश्वकर्मा आणि मदरसा ते शेख मुज्जू यांचे घरापर्यंत कांक्रीट रस्ता विकसित करण्याचे काम महाराष्ट्र नगोरत्थान निधी अंतर्गत केले असून सदर कामाचे कंत्राट सुभाष तोगरवार चंद्रपूर यांना देण्यात आले. निविदेच्या अटी शर्तीमध्ये कंत्राटदाराची आर्थिक स्थिती, कामाचा अनुभव व त्यांचेकडील उपलब्ध मनुष्यबळ व मशिनरी इत्यादीचा समावेश केलेला नाही. मनपा आस्थापनेकडे तांत्रिक मनुष्यबळ असतांना पर्यवेक्षण त्रयस्थ यंत्रणेकडून करून घेतले त्यामुळे त्यावर झालेला खर्च रु. 30786/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे. कंत्राटदाराने विहित मुदतीचे विहित मुदतीत काम पूर्ण केले नसतांना व करारनाम्यानुसार कामाकरिता मुदत वाढ न मिळाल्यास दंडाची तरतूद असतांना विलंबाने काम पूर्ण केल्यानंतरही कोणत्याही प्रकारच्या दंडाची वसुली कंत्राटदाराकडून करण्यात आली नाही.

| | | |
|---|---|---|
| 1. | कामाचे नाव | अंचलेश्वर प्रभागात श्री धकाते ते नरुले ते गुलाब ससोदे ते विश्वकर्मा आणि मदरसा ते शेख मुज्जू यांचे घरापर्यंत कांक्रीट रस्ता विकसित करण्याचे कामातील अनियमितते बाबत. |
| 2. | प्रमाणक क्र. | 180 ,दि.31/03/2017 (नगोरत्थान) |
| 3. | अंदाजपत्रकीय शुल्क | 34,02,350/- |
| 4. | कामाचा आदेश | क्र. जंशमनपा/बांध/झोन-2/2015-16/139 दि.29/02/2016 |
| 5. | कंत्राटदाराचे नाव | सुभाष तोगरवार, चंद्रपूर |
| 6. | कामाची मुदत | 8 महिने |
| 7. | मोजमाप पुस्तिका क्रमांक | 218 /20/10/2016 |
| 8. | काम पूर्णत्वाचा दिनांक | 29/10/2016 |
| 9. | प्रशासकीय मान्यता | जिल्हा नियोजन आदेश क्र.3734 दि.08/09/2015 |
| 10. | तांत्रिक मान्यता | दिनांक |
| 11. | स्थायी समिती ठराव | 301/ 10/02/2016 |

उक्त कामामध्ये पुढीलप्रमाणे अनियमितता दिसुन आल्या.

1) निविदेच्या अटी शर्तीत कंत्राट दाराची आर्थिक स्थिती कामाचा अनुभव व त्यांचेकडील उपलब्ध मनुष्यबळ, मशिनरी इत्यादी बाबीच्या समावेश केला नाही.

2) निविदा छाननी समितीतील विभाग प्रमुखाचा समावेश असणे आवश्यक आहे. त्यामध्ये लेखा विषयक अधिकारी यांचा समावेश असणे आवश्यक आहे. अशी समिती गठीत करून निविदा छाननी तक्ता करून निविदा समितीचे स्वंयस्पष्ट अभिप्राय संचिकेत नाहीत.

3) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम 10 क नुसार महानगरपालिके बरोबर त्यांच्या वतीने केलेल्या कोणत्याही करारात पालिका सदस्याचा किंवा त्यांच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही भाग किंवा हितसंबंध असेल तर तो पालिका सदस्य राहण्यात अपात्र राहील अशी तरतूद असल्याने प्रत्येक निविदा धारकाकडून त्यांचे उपरोक्त तपशीलाचे प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही

करण्यात आली नाही.

4) मा. जिल्हाधिकारी यांच्या प्रशासकीय आदेशानुसार प्रस्तावित रस्ते हे विकास नियंत्रण नियमावलीशी सुसंगत आहेत याची खात्री मनपाने करणे आवश्यक होते. त्यासाठी नगररचना विभागाचे अभिप्राय घेणे क्रमप्राप्त असतांना नगररचना विभागाचे अभिप्राय घेतले नाहीत.

5) निविदेतील अटी शर्तीनुसार कंत्राटदाराचा EPF नोंदणी बंधनकारक असुन त्याशिवाय देयके अदा केले जाणार नाही अशी अट आहे. तरी EPF नोंदणी प्रमाणपत्राशिवाय देयके अदा केल्याचे दिसते.

6) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 चे नियम 182 नुसार क्रमांक 139 मध्ये कामाची नोंद घेणे आवश्यक आहे. विभागाने विहित नमुण्यात नोंदवही ठेऊन त्यात नोंद घेतल्याचे आढळले नाही.

7) सदर कामाची मुदत 8 महिन्यापर्यंत पुर्ण करण्याचा कालावधी आहे. करारनाम्यानुसार कामास मुदतवाढ न मिळाल्यास 500/- रु. प्रतीदिवस दंड व सदरचा दंड मुदत संपल्यापासून एक महिन्याचे कालावधी करिता राहील व पुढील कालावधीत मुदत वाढ न मिळाल्यास विलंबास प्रतिदिन 1000/- रु. पर्यंत दंडाची तरतूद आहे. नस्तीनुसार सदरहु काम दि. 27/03/2017 रोजी पूर्ण केल्याचे प्रमाणपत्रावरून दिसुन येते. सदरहु कामास कोणत्याही प्रकारची मुदतवाढ दिल्याचे पत्र नस्तीस नाही. कामाचा कार्यादेश दि. 29.02.2016 रोजी दिला व कामाची मुदत 8 महिन्याची असल्यामुळे काम पुर्ण करण्यास विलंब झाला. कामास विलंब झाल्यामुळे कंत्राटदाराकडून एकूण रु.1,33,000/- येवढा विलंब दंड आकारण्यात आला नाही.

8) सदर कामाचे पर्यवेक्षण करण्यासाठी मे.मुकेश इन्फ्रास्ट्रक्चर यांची नियुक्ती मनपाने केली आहे. महानगरपालिका आस्थापनेवर तांत्रिक मनुष्यबळ असतांना पर्यवेक्षण त्रयस्त यंत्रणेकडून करण्यात आले. त्यामुळे यावरील झालेला खर्च रु.30786/- आक्षेपित ठेवण्यात येत आहे.

याबाबत अर्धसमास पत्र क्र.128 दिनांक 09/02/2021 नुसार खुलासा मागितला असता संयुक्तिक खुलासा नसल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे. तरी उपरोक्त मुद्द्यांची पूर्तता करून अनुपालन सादर करावे.

DATVVBM6301 (Ref No : 67, Hmm No : 128)

## *22 पॉंलटेक्नीक कॉंलेज ते विश्र्वकर्मा चौक ते विठोबा खिडकी पर्यंत डांबर रस्ता विकसित करण्याचे कामात अनियमितताबाबत*

**बांधकाम विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 09**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व-निधी व शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 15882559.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 13256327.60/-

वसूलपात्र रक्कम रु. 16100.00/- तात्पुरती अमान्य रक्कम रु. 2610131.33/-

महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 नुसार रु.16,200/- च्या मुद्रांक पेपरवर करारनामा करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आली नाही. मोजमापुस्तीकेनुसार बाबनिहाय चेनेज वेगवेगळे निदर्शनास येत असल्यामुळे उक्त कामाच्या मंजूर चेनेज मध्ये खर्च केला किंवा कसे याबाबत पडताळणी करता येत नाही. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभागाचे परिपत्रक क्र. संकीर्ण 2004/प्र.क्र.85/रस्ते-1 दिनांक 11/06/2004अन्वये कामाचे अंदाजपत्रक बनविताना सर्व बाबीचा विचार करूनच अचूक व सविस्तर अंदाजपत्रक बनविणे आवश्यक होते परंतु THIRD PARTY INSPECTION मध्ये अंदाजपत्रकातील काही ITEM कामावर लावण्यात आले नसल्याबद्दल नमूद आहे. तसेच काही बाबींवर परिमाणापेक्षा 25% अथवा मूल्य रुपये 5000/- पेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे. त्यामुळे अंदाजपत्रक मोघम स्वरुपात बनविण्यात आल्याचे निदर्शनास येत आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग,शासन परिपत्रक क्र. संकीर्ण 2011/प्र.क्र.467/रस्ते-1,दिनांक 21/11/2011 मधील परिच्छेद क्र.1(ड) अन्वये डांबराच्या खरेदीबाबतच्या चलनाची मूळ प्रत देयकासोबत सादर करण्यात आली नाही. काम सुरु व्हायचे अगोदरचे, सुरु असतानाचे व काम झाल्यानंतरचे फोटोग्राफ नस्तीत लावताना अनियमितता दिसून येत आहे. कंत्राटदारांचे EPF नोंदणी प्रमाणपत्र नस्तीत आढळून आले नाही.

| | |
|---|---|
| कामाचे नाव | पॉंलटेक्नीक कॉंलेज ते विश्र्वकर्मा चौक ते विठोबा खिडकी पर्यंत डांबर रस्ता विकसित करण्याचे कामात अनियमितताबाबत |
| वर्तमानपत्र / साप्ताहिक | दै.लोकमत, सकाळ, महाविदर्भ, चंद्रपूर एक्सप्रेस |
| प्रमाणक क्रमांक,दिनांक व रक्कम | प्रमाणक क्र.235 दिनांक:31/03/15प्रथम देयक रक्कम रु.59,08,383/- तसेच प्रमाणक क्र.248 दिनांक:31/03/15सल्लागार शुल्क 60,723/- व प्रमाणक क्र.29 दिनांक:03/10/16अंतिम देयक रक्कम रु.99,13,453/- |

| | |
|---|---|
| अंदाजपत्रकीय रक्कम | 1,66,61,700/- |
| कामाचा आदेश | चंशमनपा/बांध/झोन-2/2014-15/1164, दिनांक 26/02/2014 |
| कंत्राटदाराचे नाव | मे.एन.एम.पुगलिया |
| कामाची मुदत | 15 महिने |
| मुदतवाढ | चंशमनपा/बांध/झोन-2/2014-15/59, दि.09/05/2014 अन्वये दि.27/05/2015 पर्यंत मुदतवाढ |
| मोजमाप पुस्तक क्रमांक | 03 व 151 |
| काम पूर्णत्वाचा प्रमाणपत्र | शहर अभियंता दि.03/05/2015 |
| प्रशासकीय मान्यता | मा. जिल्हाधिकारी,चंद्रपूर यांचे पत्र क्र. कार्या-1/नपाप्र/2013/561,दि.19/11/2013 |
| तांत्रिक मान्यता | शहर अभियंता आदेश क्र.247, दि.08/08/2013 |

यावर खालीलप्रमाणे अभिप्राय देत आहे.

1)महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 अन्वये कार्य कंत्राटाकरिता करारनामा करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 नुसार 10लाखापर्यंतच्या कामासाठी रु.500/- व त्यावरील प्रत्येक लाखाकरिता रु.100/-नुसार उपरोक्त कामाकरिता रु.16,200/- च्या मुद्रांक पेपरवर करारनामा करणे आवश्यक असताना फक्त रु.100/- च्या मुद्रांक पेपरवर करारनामा करण्यात आलेला आहे. संबंधित कंत्राटदाराकडून रक्कम रु.16,100/- वसूलपात्र करून शासन निधीत जमा करावे.

2)महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम पुस्तिका 1958 मधील परिच्छेद क्र.141(6) नुसार रु.5 लाखांहून अधिक खर्चाच्या सर्व सार्वजनिक इमारतीची अभिकल्पने शासनाच्या वास्तुशास्त्रज्ञांशी विचारविनिमय करून तयार केली पाहिजेत. परंतु मा. शहर अभियंता यांच्या आदेश क्र. चंशमनपा/बांध/2014/655, दि.05/06/2014 नुसार चंद्रपूर शहर महानगरपालिकेतील कामाचे साईट सुपरविजन, बिल बनविणे, काम पूर्ण झाल्याचा अहवाल इ. कामाकरिता मे. मुकेश इन्फ्रास्ट्रक्चर या वास्तुशिल्पकाराची नियुक्ती करण्यात आली. तसेच मोजमाप पुस्तिका सुद्धा यांच्याकडून तयार करून घेण्यात आल्या आहेत. सदर बाबतीत खुलासा मागितला असता कामे गुणवत्तेची व्हावी करिता मे. मुकेश इन्फ्रास्ट्रक्चर ची नियुक्ती केल्याचे सांगण्यात आले. परंतु वास्तुशिल्पकाराची मदत पुतळे, इमारती, स्तूप ई.वास्तू बांधण्याकरिता घेण्यात येते परंतु सदर काम रस्ते

बांधकामाशी निगडीत असून त्या करिता वास्तुशिल्पकाराची मदत घेण्यात आल्याने त्यांना प्रदान करण्यात आलेली रक्कम रु.1,61,571/- नियमबाह्य आहे.

3)प्राकलन व कामाची मोजमाप पुस्तिका नुसार खाली नमूद बाबींवर प्राकलनापेक्षा जादा खर्च केला आहे

| बाब क्र. | बाब | दर | अंदाजपत्रका प्रमाणे | | मोजमाप पुस्तिका प्रमाणे | | जादा परिमाण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | परिणाम | रक्कम | परिणाम | रक्कम | परिणाम | रक्कम |
| 3 | Providing 150mm thick 40mm metal | 266.70 | 1610 | 429387 | 6310.01 | 1682879.66 | 4700.1 | 1253492.67 |
| 4 | Hot Mix Laid Bituminous Macadam50/75 VG-30(60/70) | 8256.90 | 796.95 | 6580336 | 956.52 | 7897889.98 | 159.57 | 1317553 |
| 5 | Semi-Dence Bituminous concrete with 5%bitumenVG-30 | 11058.35 | 265.65 | 2937651 | 319.03 | 3527445.40 | 53.38 | 589794.4 |
| 10 | Providing cashing cement concrete M20 | 5742.45 | 172.41 | 990056 | 210.14 | 1206718.44 | 37.73 | 216662.44 |
| 11 | Providing sieing Bar reinforcement | 5722.90 | 2.76 | 15795 | 65.80 | 376566.82 | 63.04 | 360771.82 |
| | | | | | | | | 2610131.33 |

महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक संक्रीर्ण 2004/प्र.क्र.85/रस्ते दिनांक 11/06/2004 अन्वये कामाचे अंदाजपत्रक बनवितांना सर्व बाबीचा विचार करूनच अचूक व सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्यात यावे. तसेच बी -1 निविदेतील अट क्रमांक 38(1) नुसार मंजूर कामाचे बाबनिहाय परिमाणापेक्षा 25% अथवा मूल्य रुपये 5000/- पेक्षा जास्त खर्च करण्याची तरतूद नसताना जादा खर्च करण्यात आलेला आहे. तसेच अट क्रमांक 38(2) नुसार त्रांत्रिक मंजुरीप्रदान करणाऱ्या अधिकाऱ्याच्या निर्देशनास ही बाबा तात्काळ आणून पूर्व मंजुरी प्राप्त करणे आवश्यक आहे. तसेच अट क्र.14 नुसार कार्यकारी अभियंता यांचे लिखित आदेश असणे आवश्यक आहे. सदर बाब नियमबाह्य असून बी-1 निविदेतील अट क्र.38(1) नुसार मंजुरी शिवाय उक्त

कामावर केलेल्या वाढीव खर्च रु.26,10,131.33/- तात्पुरती अमान्य करण्यात येत आहे.

4)सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र. संक्रीर्ण 2007/प्र.क्र.257/रस्ते-1, दिनांक 21/01/2008 मधील परिच्छेद क्र. 2.4 नुसार डांबरीकरानाच्या कामाचे अंदाजपत्रक तयार करताना त्यात रस्त्यावर काही ठिकाणी जसे वळणावर, बस थांबा,वाहन तळ इ. रस्ता पुरेसा जास्त रुंद करण्यासाठीची आवश्यक परिमाणांच्या विविध बाबींची तरतूद करणे क्रमप्राप्त आहे. सदर कार्यवाही करण्यात आली नाही. एमबी 3 व 151 मध्ये दोन्ही देयकावेळेस बाबनिहाय टप्पे(चेनेज) पाडताना अनिश्चितता आढळते तसेच चेनेजनुसार उक्त कामाचा नकाशा नस्त्तीत नाही. प्राकलन बाब 4 (Providing and laying hot mix hot laid Bituminious) व प्राकलन बाब 5 (Providing and laying hot mix hot laid Semidance) एमबी क्र. 3 मध्ये प्रथम देयकाच्या वेळेस बाब क्र.1 ते 3 मध्ये नसलेले टप्पे(चेनेज) दर्शवण्यात आले आहे. प्राकलन बाब क्र. 4 व 5 मध्ये बाब क्र.1 ते 3 पेक्षा अधिक चेनेज आढळून आले आहे. श्री विजय देसाई ते नामदेव धोटे या टप्यानंतर अजून वाढीव वा सदर कामाच्या व्यतिरिक्त अतिरिक्त टप्पे दर्शवून खालीलप्रमाणे खर्च करण्यात करण्यात आला आहे.

| बाब क्र. | बाब | श्री विजय देसाई ते नामदेव धोटे घराच्या टप्यानंतर(चेनेज) चे माता मंदिर ते निंबाळकर घरापर्यंतचे लावलेले प्रमाण | दर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| 04 | Providing laying hot mix hot laid Bitumenous | 153.84 | 8256.90 cu.m | 12,70,241.5/- |
| 05 | Providing hot mix hot laid Semidance | 51.25 | 11058.35cu.m | 5,66,740.44/- |
| एकूण रक्कम | | | | 18,36,981.94/- |

तसेच एमबी क्र. 3 व 151 मध्ये द्वितीय देयकाच्या वेळेस प्राकलन बाब 2 व 3 मध्ये असलेले टप्पा(चेनेज) प्राकलन बाब 4 व 5 शी जुळत नसल्याने सदर बाबींवर केलेला खर्च उक्त कामावरच केल्याची शहानिशा करता येत नाही.तसेच नस्तीत उक्त कामाचा टप्पे (चेनेज) पाडलेला नकाशा नस्त्तीत नाही. करिता मोजमाप पुस्तिकेनुसार (एमबी 151) द्वितीय देयकाच्या वेळेस प्राकलन बाब क्र.2,3,4 व 5 वर केलेला एकूण खर्च रु.81,13,702.90/- व उपरोक्त प्रमाणे रक्कम रु. 18,36,981.94/- असे एकूण रक्कम रु.99,50,683.90/- एवढा खर्च शंकास्पद ठरते.

5)सार्वजनिक बांधकाम विभाग,शासन परिपत्रक क्र. संकीर्ण 2011/प्र.क्र.467/रस्ते-1,दिनांक 21/11/2011 मधील परिच्छेद क्र.1(ड) अन्वये कामांसाठी वापरण्यात येणाऱ्या डांबराच्या खरेदीबाबतच्या चलनाची मूळ प्रत

देयकासोबत सादर करणे आवश्यक आहे.सदर चलन संबंधित रिफायनरी यांनीच दिले असल्याबाबत खातरजमा कार्यकारी अभियंता यांनी बिलाचे देयक अदा करण्यापूर्वी करणे अपेक्षित आहे. संचिकेत डांबराच्या खरेदीबाबतच्या चलनाची मूळ प्रत आढळून आली नाही.

6)राजीव गांधी अभियांत्रिकी महाविद्यालय, चंद्रपूर यांनी सादर केलेल्या THIRD PARTY INSPECTION अहवालानुसार अंदाजपत्रकातील ITEM NO.6,13,15,16,17 व 18 सदर कामावर लावण्यात आले नाही. अंदाजपत्रकीय रक्कम फुगवण्यासाठी सदर ITEM अंदाजपत्रकात नमूद करण्यात आले असल्याचे निदर्शनास येत आहे.

7) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम पुस्तिका 1958 मधील परिच्छेद क्र.141 नुसार अंदाजपत्रक, नकाशे इ. कार्यकारी अभियंता वा समकक्ष अधिकाऱ्याने पडताळनी करून प्रमाणित करणे आवश्यक असताना फक्त सदर कामाचे अंदाजपत्रक कनिष्ठ अभियंता द्वारे तयार करण्यात आले आहे व ते कार्यकारी अभियंता वा समकक्ष अधिकाऱ्याने प्रमाणित करण्यात आले नाही. तसेच परिच्छेद क्र.141(1) नुसार प्रकल्प सादर करणाऱ्या अधिकाऱ्यांनी नकाशे व अंदाजावर दिनांक,महिना व वर्ष यासह आपली संपूर्ण स्वाक्षरी करणे आवश्यक असताना QUARRY CHART वर कोणत्याही अधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही.

8) निविदेतील अटी व शर्तीनुसार कंत्राटदारांना EPF नोंदणी बंधनकारक असून नोंदणी झाल्याचे प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय प्रथम देयक अदा करण्यात येवू नये. परंतु नस्तीत सदर कंत्राटदारांचे EPF नोंदणी प्रमाणपत्र आढळून आले नाही.

9) नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक : जोईएन-2008/प्र.क्र.08/नवि-16 दि.29/08/2008 मधील अट क्र. 8 तसेच मा.जिल्हाधिकारी,चंद्रपूर यांचे पत्र क्र. कार्या-1/नपाप्र/2013 /561, दि.19/11/2013 नुसार हाती घेण्यात येणारी कामे सुरु करण्यापूर्वी व काम पूर्ण झाल्यानंतरचे फोटोग्राफ घेऊन अभिलेखासह जतन करून ठेवायचे निर्देश दिले आहेत. परंतु सदर काम सुरु व्हायचे अगोदरचे फोटो नस्त्तीत नाही. तसेच प्राकलन बाब क्र.07,08,09,10,11 व 12 मध्ये नमूद बाबींचे काम सुरु व्हायचे अगोदरचे, सुरु असतानाचे व काम झाल्यानंतरचे फोटोग्राफ नस्तीत नाही. त्यामुळे सदर कामाची योग्यरीत्या पडताळणी करता येत नाही.

उपरोक्त बाबतीत अर्धसमास पत्र क्र.154 दि.24/02/2021 नुसार खुलासा मागितला असता संयुक्तिक खुलासा प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DLFIBBM9301 (Ref No : 68, Hmm No : 154)

## *23 BRGF निधी अंतर्गत जटपुरा गेट ते रामाळा तलाव ते पाच देऊळ ते बगड खिडकी वाढीव रस्ता विकसित करण्याचे कामातील अनियमिततेबाबत.*

**बांधकाम विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 09**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 23121550.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 268928.00/-

जटपुरा गेट ते रामाळा तलाव ते पाच देऊळ ते बगड खिडकी वाढीव रस्ता विकसित करण्याचे काम BRGF निधी अंतर्गत केले असून सदर कामाचे कंत्राट मे. एन.एम.पुंगलिया चंद्रपूर यांना देण्यात आले निविदेच्या अटी शर्तीमध्ये कंत्राटदाराची आर्थिक स्थिती, कामाचा अनुभव व त्यांचेकडील उपलब्ध मनुष्यबळ व मशिनरी इत्यादीच्या समावेश केलेला नाही. मनपा आस्थापनेकडे तांत्रिक मनुष्यबळ असतांना पर्यवेक्षण त्रयस्थ यंत्रणेकडून करून घेतले त्यामुळे त्यावर झालेला खर्च रु. 2,68,928/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे. कंत्राटदराने विहित मुदतीत काम पूर्ण केले नसतांना व करारनाम्यानुसार कामाकरिता मुदत वाढ न मिळाल्यास दंडाची तरतूद असतांना विलंबाने काम पूर्ण केल्यानंतरही कोणत्याही प्रकारच्या दंडाची वसुली कंत्राटदाराकडून करण्यात आली नाही.

विभाग :- बांधकाम (BRGF)

| | | |
|---|---|---|
| 1. | कामाचे नाव | जटपुरा गेट ते रामाळा तलाव ते पांच देऊळ ते बगडखिडकी रस्त्यापर्यंत वाढीव रस्ता विकसित करण्याचे काम. |
| 2. | प्रमाणाक क्र. | 6 / दि.04.03.2017 (BRGF)<br><br>34 / दि.26.07.2018 |
| 3. | अंदाजपत्रकीय शुल्क | 2,62,40,365/- |
| 4. | कामाचा आदेश | क्र. चंशमनपा/बांध/काम/-2/2015-16,<br><br>467, दि.29/03/2016 |
| 5. | कंत्राटदाराचे नाव | मे. एन.एम.पुगलिया,चंद्रपूर |

| | | |
|---|---|---|
| 6. | कामाची मुदत | 12 महिने |
| 7. | मोजमाप पुस्तिका क्रमांक | 220 /20/10/2016<br><br>40 (तपासणीत उपलब्ध करण्यात आले नाही.) |
| 8. | काम पूर्णत्वाचा दिनांक | 24/07/2018 |
| 9. | प्रशासकीय मान्यता | आदेश क्र.96 दि.10/02/2016 |
| 10. | तांत्रिक मान्यता | आदेश क्र.161 दि.29/09/2015 |
| 11. | स्थायी समिती ठराव | 353 |

उक्त कामामध्ये पुढीलप्रमाणे अनियमितता दिसुन आल्या.

1. निविदेच्या अटी शर्तीत कंत्राट दाराची आर्थिक स्थिती कामाचा अनुभव व त्यांचेकडील उपलब्ध मनुष्यबळ, मशिनरी इत्यादी बाबीच्या समावेश केला नाही.

2. निविदा छाननी समितीतील विभाग प्रमुखाचा समावेश असणे आवश्यक आहे. त्यामध्ये लेखा विषयक अधिकारी यांचा समावेश असणे आवश्यक आहे. अशी समिती गठीत करून निविदा छाननी तक्ता करून निविदा समितीचे स्वंयस्पष्ट अभिप्राय संचिकेत नाहीत.

3. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम 10 क नुसार महानगरपालिके बरोबर त्यांच्या वतीने केलेल्या कोणत्याही करारात पालिका सदस्याचा किंवा त्यांच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही भाग किंवा हितसंबंध असेल तर तो पालिका सदस्य राहण्यात अपात्र राहील अशी तरतूद असल्याने प्रत्येक निविदा धारकाकडून त्यांचे उपरोक्त तपशीलाचे प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

4. मा. जिल्हाधिकारी यांच्या प्रशासकीय आदेशानुसार प्रस्तावित रस्ते हे विकास नियंत्रण नियमावलीशी सुसंगत आहेत याची खात्री मनपाने करणे आवश्यक होते. त्यासाठी नगररचना विभागाचे अभिप्राय घेणे क्रम प्राप्त असतांना नगररचना विभागाचे अभिप्राय घेतले नाहीत.

5. निविदेतील अटी शर्तीनुसार कंत्राटदाराचा EPF नोंदणी बंधनकारक असुन त्याशिवाय देयके अदा केले जाणार नाही अशी अट आहे. तरी EPF नोंदणी प्रमाणपत्राशिवाय देयके अदा करण्यात आले.

6. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 चे नियम 182 नुसार क्रमांक 139 मध्ये कामाची नोंद घेणे आवश्यक आहे. विभागाने विहित नमुण्यात नोंदवही ठेऊन त्यात नोंद घेतल्याचे आढळले नाही.

7. सदर कामाचा कालावधी आदेशानुसार 12 महिने ठरविण्यात आला. करारनाम्यानुसार मुदतवाढ न मिळाल्यास 500/- रु प्रमाणे प्रतीदिवस एक महिन्याकरिता दंड त्यानंतरच्या कालावधीत रु.1000/- प्रतीदिन दंड आकारण्याबाबत करारनाम्यात नमूद आहे. उपरोक्त कामाचा कालावधी 12 महिन्याचा असतांना सदरहु काम विहित कालावधीत पूर्ण झाले किंवा नाही याबाबत कामपूर्ण केल्याचे प्रमाणपत्र नस्तीत दिसुन आले नाही. कामपुर्ण करून अंतिम प्रदान दि.24.07.2018 मध्ये करण्यात आल्याचे नस्तीत दिसुन येते. त्यानुसार काम पुर्ण करण्यात बराच विलंब झाला व कामाकरिता कोणतीही मुदतवाढ दिल्याचे नस्तीत दिसून आले नाही. विहित कालावधीपेक्षा कामपूर्ण करण्यात विलंब झाल्यामुळे व कोणतीही मुदतवाढ दिली नसल्यामुळे कंत्राटदाराकडून दंडाची रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.

8. उपरोक्त कामाकरिता पर्यवेक्षणाचे काम मे.एम.एस.दी. टेक्नो. कन्सल्टंट अंड इंजिनियर चंद्रपूर याची नियुक्ती मनपाने केली आहे.महानगरपालिका आस्थापनेवर तांत्रिक मनुष्यबळ असतांना पर्यवेक्षण त्रयस्त यंत्रणेकडून केल्याने झालेला खर्च रु.2,68,928/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

9. सदर कामाची निविदा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 470 नुसार निविदा जास्त खपाच्या वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक आहे. तथापि सदर निविदा चंद्रपूर आंचल, सन्नाटा, लोकशाही वार्ता या स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द केल्यामुळे निविदेत व्यापक प्रसिध्दी प्राप्त झाली नाही. त्यामुळे स्पर्धात्मक दराचा लाभ महानगरपालिकेला मिळालेला नाही.

उपरोक्त अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र.135 दि.10/02/2021 नुसार खुलासा विचारला असता संयुक्तिक खुलासा प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे. मुद्देनिहाय आक्षेपाची पूर्तता करून अनुपालन सादर करावे.

DATVVBM6301 (Ref No : 71, Hmm No : 135)

## *24 रमाई आवास योजनेच्या खात्यावरील व्याज शासनाकडे जमा न करण्याबाबत व योजनेअंतर्गत काम पूर्ण न झालेल्या घरकुलाबाबत*

**Ramai Awas Gharkul Yojana**
**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**
**अनियमितता संख्या : 2**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 36018331.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 14420991.00/-

महानगरपालिकेतर्फे राबवण्यात येणाऱ्या रमाई आवास घरकुल योजनेंतर्गत मिळणाऱ्या शासन निधीवरील व्याज रुपये 14420991 शासनास जमा केलेले नाही. त्यामुळे सदर रक्कम वसुलपात्र ठरते. तसेच सन 2016-17 आणि 2017-18 या वर्षातील एकूण मंजूर प्रकरणापैकी 47 घरकुलांचे काम अपूर्ण असून या 47 प्रकरणावर आतापर्यंत एकूण 800000 रुपये अनुदान वाटप झालेले आहे.तरी हे अनुदान अनुत्पादक ठरले असून अपूर्ण कामे पूर्ण करण्याची कार्यवाही न केल्यास प्रदान कलेली रक्कम वसूलपात्र ठरते.

1) महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीएच-2009/ प्र.क्र.159/ मावक-2 दिनांक 09/03/2010 नुसार रमाई आवास घरकुल योजना चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे राबविण्यात येते. या योजनेसाठीचे अनुदान राज्य शासनाद्वारे महानगरपालिकेच्या बँक खात्यात टाकले जाते. या शासन निधीवर मिळणारे व्याज महानगरपालिकेने शासनाकडे जमा करणे आवश्यक आहे. तरी दिनांक 09/06/2017 ला अनुसूचित जाती घरकुल योजना समितीच्या झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तात योजनेच्या खात्यावर त्या दिनांकापर्यंत एकूण 36018331 एवढे व्याज प्राप्त झाले असून त्यापैकी एकूण 21597340 एवढी रक्कम शासनास जमा केल्याचे नमूद आहे. सबब उर्वरित 14420991 रुपये शासनास जमा केलेली नाही. त्यामुळे सदर रक्कम वासुलपात्र ठरते.

2)सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागच्या आदेश क्र. जा.क्र.सआसक/चंद्र/राआयो/म.व.त्रु./प्रस्ताव बाबत/201-16/952 दिनांक 30/03/2016 नुसार रमाई आवास घरकुलासाठी एकूण 208 प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागच्या आदेश क्र.सआसकचं/चंद्र/ घर/म.यादी/ए.बी./2017-18/952 दिनांक 09/06/2017 नुसार रमाई आवास घरकुलासाठी दारिद्रेरेषेखालील (BPL) एकूण 224 व दारिद्रेरेषेवरील(APL) एकूण 13 प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली आहे. सदर योजनेशी निगडीत अभिलेखे तपासले असता पुढील विवरणपत्रानुसार एकूण 47 प्रकरणामध्ये 80,00,000 रुपये अनुदान अनुत्पादक ठरल्याचे आढळून येते. सदर 47 घरकुलाचे काम पूर्ण करण्याची कार्यवाही न केल्यास प्रदान कलेली रक्कम वसूलपात्र ठरते.

| वर्ष | एकूण मंजूर लाभार्थी | काम पूर्ण केलेले लाभार्थी | एकही हप्ता न घेतलेले लाभार्थी | पहिला हप्ता घेऊन काम अपूर्ण असलेली लाभार्थी संख्या | दुसरा हप्ता घेऊन काम अपूर्ण असलेली लाभार्थी संख्या | अनुत्पादक अनुदान |
|---|---|---|---|---|---|---|
| 2016-17 | 208(BPL) | 184 | 8 | 6 | 10 | 26,00,000 |
| 2017-18 | 224(BPL) | 176 | 18 | 7 | 23 | 53,00,000 |
| 2017-18 | 13(APL) | 11 | 1 | 1 | 0 | 1,00,000 |

| एकूण | | | | | | 80,00,000 |
|---|---|---|---|---|---|---|

सदर प्रकरणी अर्धसमासपत्र क्र.90 दिनांक 12/01/2021 मध्ये उपरोक्त विषयासंबंधी विचारणा केली असता त्याबाबत परिच्छेद अंतिम करेपर्यंत कोणतेही उत्तर प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DLFARKM9301 (Ref No : 24, Hmm No : 90)

## *25 रमाई आवास घरकुल योजनेचे रोखपुस्तक व बँक स्टेटमेंट मधील तफावतीबाबत तसेच योजनेच्या अंमलबजावणीतील अनियमिततेबाबत*

**Ramai Awas Gharkul Yojana**
**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**
**अनियमितता संख्या : 7**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 106892274.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1690075.00/-

| |
|---|
| रमाई आवास घरकुल योजनेचे रोखपुस्तक व बँक स्टेटमेंटमध्ये 1690075 रुपयाची तफावत आहे. तसेच रमाई आवास घरकुल योजना राबवताना महाराष्ट्र शासन सामाजिक नाय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीएच-2009/प्र.क्र.159/ मावक-2 दिनांक 09/03/2010 मधील निर्देशांचे पालन केलेले दिसून आले नाही. |

1) चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे महाराष्ट्र शासन सामाजिक नाय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीएच-2009/प्र.क्र.159/ मावक-2 दिनांक 09/03/2010 नुसार रमाई आवास घरकूल योजना राबविली जाते.यासाठी राज्याशासानाद्वारे मिळणाऱ्या निधीतून लाभार्थ्यांना अनुदान वाटप केले जाते. याबाबत योजनेच्या रोखपुस्तकाची व योजनेच्या बँक खात्याची पडताळणी केली असता रमाई आवास योजनेच्या रोखपुस्तकात 31 मार्च 2017 रोजी शिल्लक 10,68,92,274 रुपये दर्शविली असून संबंधित बँक खात्याच्या स्टेटमेंटनुसार 31 मार्च 2017 रोजी शिल्लक 10,52,02,199 रुपये असल्याचे आढळले. त्यामुळे सदर बँक खात्यामध्ये रोखपुस्तकापेक्षा 16,90,075 रुपये कमी आहेत.त्यामुळे हि रक्कम वसुलपात्र ठरते.

2) महाराष्ट्र शासन सामाजिक नाय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीएच-2009/प्र.क्र.159/ मावक-2 दिनांक 09/03/2010 मधील परिच्छेद क्रमांक 19 नुसार अनुदानाचा पहिला हप्ता 50% रक्कम घराचे बांधकाम सुरु करतांना प्रदान करणे आवश्यक असून दुसरा हप्ता 50% निधीचा उपयोगिता प्रमाणपत्र सादर

केल्यानंतर 40% रक्कम प्रदान व तिसरा हप्ता घराचा ताबा घेताना सक्षम प्राधिकार्यांनी पूर्णत्वाचा दाखला दिल्यानंतर 10% रक्कम प्रदान करणे आवश्यक असतांना, चंद्रपूर महानगरपालिकेने पहिला हप्ता 50%, दुसरा हप्ता 25% आणि तिसरा हप्ता 25% असे वाटप केले आहे. तरी शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनेचे पालन केलेले नाही.

3) परीच्छेद क्रमांक 11 नुसार मंजूर अनुदानातून 5% रक्कम प्रशासकीय शासन निर्णयातील खर्चासाठी राखीव ठेवून हि रक्कम सर्वेक्षण करणे,लाभार्थ्याचे प्रकरण तयार करणे, जुन्या घराचे व जागेचे मोजमाप करणे, नवीन घराचा आराखडा तयार करणे इत्यादि बाबीसाठी वापरावे असे स्पष्ट निर्देश असताना महानगरपालिकेने उपरोक्त कोणतीही बाब कार्यन्वित केलेली नाही.

4) बांधकामाचे अंदाजपत्रक तयार न करता अनुदान वाटप केले गेले आहे. त्यामुळे बांधकामाचा खर्च अनुदानापेक्षा कमी असल्यास अतिप्रदान झाल्याची शक्यता आहे. अंतिम हप्ता प्रदान करण्यापूर्वी शहर अभियंताने काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र दिलेले आहे. परंतु बांधकामाचे अंदाजपत्रकच तयार करण्यात आलेले नसतांना शहर अभियंता यांनी काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र देणे वस्तुनिष्ठ कार्यवाहीशी सुसंगत नाही.

5) शासन निर्णय परिच्छेद क्र.10 मधील मुद्दा क्र.2 नुसार दारिद्र्य रेषेवरील लाभार्थ्याने बांधकामाच्या एकूण खर्चाच्या 10% लाभार्थी हिस्सा भरल्यानंतरच बांधकाम सुरु करण्याचे स्पष्ट निर्देश दिले असताना चंद्रपूर महानगरपालिकेने अशी कोणतीही कार्यवाही न करता अंदाज्पात्राकाशिवाय एकूण बांधकामाच्या खर्चाबाबत अनभिज्ञ असताना दारिद्र्यरेषेवरील लाभार्थ्यांना 10% कमी अनुदान वाटप केले असून शासन निधीचे शासन निर्देशाचे पालन न करता निष्काळजीपणाने वाटप झालेले आहे.

6) शासन निर्णय परिच्छेद क्रमांक 23 (अ) नुसार घराचे बांधकाम सुरु करण्यापूर्वी वर्ग-3 पेक्षा वरील अधिकाऱ्यामार्फत लाभार्थ्याच्या कुटुंबासोबत घराचा फोटो घेणे आवश्यक असताना नस्तीतील फोटो सक्षम प्रधिकाऱ्यामार्फत काढल्याचे दिसून आले नाही.

7)शासन निर्णय परिच्छेद क्रमांक 23 (फ) नुसार नवीन घर पती-पत्नी यांच्या संयुक्त नावे असल्याबाबत महानगरपालिका कर विभागात नाव नोंदविल्याबाबत 8 अ उतारा जोडण्यात आलेला नाही.

सदर प्रकरणी अर्धसमासपत्र क्र.74 व अर्धसमासपत्र क्र.75 दिनांक 29/12/2020 मध्ये उपरोक्त विषयासंबंधी विचारणा केली असता त्याबाबत केलेस खुलासा संयुक्तिक नसल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DLFARKM9301 (Ref No : 50, Hmm No : 75)

## *26 संगणक विभागातील सन 2016-17 व 2017-18 मध्ये दुहेरी लेखे तयार करण्याकरिता अर्थसंकल्पीय तरतुदी नुसार रु.19,04,144/- खर्च निरर्थक केल्याबाबतची अनियमितता.*

**Computer Department**
**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**
**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 1904144.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1904144.00/-

| |
|---|
| महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शा.नि.क्र. लेखा/सह-10/2004/71/प्रक्र-05/04/नवि-31 दि. 06/07/2005 नुसार महानगरपालिकेने दि.01/04/2005 पासून दुहेरी नोंदपध्दतीने लेखे ठेवण्याबाबत सुधारात्मक बाब म्हणून आदेशित केलेले आहे. तसेच सन 2016-17 व 2017-18. या वर्षात वरील बाबीकरिता मनपा चंद्रपूर कडून रु.19,04,144/- रक्कमेची तरतूद सुध्दा करून देण्यात आलेली असून दुहेरी नोंद पध्दतीने लेखे तयार करण्याचे काम कंत्राटदारा मार्फत पुर्ण करण्यात आलेले नसल्याने त्या बाबीवर रु.19,04,144/- एवढा खर्च निरर्थक करण्यात आलेला आहे. |

स्थानिक स्वराज्य संस्थांना आर्थिक दृष्ट्या सक्षम बनविणे तसेच नागरी प्रशासनांत सुधारणा घडवून आणणे. त्याची बाजारातील पत सुधारण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना केंद्र शासनाने ज्या सुधारणा करणे बंधनकारक केलेले आहे. त्यातील अनिवार्य सुधारणा मध्ये आधुनिक दुहेरी नोंद पध्दतीने लेखे ठेवणे होय. त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शा.नि.क्र. लेखा/सह-10/2004/71/प्रक्र-05/04/नवि-31 दि. 06/07/2005 मध्ये नमूद असल्यानुसार स्थानिक स्वराज्य संस्थाचे लेखे दुहेरी पध्दतीने ठेवण्याबाबत आदेशित केलेले आहे. सदरील नोंद वह्या राष्ट्रीय महानगरपालिका लेखा नियम पुस्तिका (NMAM) मधील विहित नमुन्यात महानगरपालीकाने ठेवणे आवश्यक आहे. परंतु नोंदवह्या विहित नमुन्यात ठेवण्यात आलेल्या नाहीत. त्यावरील सन 2016-17 व 2017-18 या वर्षात रु.19,04,144 खर्च करण्यात आलेला निरर्थक ठरलेला असून प्रत्येक वर्षात लेखापरिक्षण विभागाकडून दुहेरी नोंद पध्दती बाबत आक्षेप घेण्यात येते व त्याचे अनुपालन करण्यात येत नाही. हि अतिशय गंभीर स्वरुपाची बाब असून त्यावरून असे निर्देशनास येते की सदर कामाचा कंत्राटदारांवर महानगरपालिकेचे नियंत्रण नाही.

या कार्यालयांचे अर्धसमास पत्र क्र.58, दि. 09/12/2020 नुसार सदर दुहेरी नोंद पध्दतीनुसार लेखे तपासणीस उपलब्ध करून देण्याबाबत अभिलेख्याची मागणी केली असता असे लेखे लेखा परीक्षण पथकास उपलब्ध झालेले नाही. त्यामुळे दुहेरी नोंद पध्दतीने लेखे तयार करण्याचे काम अद्यापही पुर्ण झालेले नाही. सदर बाबीवर

झालेला खर्च रु.19,04,144/- निरर्थक झाल्याचे दिसून येते. तरी यावरील झालेला खर्च आक्षेपीत ठेवण्यात येत आहे.

DATDRMM6701 (Ref No : 27, Hmm No : 58)

## *27 शासन निर्णयानुसार महिला व बालकल्याण कार्यक्रम राबविण्यासाठी महसुली उत्पन्नाच्या 5% खर्च न करण्याची अनियमितता.*

**महिला व बालविकास**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 163399592.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 163399592.00/-

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण/2005/प्र.क्र.255/05/नवि-20 दिनांक 8 नोव्हेंबर 2010 नुसार महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या मनपाच्या एकूण वार्षिक महसुली उत्पन्नातून बांधील खर्च वजा जाता निव्वळ महसुली उत्पन्नाच्या 5% रक्कम महिला व बालकल्याण कार्यक्रमासाठी राखून ठेवून समितीच्या मागणीनुसार त्यातून महिला व बालकल्याणाच्या उन्नतीसाठी विविध योजना राबवून खर्च करणे आवश्यक आहे. परंतु निधीचा इतरत्र बाबीवर खर्च होत असून शासन निर्णयातील तरतुदीनुसार खर्च होत नसल्याचे निदर्शनास येते.

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण/2005/प्र.क्र.255/05/नवि-20 दिनांक 8 नोव्हेंबर 2010 नुसार महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या महसुली उत्पन्नामधून 5% रक्कम शासन निर्णयात नमूद केलेल्या खालील 15 बाबीवर महिला व बालकल्याणाच्या उन्नतीसाठी महिला व बालकल्याण समिती मार्फत खर्च करणे आवश्यक आहे.

1) ज्या ठिकाणी अंगणवाडी इमारती भाड्याने दिल्या आहेत किंवा अयोग्य सार्वजनिक इमारतीमध्ये भरत आहे, त्यासाठी अंगणवाडी केंद्राची इमारत बांधून यामाध्ये ICDS योजनेसाठी रु.1/- दरमहा नाममात्र भाड्यावर उपलब्ध करुन देणे.
2) अंगणवाडी केंद्रातील मुलांकरिता आवश्यक शैक्षणिक साहित्य खरेदी करणे.
3) पिण्याच्या पाण्याची व्यवस्थ्या करणे व शौचालय बांधकाम करणे.

4) मुलांकरिता पोषक आहार पुरविणे .
5) 0-3 वर्षांच्या मुलांकरिता creche किंवा Day care centre बांधणे व क्रियान्वित करणे तसेच पाळणाघर चालविणाऱ्या अशासकीय संस्थांना अर्थसहाय्य करणे.
6) गरोदर स्त्रियांसाठी तसेच शालेय विद्यार्थी व अंगणवाडी विद्यार्थी यांचे वैद्यकीय तपासणी व औषधोपचार करणे.
7) मुलीकरीता शिष्यवृत्ती योजना राबविणे
8) महिलांसाठी प्रसूतिगृह बांधणे अथवा श्रेणीवाढ करणे अथवा विस्तारीकरण करणे.
9) 16 वर्षावरील मुलींना/महिलांना व्यावसायीक प्रशिक्षण देणे.
10) काम करणाऱ्या महिलांसाठी वसतीगृह बांधणे.
11) शिकणाऱ्या मुलीसाठी वसतीगृह बांधणे.
12) पोलिओग्रस्त किंवा अपंग व्यक्तींना Prosthetic aids पुरविणे
13) महिलांसाठी समुपदेशक केंद्र चालविणे, helpline चालविणे, विधी सल्ला केंद्र चालविणे इ.
14) BPL खलील मुलींची शाळा गणतीचे प्रमाण थांबविण्यासाठी प्रोत्साहनपर दैनिक उपस्थिती भत्ता देणे.
15) मुलींच्या विविध क्रिडा सुविधानिर्माण करणे.

महानगरपालिका चंद्रपूर येथील वर्ष 2016-17 व 2017-18 चे अंदाजपत्रकानुसार महसुली उत्पन्न तसेच महिला व बाल विकास कार्यक्रमाकरिता केलेली तरतूद पुढीलप्रमाणे आहे.

वर्ष 2016-17

| | |
|---|---|
| वर्ष 2016-17 चे प्रत्यक्ष महसुली उत्पन्न | 1728418402 |
| बांधील खर्च (प्रत्यक्ष) | 371265388 |
| निव्वळ महसुली उत्पन्न | 1357153014 |
| 5% रक्कम | 67857650 |
| प्रत्यक्ष केलेली तरतुदी | 718756 |

वर्ष 2017-18

| | |
|---|---|
| वर्ष 2017-18 चे प्रत्यक्ष महसुली उत्पन्न | 2415322565 |

| | |
|---|---|
| बांधील खर्च (प्रत्यक्ष) | 504483718 |
| निव्वळ महसुली उत्पन्न | 1910838847 |
| 5% रक्कम | 95541942 |
| प्रत्यक्ष केलेली तरतुदी | 10510729 |

उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका चंद्रपूर येथील वर्ष 2016-17 च्या अंदाजपत्रकानुसार मनपाचे बांधील खर्च वजा जाता या वर्षाचे एकूण निव्वळ महसुली उत्पन्न 135,71,53,014 एवढे होते. प्राप्त झालेल्या महसुली उत्पन्नाच्या 5% प्रमाणे 6,78,57,650 एवढे रुपये महिला व बालकल्याणासाठी वर दर्शविल्यानुसार शासन निर्णयातील वैयक्तिक लाभाच्या योजनावर खर्च होणे आवश्यक होते. परंतु अंदाजपत्रकात नमूद असल्याप्रमाणे महिला व बालकल्याणासाठी 7,18,756 (महसुली उत्पन्नाच्या 0.05%) एवढी तुटपुंजी तरतूद केली असून प्रत्यक्षात मात्र कुठलाही खर्च करण्यात आल्याचे दिसून आले नाही.

तसेच वर्ष 2017-18 च्या अंदाजपत्रकानुसार मनपाचे बांधील खर्च वजा जाता या वर्षाचे एकूण निव्वळ महसुली उत्पन्न 191,08,38,847 एवढे होते. प्राप्त झालेल्या महसुली उत्पन्नाच्या 5% प्रमाणे 9,55,41,942 एवढे रुपये महिला व बालकल्याणासाठी वर दर्शविल्यानुसार शासन निर्णयातील वैयक्तिक लाभाच्या योजनावर खर्च होणे आवश्यक होते. परंतु अंदाजपत्रकात नमूद असल्याप्रमाणे महिला व बालकल्याणासाठी 1,05,10,729 (महसुली उत्पन्नाच्या 0.5%) एवढी तुटपुंजी तरतूद केली असून प्रत्यक्षात मात्र कुठलाही खर्च करण्यात आल्याचे दिसून आले नाही.

याबाबत अर्धासामास पत्र क्र.115 दि. 28-01-2021 चे अनुषगाने खुलासा मागितला असता परिच्छेद तयार करेपर्यंत कोणताही खुलासा प्राप्त झाला नाही.

शासन निर्देशाप्रमाणे वर्ष 2016-17 मधील आवश्यक 5% रक्कम 6,78,57,650/-व वर्ष 2017-18 मधील आवश्यक 5% रक्कम 9,55,41,942/- अन्य बाबीवर झाला असल्यामुळे सदर रकमेवरील खर्च आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DLFYBPF9301 (Ref No : 36, Hmm No : 115)

## *28 चंद्रपूर महानगरपालिका नगर सचिव विभागांतर्गत घेण्यात आलेल्या बैठकीच्या नियमबाह्य खर्चाबाबत.*

**नगर सचिव विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 257847.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 161142.00/-

वित्तीय अधिकार नियम पुस्तिका 1978 शासन निर्णय,वित्त विभाग,क्रमांक:विअप्र-10.08/प्र.क्र.70/2008/विनियम दिनांक 15 मे 2009 मधील नियम क्र. 31(अ) नुसार बैठक 3 तासापेक्षा अधिक कालावधीसाठी असेल तर चहा व अल्पोपहारासाठी प्रती व्यक्ती रु.50 पेक्षा जास्त खर्च असता कामा नये असे निर्देश केले आहे परंतु चंद्रपूर मनपाकडून असे केल्याचे आढळून येत नाही.

वित्तीय अधिकार नियम पुस्तिका 1978 शासन निर्णय,वित्त विभाग,क्रमांक:विअप्र-10.08/ प्र.क्र.70/2008/विनियम दिनांक 15 मे 2009 मधील नियम क्र.31(अ) नुसार बैठक 3 तासापेक्षा अधिक कालावधीसाठी असेल तर चहा व अल्पोपहारासाठी प्रती व्यक्ती रु.50 पेक्षा जास्त खर्च असता कामा नये. परंतु उपरोक्त तरतुदींच्या अनुषगाने कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही.

उपलब्ध अभिलेखांवरून खालीलप्रमाणे नियमबाह्य खर्च आढळून आला आहे:-

1.स्थायी समिती

| अक्र | वित्तीय वर्ष | या वर्षातील तरतुद रजिस्टर मध्ये नोंदविलेल्या सभा | सर्व सभेतील एकूण सदस्य उपस्थिती | प्रती सदस्य 50 रुपये प्रमाणे जास्तीत जास्त ग्राह्य खर्च (सदस्य उपस्थिती संख्या* 50) | प्रत्यक्षात झालेला खर्च (प्रती व्यक्ती खर्च ) | एकूण नियमबाह्य खर्च (फरक) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2016-17 | 08 | 91 | 4,550 | 19,891 (218.5 रु. प्रती व्यक्ती) | 15,341 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 2017-18 | 28 | 410 | 20,500 | 69,683 (170 रु. प्रती व्यक्ती) | 49,183 |
| | | | एकूण | 25,050 | 89,574 | 64,524 |

2.सर्वसाधारण सभा

| अक्र | वित्तीय वर्ष | या वर्षातील तरतुद रजिस्टर मध्ये नोंदविलेल्या सभा | सर्व सभेतील एकूण सदस्य उपस्थिती | प्रती सदस्य 50 रुपये प्रमाणे जास्तीत जास्त ग्राह्य खर्च (सदस्य उपस्थिती संख्या* 50) | प्रत्यक्षात झालेला खर्च (प्रती व्यक्ती खर्च ) | एकूण नियमबाह्य खर्च (फरक) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 2016-17 | 12 | 591 | 29,550 | 65,543 (106 रु. प्रती व्यक्ती) | 35,993 |
| 2. | 2017-18 | 12 | 699 | 34,950 | 69,590 (100 रु. प्रती व्यक्ती) | 34,640 |
| | | | एकूण | 64,500 | 1,35,138 | 70,633 |

3.महिला व बालविकास :

| अक्र | वित्तीय वर्ष | या वर्षातील तरतुद रजिस्टर मध्ये नोंदविलेल्या सभा | सर्व सभेतील एकूण सदस्य उपस्थिती | प्रती सदस्य 50 रुपये प्रमाणे जास्तीत जास्त ग्राह्य खर्च (सदस्य उपस्थिती संख्या* 50) | प्रत्यक्षात झालेला खर्च (प्रती व्यक्ती खर्च ) | एकूण नियमबाह्य खर्च (फरक) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 2016-17 | 11 | 91 | 4,550 | 22,291 (245 रु. प्रती व्यक्ती) | 17,741 |
| 2. | 2017-18 | 05 | 52 | 2,600 | 10,844 (208.5 रु. प्रती व्यक्ती) | 8,244 |
| | | | एकूण | 7,150 | 33,135 | 25,985 |

वरील सर्व माहितीवरून असे आढळून येते की वित्तीय वर्ष 2016-17 व 2017-18 या दोन वर्षामध्ये नगर सचिव विभांतर्गत घेण्यात आलेल्या स्थायी समिती, सर्वसाधारण समिती व महिला-बालविकास समिती यांच्या बैठकीदरम्यान चहा व अल्पोपहारासाठी एकूण 2,57,847 एवढा खर्च झाला असून त्यापैकी सुमारे 62.49% एवढा म्हणजे 1,61,142 रुपये नियमबाह्य खर्च करण्यात आला आहे.

याबाबत अर्धासामास पत्र क्र.107 दि.20/01/2021 चे अनुषगाने खुलासा मागितला असता परिच्छेद तयार करेपर्यंत कोणताही खुलासा प्राप्त झाला नसल्याने परिच्छेद नोंदविण्यात येत आहे.

DLFYBPF9301 (Ref No : 38, Hmm No : 107)

## *29 बाजार विभागातील गाळे भाडयाची रक्कम वसुल न केल्याबाबतची अनियमितता*

**परवाना व मंडई विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 1**

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 10053720.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 10053720.00/-

चंद्रपूर महानगरपालिका हद्दीतील भाडयाने दिलेली दुकाने/गाळे बाबत येणे असलेली भाडयाची रक्कम रु. 10053720 थकीत असल्याचे दिसुन आले. सबब महानगरपालिकेस महसुली उत्पन्न वाढीचा लाभ मिळत नसल्याचे दिसुन आले.

चंद्रपूर शहर महानगरपालिका यांनी स्वमालकीच्या स्थावर मालमत्तेवर बांधकाम केलेले व्यापारी संकुल व दुकाने इत्यादी भाडे तत्वावर आवंटीत केले आहे. मात्र भाडयापोटी महानगरपालिकेस प्राप्त होणारी रक्कम खालीलप्रमाणे दुकाने, गाळे, भोगवटदारांकडून वसुली झालेली नसल्याने महानगरपालिकेत महसूल उत्पन्नाचा वाढीव लाभ मिळालेला नाही.

(रक्कम रुपयात)

| अ. क्र. | सन 2015-16 थकीत भाडे | सन 2016-17 चालू मागणी | एकूण मागणी | सन 2016-17 एकूण वसुली | सन 2016-17 अखेर थकबाकी |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 1,06,21,479 | 1,12,24,436 | 2,18,45,915 | 1,38,79,532 | 79,66,383 |

(रक्कम रुपयात)

| अ. क्र. | सन 2016-17 थकीत भाडे | सन 2017-18 चालू मागणी | एकूण मागणी | सन 2017-18 एकूण वसुली | सन 2017-18 अखेर थकबाकी |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 79,66,383 | 1,19,39,065 | 1,99,05,448 | 98,51,728 | 1,00,53,720 |

नगर परिषद प्रशासन संचालनालय मुंबई यांचे आदेश क्र. 14, दिनांक 26/11/2001 मधील परिच्छेद (क) (17) नुसार महानगरपालिकेने कोणत्याही प्रकारच्या वसुलीवर शिथिलता न देता संपुर्ण रक्कम शीघ्र गतीने वसूल करावयाची आहे. परंतु वसुलीची कार्यवाही गंभीरतेने होत नसल्याने मनपास एकूण रु.1,00,53,720/- थकबाकी वसुलीचा लाभ घेता आला नाही. चंद्रपूर शहर महानगरपालिका हद्दीतील भाडयाने दिलेली दुकाने/गाळे बाबत येणे असलेली भाडयाची रक्कम रु.1,00,53,720/-थकीत असल्याचे दिसुन आले. सबब दुकान गाळे भोगवटदारांकडून वसुली झाली नसल्याने विभागावर प्रशासनाचे नियंत्रण नसल्याचे दिसून आले.

तरी याबाबत अर्धसमास पत्र क्र.93 दि.12/01/2021 नुसार खुलासा मागितला असता संयुक्तिक खुलासा नसल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATDRMM6701 (Ref No : 43, Hmm No : 93)

## *30 बाजार विभागातील सन 2017-18 मधील धनादेश वारंवार अनादरीत झाल्याने मनपाचे आर्थिक नुकसानीबाबत*

**परवाना व मंडई विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 1**

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 944246.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 944246.00/-

मनपा चंद्रपूर अंतर्गत बाजार विभागातील सन 2016-17 व 2017-18 मध्ये धनादेशाद्वारे करण्यात आलेल्या वसुलीचे धनादेश वारंवार अनादरीत झाल्याने एकूण 14 धनादेशाची रक्कम रु.9,44,246/- ची वसुली करणे आवश्यक होते. परंतु बाजार विभागातील व जनरल रोकडवहीची तपासणी केली असता 14 धनादेशाची रक्कम

रु.9,44,246/- मनपा खात्यात जमा झाल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे मनपाची रु.9,44,246/- येवढी हानी झाल्याचे दिसून येते.

बाजार विभागातील वसुलीचे धनादेश भोगवटदारांकडून स्विकारण्यात आले. तसेच सदरचे धनादेश वारंवार अनादरीत झाल्याने त्यानंतर संबधीताने भोगवटदारांकडून रोख रक्कम वसूल केली किंवा कसे याबाबत रोकडवहीत सदर व्यवहाराची नोंद दिसून येत नाही. एकूण 14 धनादेश रक्कम रु.9,44,246/- ची नोंद रोख नोंदवहीत दिसून आल्या नाहीत. त्यामुळे अनादरीत झालेल्या धनादेशाची वसुली झाल्याचे दिसून येत नाही. सन 2017-18 मध्ये मनपा चंद्रपूर येथील बाजार विभागाच्या अनादरीत झालेल्या धनादेशांची यादी खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | नाव | बँकेचे नाव धनादेश क्रमांक | रक्कम (रुपये) | बँकेकडून धनादेश परत दिनांक |
|---|---|---|---|---|
| 1 | विठ्ठल गुलाब कुकडे (सराय मार्केट) | HDFC बँक 000431 28/06/2017 | 30,000/- | 05/07/2017 |
| 2 | निर्मल भंडारी | ओरियेंटल बँक 789650 03/07/2017 | 1,60,203/- | 20/07/2017 |
| 3 | निर्मल भंडारी (कंत्राटदार) | ओरियेंटल बँक 789652 03/09/2017 | 1,60,203/- | 13/09/2017 |
| 4 | मो. फारूक हबीब (सुपर मार्केट) | दि भंडारा अर्बन को. ऑप. बँक 026645 03/09/2017 | 10,000/- | 07/10/2017 |
| 5 | चालाराम गंगवानी (संजय गांधी मार्केट) | सिंडीकेट बँक 675773 | 32,490/- | 12/10/2017 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | 27/09/2017 | | |
| 6 | मोतीलाल सरकार (रामाला तलाव) | ईलहाबाद बँक<br>020051<br>06/11/2017 | 2,00,000/- | 09/11/2017 |
| 7 | मोतीलाल सरकार (गोलबाजार) | ईलहाबाद बँक<br>020051 | 2,00,000/- | 07/12/2017 |
| 8 | अनिल तपासे<br>(गांधी चौक) | युको बँक चंद्रपूर<br>000004<br>15/12/2017 | 28,000/- | 22/12/2017 |
| 9 | सौ. मंगला चोरडीया (संजय गांधी मार्केट) | SBI बँक<br>052937<br>30/12/2017 | 22,675/- | 02/01/2018 |
| 10 | अनिल तपासे<br>(गांधी चौक) | युको बँक चंद्रपूर<br>000004<br>15/12/2017 | 28,000/- | 04/01/2018 |
| 11 | मंगल चोरडीया (संजय गांधी मार्केट) | SBI बँक<br>052937<br>30/12/2017 | 22,675/- | 06/01/2018 |
| 12 | रामलाल सोनी<br>(व्या संकुल मार्केट) | Axis Bank<br>000658<br>10/03/2018 | 20,000/- | 19/03/2018 |
| 13 | रामलाल सोनी<br>(व्या संकुल मार्केट) | Axis Bank<br>000659<br>20/01/2018 | 20,000/- | 22/03/2018 |
| 14 | मो. फारूक हबीब (सुपर | दि भंडारा अर्बन को. | 10,000/- | 28/03/2018 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | मार्केट) | ऑप. बँक<br>041801<br>24/03/2018 | | |

मनपाने अनादरीत झालेल्या धनादेशाची स्वतंत्र नोंदवही ठेवलेली नाही. वरीलप्रमाणे दर्शविण्यात आलेल्या धनादेशाची रक्कम केव्हा व कोणत्या रोकडवहीत नोंदी घेतल्या आहेत. या संदर्भात अर्धसमास क्र.103, दि.14/01/2021 नुसार खुलासा मागितला असता खुलासा प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATDRMM6701 (Ref No : 44, Hmm No : 103)

## *31 बाजार विभागातील कंत्राटदार श्री निर्मल भंडारी यांचेकडून दरमहा नियमित बाजार फी कंत्राटाची रक्कम रु.1,60,203/- मनपा खात्यात जमा होत नसल्याची अनियमितता.*

**बाजार विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 3844872.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 2242842.00/-

महानगरपालिका चंद्रपूर अंतर्गत बाजार विभागातील किल्ल्याचा आतील व बाहेरील बाजार फी वसुलीबाबत कंत्राट श्री निर्मल भंडारी यांना देण्यात आलेले आहे. त्यानुसार केलेल्या करारनाम्या नुसार सन 2015-16 ते 2017-18 या तीन वर्षाकरिता एकूण रु.52,86,203/- चे बाजार फी वसुली बाबतचे कंत्राट देण्यात आले. त्याची रक्कम दरमहा रु.1,60,203/- भरावयाचे ठरले असून ती रक्कम धनादेशाद्वारे दर महिन्याचे 1 तारखेस जमा करण्यात येईल त्याकरिता कंत्राटदारांकडून एकूण 33 धनादेश मनपाला दिले. (धनादेश क्र.789626 ते 789658) त्यानुसार सदर कंत्राटाची नस्तीचे व वित्त विभागातील सर्वसाधारण रोख पुस्तकीचे लेखा परीक्षण केले असता श्री निर्मल भंडारी यांचेकडून बाजार फी कंत्राटाची रक्कम दरमहा रु.1,60,203/- नियमित जमा झाल्याचे दिसून येत नाही.

महनगरपालिका चंद्रपूर यांनी 2016-17 व 2017-18 या वर्षाकरिता बाजार फी बाबत कंत्राट श्री निर्मल भंडारी यांना देण्यात आलेले होते. त्यानुसार केलेल्या करारनाम्यानुसार सन 2016-17 व 2017-18 या वर्षातील बाजार

फी ची रक्कम खालीलप्रमाणे दरमहा रु.1,60,203/- प्रमाणे दोन वर्ष भरणे आवश्यक होते.

| अं.क्र. | कालावधी | धनादेश क्र. | रक्कम (रुपये) | मनपा खात्यात जमा केल्याचे दिनांक |
|---|---|---|---|---|
| 1 | 01/04/2016 | 789635 | 1,60,203/- | 13/04/2016 |
| 2 | 01/05/2016 | 789636 | 1,60,203/- | 06/05/2016 |
| 3 | 01/06/2016 | 789637 | 1,60,203/- | 09/06/2016 |
| 4 | 01/07/2016 | 789638 | 1,60,203/- | 07/07/2016 |
| 5 | 01/08/2016 | 789639 | 1,60,203/- | 06/08/2016 |
| 6 | 01/09/2016 | 789640 | 1,60,203/- | 09/09/2016 |
| 7 | 01/10/2016 | 789641 | 1,60,203/- | 07/10/2016 |
| 8 | 01/11/2016 | 789642 | 1,60,203/- | 04/11/2016 |
| 9 | 01/12/2016 | 789643 | 1,60,203/- | 05/12/2016 |
| 10 | 01/01/2017 | 789644 | 1,60,203/- | 04/01/2017 |
| 11 | 01/02/2017 | 789645 | 1,60,203/- | 04/02/2017 |
| 12 | 01/03/2017 | 789646 | 1,60,203/- | 04/03/2017 |
| 13 | 01/04/2017 | 789647 | 1,60,203/- | 26/04/2017 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 14 | 01/05/2017 | 789648 | 1,60,203/- | 11/05/2017 |
| 15 | 01/06/2017 | 789649 | 1,60,203/- | 08/06/2017 |
| 16 | 01/07/2017 | 789650 | 1,60,203/- | 26/07/2017 |
| 17 | 01/08/2017 | 789651 | 1,60,203/- | 11/08/2017 |
| 18 | 01/09/2017 | 789652 | 1,60,203/- | 20/09/2017 |
| 19 | 01/10/2017 | 789653 | 1,60,203/- | 06/10/2017 |
| 20 | 01/11/2017 | 789654 | 1,60,203/- | 10/11/2017 |
| 21 | 01/12/2017 | 789655 | 1,60,203/- | 14/12/2017 |
| 22 | 01/01/2018 | 789656 | 1,60,203/- | 06/01/2018 |
| 23 | 01/02/2018 | 789657 | 1,60,203/- | 09/02/2018 |
| 24 | 01/03/2018 | 789658 | 1,60,203/- | 09/03/2018 |
| एकूण | | | 38,44,872/- | |

वरीलप्रमाणे करारनाम्यानुसार रक्कम रु.38,44,872/- मनपा खात्यात जमा केल्याचे कर विभागाकडून माहिती सादर केलेली आहे. परंतु वित्त विभागाच्या सर्वसाधारण रोकड पुस्तकेची 01/04/2016 ते 31/03/2018 पर्यंतची तपासणी केली असता मनपाचा सर्वसाधारण रोकड वहीत खालीलप्रमाणे रक्कम जमा झाल्याची दिसून आली.

| अं.क्र. | दिनांक | रक्कम (रुपये) |
|---|---|---|
| 1 | 09/06/2016 | 1,60,203/- |

| | | |
|---|---|---|
| 2 | 09/06/2016 | 1,60,203/- |
| 3 | 19/08/2016 | 1,60,203/- |
| 4 | 19/08/2016 | 1,60,203/- |
| 5 | 19/08/2016 | 1,60,203/- |
| 6 | 25/01/2017 | 1,60,203/- |
| 7 | 01/03/2017 | 1,60,203/- |
| 8 | 01/03/2017 | 1,60,203/- |
| 9 | 01/03/2017 | 1,60,203/- |
| 10 | 01/03/2017 | 1,60,203/- |
| एकूण | | 16,02,030/- |

श्री निर्मल भंडारी कंत्राटदार यांनी करारनाम्यानुसार एकूण 24 महिन्याचे रु. 1,60,203/- प्रमाणे एकूण रु.38,44,872/- मनपा फंडात जमा करणे अप्रेक्षित होते. परंतु मनपाच्या सर्वसाधारण रोकड वहीची तपासणीअंती फक्त 10 महीण्याचे वरीलप्रमाणे रक्कम रु.16,02,030/- जमा झाल्याचे दिसून येते. त्यामुळे उर्वरित रक्कम रु.22,42,842/- सदर कंत्राटदारांकडून वसूल पात्र ठरते किंवा अन्य कोणत्या रोकड वहीत रक्कम जमा केल्याची नोंद असल्यास याबाबतचे अनुपालन सादर करावे.

या संदर्भात अर्धसमास पत्र क्र.96, दि.13/01/2021 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. परंतु समर्थनीय खुलासा सादर न केल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATDRMM6701 (Ref No : 76, Hmm No : 96)

## *32 स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत व वैयक्तिक घरगुती शौचालय योजने अंतर्गत काम पूर्ण न झालेल्या प्रकरणाबाबत व योजनेची अंमलबजावणी करताना झालेल्या अनियमिततेबाबत*

**वैयक्तिक शौचालय योजना**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 4**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व-निधी व शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

**गुंतलेली रक्कम** रु. 101381086.00 /-

**वसूलपात्र रक्कम** रु. 5536000.00/-

मनपातर्फे शासन निर्णय क्र.स्वभाअ/2015/ प्र.क्र.23/नवि-34/ दि.15 मे 2015 नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक शौचालय योजने अंतर्गत काही प्रकरणांचे बांधकाम अपूर्ण असल्याचे दिसून आले असून त्यामुळे अशा प्रकरणासाठी दिलेले अनुदान अनुत्पादक ठरण्याची शक्यता आहे. तसेच योजनेच्या अंमलबजावणीमध्ये काही शासन निर्देशांचे पालन न करण्याची अनियमितता आढळून येते.

सन 2016-17 व 2017-18 या वित्तीय वर्षात चंद्रपूर मनपातर्फे शासन निर्णय क्र.स्वभाअ/2015/ प्र.क्र.23/नवि-34/ दि.15 मे 2015 नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) राबविण्यात येते. त्यांतर्गत येणाऱ्या वैयक्तिक घरगुती शौचालय योजनेसाठी उपरोक्त शासन निर्णयातील मुद्दा क्र.3.3(अ)(2) नुसार प्रत्येक लाभार्थ्याला केंद्र शासनाचे 4000 रुपये व राज्य शासनाचे 8000 रुपये असे 12,000 इतके अनुदान अनुज्ञेय आहे.तसेच चंद्रपूर महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या ठराव क्र.82 दिनांक 22/07/2016 अन्वये प्रत्येक लाभार्थ्यास शौचालय बांधणीसाठी 5000 रुपये अनुदान देण्याची तरतूद आहे. असे एकूण 17000 रुपये प्रती लाभार्थी अनुदान खर्च होत आहे. सदर योजनेवर सन 2016-17 मध्ये 80515198 रुपये व 2017-18 मध्ये 20865888 रुपये असे एकूण 101381086 रुपये खर्च झाले आहेत. मनपाच्या पत्र क्र. चंशमनपा/उपयुक्त/1690/2015 दिनांक 20/10/2015 नुसार सदर अनुदान चार हप्त्यामध्ये लाभार्थीना देण्यात येत असून योजनेच्या अंमलबजावणीबाबत पुढील अनियमितता आढळून आल्या आहेत.

1) सन 2016-17 व 2017-18 या वर्षात वैयक्तिक शौचालय योजने अंतर्गत झालेल्या बांधकामाची व त्यावर केल्या गेलेल्या अनुदान वाटपाची माहिती पुढील विवरणपत्रात नमूद केली आहे. त्यानुसार 698 प्रकरणांचे काम अपूर्ण असून त्या प्रकरणासाठी एकूण 6345000 रुपये अनुदान दिले आहे. त्यापैकी 809000 रुपये वसूल केले गेले आहेत. तरी बाकीचे 5536000 रुपयाचे अनुदान अनुत्पादक ठरण्याची शक्यता आहे. त्यामुळे अपूर्ण कामे पूर्ण करण्याची कार्यवाही करण्यात यावी अन्यथा सदर रक्कम वसूलपात्र ठरते.

| अ.क्र. | प्रभाग क्र. | एकूण लाभार्थ्यांची संख्या | पूर्ण कामांची संख्या | अपुर्ण कामांची संख्या | काम अपूर्ण असलेल्या प्रकरणावर झालेले अनुदान वाटप | काम अपूर्ण असलेल्या लाभार्थ्यांकडून झालेली वसुली | अनुत्पादक अनुदान |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1(अ) | 621 | 519 | 102 | 862000 | 300000 | 562000 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 1(ब) | 75 | 71 | 04 | 36000 | -- | 36000 |
| 3 | 2(अ) | 408 | 348 | 60 | 518000 | 162000 | 356000 |
| 4 | 2(ब) | 1380 | 1043 | 337 | 3111000 | 114000 | 2997000 |
| 5 | 3(अ) | 1429 | 1250 | 179 | 1722000 | 138000 | 1584000 |
| 6 | 3(ब) | 991 | 975 | 16 | 96000 | 95000 | 1000 |
| | | | | | | | |
| | एकूण | 4904 | 4206 | 698 | 6345000 | 809000 | 5536000 |

2)उपरोक्त शासन निर्णयातील मुद्दा क्र.3.3(अ)(11) अनुदानाच्या 50% रक्कम रुपये 6000 पहिलाव हप्ता म्हणून देऊन मुद्दा क्र.3.3(अ)(15) नुसार सदर बांधकामाची अंतिम तपासणी करून अर्जदार व बांधकाम यांचा भौगोलिक tag केलेला स्वयंसाक्षांकित फोटो स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या MIS वरती अपलोड केल्यानंतर दुसरा हप्ता रुपये 6000 देण्याची तरतूद आहे. परंतु महानगरपालिकेतर्फे सदर कार्यवाही पूर्ण करण्याआगोदारच दुसरा हप्ता दिला जात असल्याचे निदर्शनास येते.

3)उपरोक्त शासन निर्णयातील मुद्दा क्र.3.3(अ)(17)नुसार सदर अनुदान लाभार्थी कुटुंबाच्या खात्यावर थेट जमा करण्याची तरतूद असून रोख किंवा धनादेशाद्वारे अनुदान न देण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. तरीही चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे लाभार्थ्यांना धनादेशाद्वारे अनुदान वाटप केल्याचे निदर्शनास आले असून शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनेचे पालन केलेले नाही.

4)काही प्रकरणांमध्ये बांधकाम पूर्ण झाल्यानंतर अर्जदारासोबतचा फोटो नस्तीत नसूनसुद्धा त्यांना पूर्ण अनुदान दिल्याचे आढळून आले.त्यामुळे काम पूर्ण झाल्याची खात्री न करता अनुदान दिल्याची शक्यता आहे.

या प्रकरणी अर्धसमासपत्र क्र.91 व 92 दिनांक 12/01/2021 नुसार उपरोक्त विषयाबाबत माहितीची विचारणा केली असता दिलेल्या उत्तरामध्ये अनुदान धनादेशाद्वारे दिल्याचे नमूद केले आहे. तसेच काम अपूर्ण असेल्या प्रकरणाबाबत वसुलीची कार्यवाही करत असल्याचे नमूद केले आहे. परिच्छेदातील इतर अनियमिततेबाबत संयुक्तिक उत्तर न दिल्यामुळे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DLFARKM9301 (Ref No : 55, Hmm No : 92)

# कलम ९ ब खालील आक्षेप

लेखापरीक्षकाच्या दृष्टीने कोणत्याही व्यक्तीच्या अक्षम्य हयगयीमुळे अथवा गैरवर्तणुकीमुळे जी कोणतीही तुट अथवा जे कोणतेही नुकसान झाले आहे अशा तुटीची किंवा  नुकसानीची रक्कम तसेच कंत्राट देण्यात झालेल्या अनियमितता, निर्णयामुळे झालेली महसूल हानी आणि धोरणात्मक निर्णयामुळे झालेले आर्थिक नुकसान

## *33 भविष्य निर्वाह निधी खात्यावरील शिल्लक रकमेवर विहित दरापेक्षा जास्त दराने व्याज आकारणे तसेच ना परतावा अग्रीमाची रक्कम वजा न करता व्याज आकारणे व इतर अनियमितताबाबत.*

**लेखा विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**
**अनियमितता संख्या : 05**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 18817.00/-

वर्ष 2016-17 मध्ये भविष्य निर्वाह निधी खात्यावरील शिल्लक रकमेवर निर्धारित दरापेक्षा जास्त दराने व्याज दिले तसेच भविष्य निर्वाह निधीमधील ना परतावा अग्रिम रक्कम दिल्यानंतर व्याजाची गणना करतांना ना परतावा अग्रिम एकूण शिल्लक रकमेमधून कमी न केल्यामुळे जास्तीचे व्याज प्रदान करण्यात आले असुन असे रु.18,817/- चे अतिप्रदान तसेच भविष्य निर्वाह निधि खात्याची तपासणी करून सक्षम प्राधिकाऱ्यांची स्वाक्षरी घेण्यात आली नाही.

मनपा चंद्रपूर येथील वर्ष 2016-17 व 2017-18 या वर्षाचे लेखापरीक्षणा दरम्यान भविष्य निर्वाह निधी खात्याची तपासणी केली असता खालीलप्रमाणे अनियमितता दिसुन आली.

1. भविष्य निर्वाह निधी अधिनियम 1925 (सुधारित 1998) नुसार नोकरदार कर्मचाऱ्यांना त्यांच्या वेतनाच्या कमीत कमी 6% हिस्सा भविष्य निर्वाह निधी मध्ये जमा करण्यात येते. सदर जमा झालेल्या रकमेवर शासनाने वेळेवेळी निश्चित केलेल्या दरानुसार व्याज कर्मचाऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात येते. वर्ष 2016-17 मध्ये एप्रिल 2016 ते सप्टेंबर 2016 या कालावधीत 8.1% व्याजाचा दर ऑक्टोबर 2016 ते मार्च 2017 या कालावधीत 8% व्याजाचा दर निर्धारित करण्यात आला होता.

परंतु विभागाने वर्ष 2016-17 या कालावधीत खालील दर्शविलेल्या काही कर्मचाऱ्यांना एप्रिल 2016 पासून निर्धारित केलेल्या 8.1% ऐवजी 8.7 % या पूर्वीच्याच दराने व्याजाची गणना करून व्याजाचे अतिप्रदान करण्यात आले.

खाली दर्शविलेल्या कर्मचाऱ्यांना जास्त दराने व्याज प्रदान करून व्याजाचे अतिप्रदान करण्यात आले.

| अ. क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव | पदनाम | खाते क्र. | प्रदान करण्यात आलेले व्याज 8.7% | अनुज्ञेय व्याज दर 8.1% | व्याजाची अतिप्रदान रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | अनिता अनिल पाटणे | सहा. शिक्षक | 712 | 38589 | 35927 | 2662 |
| 2 | देवानंद कांबळे | | 846 | 11324 | 10543 | 781 |
| 3 | मुरलीधर चौथाले | | 926 | 6701 | 6239 | 462 |
| 4 | सिंधू वसंत उसेकवार | | 981 | 13855 | 12880 | 955 |
| 5 | सुरेश बोकडे | वाहन चालक | 1098 | 17091 | 15912 | 1179 |
| 6 | सुरेश भैय्याजी अरगुंडे | वाहन चालक | 1100 | 9045 | 8422 | 623 |
| 7 | मन्या हरीलाल भुते | स.का. | 1121 | 7642 | 7115 | 527 |
| 8 | ब्रिजेश छोटेलाल हाते | स.का. | 1159 | 10778 | 10035 | 743 |
| 9 | कवडू गायधने | सहा.शिक्षक | 1270 | 23512 | 21890 | 1622 |
| 10 | कल्पना परिमल राय | सहा.शिक्षक | 1391 | 15953 | 14853 | 1100 |
| 11 | मीना विठ्ठल चहाटे | रेजा | 1485 | 8373 | 7795 | 578 |
| 12 | अब्दुल रहीम शेख | शिपाई | 1685 | 4657 | 4336 | 321 |
| 13 | मारोती नळे | सहा.कुली | 1712 | 6287 | 5853 | 434 |
| 14 | नारायण सोनू देवतळे | शिपाई | 641 | 10165 | 9464 | 701 |
| एकूण रुपये | | | | | | 12688 |

2. वर्ष 2016-17 मध्ये श्री निशिकांत मनोहर चांदेकर कनिष्ठ लिपिक यांना ना परतावा दिलेल्या अग्रीमाची रकम भविष्य निर्वाह निधीच्या एकूण शिल्लकेमधून कमी न करता व्याजाची गणना करण्यात आली त्यामुळे व्याजाची गणना करतांना एकूण रु.6129/- व्याजाचे अतिप्रदान झाल्याचे भविष्य निर्वाह निधी खात्याची

पडताळणी केलेल्या प्रकरणावरून दिसून येते. तसेच इतरही कर्मचाऱ्यांची व्याजाची गणना करतांना जास्तीचे व्याज प्रदान केलाची शक्यता नाकारता येत नाही.
3. भविष्य निर्वाह निधी नोंदवहीची तपासणी केली असता भविष्य निर्वाह निधी खाते नोंदवही ही कर्मचाऱ्यांकडून वसूल केलेल्या निधीचा हिशेब ठेवण्याची महत्वाची नोंदवही असतांना व व्याजाची गणना नियमानुसार आहे किंवा नाही ते तपासून त्यावर सक्षम प्राधिकाऱ्यांची स्वाक्षरी घेणे गरजेचे असतांना अशा प्रकारची कार्यवाही करण्यात आली नाही.
4. भविष्य निर्वाह निधीचे परतावा / ना परतावा अग्रीमाचे प्रदान करतांना 1/- रुपये च्या मुद्रांकावर (रेव्हनी स्टॅप) कर्मचाऱ्यांची स्वाक्षरी घेणे आवश्यक असतांना परतावा/ ना परतावा अग्रीमाचे प्रदान करतांना 1/- रुपये मुद्रांकावर स्वाक्षरी घेण्यात आली नसल्याने शासनाच्या महसुलाची हानी झाल्याचे दिसून येते.
5. तसेच भविष्य निर्वाह निधी खातेधारकांना त्यांच्या खात्यात जमा असलेल्या रकमा, प्राप्त व्याज व शिल्लक बाकी दर्शविलेले वार्षिक विवरण किंवा पासबुक कर्मचाऱ्यांना देण्यात आले नाही.
याबाबत अर्धसमास पत्र क्र.26 दिनांक 04/11/2020 नुसार अन्वये खुलासा विचारला असता कोणताही खुलासा प्राप्त न झाल्यामुळे आक्षेप नोंदविण्यात येत आहे. व्याजाचे अतिप्रदानाची वसुली तसेच आक्षेपाची पूर्तता करून अनुपालन सादर करावे.

DATVVBM6301 (Ref No : 4, Hmm No : 26)

## *34 मनपा चंद्रपूर येथे धनादेश वितरण नोंदवही (Cheque Issue Register) ठेवले नसल्याबाबत.*

**लेखा विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

राष्ट्रीय महानगरपालिका लेखा संहिता 2011 NMAM CHAPTER 5 General accounting procedures मधील नियम क्र. 5.8 मध्ये नमुद असल्याप्रमाणे मनपा चंद्रपूर येथे धनादेश वितरण नोंदवही Cheque Issue Register. लेखापरीक्षणाकरिता उपलब्ध करून देण्यात आले नाही. धनादेश वितरण नोंदवही नसणे ही मोठी अनियमितता असल्याचे दिसुन येते.

मनपा चंद्रपूर येथील वर्ष 2016-17 व 2017-18 या वर्षाचे लेखापरीक्षणा दरम्यान धनादेश वितरण नोंदवही Cheque Issue Register लेखापरीक्षाकरिता उपलब्ध करून देण्यात आले नाही.

राष्ट्रीय महानगरपालिका लेखासंहिता 2011 NMAM CHAPTER 5 General accounting procedures मधील नियम क्र.5.8 मध्ये नमूद असल्याप्रमाणे ldquo;An entry of the cheque prepared shall be made in the cheque issue register maintained in form GEN 15rdquo;

धनादेश वितरण नोंदवही (Cheque Issue Register) Form GEN-15 या नमुन्यात ठेवण्यात आलेली नाही. धनादेश वितरण नोंदवही मध्ये प्रत्येक वितरीत केलेल्या धनादेशाची नोंद घेऊन सदर नोंदीवर वरिष्ठ अधिकाऱ्याने तपासून त्या योग्य असल्याचे प्रमाणित होणे व त्यावर स्वाक्षरी होणे अभिप्रेत आहे. परंतु मनपा चंद्रपुर येथे याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत नसुन प्रमाणाकावर धनादेश क्रमांक नमूद करण्यात येत आहे. धनादेश वितरण नोंदवही नसणे हि गंभीर स्वरुपाची व वित्तीय अनियमितता होण्यास वाव देणारी बाब आहे.

या संदर्भात अर्धसमास पत्र क्र.47 दिनांक 03/12/2020 अन्वये धनादेश वितरण नोंदवही लेखा परीक्षणास उपलब्ध करण्यात कळविले असता धनादेश वितरण नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नसल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATVVBM6301 (Ref No : 5, Hmm No : 47)

## *35 म.न.पा.चंद्रपूर येथील अधिकारी / कर्मचारी व इतर फर्मला दिलेल्या अग्रिमाची वसुली न करणे तसेच इतर अनियमिततेबाबत.*

**लेखा विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 8**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

लेखा विभागाने त्यांचे अधिनस्त अधिकारी/कर्मचारी तसेच इतर फर्मला योजना/उपक्रम राबविणे/प्रवासभत्ता तसेच वाहन खरेदीकरिता व विविध कार्यालयीन कामासाठी अग्रिम मंजूर केल्याचे दिसून येते. महाराष्ट्र शासन निर्णय वित्तविभाग,मंत्रालाय.मुंबई शासन निर्णय क्र.विअप्र-10.08/प्र.क्र.70 /2008/विनियम, दिनांक 15.5.2009 तसेच वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, 1978, भाग पहिला, उपविभाग-एक, अ.क्र.18, नियम क्र.142-क नुसार अग्रिम दिल्याच्या दिनांकापासून तीन महिण्यांचे आत त्याचे समायोजन करणे आवश्यक आहे. मात्र बऱ्याच अग्रिमाचे समायोजन प्रदीर्घ कालावधीपासून करण्यात आलेले नाही.

1)लेखा विभागाने त्यांचे अधिनस्त अधिकारी/कर्मचारी तसेच इतर फर्मला योजना/उपक्रम राबविणे/प्रवासभत्ता तसेच वाहन खरेदीकरिता व विविध कार्यालयीन कामासाठी अग्रिम मंजूर केल्याचे दिसून येते. महाराष्ट्र शासन निर्णय वित्तविभाग,मं.मुंबई शासन निर्णय क्र.विअप्र-10.08/प्र.क्र.70 /2008/विनियम, दिनांक 15.5.2009 तसेच वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, 1978, भाग पहिला, उपविभाग-एक, अ.क्र.18, नियम क्र.142-क नुसार अग्रिम काढल्याच्या दिनांकापासून तीन महिण्यांचे आत त्याचे समायोजन करणे आवश्यक आहे. खालील विवरणपत्रातील अ.क्र.1 व 2 वरील अग्रिमाचे प्रदीर्घ कालावधीपासून प्रलंबित असून अद्यापही समायोजन करण्यात आले नाही.

प्रलंबित अग्रिमाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | अग्रिम दिलेल्या अधिकारी/ कर्मचारी/ फर्मचे नांव | प्रमाणक क्र.व दिनांक | अग्रिम देण्याचे प्रयोजन | अग्रिमाची रक्कम | अग्रिम समायोजन प्र.क्र.व दि. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | टाटा इंजि.ऑटो.कंपनी, दिल्ली | प्र.क्र.2400 दि.24.11.1994 | टाटा सुमो कार खरेदी अग्रिम | 20000/- | - | |
| 2 | श्री.संजय वाघमारे, टाऊन प्लॅनर | प्र.क्र.325., दि.1.6.2004 | मुंबई प्रवास भत्ता अग्रिम | 6000/- | - | |

2) मुंबई वित्तीय नियम 1959 नियम क्रमांक 142 नुसार तसेच महारष्ट्र नगर परिषद लेखा साहिंता 2011 प्रकरण 16 मधील नियम क्रमांक 244 अन्वये अग्रीम धारकास प्रदान केलेल्या पहिल्या अग्रीमाची रक्कम वसूल झाल्याशिवाय दुसरे अग्रीम मंजूर करण्यात येऊ नये, अशी तरतूद असताना बऱ्याच कर्मचाऱ्यांना अग्रिम मंजूर करण्यात आले.

उदाहरणादाखल प्रकरणे .

| अ.क्र. | अग्रिम दिलेल्या | प्रमाणक क्र.व | अग्रिमाची | अग्रिम समायोजन | शेरा |
|---|---|---|---|---|---|

| | अधिकारी/<br>कर्मचारी/ फर्मचे नांव | दिनांक | रक्कम | प्र.क्र.व दि. | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | श्री दिलीप नवघरे | प्र.क्र.172<br>दि.20.05.2016 | 45000 | प्र.क्र.1042<br>दि.11.08.2017 | |
| 2 | श्री दिलीप नवघरे | प्र.क्र. 1719<br>दि.21.11.2016 | 10000 | प्र.क्र.1164<br>दि.30.08.2017 | |
| 3 | सारंग निर्मळे | प्र.क्र. 1<br>दि 6.04.2017 | 10000 | प्र.क्र.74<br>दि.29.04.2017 | |
| 4 | सारंग निर्मळे | प्र.क्र. 5<br>दि 10.04.2017 | 40000 | प्र.क्र.75<br>दि.29.04.2017 | |
| 5 | सारंग निर्मळे | प्र.क्र. 26<br>दि 17.04.2017 | 50000 | प्र.क्र.76<br>दि.29.04.2017 | |
| 6 | रफिक शेख | प्र.क्र. 872<br>दि 02.08.2017 | 25000 | प्र.क्र. 2216<br>दि 30.12.2017 | |
| 7 | रफिक शेख | प्र.क्र. 1368<br>दि 20.09.2017 | 5000 | प्र.क्र. 3010<br>दि 20.03.2017 | |
| 8 | शरद नागोसे | प्र.क्र. 2540<br>दि 02.02.2018 | 211952 | प्र.क्र. 659<br>दि 20.07.2018 | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 9 | शरद नागोसे | प्र.क्र. 2194<br>दि 08.03.2018 | 60000 | प्र.क्र. 663<br>दि 20.07.2018 | |

3) महाराष्ट्र नगर परिषद लेखा साहिंता 2011 प्रकरण 16 मधील नियम क्रमांक 239 अन्वये प्रत्येक प्रकरणात रु. 20000/- पर्यंतच्या रकमेच्या अग्रिमास परवानगी असतांना त्यापेक्षा अधिक रकमेचे प्रदान एकाच प्रकरणात मुख्य लेखाधिकारी यांचे मार्फत मंजूर करण्यात आलेले आहेत.
4) अग्रिम नोंदवहीतील पुष्ठ क्रमांक प्रमाणित करण्यात आलेले नाही .
5) अग्रिम नोंदवही मासिक गोषवारा काढण्यात आलेला नाही त्यामुळे महिना निहाय प्रदान अग्रिम किती व किती अग्रीमाचे समायोजन करण्यात आले आहे याबातची स्थिती स्पष्ट होत नाही.
6) वर्षाअखेर प्रलंबित असलेल्या समायोजनाच्या रकमा व मंजूर अग्रिम पुढील वर्षात सुरवातीची शिल्लक म्हणून दर्शविण्यात आलेल्या नाहीत त्यामुळे विहित वर्षांत मंजूर अग्रिम व प्रलंबित अग्रिम किती याची खातरजमा करता येत नाही.
7) अधिकारी/ कर्मचारी यांनी घेतलेल्या अग्रीमाच्या समायोजनाच्या अनुषंगाने नोंदवहीत महिनानानिहाय नोंदी दर्शविण्यात आलेल्या नाही त्यामुळे कोणत्या महिन्यात अग्रीमाचे समायोजन झाले याबाबत अर्थबोध होत नाही.
8) नोंदवहित कुठेही मुख्य लेखाधिकारी किंवा सक्षम प्रधीकारी यांची स्वाक्षरी शिक्क्यासह घेण्यात आलेली नाही त्यामुळे उक्त अभिलेख/ नोंदवही मनपा अभिलेख म्हणून गृहीत धरता येत नाही.
सदर अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र 65 ,दि. 15.12.2020 नुसार विभागास अनुपालन अभिप्राय सादर करण्यास कळविले होते. तथापि विभागाकडून समर्पक अनुपालन / अभिप्राय प्राप्त न झाल्यामुळे परिच्छेद नोंदविण्यात येत आहे.

DATSMBM7501 (Ref No : 17, Hmm No : 65)

## *36 शासन निधी व सामान्य निधीच्या रोखपुस्तक व बँक ताळमेळ मधील तफावतीबाबत.*

**लेखा विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**
**अनियमितता संख्या : 05**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व-निधी व शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 प्रकरण 29 नियम 397 ते 403 मध्ये बँक ताळमेळाबाबत कार्यपध्दती ठरवुन दिलेली असून महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 नियम 54 नुसार प्रत्येक महिनाअखेरीस प्रकरण 29 मध्ये विहीत केलेल्या कार्यपध्दतीनुसार नमुना 5 मध्ये बँक मेळ विवरणपत्र तयार करणे आवश्यक आहे. चंद्रपूर महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-18 वर्षाचे लेखापरीक्षणअंती सामान्य निधीच्या एकाही रोखपुस्तकामध्ये कोणत्याही महिना अखेरीस बँक ताळमेळ घेण्यात आलेला नाही.महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 प्रकरण 29 नियम 396 नुसार रोखपालाने नमुना 5 मध्ये बँकमेळ विवरणपत्र तयार करणे अनिवार्य असताना अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

लेखापरीक्षणादरम्यान एकूण 11 योजनेतील माहे मार्च 2017 व मार्च 2018 मध्ये लेखा विभागाने उपलब्ध केलेल्या शासन निधीच्या रोखपुस्तकातील शिल्लक व बँक विवरणपत्रातील शिल्लक याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

सन 2016-17

| अ.क्रं. | शासन निधीचे नाव | दि.31/03/2017 अखेर रोखपुस्तीकेनुसार शिल्लक | दि.31/03/2017 अखेर बँक विवरणपत्रातील शिल्लक | तफावत | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | अमृत योजना | 334742773 | 334811893 | 69120 | |
| 2 | अतिवृष्टी मुळे झालेल्या नुकसानी बाबत | 82928255 | 82928275 | 20 | |
| 3 | बी.आर.जी.एफ | 6794421 | 7062491 | 268070 | |
| 4 | मुलभूत सोई सुविधा विकास पायाभूत | 139784083 | 140732113 | 948030 | |
| 5 | रस्ते बांधकामे | 28869067 | | | बँक विवरणपत्र उपलब्ध केले |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | नाही. |
| 6 | खनिज विकास निधी | 1789540-99 | | | बँक विवरणपत्र उपलब्ध केले नाही. |
| 7 | अनुसूचित जाती जमाती नवबोध्द घरकुल योजना | 106892274 | 105202199 | 1690075 | |
| 8 | स्वच्छ महाराष्ट्र अभियान | 7486996 | 8973104 | 1486138 | बँक विवरणपत्र उपलब्ध केले नाही. |
| 9 | नागरी दलित वस्ती | 136728490 | 168998016 | 32269527 | |
| 10 | 14 वा वित्त आयोग | 83881554 | 92560367 | 8678813 | |

31/03/2017 अखेर रोखपुस्तक व बँक खातेपुस्तकातील अखेरच्या शिलकेतील तफावतरु.45409793/-

सन 2017-18

| अ.क्रं. | शासन निधीचे नाव | दि.31/03/2018 अखेर रोखपुस्तीकेनुसार शिल्लक | दि.31/03/2018 अखेर बँक विवरणपत्रातील शिल्लक | तफावत | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | अमृत योजना | 950854633 | 960066891 | 9212258 | |
| 2 | अतिवृष्टी मुळे झालेल्या नुकसानी बाबत | 39648839 | 39676209 | 27370 | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 3 | बी.आर.जी.एफ | 2474260 | 2649026 | 174766 | |
| 4 | मुलभूत सोई सुविधा विकास पायाभूत | 143257501 | 144109634 | 852133 | बँक विवरणपत्र उपलब्ध नसल्यामुळे 01/04/2018 ची अखेरची शिल्लक |
| 5 | रस्ते बांधकामे | 22010408 | 23258762 | 1248354 | |
| 6 | खनिज विकास निधी | 1885667-99 | | | बँक विवरणपत्र उपलब्ध केले नाही. |
| 7 | अनुसूचित जाती जमाती नवबोध्द घरकुल योजना | 307670788 | 306345320 | 1325468 | |
| 8 | स्वच्छ महाराष्ट्र अभियान | 17129789 | 18255417 | 1125628 | |
| 9 | नागरी दलित वस्ती | 51217388 | 5909797246 | 7879858 | . |
| 10 | 14 वा वित्त आयोग | 47403404 | 47079353 | 324051 | |
| 11 | वैशिष्ठ पूर्ण कामासाठी विशेष अनुदान | 77811964 | 77991000 | 176036 | |

31/03/2018 अखेर रोखपुस्तक व बँक खातेपुस्तकातील अखेरच्या शिलकेतील तफावत रु.22345922/-

याशिवाय सामन्य निधीच्या एकूण 15 रोखपुस्तक व बँकपासबुक रकमेचा ताळमेळ घेतला असता सन 2016-17 मध्ये दिनांक 31/03/2017 अखेर रोखपुस्तक व बँक खातेपुस्तकातील अखेरच्या शिलकेतील तफावत

रु.35842194/- एवढी दिसून येते तसेच सन 2017-18 मध्ये दिनांक 31/03/2018 अखेर रोखपुस्तक व बँक खातेपुस्तकातील अखेरच्या शिलकेतील तफावत रु. 41956159/- एवढी प्रचंड आहे. 1)महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 नियम 54 नुसार प्रत्येक महिनाअखेरीस प्रकरण 29 मध्ये विहीत केलेल्या कार्यपध्दतीनुसार नमुना 5 मध्ये बँक मेळ विवरणपत्र तयार करणे आवश्यक असताना सन 2016 -17 च्या शासननिधी व सामान्य निधीच्या उपलब्ध केलेल्या एकाही रोखपुस्तकामध्ये कोणत्याही महिणा अखेरीस बँक ताळमेळ घेण्यात आलेला नाही, महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 प्रकरण 29 नियम 396 नुसार रोखपालाने नमुना 5 मध्ये बँकमेळ विवरणपत्र तयार करणे अनिवार्य असताना अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. बँक खात्यामधील शिलकेशी रकमेचा ताळमेळ घेतला जात नसल्याने एखादी गंभीर आर्थिक अनियमीतता घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

2) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 प्रकरण 29 नियम 397 ते 403 मध्ये बँक ताळमेळाबाबत कार्यपध्दती ठरवुन दिलेली असताना वरील नियमातील तरतुदीकडे दुर्लक्ष केल्याचे स्पष्ट होत आहे.
3)महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011प्रकरण 5 मधील नियम 50 ते 51 मधील तरतुदीनुसार रोखपुस्तकाबाबत कार्यवाही करण्यात येत नाही.
4)महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011प्रकरण 5 मधील नियम 52 ते 53 मधील तरतुदीनुसार बँक नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.
5) वरीलपैकी काही योजना या केंद्र पुरस्कृत योजना असुन त्याचा कालावधीही ठरावीक आहे. परंतु बराच निधी मार्च अखेर शील्लक असल्याने शासनाचा निधी विनाकारण अडकुन पडला आहे. सदरचा निधी शासन खाती भरणा करून अनुपालन सादर करावे.
सदर अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र 61,दि. 09.12.2020 नुसार विभागास अनुपालन अभिप्राय सादर करण्यास कळविले होते. तथापि विभागाकडून समर्पक अनुपालन / अभिप्राय प्राप्त न झाल्यामुळे परिच्छेद नोंदविण्यात येत आहे.

DATSMBM7501 (Ref No : 18, Hmm No : 61)

## *37 मनपा फंडातून भरण्यात आलेली आयकर दंडाची रक्कम रु. 234074/- चे मनपा फंडात समायोजन न केल्याच्या अनियमिततेबाबत.*

**लेखा विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 3**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 234074.00/-

| |
|---|
| चंद्रपूर मनपा येथील सन 2016-17 व 2017-18 वर्षातील लेखापरीक्षणाच्या अनुषंगाने आयकर बाबत नस्तीची तपासणी केली असता, उक्त वर्षांत कमी भरणा करण्यात आलेली आयकराची रक्कम रु. 594074/- सबंधित कंत्राट दाराकडून वसूल करून भरणा करणे अपेक्षित होते. मात्र मनपाने 360000/- रक्कम सबंधित कंत्राटदाराकडून वसूल करून उर्वरित रक्कम रु. 234074/- मनपा फंडातून आयकर विभागास भरणा केल्याचे नस्तीवरून दिसून येते. भरणा करण्यात आलेले रु. 234074/- कंत्राटदाराकडून विलंब आकारासह वसूल करून मनपा फंडात जमा करण्यात आले नसल्यामुळे मनपा निधीची हानी झालेली आहे |

चंद्रपूर मनपा येथील सन 2016-17 व 2017-18 वर्षातील लेखापरीक्षणाच्या अनुषंगाने आयकर बाबतच्या नस्तीची तपासणी केली असता, आयकर अधिकारी (tds) वार्ड-2(3) चंद्रपूर यांचे पत्र क्र-ITO(tds) वार्ड -2(3)/cdp/Outstanding Demands / 2018-19 दिनांक 10/05/2018 अन्वये विलंब प्रदानावरील व्याज, आयकर विलंब आकार व सन 2014-15 ते 2015-16 वर्षातील व्याजापोटी असे एकूण रु. 594074/- भरणा करण्याबाबतची नोटीस मा. आयुक्त मनपा चंद्रपूर यांना बजावण्यात आलेली आहे. यावरील लेखापरीक्षणावरील अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1)बजावण्यात आलेल्या नोटीसा नुसार उक्त वर्षांत आयकराची कमी भरणा करण्यात आलेली रक्कम रु. 594074/- सबंधित कंत्राट दाराकडून वसूल करून भरणा करणे अपेक्षित होते. मात्र मनपाने 360000/- रक्कम सबंधित कंत्राटदाराकडून वसूल करून उर्वरित रक्कम रु. 234074/- मनपा फंडातून आयकर विभागास भरणा केल्याचे नस्तीवरून दिसून येते. मात्र भरणा करण्यात आलेले रु.234074/-कंत्राटदाराकडून विलंब आकारासह वसूल करून मनपा फंडात जमा केल्याचे कोणतेही दस्ताऐवज व अभिलेख नस्तीत दिसून येत नाही. याबाबत अर्धासमास पत्र क्र.123 दिनांक 03/02/2021 अन्वये खुलासा सादर करण्यास कळविले असता अद्यापही उक्त रक्कम मनपा निधीत जमा करण्यात आली नसल्याचे कळविण्यात आले. त्यामुळे मनपा निधीची हानी झालेली आहे.

2)आयकर विभागाने बजावलेल्या नोटीस चे अवलोकन केले असता सन 2015-16 या वर्षात

| | |
|---|---|
| आयकर उशिरा भरण्याबाबतची व्याजाची रक्कम | 249274/- |
| आयकर उशिरा भरण्याबाबतचा दंड रक्कम | 142800/- |
| सन 2014-15 ते 2015-16 वर्षातील दंडनीय व्याज | 39431/- |

असे एकूण रु. 431505/- दंडनीय रक्कम म्हणून आयकर विभागास भरणा करण्यात आल्याचे दिसते. उपरोक्त

बाबीचा विचार केला असता विभागातील आयकार बाबतची कामे विहित कालावधीत पूर्ण न केल्यामुळे मनपास दंडाबाबतच्या नोटीस प्रदान करण्यात आलेल्या आहेत. उक्त कामे विहित कालावधीत मनपाने पूर्ण केल्यास दंडापोटी मनपा निधीची होणारी हानी टळू शकते.

3) मनपातील सन 2016-17 व 2017-18 वर्षातील लेखापरीक्षणादरम्यान कार्यकंत्राटाच्या निवडक नस्त्या तपासल्या असता कंत्राट दाराच्या रक्कमेतून आयकर कपातीबाबत एकसूत्रता दिसून येत नाही. काही प्रकरणात 1% तर काही प्रकरणात 2% आयकर कपात करण्यात येत असल्याचे दिसते.

सदर अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र 123 ,दि. 03.02.2021 नुसार विभागास अनुपालन अभिप्राय सादर करण्यास कळविले होते. तथापि विभागाकडून समर्पक अनुपालन प्राप्त न झाल्यामुळे परिच्छेद नोंदविण्यात येत आहे.

DATSMBM7501 (Ref No : 72, Hmm No : 123)

## *38 शासन निर्णयानुसार कार्यकंत्राटाच्या करारनाम्यावर मुद्रांक शुल्क वसूल न करण्याच्या अनियमितेबाबत.*

**लेखा विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 125530.00/-

| |
|---|
| महाराष्ट्र महानगर पालिका अधिनियम कलम 73 अन्वये कार्य कंत्राटाकरीता करारनामा करणे अनिवार्य आहे. महारष्ट्र शासन राजपत्र असाधारण भमा -8/असक्र-47/महाराष्ट्र अँक्ट 2015 दिनांक 24/04/2015 मधील परिच्छेद क्रमांक 34 मध्ये सुधारणा अन्वये रु.10 लाखापर्यंत 500/- व रु.10 लाखाच्या वरील रक्कमेवर 0.1% दराने करारनामा मुद्रांक शुल्क भरणे गरजेचे आहे. सन 2016 -17 व 2017-18 या वर्षांत चंद्रपूर महानगरपालिकेने कार्यकंत्राटाच्या अनुषंगाने बऱ्याच निविदा प्रसिद्ध केलेल्या असून त्यानुषंगाने देण्यात आलेल्या कंत्राटामध्ये मुद्रांक शुल्काचा कमी भरणा केल्यामुळे शासन निधीची हानी झालेली आहे. |

महाराष्ट्र महानगर पालिका अधिनियम कलम 73 अन्वये कार्य कंत्राटाकरीता करारनामा करणे अनिवार्य आहे. महारष्ट्र शासन राजपत्र असाधारण भमा -8/असक्र-47/महाराष्ट्र अँक्ट 2015 दिनांक 24/04/2015 मधील

परिच्छेद क्रमांक 34 मध्ये सुधारणा अन्वये रु.10 लाखापर्यंत 500/- व रु.10 लाखाच्या वरील रक्कमेवर 0.1% दराने करारनामा मुद्रांक शुल्क भरणे गरजेचे आहे. चंद्रपूर मनपामार्फत सन 2016 -17 व 2017-18 या वर्षात देण्यात आलेल्या कार्यकंत्राटाच्या निवडक नस्त्याची तपासणी केली असता मुद्रांक शुल्काचा भरणा शासन निर्णयानुसार केला नसल्याने शासन महसुलाची हानी झालेली आहे. तरी दोन्ही वर्षातील उक्त प्रकरणाचा आढावा घेवून कमी मुद्रांक शुल्क भरणा केल्या प्रकरणी वासुलीबाबतची कार्यवाही करावी.

पडताळणी केलेल्या काही निवडक प्रकरणाचे विवरणपत्र.

| अ.क्र. | कंत्राट दाराचे नाव | प्रमाणक क्र. व दिनांक | प्रत्यक्ष वसूल मुद्रांक शुल्क | नियमानुसार येणारे मुद्रांक शुल्क | वसूलपात्र मुद्रांक शुल्क |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मे.महेश कन्स्ट्रकशन | 4 -11/05/16 | 100/- | 2044/- | 1944/- |
| 2 | मे.एस.वी,.एम. कन्स्ट्रकशन | 4 -02/11/16 | 200/- | 23487/- | 21487/- |
| 3 | मे.राम इन्फ्रास्टक्चर | 6 -17/05/16 | 100 | 26703 | 26603/- |
| 4 | ओम साई वेंकटेश्वरा कन्स्ट्रकशन | 8 -17/10/16 | 100 | 34428/ | 34328/- |
| 5 | श्री आर. सि पटेल | 14-31/03/17 | 100 | 41268/- | 41168/- |
| वसूलपात्र रक्कम | | | | | 125530/- |

सदर अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र 120 ,दि. 03.02.2021 नुसार विभागास अनुपालन/अभिप्राय सादर करण्यास कळविले होते. तथापि विभागाकडून समर्पक अनुपालन प्राप्त न झाल्यामुळे परिच्छेद नोंदविण्यात येत आहे.

DATSMBM7501 (Ref No : 74, Hmm No : 120)

## *39 विवाह नोंदणी शुल्क व शास्ती, विवाह मंडळ नोंदणी व नुतनीकरण तसेच प्रमाणपत्राची सत्यप्रत पुरवताना आकारलेले शुल्क याद्वारे प्राप्त रक्कम शासनाकडे जमा न केल्याबाबत*

**Vivah Nondani Vibhag**
**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**
**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :0030 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 362600.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 18950.00/-

महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी नियम,1999 मधील नियम क्र.12 नुसार निबंधकास मिळालेली सर्व शुल्कांची व शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात जमा करणे आवश्यक आहे. असे असतानाही चंद्रपूर महानगरपालिकेने सन 2016-17 आणि 2017-18 मध्ये आकारलेले विवाह नोंदणी शुल्क,विवाह मंडळ नोंदणी व नुतनीकरण शुल्क व सत्यप्रत पुरवताना आकारलेले शुल्क रुपये 18,950 शासकीय खात्यात जमा केलेली नाही

महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी नियम,1999 नुसार नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. का-१३/रवका/विवाह नोंदणी दिनांक 21/04/2008 अन्वये विवाह नोंदणी करण्याचे काम दिनांक 01 मे 2008 पासून नगरपालिका / महानगरपालिकेकडे हस्तांतरित झालेले आहे. यानुसार चंद्रपूर महानगरपालिका कार्यालयामार्फत महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी नियम,1999 मधील नियम क्र.3 नुसार विवाह मंडळ नोंदणी शुल्क रुपये 5000 व प्रमाणपत्राची सत्यप्रत पुरवताना प्रत्येकी 25 रुपये शुल्क आकारले जाते. तसेच विवाह नोंदणी शुल्क 50 रुपये, विवाहाच्या 90 दिवसानंतर पण 365 दिवसाच्या आत विवाहनोंदणी केल्यास 100 रुपये शास्ती तर विवाहाच्या 365 दिवसानंतर विवाहनोंदणी केल्यास 200 रुपये शास्ती असे दर आकारून विवाह नोंदणी करण्याची कार्यवाही करण्यात येते.

याअनुषंगाने महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी नियम,1999 मधील नियम क्र.12 नुसार निबंधकास मिळालेली सर्व शुल्कांची व शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात जमा करणे बंधनकारक आहे. असे असतानाही चंद्रपूर महानगरपालिकेने सं 2016-2017 आणि 2017-2018 मध्ये आकारलेले विवाह नोंदणी शुल्क, शास्ती, विवाह मंडळ नोंदणी व नुतनीकरण शुल्क तसेच प्रमाणपत्राची सत्यप्रत पुरवताना आकारलेले शुल्क याद्वारे प्राप्त रकमेपेक्षा कमी रक्कम शासकीय खात्यात जमा केलेली आहे.

| वित्तीय | एकूण वसूल | शासकीय | कमी जमा |
|---|---|---|---|

| वर्ष | झालेली रक्कम | खात्यात जमा केलेली रक्कम | केलेली रक्कम |
|---|---|---|---|
| 2016-17 | 1,49,925 | 1,42,250 | 7,775 |
| 2017-18 | 2,12,675 | 2,01,400 | 11,350 |
| एकूण | 3,62,600 | 3,43,650 | 18,950 |

वर दर्शविल्याप्रमाणे एकूण रु.18,950/- रुपये शासकीय खात्यात जमा केले नाहीत. सदर प्रकरणी अर्धसमासपत्र क्र.19 दिनांक 28/10/2020 मध्ये उपरोक्त विषयासंबंधी विचारणा केली असता त्याबाबत परिच्छेद अंतिम करेपर्यंत कोणतेही उत्तर प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

तरी उपरोक्त एकूण रक्कम रु.18,950/-शासनाकाडे जमा करण्याची उचित कार्यवाही करून अनुपालन सादर करावे.

DLFARKM9301 (Ref No : 15, Hmm No : 19)

## *40 मनपा चंद्रपूर हद्दीतील जाहिरातीच्या होर्डिंग वर जाहिरात व परवाना शुल्क कमी आकारण्याबद्दल*

**जाहिरात विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 1**

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 51097.00/-

चंद्रपूर शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र.20 दि.23/06/2016 व मा. आयुक्त यांच्या दरपत्रकानुसार महानगरपालिकेच्या हद्दीत असलेल्या स्थायी व अस्थायी जाहिरातीचे बोर्ड, होर्डिंग, फलक ई. वर कर आकारणी करताना सदर दरपत्रकामध्ये नमूद असलेल्या दरापेक्षा कमी आकारणी करून मनपाचे आर्थिक नुकसान केले आहेत.

महानगरपालिकेच्या हद्दीत असलेल्या स्थायी व अस्थायी जाहिरातीचे बोर्ड, होर्डिंग, फलक ई. वर कर आकारणी करून मनपाचे आर्थिक उत्पन्न वाढविणे आवश्यक आहे. चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर दिनांक

23/06/2016 ला झालेल्या सर्वसाधारण सभा ठराव क्र.20 अन्वये अस्थायी जाहिरात फलक(मंजूर जागेवर), स्थायी जाहिरात फलक(मंजूर जागेवर) व खासगी जागेकरिता जाहिरात फलकावर विहित दराने कराची आकारणी करावयाची आहेत. तसेच मा. आयुक्त यांनी मनपा सर्वसाधारण सभा दि. 23/06/2016 ठराव क्र. 20 नुसार जाहिरातीचे आकार व प्रकारानुसार जाहिरातीचे दरपत्रक ठरविले आहेत. परंतु जाहिरात बोर्डावर कराची आकारणी करताना अँडव्हरटायजींग एजन्सी कडून चंद्रपूर शहर महानगरपालिकाने सदर दरपत्रक मध्ये विहित केलेल्या दरापेक्षा जाहिरात व परवाना शुल्क कमी आकारल्याचे दिसून येत आहे.

| अ.क्र. | अँडव्हरटायजींग एजन्सी | आकाश चिन्ह | आकारलेले जाहिरात व परवाना शुल्क | चंशमनपा धोरणानुसार जाहिरात व परवाना शुल्क | कमी आकारलेले जाहिरात व परवाना शुल्क |
|---|---|---|---|---|---|
| 1 | एस.आर.अँडव्हरटायजींग | 18/12 | 10,200 | 25,200 | 15,000 |
| 2 | संदीप पब्लिसिटी | 11/4 | 20,270 | 30,400 | 10,130 |
| 3 | वा सी ए पब्लिसिटी | 28/1 | 5,120 | 23,120 | 18,000 |
| 4 | आर्या अँडव्हरटायजींग | 13/8 | 15,933 | 23,900 | 7,967 |
| एकूण | | | 51,523/- | 1,02,620/- | 51,097/- |

उपरोक्त बाबींसंदर्भात अर्धसमास पत्र क्रमांक 78 दिनांक 30/12/2020 नुसार अनुपालन सादर करण्यास कळविण्यात आले असता सदर अँडव्हरटायजींग एजन्सी ला जाहिरात लावण्याचा परवाना हा वित्तीय वर्षाच्या सुरुवारतीला प्राप्त न होता वर्षाच्या मध्यात वा काही महिन्यानंतर त्यांच्याकडून जाहिरात व परवाना कर आकारल्याचे कळविण्यात आले. परंतु चंद्रपूर शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र.20 दि.23/06/2016 व मा. आयुक्त यांच्या दरपत्रकामध्ये कुठेही महिन्यानुसार कर आकारणी करण्यासंदर्भात नमूद नाही. तसेच परवाना फी एकदाच आकाराची असल्यामुळे ती महिन्यानुसार विभागून वसूल न करता धोरणानुसार संपूर्ण आकारणे आवश्यक होते. करिता उक्त दर्शवलेली एकूण रक्कम रु.51,097/-संबंधित अँडव्हरटायजींग एजन्सी कडून वसूलपात्र करून मनपा निधीत जमा केल्याचे अनुपालन सादर करावे.

उपरोक्त अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 78 दिनांक 30/12/2020 नुसार अनुपालन सादर करण्यास कळविण्यात आले होते परंतु समाधानकारक अनुपालन प्राप्त न झाल्याने परिच्छेद घेण्यात येत आहे.

DLFIBBM9301 (Ref No : 49, Hmm No : 78)

## *41 चंद्रपूर मनपा मधील जन्म-मृत्यू विभागांतर्गत असलेल्या अंत्यविधी अनुदानासंबंधी आढळून आलेल्या अनियमितते बाबत.*

**Sanugrah Anudan Yojana**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 4000000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 118000.00/-

चंद्रपूर महानगरपालिका येथील सन 2016-17 व 2017-18 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण सुरु असून सदर लेखापरीक्षणात असे आढळून आले की दिनांक: 24/02/2015 ला झालेल्या विशेष सर्वसाधारण अर्थसंकल्पीय सभा ठराव क्र.121 अन्वये चंद्रपूर शहर महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांकरिता अंत्यविधीसाठी सानुग्रह अनुदान देण्याचे ठरले. सदर अनुदान संबंधी नियम व अटी नुसार असलेल्या लाभार्थ्यांच्या कागदपत्र व अर्जाची पडताळणी करूनच मंजूर करण्यात यावे, परंतु नियमाप्रमाणे कार्यवाही न करता अनुदानाची रक्कम प्रदान करण्यात आली आहे.

चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या दिनांक: 24/02/2015 ला झालेल्या विशेष सर्वसाधारण अर्थसंकल्पीय सभा ठराव क्र. 121 अन्वये चंद्रपूर शहर महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांकरिता अंत्यविधीसाठी सानुग्रह अनुदान देण्याचे ठरले आहे. सदर अनुदानासाठी मृतकाची पत्नी/पती,भाऊ/बहिण, आई/वडील, मुलगा/मुलगी हे सर्व पात्र लाभार्थी आहेत असे चंद्रपूर महानगरपालिकेच्या विशेष सर्वसाधारण अर्थसंकल्पीय सभा ठरावामध्ये घोषित करण्यात आले असून लाभार्थ्यांकडून खाली नमूद केलेल्या कागदपत्रांसोबत अर्ज प्राप्त झाल्यानंतरच अर्ज ग्राह्य समजण्यात येते.

आवश्यक कागदपत्रे :

1.मृत्यूचा दाखला

2.संबंधीत क्षेत्रातील मा.नगरसेवकाचा दाखला

3.मृत व्यक्तीचे निवडणूक ओळखपत्र किंवा आधार कार्ड

4.अंत्यविधी खर्चाचे बिल

5.अर्जदाराचे निवडणूक ओळखपत्र किंवा आधार कार्ड

6.रेशन कार्ड

सन 2016-17 व 2017-18 मधील अंत्यविधी अनुदाची प्रकरणे व प्रमाणके तपासली असता असे आढळून आले की अनुदान मंजूर करतानी नियमाप्रमाणे कार्यवाही न करता व अनुदान अर्जदारास/लाभार्थ्यास मिळाले का याची खात्री न करताच ते वाटप करण्यात आले आहे. चंद्रपूर मनपा सन 2016-17 व 2017-18 मधील एकूण अनुदान प्रकरणापैकी 250 प्रकरणे व प्रमाणके उपलब्ध झाली व त्यापैकी 55 प्रकरणे व प्रमाणकांमध्ये त्रुटी आढळून आल्या आहेत, म्हणजे 55*2000 = 1,10,000 रुपयांचे अनुदान वाटप प्रकरणात त्रुटी असतानाही अनुदान वाटप करुन त्यामध्ये अनियमितता झाल्याचे दिसून येते किंवा लाभार्थी अनुदानापासून वंचित राहू शकतो. त्रुटी आढळलेल्या सर्व प्रकारणापैकी काही प्रकरणे उदाहरणादाखल खाली दर्शविले आहेत.

वित्तीय वर्ष 2016-17

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव | प्रमाणक क्र. | अनुदानाची रक्कम | आढळून आलेल्या त्रुटी |
|---|---|---|---|---|
| 1. | रवींद्र नामदेवराव वासेकर | 1586 | 2000 | अनुदान घेणाऱ्या व्यक्तीची स्वाक्षरी नाही, यामुळे अनुदान लाभार्थ्यास भेटले का याची खात्री होत नही. |
| 2. | मधुकर लक्ष्मीनारायण पोतदार | 2783 | 2000 | वरीलप्रमाणे |
| 3. | शुभम गोरखनाथ मोरे | 2795 | 2000 | वरीलप्रमाणे |
| 4. | विशाल एकनाथ बनकर | 2786 | 2000 | वरीलप्रमाणे |
| 5. | दिपक सदाशिव वानखेडे | 2791 | 2000 | वरीलप्रमाणे |
| 6. | अरुण किसन मेशराम | 1587 | 2000 | अनुदानासाठी अर्ज करणारा व्यक्ती व अनुदान घेणारा व्यक्ती यांची स्वाक्षरी जुळून येत नही यामुळे अनुदान अर्जदारास भेटले का याची खात्री होत नही. |
| 7. | चंदन प्रेमलाल आहेरवार | 1588 | 2000 | वरीलप्रमाणे |
| 8. | प्रतिभा गंगाधर | 1592 | 2000 | वरीलप्रमाणे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | कोटजवार | | | |
| 9. | कलम तुळशीराम बनकर | 1595 | 2000 | वरीलप्रमाणे |
| 10. | पुष्पा रामदास टेकाम | 1598 | 2000 | वरीलप्रमाणे |

वित्तीय वर्ष 2017-18

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव | प्रमाणक क्र. | अनुदानाची रक्कम | आढळून आलेल्या त्रुटी |
|---|---|---|---|---|
| 1. | गणेश सदाशिव पिंपरे | 1603 | 2000 | अनुदानासाठी अर्ज करणारा व्यक्ती व अनुदान घेणारा व्यक्ती यांची स्वाक्षरी जुळून येत नाही यामुळे अनुदान अर्जदारास भेटले का याची खात्री होत नाही. |
| 2. | राजकुमारी गायादिन केवटे | 1614 | 2000 | वरीलप्रमाणे |
| 3. | सचिन दिलीप काडूकाले | 3036 | 2000 | वरीलप्रमाणे |
| 4. | सुहास गजाननराव बाटवे | 3069 | 2000 | वरीलप्रमाणे |
| 5. | सुलताना रियाज शेख | 3077 | 2000 | वरीलप्रमाणे |
| 6. | वच्छला लहानुजी पाटील | 2862 | 2000 | वरीलप्रमाणे |
| 7. | सपना राजेंद्र नासरे | 2869 | 2000 | वरीलप्रमाणे |
| 8. | अरविंद विश्वनाथ इंगोले | 2875 | 2000 | वरीलप्रमाणे |
| 9. | अनंत तुकाराम सेट्टीवार | 2858 | 2000 | वरीलप्रमाणे |
| 10. | गुलाब किसन खोब्रागडे | 2865 | 2000 | वरीलप्रमाणे |

या उदाहरणांवरून अंत्यविधी अनुदान कार्यक्रमाचा मुख्य उद्देश साध्य होत असल्याचे स्पष्ट होत नाही. या संदर्भात अर्धसमास पत्र क्र.31 दि.05/11/2020 ला दिले असता त्यासंदर्भात कोणत्याही प्रकारचा खुलासा प्राप्त झाला नसल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

## *42 चंद्रपूर महानगरपालिका अंतर्गत विद्युत विभागाद्वारे आधुनिक इलेक्ट्रिकल्स यांना दिलेल्या विद्युत देखभाल दुरुस्तीच्या कामातील अनियमिततेबाबत.*

**विद्युत विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 3**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 187571.00/-

| |
|---|
| विद्युत देखभाल दुरुस्तीच्या कामात नव्याने लावलेल्या साहित्यांची तपासणी न करणे व ते बसविल्यानंतर निरीक्षण न करणे, योग्य दराने शासकीय कराची वसुली न करणे इत्यादी अनियमितता आढळून आलेल्या आहेत. |

मनपा चंद्रपूर मध्ये विद्युत विभागाशी संबंधित देखभाल दुरुस्ती इत्यादीवर मोठया प्रमाणावर खर्च होत असून त्यामध्ये वापरलेल्या साहित्यांचा मे. आधुनिक इलेक्ट्रिकल्स सर्विसेस, चंद्रपूर यांचेकडे सन 2016-17 या वर्षातील विद्युत पथदिवे देखभाल दुरुस्ती कंत्राट असून त्यांना वर्ष 2016-17 मध्ये एकूण रु.46,89,267/- प्रदान करण्यात आले.

यावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहे.

1. TDS (अ) आयकर अधिनियमाच्या कलम 194-C नुसार कंत्राटदारांच्या देयकांतून पुढीलपैकी लागू दरानुसार आयकराची कपात करणे आवश्यक आहे.

(अ) 1% ---- of payment made to individual or HCIF

(ब) 2% ---- In all other cases

सदर प्रकरणातील निविदा मे. आधुनिक इलेक्ट्रिकल्स सर्विसेस, चंद्रपूर या नावाने मंजूर असून त्याच नावाने रक्कमांचे प्रदान झालेले आहे.त्यामुळे वरील #39;ब#39; प्रमाणे आयकर कपातीचा दर 2% हा लागू ठरतो. परंतु 1% प्रमाणे कपात करण्यात आल्याने पुढीलप्रमाणे केंद्रशासनाच्या महसुलाची हानी झाली आहे.

आयकर कपात (वर्ष 2016-17)

| देयकाची एकूण रक्कम (रुपये) | प्रत्यक्ष 1% (रुपये) | आवश्यक 2% (रुपये) | हानी<br><br>(रुपये) |
|---|---|---|---|
| 46,89,267/- | 46893/- | 93785/- | 46893/- |
| एकूण | | | 46893/- |

ब) मनपा अंतर्गत इतरही विभागांचा विविध प्रकारचा कामाच्या अनुषंगाने कंत्राटदारांच्या मागण्याचे प्रदान करतांना सर्वसाधारणपणे 2% ऐवजी 1% दराने आयकर कपात केल्याचे दिसून आले. कंत्राटदारांच्या निविदा कपंनीच्या नावाने (other than individual and HCIF कलम 194-C) व रक्कमांचे प्रदानही कंपन्याचाच नावाने आहे. परंतु कंपनीचे मालक कंत्राटदार कंपनीच्या नावाचे पॅनकार्ड सादर न करता स्वतःचे नावाचे पॅनकार्ड सादर केल्याने 1% दराने आयकराची कपात करण्यात आली व शासनच्या महसुलाचे नुकसान झाले.

2) नवीन साहित्याची चाचणी व निरीक्षण न होणे :- कंत्राटदाराने विद्युत देखभालीचा कामासाठी वेळोवेळी नवीन साहित्य खरेदी करून यंत्रणेमध्ये बसविल्याचे अभिलेख्या वरून दिसते. तथापी ते साहित्य बसवितांना मनपाच्या तांत्रिक अधिकाऱ्यांकडून प्रत्यक्ष निरीक्षण व साहित्याची चाचणी झाल्याचे दिसत नाही. त्यामुळे देखभाल दुरुस्तीच्या नियमित देयकांत वेळोवेळी लावलेल्या नवीन साहित्यांच्या खरेदीच्या मागणी मोघम असल्याची व त्रुटीपुर्ण असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

3) मूल्य वर्धित कराची कमी दराने कपात करणे :- विक्रीकर आयुक्त महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र. Vat-1505/CR.123/Taxation-1 दिनांक 04/04/2012 पासून कार्यकंत्राट कराच्या दरात सुधारणा झाली आहे. त्याअन्वये महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम-2 अंतर्गत नोंदणीकृत कंत्राटदाराकडून प्रदान रक्कमेचा 2% व अनोंदणीकृत कंत्राटदारांकडून 5% कर कपात करणे आवश्यक आहे.

निविदा प्रपत्रासोबत सदर कंत्राटदाराचे दिनांक 01/04/2006 चे vat प्रमाणपत्र उपलब्ध आहे. परंतु निविदा सादर केल्याच्या दिनांकास वैध आहे किंवा कसे याचा बोध होत नाही. तसेच त्यासंबाधीचे त्यांचे वार्षिक रिटर्न नस्तीत उपलब्ध नाही. तरी उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे कार्य कंत्राट 3% करकपातीचे कमी भरलेले रक्कम रुपये 1,40,678/- असल्यामुळे त्या रक्कमेचा भरणा करून अनुपालन सादर करावे.

| वर्ष | देयकाची एकूण रक्कम (रुपये) | कमी वसुली रक्कम रुपये (3%) |
|---|---|---|
| 2016-17 | 46,89,287/- | 1,40,678/- |

तरी अर्धसमास पत्र क्र.23, दिनांक 03/11/2020 नुसार विहित मुदतीत खुलासा सादर न केल्यामुळे आक्षेप नोंदविण्यात येत असुन सदर बाबींची उचित शहानिशा करून आवश्यक कार्यवाहीसह अनुपालन सादर करावे.

## *43 चंद्रपूर शहरातील स्वयंचलित वाहतूक नियंत्रक देखभाल व दुरुस्ती तसेच इंदिरा गांधी चौक व बंगाली कॅम्प चौक येथील स्वयंचलित वाहतूक नियंत्रक नुतनीकरणाचे कामात अनियमिततावाबत.*

**ELECTRIC DEPARTMENT**
**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**
**अनियमितता संख्या : 4**

*महानगरपालिका स्व- निधी*
*अनियमितता कलम : 9ब*
गुंतलेली रक्कम रु. 859459.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 859459.00/-

महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-3/उद्योग-4, दिनांक 1 डिसेंबर 2016 मधील परिच्छेद क्र.4.1 नुसार रु.3,00,000/- च्या वरील कामाकरिता ई निविदा प्रक्रिया करणे आवश्यक आहे. परंतु चंद्रपूर शहरातील स्वयंचलित वाहतूक नियंत्रक देखभाल व दुरुस्ती तसेच इंदिरा गांधी चौक व बंगाली कॅम्प चौक येथील स्वयंचलित वाहतूक नियंत्रक नुतनीकरणाच्या कामाचे स्वरूप एकाच असताना त्याचे तीन तुकड्यात विभागणी करून ई निविदा प्रक्रिया राबविण्यात आली नाही. शहर अभियंता यांनी तयार केलेले अंदाजपत्रकीय नमूद वस्तुनिहाय दर कोणत्या दरपत्रकाद्वारे तयार केले याची शहानिशा करता आली नाही. काम सुरु व्हायच्या अगोदरचे फोटो व स्वाक्षरी तसेच काम सुरु असतानाचे फोटो व स्वाक्षरी नस्तीत उपलब्ध नाही.

| | |
|---|---|
| कामाचे नाव | 1)चंद्रपूर शहरातील स्वयंचलित वाहतूक नियंत्रक देखभाल व दुरुस्तीचे काम<br>2)इंदिरा गांधी चौक, चंद्रपूर येथील स्वयंचलित वाहतूक नियंत्रक नुतनीकरणाचे काम<br>3)बंगाली कॅम्प चौक, चंद्रपूर येथील स्वयंचलित वाहतूक नियंत्रक नुतनीकरणाचे काम |
| वर्तमानपत्र / साप्ताहिक | दै. सन्नाटा व सार्वजनिक सर्वश्रेष्ठ |
| प्रमाणक क्रमांक,दिनांक व रक्कम | 1)प्रमाणक क्र.1060 दिनांक: 18/08/17 प्रथम देयक रक्कम रु.1,05,239/- व प्रमाणक क्र.1474 दिनांक: 11/10/18 अंतिम देयक रक्कम रु.1,89,819/- |

| | |
|---|---|
| | 2)प्रमाणक क्र.1058 दिनांक: 18/08/17 रक्कम रु.2,73,104/-<br>3)प्रमाणक क्र.1059 दिनांक: 18/08/17<br>रक्कम रु.2,82,285/- |
| अंदाजपत्रकीय रक्कम | 1)चंद्रपूर शहरातील स्वयंचलित वाहतूक नियंत्रक देखभाल व दुरुस्तीचे कामाची रक्कम रू.2,90,400/-<br>2)इंदिरा गांधी चौक, चंद्रपूर येथील स्वयंचलित वाहतूक नियंत्रक नुतनीकरणाचे कामाची रक्कम रू.2,72,898/-<br>3)बंगाली कँम्प चौक, चंद्रपूर येथील स्वयंचलित वाहतूक नियंत्रक नुतनीकरणाचे कामाची रक्कम रू.2,96,161/- |
| कामाचा आदेश | 1)चंशमनपा/बांध/कार्या-1/2017/67 दि.14/06/2017<br>2)चंशमनपा/बांध/कार्या-1/2017/66 दि.14/06/2017<br>3)चंशमनपा/बांध/कार्या-1/2017/68 दि.14/06/2017 |
| कंत्राटदाराचे नाव | मे.अश्लेषा कंट्रोल्स, पुणे |
| कामाची मुदत | 1)12 महिना<br>2)1 महिना<br>3)1 महिना |
| मोजमाप पुस्तक क्रमांक | 109 व 62 |
| काम पूर्णत्वाचा दिनांक | 1)नस्त्तीत नमूद नाही.<br>2)07/07/2017<br>3)12/07/2017 |
| प्रशासकीय मान्यता | 1)चंशमनपा/बांध/कार्या-1/2017/59 दि.06/06/2017<br>2)चंशमनपा/बांध/कार्या-1/2017/61 दि.06/06/2017 |

| | |
|---|---|
| | 3)चंशमनपा/बांध/कार्या-1/2017/60 दि.06/06/2017 |
| तांत्रिक मान्यता | 1)मान्यता क्र. 05 दि.17/05/2017<br>2)मान्यता क्र. 03 दि.17/05/2017<br>3)मान्यता क्र. 04 दि.17/05/2017 |

यावर खालीलप्रमाणे अभिप्राय देत आहे.

1) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-3/उद्योग-4, दिनांक 1 डिसेंबर 2016 मधील परिच्छेद क्र.4.1 नुसार रु.3,00,000/- च्या वरील कामाकरिता ई निविदा प्रक्रिया करणे आवश्यक आहे. तसेच उपरोक्त सर्व कामे मे.अश्लेषा कंट्रोल्स, पुणे या एकाच कंत्राटदारास देण्यात आली परंतु एकूण अंदाजपत्रकीय रक्कम रू.8,59,459/- च्या कामाचे रू.2,90,400/- ,रू.2,72,898/- व रू.2,96,161/- अश्या तीन तुकड्यात नियमबाह्यपणे विभागणी करण्यात आली व उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे ई-निविदा प्रक्रिया राबविण्याबाबत कार्यवाही करण्यात आली नाही. सदर बाबतीत अर्धसमास पत्र क्र.131, दि.09/02/2021 खुलासा मागितला असता उपरोक्त काम वेगवेगळे स्थळावरील असून क्र.1 चे कार्य वर्षभरासाठी देखभाल व दुरुस्तीचे असून उर्वरित कार्य ही नुतनीकरणाचे कामाचे आहेत असे अनुपालन सादर करण्यात आले. परंतु उपरोक्त तिन्ही कामाचे स्वरूप एकाच प्रकारचे असल्यामुळे सदर बाबतीत शासन निर्णयाप्रमाणे ई-निविदा प्रक्रिया न राबविण्याची अनियमितता झाली असून त्यामुळे मनपा चंद्रपूरला स्पर्धात्मक दराच्या लाभापासून वंचित राहावे लागले.

2) काम सुरु व्हायच्या अगोदरचे फोटो व स्वाक्षरी तसेच काम सुरु असतानाचे फोटो व स्वाक्षरी नस्तीत उपलब्ध नसल्यामुळे सदर खर्च उक्त कामावरच केल्याची पडताळणी करता येत नाही.

3)महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम 10 क नुसार महानगरपालिकेने त्यांच्या वतीने केलेल्या कोणत्याही करारात पालिका सदस्याचा किंवा भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सहभाग नसलेले प्रमाणपत्र नस्तीत आढळून आले नाही.

4)शहर अभियंता यांनी तयार केलेले अंदाजपत्रकीय नमूद वस्तुनिहाय दर कोणत्या दरपत्रकाद्वारे तसेच त्यातील कोणत्या पुष्ठांकावरून घेण्यात आले आहेत याबाबत माहिती सादर करण्याबाबत सांगितले असता सदर कामाचे दरपत्रक उपलब्ध नसल्यामुळे आयटम रेट नुसार स्पर्धात्मक दर बोलावून सर्वात कमीचे दर सादर करणाऱ्या निविदा सादर कर्त्याला काम देण्यात आल्याचे अनुपालन सादर करण्यात आले परंतु नस्तीमध्ये शहर अभियंता यांनी ठरवलेल्या आयटम रेटच्या दरपत्रकानुसार निविदाधारकांनी निविदा सादर केल्या आहेत. तसेच नस्तीमध्ये निविदाधाराकांनी बाबनिहाय सादर केलेले दरपत्रक आढळून आले नाही. करिता उक्त कामाचे बाबनिहाय दर योग्यरीत्या तयार केले किंवा नाही याची शहानिशा करता येत नाही. करिता सदर

कामावर झालेला संपूर्ण खर्च रु. 859459/-आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

उपरोक्त अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 131 दिनांक 09/02/2021 नुसार अनुपालन सादर करण्यास कळविण्यात आले होते परंतु समाधानकारक अनुपालन प्राप्त न झाल्याने परिच्छेद घेण्यात येत आहे.

DLFIBBM9301 (Ref No : 46, Hmm No : 131)

## *44 कामगार झोपडपट्टी भागात राजेश मेश्राम ते राजू बनकर,श्री अलोणे ते हंसराज खोब्रागडे ते केशवराव चवरे यांच्या घरापर्यंतच्या कांक्रीट रस्त्यातील बांधकामातील अनियमिततेबाबत.*

**बांधकाम विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**
**अनियमितता संख्या : 15**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी व शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 4861180.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 34529.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 345214.00/-

महाराष्ट्र महानगरपालीका अधिनियम कलम 470 अन्वये निविदा जास्त खपाच्या वर्तमानपत्रात प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. तथापि उक्त प्रकरणी 55 विकासकामाचा समावेश असणाऱ्या एकूण रु.15,67,62,366/- रुपये किमतीच्या निवेदेची जाहिरात देशान्नती,खालसा संदेश, बुलंद आवाज या वर्तमानपत्रात दिल्यामुळे निविदेस व्यापक प्रसिद्धी प्राप्त झाली नसून अल्प प्रतिसाद मिळालेला आहे. त्यामुळे महापालिकेस स्पर्धात्मक दराचा लाभ मिळालेला नाही. मनापकडे तांत्रिक मनुष्यबळ मुबलक स्वरुपात उपलब्ध असतांना प्रयावेक्षण त्रयस्त संस्थेकडून करून त्यावर रु. 35429 खर्च करण्यात आला आहे सदर रक्कम हि अक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे. त्रयस्त तांत्रिक लेखापरीक्षणातील अहवालात उणीवा निदर्शनास दिसूनही कामात दुरस्ती न करता कामाची रकम प्रदान करण्यात आली आहे. अंदाजपत्रकात नमूद बाबी व दर्जा नुसार काम होत असल्याची खात्री कनिष्ठ अभियंता यांनी केलेली नाही. कंत्राटदाराने 12 महिने विलंबाने काम केले असूनही त्यावर दंडात्मक कार्यवाही करण्यात आलेली नाही

| | |
|---|---|
| कामाचे नाव | कामगार झोपडपट्टी भागात राजेश मेश्राम ते राजू बनकर,श्री अलोणे ते हंसराज खोब्रागडे ते केशवराव चवरे यांच्या घरापर्यंतच्या कांक्रीट रस्ता विकसित |

| | |
|---|---|
| | करण्याचे काम |
| प्रमाणक क्रमांक दिनांक व देयकाची रक्कम | प्रमाणक क्र.53 दिनांक:28/07/16 रु.2100000/- (प्रथम चालू देयक) प्रमाणक क्र.84दिनांक:05/10/16 रु.534493/- (प्रथम उर्वरित देयक), प्रमाणक क्र.63 दिनांक: 13/03/18 रु.2226867/- (दुसरे अंतिम देयक) |
| अंदाजपत्रकीय तरतुद | 50,06,200/- |
| कामाचा आदेश | जा.क्र.चंशमनपा/बांध/झोन क्र-3/2016/251 दिनांक:24/02/2016 |
| कंत्राटदाराचे नाव | श्री रमेश चहारे चंद्रपूर. |
| कामाची मुदत | 9 महिने |
| मोजमाप पुस्तक क्रमांक | क्र.146 |
| काम पूर्णत्वाचा दिनांक | 13/03/2018 |
| प्रशाकीय मान्यता | जिल्हाधिकारी चंद्रपूर यांचे पत्र जा.क्र.3734 दिनांक:08/09/2015 |
| तांत्रिक मान्यता | क्र.34 दिनांक 27/05/2015 |

कामातील अनियमितता खालीलप्रमाणे आहेत :-

1) महाराष्ट्र महानगरपालीका अधिनियम कलम 470 अन्वये निविदा जास्त खपाच्या वर्तमानपत्रात प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. तथापि उक्त प्रकरणी 55 विकासकामाचा समावेश असणाऱ्या एकूण रु.15,67,62,366/- रुपये किमतीच्या निवेदेची जाहिरात देशान्नती,खालसा संदेश, बुलंद आवाज या वर्तमानपत्रात दिल्यामुळे निविदेस व्यापक प्रसिद्धी प्राप्त झाली नसून अल्प प्रतिसाद मिळालेला आहे. त्यामुळे महापालिकेस स्पर्धात्मक दराचा लाभ मिळालेला नाही.

2)उक्त कामाचे त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण राजीव गांधी अभियांत्रिक महविद्यालय यांनी केलेले आहे.त्यांनी दिनांक 18/10/2016 रोजी दिलेल्या अहवालात खालील नमूद उणीवा निदर्शनास आणून दिलेल्या आहेत.

01) At some place cross drainages are urgently required to be provided as water is flowing across the road.
02) The work of providing and fixing 60mm thick factory made hydraulically press mechanically vibrated and compact precast inter locking cement concrete paving block in M40 Grade was found incomplete and improper.
03) The slope of road not maintained properly.

04) The top layer of road at many places was found damaged, सदर अनियमिततेच्या अनुषंगाने दुरुस्ती करण्यात अल्याबाबाताचे पुरावे नस्तीत नाही.

3)सदर कामाची दुरुस्ती झाली असल्यास त्याचे पुन: तांत्रिक लेखापरीक्षण करून घेणे गरजेचे असतांना असे लेखापरीक्षण न करता सबंधित कंत्राटदारास अंतिम देयकाचे प्रदान कोणत्या आधारे करण्यात आले याबाबत विहीत अभिलेख्यासह खुलासा सादर करावा.

4)त्रयस्थ तांत्रिक लेखापारीक्षण अहवालात item no-1 चा वापर केला नसतानाही 1.73 घनमीटरचे रु. 214.35 चे प्रदान देयकात करण्यात आले आहे.

5) मुकेश इन्फ्रास्टक्चर यांची नियुक्ती सदर कामाच्या पर्यवेक्षणासाठी करण्यात आली असून त्यांनी दिनांक 05/07/2016 रोजी प्रगतीदर्शक अहवालात काम समाधानकारक असल्याचे नमूद केले आहे.मात्र दिनांक 18/10/16 च्या त्रयस्थ तांत्रिक लेखापारीक्षण अहवालात रस्त्याच्या कामाची गुणवत्ता हि दोषपूर्ण असल्याचे कळविण्यात आले. दोन्ही अहवालात विसंगती आढळून येत असून अंदाजपत्रकात नमूद पी.डब्लू.डी. स्पेसिफीकेशन नुसार प्रत्यक्ष कामे होत असल्याची खात्री कनिष्ठ अभियंता यांनी करणे गरजेचे आहे. मात्र तशी खातरजमा करण्यात येत नसल्याचे सदर प्रकरणात दिसून येत आहे.

6) कारारनाम्यातील अट क्र. 16 अन्वये कामात निष्काळजीपणा/फसवणूक करीत असल्यास किंवा महानगर पालिकेच्या आदेशाचे पालन योग्य प्रकारे न केल्यास महानगरपालिकेने कंत्राट रद्द करून कंत्राट दुसऱ्या कंत्राटदारास दिल्यास महानगरपालिकेस होणारे नुकसान भरपाई फसवणूक करणारा कंत्राटदार करेल अशी तरतूद आहे. सदर प्रकरणात याबाबत कुटली कार्यवाही करण्यात आली याबाबत खुलसा करावा.

7)सदर कामाची मुदत 9 महिने असतांना अंतिम बिलाचे प्रदान हे दिनांक 13/03/18 ला करण्यात आले. त्यामुळे जवळपास 12 महिने विलंबाने काम पूर्ण करण्यात आले. निविदेतील अट क्र. 8 नुसार पहिल्या एक महिन्यासाठी 500/- व पुढील विलंब महिन्यासाठी 1000/- प्रती दिवस दंड आकरण्याची तरतूद असतांना कंत्राट दारास कोणताही दंड आकारण्यात आलेला नाही. त्यामुळे सबंधित कंत्राटदाराकडून बारा महिन्यासाठी रुपये 3,45,000/- दंड वसूल करून मनपा निधीत जमा करावे व तसे अनुपालन सादर करावे.

8)निविदेच्या अटी शर्ती संचिकेत नाहीत. तसेच वृत्तपत्राच्या निविदेच्या अटीशर्तीत कंत्राटदाराची आर्थिक परिस्थिती, कामाचा अनुभव, त्याच्याकडील उपलब्ध मनुष्यबळ, मशिनरी, इत्यादी महत्वपूर्ण बाबींचा समावेश केला नाही.

9)महानगरपालिकेकडे उपयुक्त तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध असतांना उक्त कामाच्या पर्यवेक्षणासाठी मनपाने मुकेश इन्फ्रास्टक्चर नियुक्ती करून रु.35429/- खर्च करण्यात आले याबाबत विभागाने खुलासा करावा तोपर्यंत सदर खर्च अक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

10)निविदा छाननी समितीत विभाग प्रमुखांचा समावेश असणे आवश्यक आहे.त्यात लेखा विषयक अधिकारी यांचा समावेश असणे आवश्यक आहे. अशी समिती गठीत करून निविदा छाननी तक्ता करून,निविदा समितीचे स्वयंस्पष्ट अभिप्राय संचिकेत घेण्यात आलेले नाहीत.

11)महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 10 (फ) नुसार महापालिकेबरोबर किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही करारात पालिका सदस्याचा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही भाग किंवा हितसबंध नाही अश्या आशयाचे तपशीलवार प्रमाणपत्र निविदाधारका कडून घेण्यात आल्याचे नास्तीत दिसत नाही.

12)मा.जिल्हाधिकारी यांच्या प्रशासकीय आदेशानुसार प्रस्तावित रस्ते हे विकास नियंत्रण नियमावलीशी .सुसंगत आहेत याची खात्री मनपाने करणे आवश्यक होते त्यासाठी नगररचना विभागाचे अभिप्राय घेणे क्रमप्राप्त असताना नगररचना विभागाचे अभिप्राय घेण्यात आलेले नाही.

13)विवीध गौण खनिज जसे रेती, मुरूम यासाठी लीड चार्जेस काढण्यासाठी कामाचे ठिकाण ते खदाणीचे अंतर दर्शवणारे कार्यकारी अभियंता यांचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्याचे प्रमाणपत्र न घेता लीड चार्जेस कश्याच्या आधारावर काढले याचा खुलासा करावा.

14)निविदेच्या अटीशर्तीनुसार कंत्राटदाराचा EPF नोंदणी बंधनकारक असून त्यशिवाय देयक अदा केले जाणार नाही अशी अट आहे. तथापि EPF नोंदणी प्रमाणपत्राशिवाय देयक अदा केल्याचे दिसते याबाबत खुलासा करावा.

15)महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता-2011 चे नियम 182 नुसार नमुना नंबर 139 मध्ये कामाची नोंद घेणे आवश्यक आहे. विभागाने विहित नमुन्यात नोंदवही ठेवून त्यात नोंद घेतल्याचे आढळले नाही.

देयकातील वसूलपात्र रकमा खालीलप्रमाणे आहेत.

| अनुक्रमांक | बाब | रक्कम |
|---|---|---|
| 1 | अतिरिक्त प्रदान | 214/- |
| 2 | विलंब आकार | 345000/- |
| एकूण | | 345214/- |

सदर अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र 77 ,दि. 30.12.2020 नुसार विभागास अनुपालन अभिप्राय सादर करण्यास कळविले होते. तथापि विभागाकडून समर्पक अनुपालन / अभिप्राय प्राप्त न झाल्यामुळे परिच्छेद नोंदविण्यात येत आहे.

## *45 मूळ प्रकलनात अनावश्यक बाबीचा अंतर्भाव करून त्यावरील बचतीमधून अन्य बाबीच्या परिमाणात अनावश्यक वाढ दर्शविने तसेच कांक्रीट करणाच्या कामातील एका टप्प्याचे कार्यान्वयन न केल्याच्या शक्यतेबाबत.*

**बांधकाम विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**
**अनियमितता संख्या : 7**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 2514440.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 786717.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 496000.00/-

| |
|---|
| करारनाम्यातील सर्वसाधारण अटीनुसार साहित्याच्या बदलत्या ग्रेडिंगनुसार वेळोवेळी प्रत्येक कांक्रीट करणाचे विशिष्ठ आकाराचे नमुने शासकीय प्रयोग शाळेकडे पाठविणे बंधनकारक आहे. मात्र मनपाने फक्त बाब क्र. 6 , M20 या कांक्रीट करणाचे नमुने चंद्रपूर अभियांत्रिक महाविद्यालयाकडे दिनांक 22/09/14 व 25/09/14 तपासणीस पाठविल्याचे नस्तीवरून निदर्शनास येते. मात्र बाब क्र. 5, M10 चे नमुने तपासणीस पाठविण्यात आलेले नाहीत. त्यामुळे बाब क्र. 5 ,M10 व बाब क्र. 6 , M20 यापैकी एकाच स्तराचे काम पूर्ण करण्यात आल्याचे निदर्शनास येत आहे. वाढीव मुदतवाढ न घेता त्यापुढेही सुमारे 17 महिन्यानंतर काम पूर्ण झाल्याचे बांधकाम सल्लागार यांचे पत्र दिनांक 22/03/16 तसेच शहर अभियंता यांच्या दिनांक 23/03/2016 च्या प्रमाणपत्रावरून दिसून येते. या प्रकरणी मुदतीनंतरच्या कालावधीतील विलंबापोटी कारानाम्यातील अटीनुसार दंड वसूल पात्र आहे. अंदाज प्राकलनात Extra Item ची तरतूद केली नसतानाही कंत्राट दारास रु. 19237 चे अतिरिक्त प्रदान करण्यात आलेले आहे. |

कामाचे नाव :- वडगाव प्रभागात नागपूर रोड ते फ्लाँय ओव्हर ब्रिज ते डॉ.बुक्कावार यांचे घरापर्यंत कांक्रीट रोडचे बांधकाम.

कंत्राट दाराचे नाव :- मे. महेश कन्स्ट्रकशन चंद्रपूर.

प्रमाणक क्रमांक :- 4 दिनांक 11/05/2016.

अंदाजपत्रकीय रक्कम :- 2514440/-

मोजमाप पुस्तक - 62

कामातील अनियमितता खालीलप्रमाणे आहेत :-

01)करारनाम्यातील सर्वसाधारण अटीनुसार साहित्याच्या बदलत्या ग्रेडिंगनुसार वेळोवेळी प्रत्येक कांक्रीटीकरणाचे विशिष्ठ आकाराचे नमुने शासकीय प्रयोग शाळेकडे पाठविणे बंधनकारक आहे. वरील कामाच्या कांक्रीट करणाच्या महत्वाच्या दोन बाबीचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | बाब | प्राकलीत परिमाण | कार्यान्वित परिमाण | टक्के | दर | जादा कामाचे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| 5 | Providing laying in situ M10/1:3:6 | 96.75 | 206.74 | 114% | 3712.20 | 408304 |
| 6 | Providing and casting in situ M20 | 143.13 | 249.82 | 75% | 4743.35 | 506068 |

वरील दोन्ही नमुन्याची प्रयोग शाळेत तपासणी होणे आवश्यक असतांना मनपाने फक्त बाब क्र. 6 , M20 या कांक्रीट करणाचे नमुने चंद्रपूर अभियांत्रिक महाविद्यालयाकडे दिनांक 22/09/14 व 25/09/14 तपासणीस पाठविल्याचे नस्तीवरून निदर्शनास येते. मात्र बाब क्र. 5 ,M10 चे नमुने तपासणीस पाठविण्यात आलेले नाहीत.बाब क्र. 5 ,M10 व बाब क्र. 6 , M20 यापैकी एकाच स्तराचे काम करण्यात आल्याचे दिसते. प्रयोग शाळेत पाठविलेल्या नमुन्याशी सांगड घातल्यास मोजमाप विवरणपत्रात दर्शविलेले 206.74 क्यू.मी.(3712.20) चे रु.767480/- मूल्याच्या कामाचे कार्यान्वयन न झाल्याचे निदर्शनास येत आहे.

2)दिनांक 28/04/2014 च्या आदेशानुसार 4 महिन्याच्या कालावधीत किती काम झाले हे स्पष्ट होत नाही.वाढीव मुदतवाढ न घेता त्यापुढेही सुमारे 17 महिन्यानंतर काम पूर्ण झाल्याचे बांधकाम सल्लागार यांचे पत्र दिनांक 22/03/16 तसेच शहर अभियंता यांच्या दिनांक 23/03/16 च्या प्रमाणपत्रावरून दिसून येते. या प्रकरणी मुदतीनंतरच्या कालावधीतील विलंबापोटी कारानाम्यातील अटीनुसार दंड वसूल पात्र आहे.

| | |
|---|---|
| एक महिना :- 500/- प्रती दिवस | एक महिना = 15000/- |
| त्यापुढे बांधकाम सल्लागार व शहर अभियंता यांच्या काम पूर्ण प्रमाणपत्रा नुसार | 16 महिने = 480000/- |
| दिनांक 23/03/16 पर्यंत | वसूलपात्र रक्कम = 496000/- |

3)अंदाज प्राकलनात Extra Item ची तरतूद केली नसतानाही कंत्राट दारास रु. 19237 चे अतिरिक्त प्रदान

करण्यात आलेले आहे.

4)निविदेच्या अटी शर्ती संचिकेत नाहीत. तसेच वृत्तपत्राच्या निविदेच्या अटीशर्तीत कंत्राटदाराची आर्थिक परिस्थिती, कामाचा अनुभव, त्याच्याकडील उपलब्ध मनुष्यबळ, मशिनरी, इत्यादी महत्वपूर्ण बाबींचा समावेश केला नाही.

5)मा.जिल्हाधिकारी यांच्या प्रशासकीय आदेशानुसार प्रस्तावित रस्ते हे विकास नियंत्रण नियमावलीशी सुसंगत आहे याची खात्री मनपाने करणे आवश्यक होते त्यासाठी नगररचना विभागाचे अभिप्राय घेणे क्रमप्राप्त असताना नगररचना विभागाचे अभिप्राय घेण्यात आलेले नाही.

6)निविदा छाननी समितीत विभाग प्रमुखांचा समावेश असणे आवश्यक आहे.यात लेखा विषयक अधिकारी यांचा समावेश असणे आवश्यक आहे. अशी समिती गठीत करून निविदा छाननी तक्ता करून, निविदा समितीचे स्वयंस्पष्ट अभिप्राय संचिकेत नाहीत.

7)निविदेच्या अटीशर्तीनुसार कंत्राटदाराचा EPF नोंदणी बंधनकारक असून त्यशिवाय देयक अदा केले जाणार नाही अशी अट असतांना EPF नोंदणी प्रमाणपत्राशिवाय देयक अदा करण्यात आलेले आहेत.

सदर अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र 118 ,दि. 02.02.2021 नुसार विभागास अनुपालन अभिप्राय सादर करण्यास कळविले होते. तथापि विभागाकडून समर्पक अभिप्राय प्राप्त न झाल्यामुळे परिच्छेद नोंदविण्यात येत आहे.

DATSMBM7501 (Ref No : 53, Hmm No : 118)

## *46 महाराष्ट्र नगरोत्थान योजने अंतर्गत बाजार प्रभागात भालगट ते फुले मार्केट , शहा स्वीटमाट,मेहता, ते पोटदुखे राईस मिल पर्यंतच्या कांक्रीट रस्त्यातील कामामधील अनियमिततेबाबत.*

**बांधकाम विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**
**अनियमितता संख्या : 10**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व-निधी व शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 8480359.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 84684.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 75000.00/-

महाराष्ट्र महानगरपालीका अधिनियम कलम 470 अन्वये निविदा जास्त खपाच्या वर्तमानपत्रात प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र नगरोत्थान योजने अंतर्गत 05 विकासकामाचा समावेश असणाऱ्या एकूण रु.3,17,28,000/- रुपये किमतीच्या निवेदेची जाहिरात लोकसत्ता,चंद्रपूर समाचार या वर्तमानपत्रात दिल्यामुळे निविदेस व्यापक प्रसिद्धी प्राप्त झाली नसून अल्प प्रतिसाद मिळालेला आहे. त्यामुळे महापालिकेस स्पर्धात्मक दराचा लाभ मिळालेला नाही. मनपकडे तांत्रिक मनुष्यबळ मुबलक स्वरुपात उपलब्ध असतांना तांत्रिक पर्यवेक्षण त्रयस्त संस्थेकडून करून त्यावर रु. 84684 खर्च करण्यात आला आहे. सदर रक्कम हि अक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे. कंत्राटदाराने 3 महिने विलंबाने काम केले असूनही त्यावर दंडात्मक कार्यवाही करण्यात आलेली नाही. निविदेच्या अटीशर्तीनुसार कंत्राटदाराचा EPF नोंदणी बंधनकारक असून त्या शिवाय देयक अदा केले जाणार नाही अशी अट असतांनाही EPF नोंदणी प्रमाणपत्रा शिवाय देयक अदा करण्यात आले.

| | |
|---|---|
| कामाचे नाव | बाजार प्रभागात भालगट ते फुले मार्केट ते शहा स्वीटमाट ,मेहता,ते पोटदुखे राईस मिल पर्यंत कांक्रीट रस्ता विकसित कार्नायचे काम |
| प्रमाणक क्रमांक दिनांक व देयकाची रक्कम | प्रमाणक क्र.1 दिनांक:27/04/16 रु.1918042/- (प्रथम चालू देयक) , प्रमाणक क्र.22 दिनांक:17/06/16 रु.3449469/- (दुसरे चालू देयक), प्रमाणक क्र.73 दिनांक: 20/09/16 रु.2037753/- (तिसरे चालू देयक) प्रमाणक क्र.26दिनांक: 11/08/17 (चौथे अंतिम देयक) रक्कम रु. 1075095/- |
| अंदाजपकीय तरतुद | 77,76,150/- |
| कामाचा आदेश | जा.क्र.चंशमनपा/बांध/कार्या-2/2015-16/202 दिनांक:23/09/2015 |
| कंत्राटदाराचे नाव | श्री मनोज अशोक खत्री चंद्रपूर. |
| कामाची मुदत | 8 महिने |
| मोजमाप पुस्तक क्रमांक | क्र.98,143 |
| काम पूर्णत्वाचा दिनांक | 20/10/2016 |
| प्रशाकीय मान्यता | जिल्हाधिकारी चंद्रपूर यंचे पत्र जा.क्र.3033 दिनांक:24/03/2015 |
| तांत्रिक मान्यता | क्र.77 दिनांक 24/02/2015 |

कामातील अनियमितता खालीलप्रमाणे आहेत :-

1) महाराष्ट्र महानगरपालीका अधिनियम कलम 470 अन्वये निविदा जास्त खपाच्या वर्तमानपत्रात प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. तथापि उक्त प्रकरणी 05 विकासकामाचा समावेश असणाऱ्या एकूण रु.3,17,28,000/- रुपये किमतीच्या निवेदेची जाहिरात लोकसत्ता,चंद्रपूर समाचार या वर्तमानपत्रात दिल्यामुळे निविदेस व्यापक प्रसिद्धी प्राप्त झाली नसून अल्प प्रतिसाद मिळालेला आहे. त्यामुळे महापालिकेस स्पर्धात्मक दराचा लाभ मिळालेला नाही.

2) सदर कामाची मुदत 8 महिने असतांना अंतिम बिलाचे प्रदान हे दिनांक 20/09/16 ला करण्यात आले. त्यामुळे जवळपास 3 महिने विलंबाने काम पूर्ण करण्यात आले. निविदेतील अट क्र. 8 नुसार पहिल्या एक महिन्यासाठी 500/- व पुढील विलंब महिन्यासाठी 1000/- प्रती दिवस दंड आकरण्याची तरतूद असतांना कंत्राट दारास कोणताही दंड आकारण्यात आलेला नाही. त्यामुळे सबंधित कंत्राटदाराकडून तीन महिन्यासाठी रुपये 75,000/- दंड वसूल करून मनपा निधीत जमा करावे व तसे अनुपालन सादर करावे.

3) निविदेच्या अटी शर्ती संचिकेत नाहीत. तसेच वृत्तपत्राच्या निविदेच्या अटीशर्तीत कंत्राटदाराची आर्थिक परिस्थिती, कामाचा अनुभव, त्याच्याकडील उपलब्ध मनुष्यबळ, मशिनरी, इत्यादी महत्वपूर्ण बाबींचा समावेश केला नाही.

4) महानगरपालिकेकडे उपयुक्त तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध असतांना उक्त कामाच्या पर्यवेक्षणासाठी मनपाने मुकेश इन्फ्रास्टक्चर नियुक्ती करून रु.84684/- खर्च करण्यात आले याबाबत विभागाने खुलासा करावा तोपर्यंत सदर खर्च अक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

5) निविदा छानननी समितीत विभाग प्रमुखांचा समावेश असणे आवश्यक आहे.त्यात लेखा विषयक अधिकारी यांचा समावेश असणे आवश्यक आहे. अशी समिती गठीत करून निविदा छाननी तक्ता करून,निविदा समितीचे स्वयंस्पष्ट अभिप्राय संचिकेत घेण्यात आलेले नाहीत.

6) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 10 (फ) नुसार महापालिकेबरोबर किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही करारात पालिका सदस्याचा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही भाग किंवा हितसबंध नाही अश्या आशयाचे तपशीलवार प्रमाणपत्र निविदाधारका कडून घेण्यात आल्याचे नस्तीत दिसत नाही.

7) मा.जिल्हाधिकारी यांच्या प्रशासकीय आदेशानुसार प्रस्तावित रस्ते हे विकास नियंत्रण नियमावलीशी सुसंगत आहेत याची खात्री मनपाने करणे आवश्यक होते त्यासाठी नगररचना विभागाचे अभिप्राय घेणे क्रमप्राप्त असताना नगररचना विभागाचे अभिप्राय घेण्यात आलेले नाही.

8) विवीध गौण खनिज जसे रेती, मुरूम यासाठी लीड चार्जेस काढण्यासाठी कामाचे ठिकाण ते खदाणीचे अंतर दर्शवणारे कार्यकारी अभियंता यांचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी

अभियंत्याचे प्रमाणपत्र न घेता लीड चार्जेस कश्याच्या आधारावर काढले याचा खुलासा करावा.

9) निविदेच्या अटीशर्तीनुसार कंत्राटदाराचा EPF नोंदणी बंधनकारक असून त्यशिवाय देयक अदा केले जाणार नाही अशी अट आहे. तथापि EPF नोंदणी प्रमाणपत्राशिवाय देयक अदा केल्याचे दिसते याबाबत खुलासा करावा.

10) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता-2011 चे नियम 182 नुसार नमुना नंबर 139 मध्ये कामाची नोंद घेणे आवश्यक आहे. विभागाने विहित नमुन्यात नोंदवही ठेवून त्यात नोंद घेतल्याचे आढळले नाही.

सदर अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र 73 दि. 29.12.2020 नुसार विभागास अनुपालन अभिप्राय सादर करण्यास कळविले होते. तथापि विभागाकडून समर्पक अभिप्राय प्राप्त न झाल्यामुळे परिच्छेद नोंदविण्यात येत आहे.

DATSMBM7501 (Ref No : 58, Hmm No : 73)

## *47 हिंदुस्थान लालपेठ कॉलोनी प्रभागात विजय यादव ते इटलावार व संजय मिसलवार ते रामय्या जगन्नाथ रोहिदास या परिसरातील कांक्रीट रस्ता विकास कामातील अनियमिततेबाबत.*

**बांधकाम विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 9**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व-निधी व शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 5442333.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 67054.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 59294.00/-

हिंदुस्थान लालपेठ कॉलोनीतील प्रभागातील विजय यादव ते इटलवार व संजय मिसलवार ते रामय्या जगन्नाथ रोहिदास यांचे घरापर्यंत कॉक्रीट रस्ता विकास करण्याचे बांधकाम या नस्तीचे लेखापरिक्षण केले असता जाहिरात निविदेचे पत्र दैनिक महाविदर्भ, दैनिक लोकमत या वर्तमानपत्रात प्रसिध्द केल्याचे नमूद आहे. परंतु जाहिरात प्रसिध्द केल्याची वर्तमानपत्राची प्रत नस्तीस दिसून आली नाही. निविदेच्या अटी व शर्तीत कंत्राटदाराची आर्थिक परिस्थिती, कामाचा अनुभव व त्यांचेकडील उपलब्ध मनुष्यबळ, मशिनरी इत्यादी महत्वपूर्ण बाबीचा समावेश केलेला नाही. कामाच्या करारनाम्यात महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 नुसार देयकातून योग्य किमतीचे मुद्रांक न वापरल्याने रु. 4870/- ची वसुली शिल्लक आहे. तसेच देयकातून आयकर अधिनियम 1961 नियम 194 (क) नुसार 2% रक्कम कपात न केल्याने रु. 54,424/- कंत्राटदाराकडून

वसूल करण्यात आले नाही.

| अं. क्र. | कामाचे नाव | हिंदुस्थान लालपेठ कॉलोनी प्रभागातील विजय यादव ते इटलवार व संजय मिसलवार ते रामय्या जगन्नाथ रोहिदास या परिसरातीलकॉक्रीट रस्ता विकास करण्याचे काम. |
|---|---|---|
| 1 | प्रमाणक क्रमांक व दिनांक | 52/28-07-2016 व प्र.क्र. 179 दि.31/03/2017 |
| 2 | अंदाजपत्रकीय रक्कम | 55,69,920/- |
| 3 | कामाचा आदेश | चंशमनपा/बांध/कार्या.2/2015-16/201 दिनांक 23/09/2015 |
| 4 | कंत्राटदाराचे नाव | मे. भाग्यलक्ष्मी कन्स्ट्रक्शन, चंद्रपूर |
| 5 | कामाची मुदत | 7 महिने |
| 6 | मोजमाप पुस्तक दिनांक | 140/15/01/2016<br>142/15/01/2016 |
| 7 | काम पूर्णत्वाचा दिनांक | 31/03/2017 |
| 8 | प्रशासकीय मान्यता | मा. जिल्हाधिकारी चंद्रपूर याची मान्यता आदेश क्र.3100 दिनांक 31/03/2020 |
| 9 | तांत्रिक मान्यता | -- |

1. सदर कामाची निविदा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 470 नुसार निविदा जास्त खपाच्या वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक आहे. तथापि सदर प्रकरणी नस्तीमध्ये दैनिक लोकमत, दैनिक महाविदर्भ या वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यास सूचित करण्यात आले. परंतु प्रसिध्द केलेल्या वर्तमानपत्राची प्रत नस्तीस जोडलेली नाही.

2. निविदेच्या अटी शर्तीत कंत्राटदाराची आर्थिक परिस्थिती, कामाचा अनुभव, त्यांच्याकडील उपलब्ध मनुष्यबळ, मशिनरी इत्यादी महत्वपुर्ण बाबीचा समावेश केला नाही.

3. कामाची अंदाजीत किंमत रु.55,69,920/- असल्याने महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 व वेळोवेळी सुधारित शासन निर्णयान्वये रु.5070/- इतक्या किंमतीचे मुद्रांक करारनाम्यासाठी वापरणे आवश्यक होते. परंतु केवळ रु.200/- चे मुद्रांक वापरले असल्याने रु.4870/- इतके शुल्क ठेकेदाराकडून वसूल करून शासनखाती भरावे.

4. निविदा छाननी समितीतील विभाग प्रमुखाचा समावेश करणे आवश्यक आहे. त्यात लेखाविषयक अधिकारी अशा प्रकारची समिती गठीत करणे आवश्यक आहे. अशा प्रकारची समिती व समितीचे स्वयंस्पष्ट अभिप्राय संचिकेत नाही.

5. देयकामधून आयकर अधिनियम 1961 नियम 194(क) नुसार व्यक्तिगत किंवा अविभाजीत कुटुंबाव्यतिरिक्त इतरांकडून 2% प्रमाणे आयकर कापणे आवश्यक असतांना 1% आयकर कपात केली आहे. त्यानुसार उर्वरित 1% आयकर रक्कम रु.54424/- वसूल करणे आवश्यक आहेत.

6. सदर कामाचे पर्यवेक्षण करण्यासाठी मुकेश इन्फ्रास्ट्रक्चर नागपूर यांची नियुक्ती मनपाने केली आहे. महानगरपालिका आस्थापनेत तांत्रिक मनुष्यबळ असतांना पर्यवेक्षण त्रयस्त यंत्रणेकडून कसे करून घेतले याबाबत खुलासा करावा व पर्यवेक्षण त्रयस्त यंत्रणेकडून केल्याने झालेला खर्च रु.67054/- आक्षेपाधीन ठेवण्यात येते.

7. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 चे नियम 182 नुसार नमुना नंबर 139 मध्ये कामाची नोंद घेणे आवश्यक आहे. विभागाने विहित नमुन्यात नोंदवही ठेऊन त्यात नोंद घेतल्याचे आढळले नाही.

8. निविदेतील अटीमध्ये नमूद असल्याप्रमाणे कंत्राटदाराची EPF नोंदणी बंधनकारक असून त्याशिवाय देयक अदा केले जाणार नाही. अशी अट असतांना EPF नोंदणी प्रमाणपत्राशिवाय देयेके प्रदान केलेले आहेत.

9. बांधकाम नियम पुस्तकेनुसार कामाच्या पूर्वीचे व कामाच्या नंतरचे छायाचित्रे तपासून सक्षम प्राधिकाऱ्यांनी देयके पारीत करणे आवश्यक आहे. संचिकेत कामाच्या नंतरचे छायाचित्रे आहेत परंतु कामाच्या पुर्वीचे छायाचित्रे नाहीत.

देयकातील वसुलपात्र रकमा खालीलप्रमाणे आहेत.

| अं. क्र. | बाब | वसूलपात्र रक्कम (रुपये) |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| 1<br>2 | मुद्रांक शुल्क<br>2% आयकर नियम 194 क | 4870/-<br>54424/- |
| | एकूण | 59294/- |

उपरोक्त अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र.89 दि.11/01/2021 नुसार विभागास खुलासा सादर करण्यास कळविले परंतु संयुक्तिक खुलासा प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे. आक्षेपीत मुद्द्यावरील पूर्तता करून अनुपालन सादर करावे.

DATVVBM6301 (Ref No : 65, Hmm No : 89)

## *48 जटपुरा गेट ते दवा बाजार ते जुना वरोरा नाक्यापर्यंत रस्ता डांबरीकरणाच्या कामातील अनियमिततेबाबत.*

**बांधकाम विभाग (मुलभूत प्राथमिक सोई सुविधा विकास कार्यक्रम)**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 7**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व-निधी व शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 23406582.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 520949.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 521104.00/-

मुलभूत प्राथमिक सोई सुविधा विकास कार्यक्रमाअंतर्गत मनपा चंद्रपूर यांचे मार्फत जटपुरा गेट ते दवा बाजार ते जुना वरोरा नाक्यापर्यंत रस्ता डांबरीकरणाचे कामे करण्यात आली. सदर कामाचे कंत्राट श्री मे. रामा इन्फ्रास्टक्चर चंद्रपूर.यांना देण्यात आले. उक्त कामाचे त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण राजीव गांधी अभियांत्रिक महविद्यालय यांनी केलेले असून त्यांनी दिनांक 23/05/2015 रोजी दिलेल्या अहवालात कामातील बऱ्याच उणीवा निदर्शनास आणून दिलेल्या आहेत. मुकेश इन्फ्रास्टक्चर यांची नियुक्ती सदर कामाच्या पर्यवेक्षणासाठी करण्यात आली असून त्यांनी प्रथम धावत्या देयकाचा प्रगती अहवाल (दिनांक नमूद नाही) तसच दुसरे धावते देयकाचे प्रगती अहवालात दिनांक 22/07/2014 रोजी काम समाधानकारक असल्याचे नमूद केले आहे. मात्र दिनांक 23/05/15 च्या त्रयस्थ तांत्रिक लेखापारीक्षण अहवालात रस्त्याच्या कामाची गुणवत्ता हि दोषपूर्ण असल्याचे कळविण्यात आले. दोन्ही अहवालात विसंगती आढळून येत असून अंदाजपत्रकात नमूद पी.डब्लू.डी. स्पेसिफीकेशन नुसार प्रत्यक्ष कामे होत असल्याची खात्री कनिष्ठ अभियंता यांनी करणे गरजेचे आहे. मात्र तशी खातरजमा न करता तांत्रिक सल्लागाराच्या प्रमाणपत्राच्या आधारे कंत्राटदारास रकमेचे प्रदान करण्यात आले

आहे. तसेच कामाच्या प्रगती बाबत कोणतीही खातरजमा न करता तांत्रिक सल्लगार यांनी (Further certified that the above mentioned work has progressed as par specification specified in estimate and drawing measuermants of the work taken by me Parsonally and test result, other necessary testing checked found stisfactory. So recommended for Payment.) प्रगती अहवालात चुकीचे प्रमाणित करून प्रदानास मंजुरी दिली आहे.

| | |
|---|---|
| कामाचे नाव | जटपुरा गेट ते दवा बाजार ते जुना वरोरा नाक्यापर्यंत रस्ता डांबरीकरणाचे काम |
| प्रमाणक क्रमांक दिनांक व देयकाची रक्कम | प्रमाणक क्र.9 दिनांक:13/06/14 रु.6064201/- (प्रथम चालू देयक) प्रमाणक क्र.62 दिनांक:21/10/14 रु.2488690/- (दुसरे चालू देयक), प्रमाणक क्र.6 दिनांक: 17/05/16 रु.14853671/- (तिसरे व अंतिम देयक) |
| अंदाजपत्रकीय तरतुद | 2,67,03,500/- |
| कामाचा आदेश | जा.क्र.चंशमनपा/बांध/झोन क्र-3/2016/251 दिनांक:24/02/2016 |
| कंत्राटदाराचे नाव | श्री मे. रामा इन्फ्रास्टक्चर चंद्रपूर. |
| कामाची मुदत | 9 महिने |
| मोजमाप पुस्तक क्रमांक | क्र.125,127, |
| काम पूर्णत्वाचा दिनांक | 03/05/2016 |
| प्रशाकीय मान्यता | जिल्हाधिकारी चंद्रपूर यांचे पत्र जा.क्र. दिनांक:19/11/2013 |
| तांत्रिक मान्यता | क्र.242 दिनांक 08/08/2013 |

मुलभूत प्राथमिक सोई सुविधा विकास कार्यक्रमाअंतर्गत मनपा चंद्रपूर यांचे मार्फत जटपुरा गेट ते दवा बाजार ते

जुना वरोरा नाक्यापर्यंत रस्ता डांबरीकरणाचे कामे करण्यात आली. सदर कामाचे कंत्राट श्री मे. रामा इन्फ्रास्टक्चर चंद्रपूर यांना देण्यात आले. याबाबत लेखापरीक्षणाअंती अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1) सदर कामाचे त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण राजीव गांधी अभियांत्रिक महविद्यालय यांनी केलेले आहे. त्यांनी दिनांक 23/05/2015 रोजी दिलेल्या अहवालात खालील नमूद उणीवा निदर्शनास आणून दिलेल्या आहेत.

01) item no-1 is not executed.

02) item no 2 and 3 mentioned in schedule B are partially executed due to pre-existence of suitable sub-base layer in the form of existing road of lesser wide than constructed road.

03) item no 7,8,9 10 are executed partially.

04) item no 6,11,12,15,16,17 18 mentioned in schedule B are not executed.

05) Camber provided on road was found improper at some places.

सदर अनियमितता असतांना सुद्धा प्रथम व दुसऱ्या धावते देयकाची रक्कम कंत्राट दारास कोणत्या आधारे प्रदान करण्यात आली याबाबत खुलासा व्हावा.

2) मुकेश इन्फ्रास्टक्चर यांची नियुक्ती सदर कामाच्या पर्यवेक्षणासाठी करण्यात आली असून त्यांनी प्रथम धावत्या देयकाचा प्रगती अहवाल ( दिनांक नमूद नाही ) तसच दुसरे धावते देयकाचे प्रगती अहवालात दिनांक 22/07/2014 रोजी काम समाधानकारक असल्याचे नमूद केले आहे. मात्र दिनांक 23/05/15 च्या त्रयस्थ तांत्रिक लेखापारीक्षण अहवालात रस्त्याच्या कामाची गुणवत्ता हि दोषपूर्ण असल्याचे कळविण्यात आले. दोन्ही अहवालात विसंगती आढळून येत असून अंदाजपत्रकात नमूद पी.डब्लू.डी. स्पेसिफीकेशन नुसार प्रत्यक्ष कामे होत असल्याची खात्री कनिष्ठ अभियंता यांनी करणे गरजेचे आहे. मात्र तशी खातरजमा करण्यात येत नसल्याचे सदर प्रकरणात दिसून येत आहे. तांत्रिक सल्लागाराच्या प्रमाणपत्राच्या आधारे कंत्राटदारास रकमेचे प्रदान करण्यात येत आहे. तसेच कामाच्या प्रगती बाबत कोणतीही खातरजमा न करता तांत्रिक सल्लगार यांनी (Further certified that the above mentioned work has progressed as par specification specified in estimate and drawing measuermants of the work taken by me Parsonally and test result, other necessary testing checked found stisfactory. So recommended for Payment.) प्रगती अहवालात चुकीचे प्रमाणित करून प्रदानास मंजुरी दिली आहे.

3) त्रयस्थ तांत्रिक लेखापारीक्षण अहवालात item no-1 चा वापर करण्यात आला नाही असे नमूद असतानाही मोजमाप पुस्तिकेवर 1194.22 घनमीटरचे रु. 101509, item no-2 चे 239.29 घनमीटरचे रु. 60372 व item no-3 चे 1346.34 घनमीटरचे रु. 359068 चे प्रदान प्रथम व दुसऱ्या देयकात कंत्राटदारास प्रदान करण्यात आले आहे.

4) सदर कामाची दुरुस्ती झाली असल्यास त्याचे पुन: तांत्रिक लेखापरीक्षण करून घेणे गरजेचे असतांना असे लेखापरीक्षण न करता सबंधित कंत्राटदारास अंतिम देयकाचे प्रदान कोणत्या आधारे करण्यात आले याबाबत

विहीत अभिलेख्यासह खुलासा सादर करावा.

5) दिनांक 17/02/2014 च्या कार्याआदेशानुसार 9 महिन्याच्या कालावधीत किती काम झाले हे स्पष्ट होत नाही. वाढीव मुदतवाढ न घेता त्यापुढेही सुमारे 17 महिन्यानंतर काम पूर्ण झाल्याचे बांधकाम सल्लागार यांचे पत्र दिनांक 23/03/16 व शहर अभियंता यांचे पत्र दिनांक 03/05/16 च्या प्रमाणपत्रावरून दिसून येते.या प्रकरणी मुदतीनंतरच्या कालावधीतील विलंबापोटी करानाम्यातील अटी व शर्तीनुसार नुसार दंड वसूल पात्र आहे.

| | |
|---|---|
| एक महिना :- 500/- तद्नंतर प्रती दिवस -1000/- | एक महिना = 15000/- |
| त्यापुढे बांधकाम सल्लागार व शहर अभियंता यांच्या काम पूर्ण प्रमाणपत्रा नुसार | 16 महिने = 480000/- |
| दिनांक 03/05/16 पर्यंत. | वसूलपात्र रक्कम = 495000/- |

6) महाराष्ट्र महानगर पालिका अधिनियम कलम 73 अन्वये कार्य कंत्राटाकरीता करारनामा करणे अनिवार्य आहे. महारष्ट्र शासन राजपत्र असाधारण भमा -8/असक्र-47/महाराष्ट्र अँक्ट 2015 मधील परिच्छेद क्रमांक 34 मध्ये सुधारणा अन्वये रु.10 लाखापर्यंत 500/- व रु.10 लाखाच्या वरील रक्कमेवर 0.1% दराने करारनामा मुद्रांक शुल्क भरणे गरजेचे आहे. मात्र उक्त कामाचा करारनामा फक्त रु. 100 च्या मुद्रांकावर करण्यात आलेला आहे. सदर कंत्राट रु. 2,67,03,500/- चे असल्यामुळे 26104/- रुपये मुद्रांक शुल्क भरणा केल्याचे विहित अभिलेखे लेखापरीक्षणास सादर करावी.

7)शासन परिपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग दिनांक 2 जानेवारी 2006 अन्वये रस्ता रुंदीकरण व मजबुतीकरणाचे प्रस्ताव तयार करतांना खडीच्या थरच्या जाडीची नोंदवही ठेवणे अनिवार्य आहे. परिपत्रकात नमूद 1 ते 7 बाबीची नोंद प्रपत्र अ मध्ये वेळेवेळी स्वाक्षरी, शिक्का व दिनांकसह घेवून नोंदवही अद्यावत ठेवणे गरजेचे आहे. अन्यथा महाराष्ट्र वर्तवणूक व सेवा नियम 1979 मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्याची तरतूद आहे.

सदर अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र 146 ,दि. 16.02.2021 नुसार विभागास अनुपालन अभिप्राय सादर करण्यास कळविले होते. तथापि विभागाकडून अभिप्राय प्राप्त न झाल्यामुळे परिच्छेद नोंदविण्यात येत आहे.

DATSMBM7501 (Ref No : 70, Hmm No : 146)

## *49 BRGF योजनेच्या अनुषंगाने पूर्ती बाजार ते फुटका किल्ला, पाचगाव देऊळ कांक्रीट रस्ता विकसित करण्यात आलेल्या कामातील अनियामितेबाबत.*

**बांधकाम विभाग (BRGF योजना)**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 7**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व-निधी व शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 22068093.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1948584.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 21487.00/-

BRGF योजनेच्या अनुषंगाने पूर्ती बाजार ते फुटका किल्ला, पाचगाव देऊळ कांक्रीट रस्ता विकसित करण्याचे काम मे.एस.व्ही.एम. कन्स्ट्रकशन चंद्रपूर.यांना देण्यात आले. सदर कामात सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक संकीर्ण 2004/प्र.क्र.85/रस्ते दिनांक 11/06/2004 नुसार बाबीच्या परिमाणात 25% अथवा 5000/- वर वाढ होत असल्यास निविदेतील अनुच्छेद क्र.38(2) नुसार तांत्रिक मंजुरी प्रदान करणाऱ्या अधिकाऱ्याच्या निदर्शनास हि बाब तात्काळ आणून पूर्व मंजुरी प्राप्त करून निविदा अनुच्छेद क्र.14 नुसार कार्यकारी अभियंता यांचे लिखित आदेश प्राप्त करणे गरजेचे असतांना सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्व मंजुरीशिवाय प्राकलणातील कामातील एका बाबीवर बचत करून दुसऱ्या बाबीवर खर्च करून अंदाजपत्रकातील बाबीवर जादा परिमाण नोंदविल्याने रु.19,48,584/- चे अतिप्रदान करण्यात आले आहे. महाराष्ट्र महानगर पालिका अधिनियम कलम 73 अन्वये कार्य कंत्राटाकरीता करारनामा करणे अनिवार्य आहे. महारष्ट्र शासन राजपत्र असाधारण भमा -8/असक्र-47/महाराष्ट्र ॲक्ट 2015 मधील परिच्छेद क्रमांक 34 मध्ये सुधारणा अन्वये रु.10 लाखापर्यंत 500/- व रु.10 लाखाच्या वरील रक्कमेवर 0.1% दराने करारनामा मुद्रांक शुल्क भरणे गरजेचे आहे. मात्र उक्त कामाचा करारनामा फक्त रु. 200 च्या मुद्रांकावर करण्यात आलेला आहे. सदर कंत्राट रु. 2,21,87,280/- असल्यामुळे 21487/- रुपये मुद्रांक शुल्क वसूलपात्र आहे.

BRGF योजनेच्या अनुषंगाने पूर्ती बाजार ते फुटका किल्ला, पाचगाव देऊळ कांक्रीट रस्ता विकसित करण्याचे काम मे. एस.व्ही.एम. कन्स्ट्रकशन चंद्रपूर.यांना देण्यात आले. कामाचे तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| कामाचे नाव | पूर्ती बाजार ते फुटका किल्ला , पाचगाव देऊळ कांक्रीट रस्ता विक<br>करण्याच्या कामातील अनियामितेबाबत |
| प्रमाणक क्रमांक दिनांक व देयकाची रक्कम | प्रमाणक क्र.4 दिनांक: 2/11/16 प्रथम देयक रक्कम रु. 17476553<br>प्रमाणक क्र.1 दिनांक: 11/10/17 अंतिम व दुसरे देयक रक्कम रु. 4591450/- |

| | |
|---|---|
| अंदाजपकीय तरतुद | 22187280/- |
| कामाचा आदेश | जा.क्र.चंशमनपा/बांध/कार्या-2/15-16/69 दिनांक:22/06/2015 |
| कामास मुदतवाढ आदेश | जा.क्र.चंशमनपा/बांध-265/16-17 दिनांक:15/10/2016 |
| कंत्राटदाराचे नाव | मे. एस.व्ही.एम. कन्स्ट्रकशन चंद्रपूर. |
| कामाची मुदत | 8 महिने + 6 महिने =14 महिने |
| मोजमाप पुस्तक क्रमांक | क्र.154 |
| काम पूर्णत्वाचा दिनांक | नस्तीत नमूद नाही. |
| प्रशाकीय मान्यता | जिल्हाधिकारी चंद्रपूर यंचे पत्र जा.क्र.बी.आर.जी.एफ./2015/188 दिनांक:16/02/2015 |
| तांत्रिक मान्यता | क्र.1 दिनांक 01/08/2014 |

याबाबत लेखापरीक्षणावरील अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1) महाराष्ट्र महानगर पालिका अधिनियम कलम 73 अन्वये कार्य कंत्राटाकरीता करारनामा करणे अनिवार्य आहे. महारष्ट्र शासन राजपत्र असाधारण भमा-8/असक्र-47/महाराष्ट्र अँक्ट 2015 मधील परिच्छेद क्रमांक 34 मध्ये सुधारणा अन्वये रु.10 लाखापर्यंत 500/- व रु. 10 लाखाच्या वरील रक्कमेवर 0.1% दराने करारनामा मुद्रांक शुल्क भरणे गरजेचे आहे. मात्र उक्त कामाचा करारनामा फक्त रु. 200 च्या मुद्रांकावर करण्यात आलेला आहे. सदर कंत्राट रु. 2,21,87,280/- असल्यामुळे 21487/- रुपये मुद्रांक शुल्क वसूल करून शासन खाती जमा करण्यात यावे.

2) सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक संकीर्ण 2004/प्र.क्र.85/रस्ते दिनांक 11/06/2004 नुसार एखाद्या बाबीच्या परिमाणात 25% अथवा 5000/- वर वाढ होत असल्यास निविदेतील अनुच्छेद क्र. 38(2) नुसार तांत्रिक मंजुरी प्रदान करणाऱ्या अधिकाऱ्याच्या निदर्शनास हि बाब तात्काळ आणून पूर्व मंजुरी प्राप्त करून निविदा अनुच्छेद क्र.14 नुसार कार्यकारी अभियंता यांचे लिखित आदेश असणे आवश्यक आहे. असे स्पष्ट नमूद असून सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्व मंजुरीशिवाय प्राकलणातील कामातील एका बाबीवर बचत करून दुसऱ्या बाबीवर खर्च करता येत नसताना अंदाजपत्रकातील खालील बाबीवर जादा/घट करून परिमाण नोंदविल्याने शासन निर्देशाचे तसेच नियमाचे उल्लघन करण्यात करून रु. 19,48,584/- अतिप्रदान करण्यात आले. त्यामुळे सदर रक्कम आक्षेपित ठेवण्यात येत आहे.

| अ.क्र | बाब | अंदाज परिमाण | देयक परिमाण | टक्के | दर | 25%जादा परिणाम | आक्षेपित रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Providing laying in situ | 28.27 | 109.53 | 287% | 5742.45 | 74.2 | 426090/- |
| 2 | Providing soling 80mm | 442 | 1972.28 | 346% | 981.45 | 1419.78 | 1393443/- |
| 3 | Providing cutting,bainding | 395.82 | 517.32 | 31% | 5722.90 | 22.55 | 129051/- |
| एकूण आक्षेपित रक्कम ----- रु. 19,48,584/- | | | | | | | |

3)काम पूर्ण झाल्याबाबतचे प्रमाणपत्र नस्तीत दिसून येत नाही. त्यामळे काम विहित कालावधीत पूर्ण करण्यात आले याबाबत खात्री होत नाही तरी काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र परिच्छेदाचे अनुपालन करतांना सादर करावे.

4)शासन निर्णय वित्त विभाग विमास /1098/प्र.क्र.28/98 दिनांक 19/08/1998 व शासकीय विमा निधी संचालनालय म.रा. क्र.प्रजिनी-2300/सहविमा सा..बा.वी./संकीर्ण दिनांक 20/04/2001 मधील बाब क्रमांक-2अन्वये कंत्राटदाराने काम चालू करण्यापूर्वी सबंधित कामाचा विमा उतरविणे आवश्यक आहे. मात्र असा विमा नस्तीत नाही.

5)वृत्तपत्राच्या निविदेच्या अटीशर्तीत कंत्राटदाराची आर्थिक परिस्थिती, कामाचा अनुभव, त्याच्याकडील उपलब्ध मनुष्यबळ, मशिनरी, इत्यादी महत्वपूर्ण बाबींचा समावेश केला नाही.

6)महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 10 (फ) नुसार महापालिकेबरोबर किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही करारात पालिका सदस्याचा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही भाग किंवा हितसबंध नाही अश्या आशयाचे तपशीलवार प्रमाणपत्र निविदाधारका कडून घेण्यात आल्याचे नास्तीत नाही.

7)मा.जिल्हाधिकारी यांच्या प्रशासकीय आदेशानुसार प्रस्तावित रस्ते हे विकास नियंत्रण नियमावलीशी सुसंगत आहेत याची खात्री मनपाने करणे आवश्यक होते त्यासाठी नगररचना विभागाचे अभिप्राय घेणे क्रमप्राप्त असताना नगररचना विभागाचे अभिप्राय घेण्यात आलेले नाही.

8)महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता-2011 चे नियम 182 नुसार नमुना नंबर 139 मध्ये कामाची नोंद घेणेआवश्यक आहे. विभागाने विहित नमुन्यात नोंदवही ठेवून त्यात नोंद घेतल्याचे आढळत नाही.

सदर अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र 111 ,दि. 21.01.2021 नुसार विभागास अनुपालन अभिप्राय सादर करण्यास कळविले होते. तथापि विभागाकडून समर्पक अनुपालन प्राप्त न झाल्यामुळे परिच्छेद नोंदविण्यात

येत आहे.

DATSMBM7501 (Ref No : 77, Hmm No : 111)

## *50 टिपले किराणा स्टोअर्स श्री खिरटकर ते विठ्ठल मंदिर पर्यंत डांबर रस्ता बांधकामातील अनियमिततेबाबत.*

**बांधकाम विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 10113115.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 93543.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 110752.00/-

टिपले किराणा स्टोअर्स ते श्री खिरटकर ते विठ्ठल मंदिर पर्यंत डांबर रस्त्याचे काम कंत्राटदार श्री एन.एस.पुंगलिया,चंद्रपूर यांना देण्यात आले. सदर कामाचा करारनामा करतांना महाराष्ट्र शासन मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 व वेळोवेळी सुधारित शासन निर्णयानुसार एकूण रु.9,722/- इतक्या किमतीचे मुद्रांक करारनाम्यासाठी वापरणे आवश्यक होते. परंतु रु.100/- च्या मुद्रांकावर करारनामा करण्यात आल्याने रु.9,622/- शासनखाती भरणे आवश्यक आहे. तसेच देयकामधून आयकर अधिनियम 1961 नियम 194 क प्रमाणे आयकराची कमी कपात केल्याने रु.1,01,130/- वसूल करून शासन खाती भरावे. निविदेच्या अटी शर्तीत महत्वपूर्ण बांबीचा समावेश केलेला नाही.

विभाग :- बांधकाम (BRGF)

| | | |
|---|---|---|
| 1. | कामाचे नाव | टिपले किराणा स्टोअर्स ते श्री खिरटकर ते विठ्ठल मंदिर पर्यंत डांबर रस्ता बांधकाम. |
| 2. | प्रमाणाक क्र. | 260/ दि.31.03.2015 (पायाभूत सुविधा अंतर्गत)<br><br>25/ दि.27.07.2016 |
| 3. | अंदाजपत्रकीय शुल्क | 1,07,21,775/- |

| | | |
|---|---|---|
| 4. | कामाचा आदेश | क्र. चंशमनपा/बांध/झोन-2/2034,<br><br>1160, दि.26/02/2014 |
| 5. | कंत्राटदाराचे नाव | मे. एन.एम.पुगलिया,चंद्रपूर |
| 6. | कामाची मुदत | 6 महिने |
| 7. | मोजमाप पुस्तिका क्रमांक | 41 व 145 |
| 8. | काम पूर्णत्वाचा दिनांक | 08/07/2016 |
| 9. | प्रशासकीय मान्यता | आदेश क्र.561 दि.19/11/2013 |
| 10. | तांत्रिक मान्यता | आदेश क्र.239 दि.08/08/2013 |
| 11. | स्थायी समिती ठराव | क्र. 321 दि.21/02/2014 |

उक्त कामामध्ये पुढीलप्रमाणे अनियमितता दिसुन आल्या.

1. निविदेच्या अटी शर्तीत कंत्राट दाराची आर्थिक स्थिती कामाचा अनुभव व त्यांचेकडील उपलब्ध मनुष्यबळ, मशिनरी इत्यादी बाबीच्या समावेश केला नाही.

2. निविदा छाननी समितीतील विभाग प्रमुखाचा समावेश असणे आवश्यक आहे. त्यामध्ये लेखा विषयक अधिकारी यांचा समावेश असणे आवश्यक आहे. अशी समिती गठीत करून निविदा छाननी तक्ता करून निविदा समितीचे स्वंयस्पष्ट अभिप्राय संचिकेत नाहीत.

3. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम 10 क नुसार महानगरपालिके बरोबर त्यांच्या वतीने केलेल्या कोणत्याही करारात पालिका सदस्याचा किंवा त्यांच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही भाग किंवा हितसंबंध असेल तर तो पालिका सदस्य राहण्यात अपात्र राहील अशी तरतूद असल्याने प्रत्येक निविदा धारकाकडून त्यांचे उपरोक्त तपशीलाचे प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

4. मा. जिल्हाधिकारी यांच्या प्रशासकीय आदेशानुसार प्रस्तावित रस्ते हे विकास नियंत्रण नियमावलीशी सुसंगत आहेत याची खात्री मनपाने करणे आवश्यक होते. त्यासाठी नगररचना विभागाचे अभिप्राय घेणे क्रमप्राप्त असतांना नगररचना विभागाचे अभिप्राय घेतले नाहीत.

5. निविदेतील अटी शर्तीनुसार कंत्राटदाराचा EPF नोंदणी बंधनकारक असुन त्याशिवाय देयके अदा केले जाणार नाही अशी अट आहे. तरी EPF नोंदणी प्रमाणपत्राशिवाय देयके अदा केल्याचे दिसते.

6. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 चे नियम 182 नुसार क्रमांक 139 मध्ये कामाची नोंद घेणे आवश्यक

आहे. विभागाने विहित नमुण्यात नोंदवही ठेऊन त्यात नोंद घेतल्याचे आढळले नाही.

7. देयकामधून आयकर अधिनियम 1961 नियम 94 क्र. प्रमाणे 2% आयकर कापणे आवश्यक असतांना 1% प्रमाणे आयकराची कपात करण्यात आली. त्यामुळे उर्वरित 1% आयकर रक्कम रुपये 1,01,130/- वसूल करून शासन खाती जमा करणे आवश्यक आहे.

8. कामाची अंदाजित किमत रु.1,07,21,775/- असल्याने महाराष्ट्र शासन मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 व वेळोवेळी सुधारित शासन निर्णयान्वे एकूण रु. 9722/- इतक्या किमतीचे मुद्रांक करारनाम्यासाठी वापरणे आवश्यक होते परंतु केवळ 100/- रु. चे मुद्रांक वापरले असल्याने रु. 9622/- इतके मुद्रांक शुल्क कंत्राटदाराकडून वसूल करून शासनखाती भरावे.

9. सदर कामाचे पर्यवेक्षण करण्यासाठी मे. मुकेश इन्फ्रास्ट्रक्चर नागपूर यांची नियुक्ती मनपाने केली आहे. महानगरपालिकाकडे आस्थापनेत तांत्रिक मनुष्यबळ असतांना पर्यवेक्षण त्रयस्थ यंत्रणेकडून कसे करून घेतले याबाबत खुलासा करावा व पर्यवेक्षण त्रयस्त यंत्रणेकडून केल्याने झालेला खर्च रु. 93543/- आक्षेपाधीन ठेवण्यात येते.

10. सदर कामाची मुदत 6 महिने ठरली असतांना कामपूर्ण करण्याकरिता दंड न आकारता 27/10/2014 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली व त्यानंतर आदेश क्र.283, दि. 22/10/2014 नुसार दि. 30/05/2015 पर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याचे दिसून येते. परंतु कामपूरण केल्याचे प्रमाणपत्र दि.08/07/2016 ला देण्यात आल्यामुळे कामपूर्ण करण्यास बराच विलंब झाल्याचे आढळून आले. करारनाम्यानुसार मुदतवाढ न मिळाल्यास प्रथम एक महिन्याचे कालावधीत दररोज 500/- रु. दंड व नंतरच्या कालावधीत प्रतिदिन 1000/- रु. दंडाची कारवाई नमूद आहे. त्यानुसार दंडाची रक्कम वसूल करणे आवश्यक आहे. परंतु दंडाची रक्कम वसूल करण्यात आली नाही.

देयकातील वसुलपात्र रकमा खालीलप्रमाणे आहेत.

| अं. क्र. | बाब | वसूलपात्र रक्कम (रुपये) |
|---|---|---|
| 1<br>2 | मुद्रांक शुल्क<br>2% आयकर नियम 194 क प्रमाणे फरक | 9,622/-<br>1,01,130/- |
| | एकूण | 1,10,752/- |

उपरोक्त अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र.127 दि.09/02/2021 नुसार विभागास खुलासा सादर करण्यास कळविले होते. परंतु संयुक्तिक खुलासा प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे. मुद्देनिहाय आक्षेपाची

पूर्तता करून अनुपालन सादर करावे.

DATVVBM6301 (Ref No : 78, Hmm No : 127)

## *51 मनपा हद्दीतील शुश्रूषा-गृह तसेच सोनोग्राफी सेंटर च्या नोंदणी व नूतनीकरनामधील अनियमितताबाबत*

**HEALTH**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 2**

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 4500.00/-

महाराष्ट्र शुश्रूषा-गृह नोंदणी अधिनियम 1949 सुधारणा 2005 अंतर्गत शुश्रूषा-गृहाच्या नोंदणी व नुतनीकरणासाठी मनपा ठराव क्र.20 दि.25/07/2017 मध्ये नमूद खाटाप्रमाणे शुल्क आकारणे आवश्यक असताना शुश्रूषा-गृह नोंदणी व नुतनीकरणासाठी कमी शुल्क आकारण्यात येत आहे. तसेच महाराष्ट्र शुश्रूषा-गृह नोंदणी अधिनियम 1949 सुधारणा 2005 तसेच PCPNDT Act 1994 नुसार शुश्रूषा-गृह व सोनोग्राफी सेंटर नोंदणी व नूतनीकरण करताना मनपाने आवश्यक वैध कागदपत्र प्राप्त केल्याचे दिसून येत नाही.

महाराष्ट्र शुश्रूषा-गृह नोंदणी अधिनियम 1949 सुधारणा 2005 अंतर्गत मनपा मार्फत करण्यात आलेल्या शुश्रूषा-गृहाच्या नोंदणी बाबतचे अभिलेख्यांच्या तपासणीत खालील बाबी निदर्शनास आलेल्या आहेत.

1) 20 खाटा असलेल्या नगराळे हॉस्पिटल, चंद्रपूर यांच्या कडून शुश्रूषा-गृह नूतनीकरण करिता रु.18,000/- वसूल केल्याचे नस्तीवरून दिसून येते परंतु मनपा ठराव क्र. 20 दि.25/07/2017 नुसार 11 ते 20 खाटा असलेल्या शुश्रूषा-गृह नूतनीकरण करिता वार्षिक 7500/- आकारणे आवश्यक आहे त्यानुसार सदर हॉस्पिटल कडून तीन वर्षाचे नूतनीकरण करताना रु.22,500/- वसूल करणे आवश्यक होते. परंतु नुतणीकरणानंतर सदर हॉस्पिटल कडून रु.4500/- कमी वसूल करण्यात आले. सदर बाबतीत अर्धसमास पत्र क्र.108 दि. नुसार खुलासा मागितला असता मनपाने जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या दि.23/07/2015 आदेशान्वये कपात केल्याचे सांगितले. परंतु नगराळे हॉस्पिटल, चंद्रपूर चे दि.01/02/2018 ला मनपा चंद्रपूर कडून नूतनीकरण करण्यात आले व सदर हॉस्पिटल ला मनपा चंद्रपूर कडून सादर केलेले प्रमाणपत्र दि.31/03/2020 पर्यंत वैध आहे. तसेच मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्र.91 दि.28/03/2018 च्या अगोदर सदर हॉस्पिटलचे नूतनीकरन करण्यात आल्याने

मनपा ठराव क्र.20 दि.25/07/2017 नुसार कार्यवाही करणे अपेक्षित आहे. करिता सदर हॉस्पिटल कडून रु.4500/- वसूलपात्र करून मनपा निधीत जमा करावे.

2) तीन वर्षाकरिता परवाना निर्गमित करतांना मागणी करण्यात येणारे कागदपत्र (FIRE AND SAFETY प्रमाणपत्र, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रमाणपत्र इ.) हे फक्त सहा महिने ते एक वर्ष वैध असलेले आहेत. पुढील दोन वर्षाकरिता सदर प्रमाणपत्र प्राप्त करण्यात येत नाही.

3) मनपा ठरावामार्फत निश्चित करण्यात आलेल्या नोंदणी फी व नुतनीकरन फी दरास राज्य शासनाची मंजुरी घेण्यात आल्याचे दिसून येत नाही.

PCPNDT Act 1994 नुसार मनपा मार्फत करण्यात आलेल्या सोनोग्राफी सेंटर नोंदणी व नूतनीकरणात करताना आवश्यक वैध कागदपत्र सादर केल्याचे दिसून येत नाही.

1)FIRE AND SAFETY प्रमाणपत्र सोनोग्राफी सेंटर नोंदणी व नूतनीकरणात करताना घेण्यात आलेले नाही.

उदा. गुरुकृपा क्लिनिक (नोंदणी क्र.88), यश डायगोनास्टीक सेंटर(नोंदणी क्र.87), डॉ स्वप्निल पुणेकर (नोंदणी क्र.86), मानवटकर मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल (नोंदणी क्र.84) इ.

2)हॉस्पिटल व डायगोस्टीक सेंटर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रमाणपत्र सादर करत नाही तर काही हॉस्पिटल व डायगोस्टीक सेंटर ने सादर केलेले प्रमाणपत्र अर्ज केल्याच्या दिनांकास वैध नसल्याचे दिसून येत आहे.

उदा.- मानवटकर हॉस्पिटल (नोंदणी क्र.84) व गुरुकृपा क्लिनिक (नोंदणी क्र.88) यांनी सादर केलेले प्रमाणपत्र अर्ज केल्याच्या दिनांकास वैध नाही.

3)सोनोग्राफी सेंटर नोंदणी रजिस्टर वैद्यकीय अधिकारी मार्फत स्वाक्षांकित करण्यात आले नसल्याने सदर बाबींवर सक्षम प्राधीकाऱ्याचे नियंत्रण नसल्याचे दिसून येत आहे.

यासंदर्भात अर्धसमास पत्र क्र.108,दि.20/01/2021 नुसार खुलासा मागितला असता सयुंक्तिक खुलासा प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DLFIBBM9301 (Ref No : 35, Hmm No : 108)

## *52 झोन क्र.2 मधील कर विभागातील वसूल झालेली एकूण रक्कम चलनाद्वारे रोखपालाकडे जमा करताना कमी जमा करण्यात येत असल्याबद्दल*

**ZONE OFFICES**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**
**अनियमितता संख्या : 2**

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 1762.00/-

चंद्रपूर शहर महानगरपालिका झोन क्र.2 मधील कर विभागाद्वारे मालमत्ता कर व इतर कराची वसुली केल्यानंतर दिवसागणिक कर संग्रहकनिहाय एकूण जमा रक्कम झोन क्र.2 मधील कर विभागातील जनरल पटनी रजिस्टर मध्ये घेऊन संपूर्ण रक्कम मनपा चंद्रपूर मधील रोखपालाकडे जमा करण्यात येते परंतु रोखपालाकडे झोनमधील रकमा जमा करताना कमी रकमेचा भरणा केल्याचे दिसून येत आहे.

महानगरपालिका चंद्रपूर येथील सन 2016-17 व 2017-18 या वित्तीय वर्षाच्या लेखापरिक्षणात झोन क्र.2 मधील कर विभागातील पटनी रजिस्टर, पावत्या बँक चालान तपासले असता झोन क्र.2 दिवसागणिक कर संग्रहकनिहाय एकूण जमा रक्कम जनरल पटनी रजिस्टर मध्ये घेऊन संपूर्ण रक्कम मनपा चंद्रपूर मधील रोखपालाकडे जमा करताना वसूल केलेल्या रकमेपेक्षा कमी रक्कम जमा करण्यात आल्याने सदर बाबतीत अनियमितता झाली आहे.

1) मार्च 2017 व मार्च 2018 मधील झोन क्र.2 मधील कर विभागाने वसूल केलेल्या रकमांपेक्षा पटनी रजिस्टर मध्ये कमी दर्शवून रोखपालाकडे रकमा जमा करताना पुढीलप्रमाणे तफावत आढळून येत आहे.

| अ.क्र. | दिनांक | पावती क्रमांक | वसूल केलेली रक्कम | पटनी रजिस्टर मध्ये जमा केलेली रक्कम | वसूलपात्र रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 31/03/2018 | 209122 | 4008/- | 3746/- | 262/- |
| एकूण | | | | | 262/- |

2) झोन क्र.2 मधील कर विभागाने वसूल केलेल्या रकमा बँक चलनाद्वारे जनरल पटनी रजिस्टर मध्ये कमी जमा करण्यात आली आहे.

| अ.क्र. | दिनांक | बँक चालान क्रमांक | वसूल केलेली रक्कम | जनरल पटनी रजिस्टर मध्ये जमा केलेली रक्कम | वसूलपात्र रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 31/03/2018 | 4832 | 13,10,265/- | 13,08,765/- | 1500/- |

| | |
|---|---|
| एकूण | 1500/- |

उपरोक्त बाबी काही नमुन्यादाखल असून अजून अश्या प्रकारची अनियमितता असण्याची शक्यता नाकारता येत नाही. उक्त दर्शवलेली एकूण रक्कम संबंधीताकडून वसूल करून मनपा खाती जमा केल्याचे अनुपालन करावे.

यासंदर्भात अर्धसमास पत्र क्र. 119 दि.02/02/2021 नुसार खुलासा मागितला असता कोणताही खुलासा प्राप्त न झाल्याने आक्षेप घेण्यात येत आहे.

DLFIBBM9301 (Ref No : 48, Hmm No : 119)

## *53 पाणी पुरवठा विभागातील पीव्हीसी पाईप लाईन टाकण्याचे कामात झालेल्या अनियमिततेबाबत.*

**पाणीपुरवठा**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1287277.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 185000.00/-

| |
|---|
| चंद्रपूर शहरातील बंगाली कॅम्प पाण्याची टाकी ते श्याम नगर आंबेडकर चौक, शिव मंदिर चंद्रपूर पर्यंत 200mm Dig HDPE पाईप लाईन टाकण्याचे कंत्राट श्री महेश बोडखे चंद्रपूर यांना देण्यात आलेले होते व करारनाम्यानुसार काम पुर्ण करण्याची मुदत 3 महिने होती. परंतु सदर नस्तीचे लेखा परीक्षणाअंती काम 3 महिन्यात पुर्ण केल्याचे दिसून येत नाही. तसेच सदर कामाच्या कंत्राटाची निविदा रु.12,87,277/- ची असून निविदा चंद्रपूर शहरातील वर्तमानपत्रात दिल्याने चंद्रपूर महानगरपालिकेला आर्थिक स्पर्धात्मक दराचा लाभ घेता आला नाही. |

चंद्रपूर शहरातील बंगाली कॅम्प पाण्याची टाकी ते श्याम नगर आंबेडकर चौक, शिव मंदिर चंद्रपूर पर्यंत 200mm Dig HDPE पाईप लाईन टाकण्याचे कंत्राट श्री महेश बोडखे चंद्रपूर यांना देण्यात आलेले होते

| | | |
|---|---|---|
| अं. | कामाचे नाव | बंगाली काम पाण्याचा टाकी ते श्याम नगर आंबेडकर चौक, शिव |

| क्र. | | मंदिर चंद्रपूर पर्यंत 200mm Dig HDPE पाईप लाईन टाकणेबाबत. |
|---|---|---|
| 1 | प्रमाणाक क्र. | 106 दि. 04/12/2017 |
| 2 | कामाची रक्कम | रु. 12,87,277/- |
| 3 | कामाचे आदेश दिनांक | दि. 30/12/2016 |
| 4 | कंत्राटदाराचे नांव | श्री महेश बोडखे, चंद्रपूर |
| 5 | कामाची मुदत | 3 महिने |
| 6 | काम पूर्णत्वाचा दिनांक | दि. 10/10/2017 |
| 7 | विलंब कालावधी | 6 महिने 20 दिवस |
| 8 | दंडाची रक्कम | रु.1,85,000/- |

उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे 200mm HDPE पाईप लाईन टाकण्याचे कामात पुढीलप्रमाणे अनियमीतता दिसून आल्या.

1. बंगाली कॅम्प पाण्याची टाकी ते श्यामनगर, आंबेडकर चौक शिव मंदिर चंद्रपूर पर्यंत 200mm Dia HDPE पाईप लाईन टाकल्याचे कामाबाबत निविदा बाबत जाहिरात स्थानिक वर्तमान पत्रात देण्यात आली. सदर कामाची निविदा महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम कलम 470 नुसार राज्यस्तरीय वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक असतांना याबाबत निविदा स्थानिक वर्तमानपत्रात दिल्यामुळे याबाबत स्पर्धात्मक दराचा लाभ मिळाला नाही.

2. कंत्राटदारांनी करून दिलेल्या करारनाम्यातील अटी व शर्तीतील क्र.7 नुसार काम करण्यास विलंब झाल्यास मुदतवाढ घेण्यात येईल. मुदतवाढ न मिळाल्यास रु.500/- प्रतीदिवसाप्रमाणे दंड आकारण्यात येईल व मुदतवाढ वाढवून न दिल्यास रु.1000/- प्रमाणे दंड वसूल करण्याचे नमूद आहे. परंतु कंत्राटदाराची विहित मुदतीत काम पूर्ण न केल्याने रु. 1,85,000/- दंडाची रक्कम वसूल करण्यात आली नाही.

3. एकाच कंत्राटदारास बरेचशी कामे दिल्याने कंत्राटदाराने एकही काम विहित मुदतीत पूर्ण केलेले नसल्याचे लेखा परीक्षणा अंतीदिसून येते. त्यामुळे इतरत्र कामातही दंडाची रक्कम वसूल करण्यात यावी.

उपरोक्त अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र.132 दि. 03/02/2021 नुसार पाणी पुरवठा विभागास अनुपालन सादर करण्यास कळविण्यात आलेले होते. परंतु प्राप्त झालेले अनुपालन समर्पक नसल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

## *54 चंद्रपूर शहरातील पाणी पुरवठा योजना BOT तत्वावर चालविण्यास दिलेल्या कामातील अनियमितता बाबत.*

**पाणीपुरवठा विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 18100000.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 16300000.00/-

चंद्रपूर शहराची पाणी पुरवठा योजना मे. उज्जवल कंन्सट्रक्शन कंपनीला बीओटी(BOT) तत्वावर दि. 28/09/2011 च्या करारनाम्यावर 10 वर्षासाठी चालविण्यास दिली होती. कराराची किंमत रु.1,81,00,000/- होती करारनाम्यातील मुद्दा क्र. 1 नुसार दहा वर्षात एकूण रु.181.00 लक्ष मनपा चंद्रपूर यांना प्रतिवर्ष ठरल्याप्रमाणे दिलेल्या तक्त्यानुसार दहा वर्ष सदरची रक्कम भरणे अपेक्षित होते. परंतु सदर कंपनीने करारनाम्या नुसार अटी व शर्तीचे पालन न केल्याने मनपा चंद्रपूर यांनी मे. उज्जवल कंन्सट्रक्शन कंपनी चंद्रपूर यांना मुद्दा क्र. 1 ते 63 बाबत पत्र क्र. 2080 दि. 07/10/2014 अन्वये कारणे दाखवा नोटीस देऊन अट क्र.1 नुसार रक्कम जमा करण्यास विलंब लावल्यामुळे विलंब काळासाठी 8% प्रमाणे व्याजाची गणना करून तत्काळ रक्कम जमा करण्याबाबत कळविण्यात आले. परंतु कंत्राटदारांनी सदरची रक्कम मनपा फंडात जमा न केल्याची अनियमितता केली आहे.

चंद्रपूर शहराची पाणी पुरवठा योजना मे. उज्जवल कंन्सट्रक्शन कंपनी चंद्रपूर यांनी बीओटी (BOT) तत्वावर दि. 28/09/2011 च्या करारनाम्याने 10 वर्षासाठी चालविण्यास देण्यात आली होती. सदर कराराची रक्कम रु. 1,81,00,000/- एवढी होती. परंतु सदर कंपनीने करून दिलेल्या करारनाम्यानुसार मुद्दा क्र. 1 नुसार दहा वर्षात एकूण रु.1,81,00,000/- मनपा चंद्रपूर यांना प्रतिवर्ष नेमून दिलेल्या तक्त्यानुसार रक्कम जमा करणे अपेक्षित होते.

Annexure-1

| अं. क्र. | वर्ष | रुपये (लक्ष) |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| 1 | ऑक्टोबर 2011 | 32.00 |
| 2 | ऑक्टोबर 2012 | 23.00 |
| 3 | ऑक्टोबर 2013 | 24.00 |
| 4 | ऑक्टोबर 2014 | 25.00 |
| 5 | ऑक्टोबर 2015 | 14.00 |
| 6 | ऑक्टोबर 2016 | 15.00 |
| 7 | ऑक्टोबर 2017 | 15.00 |
| 8 | ऑक्टोबर 2018 | 14.00 |
| एकूण | | 163.00 |

परंतु सदर कंपनीने करारनाम्यानुसार अटी व शर्तीचे पालन केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे मनपा चंद्रपूर यांनी मे. उज्जवल कंन्सट्रक्शन कंपनी चंद्रपूर यांना मुद्दा क्र. 1 ते 63 बाबत पत्र क्र. 2080 दि. 07/10/2014 अन्वये कारणे दाखवा नोटीस देऊन अट क्र.1 नुसार रक्कम जमा करण्यास विलंब लावल्यामुळे विलंब काळासाठी 8% प्रमाणे व्याजाची परिगणना करून तात्काळ रक्कम जमा करण्याबाबत सांगण्यात आले. व 1 ते 63 मुद्द्यांची पूर्तता करण्याबाबत कळविण्यात आले होते. परंतु त्यानंतर सदर कंत्राटदराने अटी व शर्तीनुसार रक्कम कधी जमा केली किंवा कसे? याबाबत चे दस्तऐवज नस्तीत उपलब्ध नसल्याने तसेच मे. उज्जवल कंन्सट्रक्शन कंपनीने करारनाम्यातील अटी व शर्तीचे उल्लंघन केल्याने व शहरातील पाणी पुरवठा सुरळीत न ठेवल्याने वाढत्या तक्रारीमुळे मनपाच्या सर्वसाधारण सभेने दि.08/11/2019 रोजीच्या ठराव क्र. 20 नुसार कंत्राट रद्द केल्याने ऑक्टोबर 2018 पर्यंतची रक्कम रु.1,63,00,000/- संबंधित ठेकेदाराकडून वसूल करणे आवश्यक आहे.

उपरोक्त अनियमितते बाबत अर्धसमास पत्र क्र.138 दि. 10/02/2021 नुसार पाणी पुरवठा विभागास अनुपालन सादर करण्यास कळविण्यास आले होते. परंतु संयुक्तिक अनुपालन प्राप्त न झाल्याने संबंधिताकडून रक्कम वसुलीची कार्यवाही करून अनुपालन सादर करावे.

DATDRMM6701 (Ref No : 75, Hmm No : 138)

## ***55 बाजार विभागा अंतर्गत किल्ल्याचे मागील व बाहेरील बाजार फी वसुलीबाबतच्या कंत्राटी कामातील अनियमितता.***

**बाजार विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 5286712.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 794886.00/-

मनपा चंद्रपूर येथील बाजार विभागामार्फत किल्ल्याचे आतील व बाहेरील चिल्लर बाजार वसुलीचे कंत्राट श्री निर्मल एन. भंडारी यांना दि.01/06/2015 ते 31/03/2018 या कालावधीकरिता देण्यात आले व स्थायी समितीने ठराव क्र.49, दि.22/05/2015 नुसार मंजुरी दिली. कार्य कंत्राटाच्या करारनाम्याकरिता एकूण रु.4786/- मुद्रांक शुल्क आवश्यक असतांना रु.4686/- इतके मुद्रांक शुल्क कमी वापरले असल्याने रु.4686/- शुल्क वसुली कंत्राटदाराकडून वसूल करणे. कंत्राटदारांनी चिल्लर दुकानदाराकडून रु. 5/- ऐवजी रु.10/- ची वसुली केल्याच्या तक्रारी आल्यामुळे व मा. आयुक्त यांच्या आदेशानुसार कंत्राटदाराकडून दंडासह रु.790200/- नुकसान भरपाई वसूल करण्याचे आदेश असतांना हि रक्कम कंत्राटदाराकडून वसूल करण्यात आली नाही. तसेच कंत्राटदारा विरुध्द बऱ्याच तक्रारी असतांना त्यांचेवर कुठलीही कारवाई न करता वारंवार मुदतवाढी देण्यात आल्याची अनियमितता करण्यात आली.

मनपा चंद्रपूर येथील बाजार विभागामार्फत किल्ल्याचे आतील व बाहेरील चिल्लर बाजार वसुलीचे कंत्राट श्री निर्मल एन. भंडारी यांना दिनांक01/06/2015 ते 31/03/2018 या कालवधी करिता देण्यात आले होते. व स्थायी समितीने ठराव क्र.49 दिनांक 22/05/2015 नुसार मंजुरी दिली.

बाजार फी वसुली बाबतच्या नस्तीची तपासणी केली असता पुढीलप्रमाणे अनियमितता दिसुन आल्या.

1. बाजार फी वसुलीबाबत वर्ष 01/06/2015 ते 31/03/2018 या कालावधीकरिता एकूण रु.52,86,712/- चे कंत्राट मे. निर्मल एन. भंडारी यांना कंत्राट देण्यात आले. महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 व वेळोवेळी सुधारित सुधारित शासन निर्णयान्वये रु.4786/- इतक्या किंमतीचे मुद्रांक करारनाम्यासाठी वापरणे आवश्यक होते. परंतु केवळ रु.100/- चे मुद्रांक करारनाम्यासाठी वापरले असल्याने रु.4686/- इतके शुल्क कंत्राटदाराकडून वसूल करून शासन खाती जमा करणे आवश्यक आहे.

2. मे. निर्मल भंडारी कंत्राटदार यांनी चिल्लर दुकानदाराकडून रु.5/- ऐवजी रु.10/- वसुली केल्याबाबत मार्केटमधील ग्राहकांनी तक्रारी केल्या तसेच इतर राजकीय पक्ष तसेच नगरसेवकांनी अतिरिक्त शुल्क वसुली केल्यामुळे कंत्राटदारावर कार्यवाही करण्याबाबतही पत्रव्यवहार करण्यात आला. या संदर्भात आयुक्त यांचे पत्र

क्र.चंशमनपा/कवि/896/2016, दिनांक 27/06/2016 नुसार कंत्राटदारांनी दुकानदाराकडून बळजबरीने रु.5/- ऐवजी रु.10/- वसूल केल्याचे निदर्शनास आल्यामुळे कंत्राटदाराकडून प्रती महिना रु.65,850/- प्रमाणे 10 महिन्याचे रु. 6,58,500/- व त्यावरील दंड रु. 1,31,700/- असे एकूण रु.7,90,200/- नुकसानीची रक्कम भरण्याचे आदेश दिले. उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे नुकसानी तसेच दंडाची रक्कम संबंधित कंत्राटदाराकडून वसुली करण्यात आली नाही.

तसेच वर दर्शविल्याप्रमाणे प्राप्त तक्रारी व त्याअनुषंगाने मा. आयुक्त यांनी त्यांचे पत्र क्र.795 दिनांक 18/06/2016 चे पत्रान्वे व वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार कंत्राटदारा विरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली याबाबत अभिलेख नस्तीत दिसुन आलेले नाही.

3. बाजार वसुलीकरिता दिलेल्या कंत्राटदाराची मुदत दिनांक 31/03/2018 रोजी संपणार हे पूर्वीच ज्ञात असतांना त्यानुसार चार महिन्यापुर्वी नवीन निविदा प्रक्रियेची कार्यवाही करणे अपेक्षित होते. काही कारणास्तव असे नमुद करून व नंतर विधानपरिषदेची आचारसंहिता दि. 21/04/2018 रोजी घोषित झाल्याचे कारण नमूद करून 3 महिन्यापर्यंत मुदतवाढ देण्यात आली. पूर्वीच बाजार फी वसुली बाबतच्या तक्रारी, दंडाची कार्यवाही तसेच कंत्राट रद्द करण्याची शिफारस इत्यादी बाबत कार्यवाही अपेक्षित असतांना संबधित कंत्राटदाराची मुदत संपल्यानंतर वेळोवेळी मुदत वाढ देण्यात आली.

याबाबत अर्धसमास पत्र क्र.105 दिनांक 18/01/2021 नुसार खुलासा मागितला असता विभागाचे पत्र क्र. 74, दि. 08/02/2021 नुसार प्राप्त खुलासा संयुक्तिक नसल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे. वसुली बाबतची कार्यवाही करून अनुपालन सादर करावे.

DATVVBM6301 (Ref No : 79, Hmm No : 105)

## *56 नगर विकास विभागातील बांधकाम परवानगी व इतर अनियमिततेबाबत.*

**नगर विकास विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 4**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

नगररचना विभागाकडून बांधकाम मंजुरीच्या प्रकरणांमध्ये विविध नियमाखालील तरतुदीचे उल्लंघन होत असून त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान होत आहे.

मनपा चंद्रपूर येथील नगररचना विभाग महसूल प्राप्तीच्या दृष्टीने महत्वाचा विभाग असून वाढीव चटईक्षेत्र, गुंठेवारी, इमारत बांधकाम परवानगी/विकास/अनुज्ञप्ती नूतनीकरण इ. बाबींपासून मोठ्या प्रमाणावर उत्पन्न अपेक्षित असताना उचित नियंत्रण, नियमित सर्वेक्षणाअभावी पुढीलप्रमाणे अपेक्षेपेक्षा कमी उत्पन्न प्राप्त झाले.

सन 2016-2017

| उत्पन्नाच्या बाबी | अपेक्षित जमा होणारी रक्कम | प्रत्यक्ष उत्पन्न | टक्केवारी |
|---|---|---|---|
| गुंठेवारी | 5.00 कोटी | 0 | 0% |
| वाढीव चटईक्षेत्र | 5.00 कोटी | 0.39 | 8 % |
| इमारत परवाना/विकास/ अनुज्ञप्ती नूतनीकरण | 4.00 कोटी | 2.34 | 59% |

सन 2017-2018

| उत्पन्नाच्या बाबी | अपेक्षित जमा होणारी रक्कम | प्रत्यक्ष उत्पन्न | टक्केवारी |
|---|---|---|---|
| गुंठेवारी | 2.00 कोटी | 0 | 0% |
| वाढीव चटईक्षेत्र | 3.00 कोटी | 0.26 | 7% |
| इमारत परवाना/विकास/ अनुज्ञप्ती नूतनीकरण | 9.00 कोटी | 0.90 | 23% |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त कमी उत्पन्नाच्या अनुषंगाने लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

1) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 नुसार अभिन्यास / लेआउट्सना मंजुरी देताना एकूण क्षेत्रफळापैकी ठराविक क्षेत्र (उदा. 2 ते 5 हेक्टर क्षेत्राच्या ले आउट्स पैकी 20% क्षेत्र) लोकोपयोगी वापर आणि सोयीसुविधांसाठी (Public Utility) आरक्षित ठेवणे आवश्यक आहे. अशा आरक्षित क्षेत्रावर मैदाने, रस्ते, नाल्या इ सोयी अभिन्यासधारकाने मनपाच्या निर्देशांप्रमाणे विकसित करून मनपाकडे हस्तांतरित करावयाचे जिल्हाधिकारी यांनी विविध प्रकरणात अभिन्यासधारकांना, अकृषक वापरासाठी दिलेल्या परवानगी आदेशांनुसार बंधनकारक करण्यात आले आहे. परंतु नगरविकास विभागाकडे वरीलप्रमाणे विकसित करून हस्तांतरित करावयाच्या रस्ते, मैदाने, नाल्या इ मालमत्ताबाबत आवश्यक कार्यवाही झाल्याचे दिसत नाही.

परिणामी नगररचना विभागाकडील वसुली अत्यल्प झाल्याचे दिसते. नविन बांधकामांच्या अनुषंगाने नगरपरिषदांची विकास नियंत्रक नियमावली मधील नियम 6.2.10, 6.2.11, 6.2.13 व 6.2.14 नुसार अनुक्रमे परवानगी शुल्क, सुरक्षा ठेव, विकास शुल्क (नगररचना कायदा 1966 मधील कलम 124 A) व प्रिमिअम चार्जेसची आकारणी करण्याची तरतूद आहे. परंतु मनपा क्षेत्रात मोठ्या प्रमाणावरील बांधकाम उचित परवानगी शिवाय व नगररचना विभागाचे दुर्लक्षामुळे होत असल्यामुळे सदर शुल्कापासून मनपा वंचित आहे असे दिसते.

2)बांधकाम परवानगी देण्यास विलंब करणे :- नगरपरिषदांची विकास नियंत्रण नियमावली मधील नियम 6.6.3 नुसार " Sanction/ Refusal shall be given within 60 days of notice for permission otherwise it will be assumed as deemed permission causing loss of several fees"

बांधकाम परवानगी नोंदवहीचा आढावा घेतला असता सहा महिन्याच्या विहित मुदतीचे उल्लंघन करून विलंबाने मंजुरीची प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत असे दिसून आले.

उदा. श्री फुलदीप सिंग प्रीतमसिंग धुव्वा. --- मौजा- देवई.गो.

| | |
|---|---|
| प्रकरण क्र- 28 दी.07/05/2016 | विलंब 3 वर्ष |
| बांधकाम परवाना दी. 01/11/2019 | |

नगररचना विभागाकडे अशा प्रलंबित प्रकरणापैकी उपरोक्त नियम 6.6.3 मधील तरतुदीचा विकासकामांना/ मालमत्ताधारकांना लाभ होऊन विविध शुल्कांपासून प्राप्त होऊ शकणाऱ्या महसुलाचे मनपास नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

3) अग्निशमन उपाययोजना (Fire Sefety Measures) शिवाय नकाशा मंजूर करणे :- Fire Protection of national Buliding Code मधील भाग 4 व Maharashtra Fire prevention and life safety measures Act 2006 मधील तरतुदीनुसार सर्व प्रकारच्या इमारतीचे बांधकाम होणे आवश्यक आहे. MRTP Act 1966 अंतर्गत नगर परिषद विकास नियमावलीत नियम क्र 6.1 व 6.2 विशेष प्रकारच्या इमारतीच्या नकाशात अग्निशमन यंत्रणेची तरतूद असल्याशिवाय नकाशे मंजूर करता येत नाही. तसेच नियमावलीतील 6.2.12 नुसार सदर नकाशांना मनपाच्या किंवा शासनाच्या अग्निशमन अधिकाऱ्याकडून(अग्निशमनविषयक बाबीच्या संदर्भात) मान्यता प्राप्त करून घेणे अनिवार्य आहे. मात्र लेखापरीक्षणात बऱ्याच प्रकरणात अशी मान्यता घेण्यात आल्याचे दिसत नाही. त्यामुळे महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवन संरक्षक उपयोजना अधिनियम 2006 मधील कलम 11 (2) चे उल्लंघन होत असून आकारण्यायोग्य शुल्काची हानी होत आहे.

4)पूर्णत्वाचे प्रमाणपत्र व ताबा प्रमाणपत्र :- नगर रचना विभागाकडून सन 2016-17 व 2017-18 या वर्षात 282 बांधकामाची प्रकरणे मंजूर केली असून केवळ 26 प्रकरणी ताबा दिल्याचे दिसून येते. महाराष्ट्र महानगर पालिका अधिनियम 1949(सुधारणा) व महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम 1966 अन्वये भोगवटा

प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. तसेच नियम क्र 7.5 व 7.6 नुसार ताबा प्रमाणपत्र व पूर्णत्वाचे प्रमाणपत्र निर्गमित होणे गरजेचे आहे. उक्त वर्षांत अद्यापही 256 भोगवटा प्रमाणपत्र निर्गमित करण्याचे प्रलंबित दिसून येत आहेत. परिणामी अनधिकृत बांधकामे, अटी व शर्तीचे उल्लंघन यावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने नगररचना विभाग गंभीर नाही हे स्पष्ट होते. उपरोक्त नियमावलीतील विविध तरतुदीनुसार नगररचना विभागाचे नियंत्रण व अवैध बांधकामावर निर्बंध नसल्यामुळे अवैध बांधकामे करणाऱ्याविरुद्ध MRTP Act 1966 मधील कलम 52 नुसार तरतूद असलेल्या दंडाच्या रकमेचे नुकसान होत आहे.

सदर अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र 157 ,दि. 25.02.2021 नुसार विभागास अनुपालन/अभिप्राय सादर करण्यास कळविले होते. तथापि विभागाकडून समर्पक अनुपालन प्राप्त न झाल्यामुळे परिच्छेद नोंदविण्यात येत आहे.

DATSMBM7501 (Ref No : 80, Hmm No : 157)

## *57 अग्निशमन विभागामार्फत इमारतीवरील अग्निसेवा शुल्काची वसुली न केल्याने मनपाचे आर्थिक नुकसान झाल्याबाबत.*

**अग्निशमन विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 अंतर्गत विभाग 11(I) विभाग 13(I) अन्वये महानगरपालिकेच्या अंतर्गत क्षेत्रातील इमारतीवर अग्निशमन शुल्काची वार्षिक आकारून त्याची वसुली करणे आवश्यक आहे. परंतु मनपाचे अग्निशमन विभागामार्फत अशा प्रकारची अग्निशमन शुल्काची वसुली करण्यात आली नाही त्यामुळे महानगरपालिकेचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे.

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 मधील विभाग 11(I) मधील तरतुदीनुसार महानगरपालिका अंतर्गत क्षेत्रातील इमारतीवर अग्निसेवा शुल्काबाबत वार्षिक रु.10,000/- व विभाग 13(I) नुसार 1% दराने फी ची वसुली करण्याची तरतूद आहे.

परंतु मनपा चंद्रपूर यांनी वर्ष 2016-17 व 2017-18 मध्ये महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना

अधिनियम 2006 मधील नियम 11(I) अन्वये मनपा क्षेत्रातील इमारतीवर प्रतिवर्ष रु.10,000/- प्रमाणे अग्निशमन सेवा शुल्क व नियम 13(I) अन्वये 1% फी वसुली करण्यात आली नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले आहे.
अर्धसमास पत्र क्र.117 दि. 02.02.2021 नुसार मनपा चंद्रपूर क्षेत्रात अशा प्रकारच्या एकूण मालमत्ता व महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 मधील विभाग 11(I) व 13(I) अन्वये केलेल्या वसुलीबाबत माहिती उपलब्ध करण्यास कळविले असता अग्निशमन विभागाने पत्र क्र.347 दि.03/02/2021 नुसार कळविण्यात आले की अग्निशमन विभागाकरिता प्रशिक्षित अधिकारी/कर्मचारी यांची नेमणूक केली नसल्यामुळे महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 मधील 11(I) व विभाग 13(I) अन्वये अग्निशमन शुल्क/फी आकारणे, वसूल करणे याबाबत कार्यवाही करता आली नाही असे नमूद केले आहे. प्राप्त खुलासा संयुक्तिक नसल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.
तरी उपरोक्त आक्षेपामध्ये दर्शविल्याप्रमाणे वसुलीची कार्यवाही करून अनुपालन सादर करावे.

DATVVBM6301 (Ref No : 88, Hmm No : 117)

# कलम ९ क खालील आक्षेप

लेख्यामध्ये दाखविणे आवश्यक असतानाही लेख्यात दाखविण्यात आली नसेल अशी रक्कम

-------------------- **निरंक** -------------------

# भाग दोन

# सर्वसाधारण अनियमितता

# कलम ९ ड खालील आक्षेप

खंड अ,ब,क मध्ये नमूद केलेल्या बाबीं व्यतिरिक्त इतर महत्वाच्या अनुचित किंवा नियमबाह्य बाबी

## *58 वैद्यकीय प्रतीपुर्ती देयकासोबत आवश्यक दस्तावेज व प्रमाणपत्रे जोडली नसतांना प्रतीपुर्ती देयकांची रक्कम प्रदान करणे तसेच इतर अनियमितता.*

**सामान्य प्रशासन विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**
**अनियमितता संख्या : 2**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 2618561.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 398503.00/-

मनपा चंद्रपूर येथील सन 2017-18 मध्ये अंदाज पत्रकानुसार वैद्यकीय प्रतीपुर्ती बाबतचे खर्चाकरिता रु.26,18,561/- खर्च झाल्याचे नमुद आहे. वैद्यकीय प्रतीपुर्ती देयकांची पडताळणी केली असता सन 2016-17 मध्ये एकूण 14 कर्मचाऱ्यांचे रु. 1,48,092/- प्रदान केलेल्या देयकांत सोबत औषधाची प्रमाणके रुग्णालयीन खर्च तसेच आवश्यक प्रमाणपत्र व देयक मंजुरी बाबतचे कोणतेही दस्तावेज जोडलेले नाहीत. तसेच लेखा परीक्षण पथकास संबंधित खर्चाचे नस्त्या उपलब्ध करून दिलेल्या नसल्याने वैद्यकीय प्रतीपुर्ती रक्कम कशाचा आधारे मंजुर करून प्रदान करण्यात आली हे स्पष्ट होत नाही. त्यामुळे देयक प्रदानांत अनियमितता झाल्याचे दिसुन येते. तसेच वैद्यकीय प्रतीपुर्तीच्या खर्चाच्या संदर्भात सामान्य प्रशासन विभागात ठेवण्यात आलेल्या नियंत्रण नोंदवही व प्रत्यक्ष झालेल्या खर्चामध्ये तफावत आहे.

महानगरपालिका चंद्रपूर अंतर्गत वैद्यकीय प्रतीपुर्ती बाबतचे प्रदान सामान्य प्रशासन विभागामार्फत नियमित केले जात असल्याचे दिसुन येते. वर्ष 2017-18 मध्ये अंदाजपत्रकानुसार वैद्यकीय प्रतीपुर्ती या बाबीवर रु. 26,18,561/- खर्च झालेला आहे. प्रदान केलेल्या वैद्यकीय प्रतीपुर्तीच्या देयाकासंबंधी पुढीलप्रमाणे अनियमितता झाल्याचे दिसुन येते.

1. महाराष्ट्र शासन आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय क्र. बेपवि-101/ प्रक्र-205/मुंबई-32, दिनांक 31 जुलै 2009 मध्ये नमुद असल्याप्रमाणे वैद्यकीय खर्चाच्या प्रतीपुर्ती देयकामध्ये एकूण 7 कर्मचाऱ्यांच्या देयकांची रक्कम रु.2,50,411/- लेखा विभागाकडून मंजुर करून संबंधित कर्मचाऱ्यांना प्रदान करण्यात आली परंतु खालील दर्शविल्याप्रमाणे देयकासोबत जोडलेल्या औषधाच्या प्रमाणकावर रकम अदा केल्याचे संबधित कर्मचाऱ्यांनी नमुद करून स्वाक्षऱ्या केलेल्या नाहीत.

| अ. क्र. | प्रमाणक क्र. | नांव | औषध देयकांची रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|
| 1 | 417 27/10/2016 | श्री गौतम करमरकर (कुली) | 92385.00 |
| 2 | 418 27/10/2016 | श्री गौतम करमरकर (कुली) | 5402.00 |
| 3 | 419 27/10/2016 | श्री गौतम करमरकर (कुली) | 35240.00 |
| 4 | 203 21/07/2016 | श्री अनिल नन्हेट | 13937.00 |
| 5 | 199 21/07/2016 | श्री पांडुरंग चौधरी (शिपाई) | 12265.00 |
| 6 | 200 21/07/2016 | श्रीमती अंजनाबाई बनकर (क.ली.) | 52237.00 |
| 7 | 201 21/07/2016 | श्रीमती मालती खोटे (सफाई कामगार) | 38945.00 |
| एकूण | | | 2,50,411=00 |

2. त्याचप्रमाणे 2016-17 मधील खालील दर्शविलेल्या कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय प्रतीपुर्ती देयकासोबत कोणत्याही प्रकारचे दस्तावेज जोडलेले नाही.

| अ.क्र. | प्रमाणक क्र. व दिनांक | नांव | औषध देयकांची रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|
| 1 | 535 07/03/2018 | श्री भूपेश गोठे (स्वच्छता निरीक्षक) | 13668.00 |
| 2 | 419 27/10/2016 | श्री गौतम करमकर (कुली) | 101124.00 |
| 3 | 503 20/01/2017 | श्री भूपेश गोठे (स्वच्छता नि.) | 14400.00 |
| 4 | 556 27/02/2017 | श्री अरुण डंभारे (वा.चालक) | 18900.00 |
| एकूण | | | 1,48,092.00 |

तरी वर दर्शविलेल्या देयकासोबत वैद्यकीय खर्चाची प्रमाणके जोडली नसल्यामुळे व वैद्यकीय प्रतीपुर्ती देयक लेखा परीक्षण पथकास तपासणीस उपलब्ध करून न दिल्याने त्यामध्ये अनियमितता होण्याची शक्यता नाकारता येत नाही.
उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे वैद्यकीय प्रतीपुर्तीच्या देयकासोबत दस्तावेज न जोडणे तसेच प्रमाणकावर बिलाची रक्कम अदा करून स्वाक्षरी केलेल्या नसल्याबाबत अर्धसमास पत्र क्र.56 दिनांक 09/12/2020 नुसार खुलासा प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATDRMM6701 (Ref No : 7, Hmm No : 56)

## *59 मनपा कर्मचारी यांच्या एकूण वेतनामधून 50% या मर्यादेपेक्षा अधिक सक्तीच्या व ऐच्छिक कपाती करून अत्यल्प प्रमाणात वेतन प्रदान करण्यात येत असल्याबाबत.*

**GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT**
**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**
**अनियमितता संख्या : 1**

*महानगरपालिका स्व- निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

मनपा कर्मचारी यांना एकूण मासिक वित्तलब्धीतून सक्तीच्या व ऐच्छिक कपातीची मर्यादा 50% असताना कर्मचाऱ्याच्या वेतनातून 92% पर्यंत कपाती करून त्यांच्या किमान निर्वाहासाठी कमी रक्कम प्रदान करण्यात आली व शासन निर्णय क्र. अग्रिम - 1095/प्रक-70/96/विनियम, दि. 26/09/1997 च्या निर्देशांचे उल्लंघन करण्यात आले आहे.

राज्य शासनाने कर्मचाऱ्यांच्या स्थूल वेतनामधून (Gross pay) कपात करावयाच्या सक्तीच्या व ऐच्छीक वजातीबाबत वित्त विभाग शासन निर्णय क्र. अग्रिम ndash;1095/प्रक-70/96/विनियम, दि. 26/09/1997 मध्ये मर्यादा स्पष्ट केली आहे. त्यामधील अनुक्रमांक 4 नुसार वेतन देयकावरील नियमित वसुली व अग्रिम किंवा दंडनीय व्याजाची रक्कम मिळून होणारी वसुली एकूण वित्तलब्धीच्या 50% पेक्षा जास्त होणार नाही असे सूचित करण्यात आले आहे. त्यावरून कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांच्या किमान निर्वाहाकरीता स्थूल वेतनाच्या किमान 50% वेतनाची रक्कम कर्मचाऱ्यांना प्रत्यक्ष अदा करावे असे अपेक्षित आहे.

परंतु वर्ष 2016-17 मधील फेब्रुवारी 2017 व 2017-18 मधील फेब्रुवारी 2018 या महिन्याच्या वेतन देयकाची

तपासणी केली असता बऱ्याच प्रकरणात वेतनातून 50% ते 92% एवढी कपात केल्याचे आढळून आले.

उदाहरणार्थ:-मनपा चंद्रपूर येथील खालील दर्शविलेल्या कर्मचाऱ्यांचा एकूण वित्तलब्धीच्या 50% अधिक 92% टक्के पर्यंत कपाती केल्यामुळे अत्यल्प प्रमाणात वेतन प्रदान करण्यात आले.

1)वित्तीय वर्ष 2016-17 मधील फेब्रुवारी 2017 या महिन्याच्या वेतन देयकामधे केलेली कपात

| अ. क्र. | अधिकारी / कर्मचाऱ्यांचे नाव | पदनाम | स्थूल वेतन | वजाती | निव्वळ वेतन | कपातीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | श्री कवडू नेहारे | वरिष्ठ लिपिक | 30,104 | 16,253 | 13,851 | 53.98% |
| 2 | श्री सुरेश माळवे | कनिष्ठ लिपिक | 31,571 | 21,823 | 9748 | 69.12% |
| 3 | श्री भय्या शा चवरे | कनिष्ठ लिपिक | 29,681 | 20,012 | 9669 | 67.42% |
| 4 | श्री संतोष भा गर्गेलवार | स्वच्छता निरीक्षक | 28,801 | 20,176.50 | 8624.50 | 70.05% |
| 5 | श्री कृष्णा रमेश पित्तरकर | सफाई कामगार | 18,569 | 17,198 | 1371 | 92.61% |
| 6 | श्री संतोष लांडगे | लाईट हेल्पर | 20,919 | 16997.5 | 3921.50 | 81.25% |
| 7 | श्री दिलीप ग गिरडकर | सफाई कुली | 22,705 | 15,670.5 | 7034.50 | 69.01% |
| 8 | श्री देवानंद कार्लेकर | सफाई कुली | 24,232 | 16,348.50 | 7883.50 | 67.46% |
| 9 | श्रीमती गंगा गौतम टेनपे | सफाई रेज्या | 20,919 | 16,497.5 | 4421.50 | 78.86% |

2)वित्तीय वर्ष 2017-18 मधील फेब्रुवारी 2018 या महिन्याच्या वेतन देयकामधे केलेली कपात

| अ. क्र. | अधिकारी / कर्मचाऱ्यांचे नाव | पदनाम | स्थूल वेतन | वजाती | निव्वळ वेतन | कपातीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | श्री संतोष भा गर्गेलवार | स्वच्छता निरीक्षक | 30,991 | 25,194.50 | 8624.50 | 81.29% |
| 2 | श्री सुधाकर रा तोकलवार | सराय चौकीदार | 31,963 | 23,204 | 8758 | 72.58% |
| 3 | श्री जितेंद्र मिठूलाल सारसार | सफाई कामगार | 18,433 | 13,983 | 4450 | 75.85% |
| 4 | श्रीमती कल्पना दे छप्परबंद | सफाई कामगार | 18,433 | 15,812 | 2621 | 85.78% |
| 5 | श्रीमती कुरीना लक्ष्मण भुते | सफाई कामगार | 17,375 | 14,926 | 2449 | 85.90% |
| 6 | श्री विनोद मुलचंद नुरकेल | सफाई कामगार | 15,456 | 14,207 | 1249 | 91.91% |

शासन निर्देशानुसार स्थूल वेतनातून सक्तीच्या कपाती वगळता करावयाच्या इतर कपातीची मर्यादा निश्चित करण्यात आली असतांना त्याकडे संबंधित आहारण व संवितरण अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत आहे असे दिसते. उपरोक्त उदाहरणादाखल नमूद प्रकरणाव्यतिरिक्त अन्य विभागातीलही प्रकरणाचा आढावा घेऊन निर्देशानुसार अंमलबजावणी करून अनुपालन सादर करावे.

याबाबत अर्धसमास क्र. 37 दि. 10/11/2020 अन्वये खुलासा मागविण्यात आला असता मनपा चंद्रपूर यांनी याबाबत समाधानकारक खुलासा न दिल्यामुळे आक्षेप नोंदविण्यात आलेला आहे.

DLFIBBM9301 (Ref No : 12, Hmm No : 37)

## *60 चंद्रपूर महानगरपालिका अंतर्गत सामान्य प्रशासन विभागातील सेवा पुस्तकांतील अनियमितता तसेच वेतन निश्चिती बाबत.*

**सामान्य प्रशासन विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 05**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 च्या नियम 38 व 45 नुसार शासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवा पुस्तकात त्यांचे सेवा कालावधीमध्ये घडणाऱ्या सर्व प्रकारच्या घटनांची नोंद घेण्याची जबाबदारी कार्यालय प्रमुखाची असुन सेवापुस्ताकांत वार्षिक वेतनवाढी, तात्पुर्ती व स्थानापन्न पदोन्नत्या, रजेच्या नोंदी व हिशेब, जात पडताळणी नोंद, निवृत्ती वेतन नामनिर्देशनाची नोंद, सेवापडताळणी नोंद, मराठी व हिंदीभाषा सुट मिळाल्याची नोंद, DCPS लेखा क्रमांकाची नोंद इत्यादी नोंदी घेऊन कार्यालय प्रमुखाने साक्षांकित करणे आवश्यक आहे. अशा नोंदी सेवापुस्ताकांत घेण्यात आलेल्या नाहीत. |

महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 च्या नियम 38 व 45 नुसार शासकीय कर्मचाऱ्यांचा सेवा पुस्तकांत कर्मचाऱ्यांच्या सेवा कालावधीमध्ये घडणाऱ्या सर्व प्रकारच्या घटनांची नोंद घेण्याची जबाबदारी कार्यालय प्रमुखाची असुन सेवापुस्तकांत वार्षिक वेतनवाढी, तात्पुर्ती पदोन्नती व पदस्थापना, रजेच्या नोंदी व रजेचा हिशेब, चारित्र्याचे प्रमाणपत्र, वैद्यकीय तपासणी, सेवापडताळणी नोंद, संगणक परीक्षा उत्तिर्ण नोंद, मराठी व हिंदी भाषा सुट मिळाल्याची नोंद, परिभाषित अंशदान योजनेच्या खाते क्रमांकाची नोंद, गटविमा योजनेच्या सदस्यत्वाची नोंद तसेच भविष्यनिर्वाह निधी, गटविमा, मृत्यु, सेवानिवृत्ती इत्यादी बाबतचे नामनिर्देशन व सर्व नोंदी घेऊन कार्यालय प्रमुखांनी स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. मनपा चंद्रपूर अंतर्गत काही कर्मचाऱ्यांचा सेवापुस्तकांची सन 2016-17 व 2017-18 चे लेखापरिक्षण दरम्यान पडताळणी केली असता सेवापुस्तकांत आवश्यक नोंदी घेण्यात आल्या नसल्याचे आढळून आले.

1. हिंदी/मराठी भाषा सुट दिल्याच्या नोंदी सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश, अधिसुचना व परिपत्रक दिनांक 30/12/1987 दिनांक 01/01/1993, दिनांक 01/02/2001 व दिनांक 08/05/2003 नुसार सर्व अधिकारी व कर्मचारी यांना मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे अथवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सुट मिळणे बाबत संबधित कार्यालयातील नियुक्ती प्राधिकारी यांनी आदेश काढून मराठी/हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सुट मिळणे बाबतची नोंद सेवापुस्तकांत घेण्यात आलेली नाही.

2. महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 मधील नियम क्र.5 मध्ये नमुद असल्याप्रमाणे भविष्य निर्वाह निधीच्या प्रत्येक वर्गणीदारास नामनिर्देशन कार्यालय प्रमुखाकडे भरून देणे आवश्यक आहे. परंतु पडताळणी केलेल्या कोणत्याही सेवापुस्तकांत भविष्य निर्वाह निधी, मृत्यु नि सेवा उपदान, कुटुंब निवृत्ती वेतन तसेच गटविमा योजनेचा नामनिर्देशनपत्र सेवापुस्तका सोबत संलग्न केल्याचे दिसुन येत नाही.

3. महाराष्ट्र नागरी सेवा (संगणक हाताळणी वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्याबाबत) नियम 1999 च्या नियम 2 व नियम 4 अन्वये दिनांक 01/01/2001 रोजी सेवेत असलेल्या कर्मचाऱ्याने संगणक परीक्षा उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. परंतु पडताळणी केल्याप्रमाणे बऱ्याच सेवापुस्तकामध्ये संगणक परीक्षा उत्तीर्ण केल्याची नोंद दिसुन आलेली नाही.
शासन निर्णयाचा दिनांकास किंवा त्यानंतर सेवेत लागलेल्या गट अ,ब व क कर्मचाऱ्यांना सेवेत लागल्यापासून

दोन वर्षाच्या आंत संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. सामान्य प्रशासन विभाग यांचे शासन निर्णय दिनांक 19/03/2003 नुसार जे कर्मचारी अशा प्रकारचे प्रमाणपत्र सादर करणार नाहीत अशा सर्व कर्मचाऱ्यांच्या सेवा समाप्त करण्यात येईल व जे कर्मचारी दिनांक 19/03/2003 पुर्वी सेवेत लागलेले आहेत अशा कर्मचाऱ्यांचे बाबतीत सुट प्राप्त होईस्तव वेतनवाढ रोखण्यात येईल अशीपण तरतूद आहे. परंतु अशी कार्यवाही होत असल्याचे दिसून येत नाही.

4. कर्मचाऱ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र सादर किंवा नाही याची नोंद सेवापुस्तकांमध्ये घेण्यांत आलेली नाही.

5. वेतन निश्चिती करतांना तसेच वार्षिक वेतनवाढ चुकीची दिल्याने खालीलप्रमाणे कर्मचाऱ्यांना अतिप्रदान झालेले आहे.

1. श्री लक्ष्मण आत्राम (स्वच्छता निरीक्षक)
2. श्री अनिल बनकर ( कनिष्ठ लिपिक)
3. श्री प्रदीप पाटील (कनिष्ठ लिपिक)
4. श्री अतुल पारेलवार ( कनिष्ठ लिपिक)
5. श्री सुरेश माळवे (कनिष्ठ लिपिक)
6. श्री राजेश झाडे (कनिष्ठ लिपिक)

इत्यादी कर्मचाऱ्यांचा चुकीच्या वेतन वाढीमुळे शासन परिपत्रक वित्त विभाग क्र./वेपर/प्रक्र 691/ सेवा-9 दिनांक 05/05/2010 परि. क्र. 2.5 मध्ये नमुद केल्यानंतर वेतन वाढी देतांना 3% वेतन वाढीची परिगणना करतांना 1 रुपया व त्यापुढील रक्कमा 10 च्या पटीत घेण्यात येऊन 0.99 पैसे दुर्लक्षित करणेबाबत शासनाचे आदेश आहेत. उदा :- 3% वेतनवाढ रुपये 250.40 अशी परिगणना होत असल्यास .40 पैसे दुर्लक्षीत असून रु.250.00 वेतन वाढ देय ठरेल. उपरोक्त कर्मचाऱ्यांचा अतिप्रदान झालेल्या रक्कमा वसुल करून कार्यमुक्त आदेशासह कार्यालय प्रमुखाच्या स्वाक्षरीसह सेवापुस्ताकांत नोंदी घेण्यात यावे.
त्याचप्रमाणे सन 2014-15 च्या आक्षेपानुसार खालीलप्रमाणे कर्मचाऱ्यांचे अतिप्रदान रक्कम वसुल न केल्याचे निदर्शनास आलेले आहे.

1. श्री पायल शंभु मंडल (रेज्या)
2. श्री उदय मैलरपवार (स्वच्छता निरीक्षक)
3. श्री भुषण ठकरे (कनिष्ठ लिपिक)

उपरोक्त कर्मचाऱ्यांकडून अतिप्रदान झालेल्या रक्कमा वसुल केल्याचा नोंदी सेवापुस्तकांत घेतलेल्या आहेत. परंतु सदर नोंदी मोघम घेतल्याचे निदर्शनास येते. वसुली केल्याचा नोंदीवर सक्षम प्राधिकाऱ्यांची स्वाक्षरी नाही. तसेच कार्यालयीन आदेश क्रमांक व दिनांकसह नोंदी नाही व वसुलीचे विवरणपत्र नाही. अतिप्रदान रक्कम वसूल केली असल्यास कार्यालयीन आदेश क्रमांक व दिनांकासह नोंदी घेऊन त्या साक्षांकित कराव्यात.

याबाबत अर्धसमास पत्र क्र.53 दिनांक 08/12/2020 नुसार खुलासा मागितला असता कोणताही खुलासा प्राप्त न झाल्यामुळे आक्षेप नोंदविण्यात येत आहे. मनपाच्या सर्व विभागातील कार्यरत कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकातील

उपरोक्त 1 ते 5 बाबीची पूर्तता करून अनुपालन सादर करावे.

DATDRMM6701 (Ref No : 14, Hmm No : 53)

## *61 रोख तसेच मौल्यवान वस्तु हाताळणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून क्षतीपुर्ती बंधपत्र न घेतल्याबाबत.*

**लेखा विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 00**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

मुंबई वित्तीय नियम 1959 च्या नियम 51 नुसार शासनाच्या / संस्थेच्या रोख रक्कम मौल्यवान वस्तु हाताळणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून सुरक्षा ठेव जमा करणे, विमा उतरविणे अथवा क्षतीपुर्ती बंधपत्र घेणे आवश्यक असतांना मनपा चंद्रपूर येथील कर्मचाऱ्यांकडून क्षतीपुर्ती बंधपत्र सुरक्षा ठेव न घेतल्याची अनियमितता आढळून आली.

मुंबई वित्तीय नियम 1959 च्या नियम 51 नुसार रोखपाल,भांडारपाल,रोख संग्रहक, कर संग्रहक ह्या कर्मचाऱ्यांना रोख रकम, मुद्रांक शुल्क किंवा मौल्यवान वस्तु हाताळाव्या लागतात. त्याकरिता या कर्मचाऱ्यांकडून सुरक्षा ठेव,विमा काढणे किंवा क्षतीपुर्ती बंधपत्र घेणे आवश्यक आहे. मनपा चंद्रपूर येथील कर व इतर विभागातील कर्मचाऱ्यांनी वर्ष 2016-17 मध्ये एकूण रु.29,48,48,969/- वर्ष 2017-18 मध्ये एकूण रु.24,50,61,710/- एवढी रक्कम हाताळल्याचे दिसून आले आहे.

अंदाजपत्रकीय प्रत्यक्ष जमेच्या आकडेवारीनुसार वर्ष 2016-17 मध्ये 29,48,48,969/- व वर्ष 2017-18 मध्ये 24,50,61,710/- कर व इतर उत्पन्नापोटी मनपाच्या विविध कर्मचाऱ्यामार्फत महसूल गोळा करण्यात आला. परंतु संबंधित कर्मचाऱ्यांकडून सुरक्षा रकम जमा केल्याचे, रकमेचा विमा काढल्याचे किंवा क्षतीपुर्ती बंधपत्र घेतल्याचे दिसून आले नाही. हि गंभीर स्वरुपाची बाब आहे. तरी सदर बाबीकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात येत असून योग्य कार्यवाही सह अनुपालन सादर करावे.

याबाबत अर्धसमास पत्र क्र.18 दिनांक 29/10/2020 नुसार खुलासा मागितला असता प्राप्त न झाल्यामुळे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

## *62 निवृत्तीवेतनधारकांना सेवानिवृत्तीवेतन विषयक प्रथम लाभाचे प्रदान विलंबाने करणे व इतर अनियमिततेबाबत*

**ACCOUNT**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 2**

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| 1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.सेनिवे-1091/55सेवा-4 दि.06.05.1991 नुसार सेवानिवृत्त कर्मचा-यांना सेवानिवृत्तीनंतर त्याला देय असलेल्या निवृत्तीवेतन विषयक लाभाचे प्रथम प्रदान विनाविलंब करणे आवश्यक आहे. प्रशासकीय विलंबाबाबत सेवानिवृत्तेवतन/उपदानावर उक्त शासन निर्णयानुसार व्याज देय आहे. मनपाच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांच्या प्रथम प्रदान प्रकरणाची तपासणी केली असता विलंबाने प्रदान करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. 2) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मध्ये निवृत्तीवेतनसंबंधी नमूद नोंदवहया विभागात न ठेवणे वा सक्षम प्राधिकाऱ्याकडून त्या प्रमाणित न करणे. |

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम 1982 मधील नियम 10(4)(5),62,66,68 किंवा 81 अंतर्गत निवृत्तीवेतन प्रकरणामध्ये निवृत्तीवेतनाबाबतची कागदपत्रे तयार करणेबाबतची कार्यपध्दती विशद केली आहे. महानगरपालिका चंद्रपूरच्या आस्थापनेवरुन सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांना निवृत्तीवेतनाचे प्रथम प्रदान करण्यात आलेल्या प्रकरणाची तपासणी केली असता कर्मचा-यांना निवृत्ती वेतन, उपदान रकमेचे प्रदान विलंबाने केल्याचे निदर्शनास आले आहे. उक्त शासन निर्णयातील तरतूदीनुसार सेवानिवृत्त कर्मचा-यांना सेवानिवृत्तीवेतन विषयक लाभाचे प्रथम प्रदान विनाविलंब करणे आवश्यक आहे. निवृत्तीवेतनधारकांना विलंबाने प्रदान केल्यास देय रकमेवर विहित दराने व्याज देय ठरते. मनपाचे लेखा शाखेतील निवृत्तीवेतन कार्यासनाकडील निवृत्तीवेतन प्रकरणाची तपासणी केली असता प्रथम लाभाचे प्रदान विलंबाने केले असून शासन निर्णयातील तरतूदीचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आले आहेत. पुढील प्रकरणात विलंबाने प्रदान करण्यात आले आहे.

| निवृत्तीवेतनधारकांचे नाव व पदनाम | सेवानिवृत्तीचा दिनांक | प्रदान करावयाची एकूण रक्कम | प्रथम प्रदानाचा प्रमाणक क्रमांक व | विलंब कालावधी |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | दिनांक | |
| श्री प्रकाश रामचंद्र पडगेलवार<br>कनिष्ठ लिपिक | 31.01.2016 | रु.72,831/- | 27 दि.05.07.2016 | 6 महिने 4 दिवस |
| श्री ब्रिजेश छोटेलाल हाते<br>सफाई कामगार | 31.07.2016 | रु.1,72,350/- | 73 दि.21.01.2017 | 5 महिने 21 दिवस |
| श्री. मनोहर धांडे<br>शिपाई | 30.06.2008 | रु.18,563/- | 114 दि.31.03.2017 | 8 वर्ष 9 महिने |
| श्री. चंद्रशेखर मारोतराव महेशकर<br>कनिष्ठ लिपिक | 30.06.2011 | रु.39,483/- | 115 दि.31.03.17 | 5 वर्ष 9 महिने |
| श्री कवडू भुज्या डोंगरे<br>फायरमन | 30.06.2016 | रु.186780/- | 61 दि.16.11.2016 | 4 महिने16 दिवस |
| श्रीमती जाईबाई नारायण मेश्राम<br>सफाई रेज्या | 30.06.2015 | रु.74662/- | 63 दि.16.11.2016 | 4 महिने<br>16 दिवस |
| श्रीमती मिना विठ्ठल चहारे<br>बांधकाम रेज्या | 30.06.2015 | रु.1,28,012/- | 64 दि.16.11.2016 | 4 महिने<br>16 दिवस |
| श्री. सोनू हुसेन जुमनाके<br>सफाई कुली | 31.08.2016 | रू.79,305/- | 81 दि.21/01/2017 | 4 महिने 21 दिवस |
| श्रीमती शंकुतला नामदेव सोरते<br>सफाई रेज्या | 28.02.2017 | रु.81,638/- | 24 दि.11.07.2017 | 4 महिने 11 दिवस |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| श्री शैलेंद्र गुलाबराव डांगे<br>बांधकाम कुली | 30.09.2016 | रु.49,833/- | 52 दि.15.09.2017 | 11 महिने 15 दिवस |

उपरोक्त नमुद प्रकरणे नमुन्यादाखल असून इतर प्रकरणातही विलंबाने प्रदान झाल्याचे आढळून आले आहे.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मध्ये निवृत्तीवेतनसंबंधी नमूद नमुना 97 निवृत्तीवेतन लेखापरीक्षा नोंदवही लेखा विभागात ठेवण्यात आली नाही. नमुना 96 उपदान नोंदवही वित्तीय वर्ष 2016-17 व 2017-18 मध्ये एकदाही सक्षम प्राधिकाऱ्याकडून प्रमाणित करण्यात आली नाही. तसेच नोंदवहया वर सक्षम प्राधिकाऱ्याच्या स्वाक्षऱ्या केलेल्या नाहीत. करिता सदर अभिलेख लेखापरीक्षणाकरिता अधिकृत मानता येत नाही.

सदर बाबीकरिता अर्धसमास पत्र क्रमांक 24, दिनांक 03/11/2020 व अर्धसमास पत्र क्रमांक 71, दिनांक 17/12/2020 ला निर्गमित करण्यात आले असता आजपावेतो खुलासा प्राप्त न झाल्यामुळे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DLFIBBM9301 (Ref No : 21, Hmm No : 24)

## *63 नवीन परिभाषित योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने योजनेत समाविष्ट कर्मचाऱ्यास वर्षनिहाय जमाचिठ्ठी/अंशदान वार्षिक विवरणपत्र वाटप न करणे तसेच उक्त योजनेचे स्वतंत्र रोखपुस्तक न ठेवण्याच्या अनियमिततेबाबत*

**ACCOUNT**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमि तता संख्या : 2**

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

चंद्रपूर महानगरपालिका येथील आस्थापनेवर दिनांक 01/11/2005 नंतर शासन सेवेत नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या अंशदान योजनेच्या अनुषंगाने अभिलेखे व नोंदवहयाची पडताळणी केली असता कर्मचाऱ्यांच्या मासिक वेतनातून परिभाषित अंशदान निवृत्तीवेतनाची शासन निर्णयानुसार 10% रक्कम कपात करण्यात येत असून सदर योजनेत मनपाचे 10% समतुल्य अंशदान नियमित जमा करण्यात येत आहे. परंतु योजनेत नमूद निर्देशानुसार अंमलबजावणीच्या अनुषंगाने योजनेत समाविष्ठ कर्मचाऱ्यास वर्षनिहाय जमाचिठ्ठी

/अंशदान वार्षिक विवरणपत्र वाटप करण्यात येत नसून उक्त योजनेबाबतचे स्वतंत्र रोखपुस्तक ठेवण्यात आलेले नाही.

शासन निर्णय वित्त विभाग क्र.अनियो/1005/126/सेवा-4 दिनांक 31/10/2005 व शासन निर्णय अनियो/1007/18/सेवा-4 दिनांक 07/11/2007 नुसार दिनांक 01/11/2005 नंतर शासन सेवेत नव्याने रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांना प्रचलित पद्धतीनुसार निवृत्तीवेतन देय नसल्याने नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू करण्यात आली आहे. यामध्ये कर्मचाऱ्यांच्या वेतनातून 10% रक्कम कपात करून आलेली रक्कम व तेवढेच समतुल्य अंशदान मनपा हिस्सा म्हणून अंशदान खात्यात जमा करणे आवश्यक आहे. या दोन्ही रक्माची एकत्रित रक्कम विहित व्याजदरासह कर्मचाऱ्यांस तो सेवानिवृत्त झाल्यास लाभ म्हणून देय असल्याची तरतूद करण्यात आली आहे.

चंद्रपूर मनपाच्या निवृत्तीवेतन अंशदान सभासद नोंदणी रजिस्टर तपासले असता सन 2016-17 या वर्षात सदर योजनेत एकूण 134 सभासद असून कर्मचाऱ्यांचे अंशदान व मनपाचे अंशदान असे एकूण रुपये 50,56,136/- अंशदान निधीत मनापाकडून जमा करण्यात आलेले आहे. तसेच 2017-18 मध्ये एकूण 164 सभासद असून कर्मचाऱ्यांचे अंशदान व मनपाचे अंशदान असे एकूण रुपये 58,36,100/- अंशदान निधीत मनापाकडून जमा करण्यात आलेले आहे. मात्र योजनेतील शासन निर्णयात नमूद निर्देशानुसार समाविष्ट सभासदांना वर्षनिहाय जमाचीठ्याचे वाटप मनपा कडून करण्यात येत नाही. त्यामुळे सभासदांना त्यांच्या अंशदान खात्यात वर्षनिहाय जमा रक्कम किती व त्यावरील व्याज किती याची खातरजमा करता येत नाही.

उक्त योजनेच्या अनुषंगाने वर्षनिहाय ठेवण्यात आलेल्या अंशदान नोंदवहीची तपासणी केली असता प्रत्येक वर्षात जमा होणारे अंशदान (कर्मचारी+मनपा हिस्सा) व त्यावरील अनुदेय असणारे व्याज अचूक असल्याची खातरजमा सक्षम अधिकारी अथवा अंतर्गत लेखापरीक्षक यांनी करणे गरजेचे आहे व त्या नोंदवहीत सक्षम प्राधीकाऱ्याची स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. भविष्यात सदर योजनेचे वाढते स्वरूप लक्षात घेता या योजनेकरिता स्वतंत्र रोखपुस्तक ठेवणे गरजेचे आहे. परंतु मनपाकडून असे रोखपुस्तक ठेवण्यात आलेले नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांचे अंशदान, मनपाचे अंशदान व त्यावरील अनुज्ञेय व्याज, अंशदान रकमेच्या ठेवण्यात आलेल्या मुदत ठेवी व परताव्या प्रकणाच्या अनुषंगाने जमा व खर्च झालेल्या रकमेची ताळमेळ पासबुकाशी करता आले नाही.

याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 70 दि.17/12/2020 अन्वये रोखपुस्तक तसेच वर्षनिहाय जमाचिठ्ठी /अंशदान वार्षिक विवरणपत्र वाटप नोंदवहीची मागणी केली असता, सदर नोंदवही लेखापरिक्षणास उपलब्ध न केल्यामुळे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DLFIBBM9301 (Ref No : 22, Hmm No : 70)

## *64 कर्ज नोंदवहीतील शिल्लक रकमेतील तफावत तसेच इतर अनियमितता.*

**Account Department**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 2**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

वर्ष 2016-17 व 2017-18 या वर्षातील मनपा चंद्रपूर येथील मार्च 2017 अखेर व मार्च 2018 अखेर कर्ज नोंदवही नुसार शिल्लक व प्रत्यक्ष केलेली परतफेड वजा करून असलेली शिल्लक यामध्ये अनुक्रमे रु.5,63,125/- व रु.3,93,520/- येवढी तफावत असल्याचे दिसून आले तसेच पाणीपुरवठा योजनेकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडून घेतलेल्या कर्ज परतफेडीच्या नोंदी कर्ज नोंदवहीमध्ये स्वाक्षरीसह अद्यावत केलेल्या नाहीत.

मनपा चंद्रपूर येथील वर्ष 2016-17 व 2017-18 या वर्षातील कर्ज नोंदवही पडताळणी केली असता पुढे दर्शविल्याप्रमाणे अनियमितता दिसून आल्या.

1. मार्च 2017 व मार्च 2018 अखेर कर्ज नोंदवहीनुसार खाली दर्शविल्याप्रमाणे कर्जाची शिल्लक व केलेली परतफेड दर्शविली आहे.

वर्ष 2016-17 (रुपये लाखात)

| अ. क्र. | कर्ज घेतल्याचा दिनांक | घेतलेले कर्ज | व्याज दर | 2017 पर्यंत एकूण परतफेड | 2017 अखेर शिल्लक | नोंदवही नुसार शिल्लक | तफावत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 15/09/94 | 10,25,000 | 12% | 9,22,500 | 1,02,500 | 4,80,245 | 3,77,745 |
| 2. | 03/04/98 | 6,00,000 | 13% | 3,41,440 | 2,58,560 | 4,43,940 | 1,85,380 |

वर्ष 2017-18 (रुपये लाखात)

| अ. क्र. | कर्ज घेतल्याचा दिनांक | घेतलेले कर्ज | व्याज दर | 2018 पर्यंत एकूण परतफेड | 2018 अखेर शिल्लक | नोंदवही नुसार शिल्लक | तफावत |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 15/09/94 | 10,25,000 | 12% | 9,73,750 | 51,250 | 3,92,690 | 3,41,440 |
| 2. | 03/04/98 | 6,00,000 | 13% | 3,00,415 | 2,99,585 | 3,51,665 | 52.080 |

वर दर्शविल्याप्रमाणे वर्ष 2016-17 व 2017-18 मधील कर्ज नोंदवहीमध्ये वेगवेगळ्या कर्ज परतफेडीच्या नोंदीसमोर प्रत्यक्ष केलेली परतफेड वजा करून असलेली शिल्लक व कर्ज नोंदवही मध्ये दर्शविलेली शिल्लक यामध्ये अनुक्रमे रु.5,63,125/- व रु.3,93,520/- येवढी तफावत असल्याचे दिसून येते. तसेच कर्ज नोंदवहीमध्ये कर्ज परतफेडीच्या नोंदी व शिल्लक यावर कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्यांची स्वाक्षरी नाही. त्यामुळे अधिकाऱ्याचे प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याचे दिसून येते.

2. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मुंबई यांचेकडून घेतलेल्या पाणीपुरवठा योजनेकरिता कर्जाची नोंदी कर्ज नोंदवहीच्या पृष्ठ क्र.62,64 व 65 असा नमूद आहे.परंतु त्या कर्जाची परतफेड किंवा समायोजन झाल्याची सक्षम अधिकाऱ्याची स्वाक्षरीसह नोंद नाही. त्यामुळे नोंदवहीत दर्शविलेले कर्ज दीर्घ कालावधीपासून शिल्लक असल्याचे दिसून येते.

उपरोक्त मुद्द्याबाबत अर्धसमास पत्र क्र. 22 दिनांक 23/12/2020 नुसार खुलासा प्राप्त न झाल्यामुळे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATVVBM6301 (Ref No : 37, Hmm No : 22)

## *65 वार्षिक विवरणपत्रे शासनाकडे व महालेखापाल यांना सादर न केल्याबाबत.*

**लेखा विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व-निधी व शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

चंद्रपूर मनपाने वर्ष 2016-17 व 2017-18 या वर्षातील महाराष्ट्र महानगरपालिकेने अधिनियमाचे नियम 126 नुसार प्रत्येक वर्षाचे शेवटी वार्षिक विवरणपत्रे तयार करून ते शासनाकडे व महालेखापाल यांना सादर करणे आवश्यक होते. परंतु मनपाद्वारे अशाप्रकारे कार्यवाही करण्यात आली नाही.

महानगरपालिका चंद्रपूर यांनी सन 2016-17 व 2017-18 मधील वार्षिक विवरणपत्रे शासनाकडे व महालेखापाल यांना सादर केले नाहीत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील नियम 126 नुसार मनपा आयुक्त यांनी प्रत्येक वर्षाच्या शेवटी मनपाचे जमा खर्चाचे वित्तीय विवरणपत्रे त्यात मनपाची देय असलेली कर्जे, जमा रक्कम, खर्च रक्कम, कर्ज निवारण निधी, अधिभार उल्लेख असलेली वित्तीय विवरणपत्रे तयार केली पाहिजेत. सदर विवरणपत्रे महानगरपालिकेच्या बैठकापुढे ठेऊन मनपाच्या स्थायी समितीच्या बैठकीत मंजुरी घेऊन हि वित्तीय विवरणपत्रे शासकीय राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली पाहिजे व अशा विवरणपत्राची एक प्रत राज्य शासनाकडे व महालेखापाल यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे. परंतु मनपा चंद्रपूर यांनी वर्ष 2016-17 व 2017-18 मध्ये अशा प्रकारची कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र.88 दि.07/01/2021 नुसार लेखा विभागास अनुपालन सादर करण्यास कळविण्यात आले होते. परंतु अनुपालन प्राप्त न झाल्याने आक्षेप घेण्यात येत आहे.

DATVVBM6301 (Ref No : 87, Hmm No : 88)

## *66 चंद्रपूर महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थींना ओळखपत्र /गणवेश /बूट मोजे व दप्तर पुरवठा करण्यात झालेल्या अनियमिततेबाबत.*

**शिक्षण विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 8**

*लेखा शीर्ष :7 महानगरपालिका स्व-निधी व शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

चंद्रपूर शहर महानगरपलिका चंद्रपूर अंतर्गत सर्व प्राथमिक/ माध्यमिक शाळांना, शाळेतील विद्यार्थींना (मुला-मुलींना) गणवेश/बूट/ दप्तर उपलब्ध करून देण्यासाठी शासनाकडून (जिल्हा परिषद / पंचायत समिती) तसेच मनपाकडून प्रत्येक वर्षी अनुदान प्राप्त होत आहे. सदर अनुदान खर्च करीत असतांना महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांचे परिपत्रक क्र.मप्रशिप/सशिआ/गणवेश/2016-17/1291 दिनांक 26/05/2016 तसेच मप्रशिप/सशिआ/गणवेश/2017-18/594 दिनांक 18/03/2017 नुसार सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत लाभार्थी विद्यार्थ्यांना गणवेश पुरविण्याबाबतची मार्गदर्शक तत्वे त्याबाबतचे निकष व कार्यप्रणाली विषद करण्यात आलेली आहे. मात्र शिक्षण विभागाकडून अशी कार्यवाही करण्यात येत नसल्याचे आढळून आले.

चंद्रपूर शहर महानगरपलिका चंद्रपूर अंतर्गत सर्व प्राथमिक/ माध्यमिक शाळांना, शाळेतील विद्यार्थींना (मुला-

मुलींना) गणवेश/बूट/ दप्तर उपलब्ध करून देण्यासाठी शासनाकडून (जिल्हा परिषद / पंचायत समिती) तसेच मनपाकडून प्रत्येक वर्षी अनुदान प्राप्त होत आहे. सदर अनुदान खर्च करीत असतांना महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांचे परिपत्रक परिपत्रकक्र.मप्रशिप/सशिआ/गणवेश/2016-17/1291 तसेच मप्रशिप/सशिआ/गणवेश/2017-18/59 दिनांक 26/05/2016 तसेच 18/03/2017 सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत लाभार्थी विद्यार्थ्यांना गणवेश पुरविण्याबाबतची मार्गदर्शक तत्वे त्याबाबतचे निकष व कार्यप्रणाली विषद करण्यात आलेली आहे. मात्र शिक्षण विभागाकडून अशी कार्यवाही केली जात नसल्याचे दिसून येते.

सन 2016-17 व 2017-18 वर्षांत पुरवठा केलेल्या वस्तूची यादी खालील प्रमाणे वर्षनिहाय आहे.

सन 2016-17

| अ.क्र. | खर्चाचे प्रयोजन | कंत्राट किंवा फर्म चे नाव | प्रमानक क्रमांक | दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | विद्यार्थ्यांना ओळखपत्र पुरवठा | विकास फोटो स्टुडियो | 1485 | 04/10/17 | 183750 |
| 2 | दप्तर पुरवठा | मे.शिखरचंद जैन | 832 | 01/08/17 | 306237 |
| 3 | बूट व मोजे पुरवठा | मे. दामोदर तोष्णीवाल | 833 | 01/08/17 | 394572 |

सन 2017-18

| अ.क्र. | खर्चाचे प्रयोजन | कंत्राट किंवा फर्म चे नाव | प्रमानक क्रमांक | दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | दप्तर पुरवठा | मे. दामोदर तोष्णीवाल | 3194 | 28/03/18 | 340153 |
| 2 | बूट व मोजे पुरवठा | मे. दामोदर तोष्णीवाल | 3195 | 28/03/18 | 424290 |
| 3 | गणवेश पुरवठा | अरिहंत ट्रेडस | 2642 | 08/02/18 | 476748 |

विहित वर्षांत केलेल्या पुरवठा वस्तूच्या अनुषंगाने अनियमितता.

01) मनपाकडून विद्यार्थ्यांसाठी तयार करण्यात आलेले ओळखपत्रे वितरीत केल्याबाबत विद्यार्थ्यांची यादी स्वाक्षरीसह नमूद नाही. त्यामुळे ओळखपत्रे वितरीत करण्यात आले किंवा नाही याबाबत खात्री पटत नाही.

02) शाळेतील विद्यार्थ्यांस ओळखपत्रे प्राप्त झाले याबाबत मुख्याध्यापक यांचे प्रमाणित केलेले प्रमाणपत्र

नस्तीत नाही.

03) गणवेश वाटप शाळा सुरु होण्यापूर्वी किमान एक दिवस अगोदर करावी तसेच शाळेत नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना एक महिन्याचे आत गणवेश वाटपाचे आदेश असतांना शिक्षण विभागाकडून सदर कार्यवाही विलंबाने करण्यात आलेली आहे.

04)गणवेश वाटपाबाबतचा अहवाल व्यवस्थापन समितीने गटशिक्षण अधिकारी पंचायत समिती यांना सादर केलेला नाही.

05)गणवेश निधीबाबताचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यात आलेले नाही.

06)गणवेश / बूट / मोजे वाटपाबाबत करण्यात आलेल्या कारारनाम्यातील अट क्रमांक 4,6व7 अन्वये पुरवठा धारकाने वर्गनिहाय विद्यार्थ्यांची मापे घेऊन गणवेश / बूट / मोजे पुरवठा केलेला नाही.

07) पुरवठ्यातील साहित्य / नमुने स्पेसीफीकेशन नुसार बरोबर असल्याचे प्रमाणित करण्यात आले नाही.

08) खरेदीच्या अनुषंगाने उपप्रमाणकवर प्रदानार्थ शिक्का व स्वाक्षरी नमूद नाही.

सदर अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र.28,दि.04.11.2020 नुसार विभागास अनुपालन अभिप्राय सादर करण्यास कळविले होते. तथापि विभागाकडून समर्पक अनुपालन / अभिप्राय प्राप्त न झाल्यामुळे परिच्छेद नोंदविण्यात येत आहे.

DATSMBM7501 (Ref No : 10, Hmm No : 28)

## *67 शिक्षण विभागामार्फत करण्यात आलेल्या खरेदी प्रक्रीयेतील अनियमिततेबाबत.*

**शिक्षण विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 4**

*लेखा शीर्ष :7 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

चंद्रपूर महानगर पालिकेच्या अधिनस्त शिक्षण विभागामार्फत खर्च करतांना शासन निर्णय उद्योग व उर्जा भाकस-2014/82ब/भाग-3/उद्योग-4 दिनांक 01/12/2016 मध्ये नमूद खरेदी प्रक्रियेतील निविदा व दरपत्रक प्रक्रियेतील मार्गदर्शक सुचानाचे पालन न करता खरेदी करण्यात आलेली आहे. परिणामी खरेदी प्रक्रियेत

पारदर्शकता दिसत नाही. खरेदीप्रक्रियेत वस्तू किंवा माल खरेदी करतांना सर्वत्र समान, पारदर्शक ,पद्धतशीर,कार्यक्षम आणि कमी खर्चिक कार्यपध्दतीचा अवलंब करणे गरजेचे आहे. तसेच खरेदी तत्वांचा योग्य विचार करून खरेदी प्रक्रिया निष्पक्षपणे राबविणे गरजेचे आहे. खरेदी प्रक्रियेतील त्रुट्या विचारात घेता शिक्षण विभागाकडून पारदर्शकपना काटेकोरपणे पाळला जात नाही.

चंद्रपूर महानगरपालिकेच्या अधिनस्त शिक्षण विभागातील खरेदीबाबतच्या काही निवडक नस्त्या तपासल्या असता लेखापरीक्षणाअंती अभिप्राय खालील प्रमाणे नमूद करण्यात आलेले आहेत.

शिक्षण विभागामार्फत वर्षनिहाय करण्यात आलेली खरेदी .

सन 2016-17

| अ.क्र. | खर्चाचे प्रयोजन | कंत्राट किंवा फर्म चे नाव | प्रमानक क्रमांक | दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | शालेय क्रीडा स्पर्धा | प्रकाश बिछायत केंद्र | 3152 | 31/03/17 | 73782 |
| 2 | विद्यार्थ्यांना ओळखपत्र पुरवठा | विकास फोटो स्टुडियो | 1485 | 04/10/17 | 183750 |
| 3 | दप्तर पुरवठा | मे.शिखरचंद जैन | 832 | 01/08/17 | 306237 |
| 4 | बूट व मोजे पुरवठा | मे. दामोदर तोष्णीवाल | 833 | 01/08/17 | 394572 |

सन 2017-18

| अ.क्र. | खर्चाचे प्रयोजन | कंत्राट किंवा फर्म चे नाव | प्रमानक क्रमांक | दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | शालेय क्रीडा स्पर्धा | प्रकाश बिछायत केंद्र | 26 | 27/03/18 | 58058 |
| 1 | दप्तर पुरवठा | मे. दामोदर | 3194 | 28/03/18 | 340153 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | तोष्णीवाल | | | |
| 2 | बूट व मोजे पुरवठा | मे. दामोदर तोष्णीवाल | 3195 | 28/03/18 | 424290 |
| 3 | गणवेश पुरवठा | अरिहंत ट्रेडस | 2642 | 08/02/18 | 476748 |

1)प्रकाश मंडप डेकोरेशन यांना क्रीडा सत्र 2016-17 व 2017-18 या वर्षात मंडप व बिछायत पुरविण्याचे प्रदान करण्यात आली. सन 2016-17 मध्ये निविदेमधील एकूण 22 बाबिचे नस्तीत नमूद तुलनात्मक तक्त्यास मंजुरी देऊन पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आले मात्र क्रीडा सत्रात एकूण 43 उप्रप्रमाणके मंजूर करण्यात येवून रकमेचे प्रदान करण्यात आले. तसेच सन 2017-18 मध्ये कोटेशनमधील 22 बाबीनुसार नस्तीत नमूद तुलनात्मक तक्त्यास मंजुरी देऊन पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आले मात्र क्रीडा सत्रात एकूण 36 उप्रप्रमाणके मंजूर करण्यात येवून रकमेचे प्रदान करण्यात आले. जादाच्या बाबीची प्रशासकीय मंजुरी न घेता अतिरिक्त रकमेचे प्रदान करण्याची अनियमितता झालेली असून सदर रक्कम वसूल करून मनपा निधीमध्ये जमा करण्यात यावी.

2)प्रकाश मंडप डेकोरेशन यांचे कडून क्रीडासत्र आयोजनासाठी मंडप व बिछायत पुरविण्यात आले सदरच्या नस्तीचे अवलोकन केले असता दरपत्रकात आयोजनाचा कालावधी नमूद नसून प्रत्यक्षात मंडप किती दिवसासाठी उभारण्यात आला याचा उल्लेख नाही. खुल्या मैदानात मंडप मोजमापानुसार किती चैरस फूट उभारण्यात आला याबाबत नस्तीत काहीच नमूद नसून कंत्राटदराने दिलेल्या मोजमापानुसार रकमेचे प्रदान करण्यात आलेले आहे.

3)सन 2016-17 मध्ये 70 रुपये प्रती फोटो या दराने शाळेतील 2225 विद्यार्थी व 100 शिक्षकांची ओळखपत्रे तयर करण्याचे काम विकास फोटो स्टुडियो यांना देण्यात आले. त्यानुसार सबंधीतास 183750/- एवढ्या रकमेचे प्रदान करण्यात आले. मात्र नस्तीचे अवलोकन केले असता मनपाकडून विद्यार्थ्यांसाठी तयार करण्यात आलेले ओळखपत्रे वितरीत केल्याबाबत विद्यार्थ्यांची यादी स्वाक्षरी सह नस्तीत नाही. शाळेतील विद्यार्थ्यांस ओळखपत्रे प्राप्त झाल्या बाबत मुख्याध्यापक यांचे प्रमाणित केलेले प्रमाणपत्र नस्तीत नाही. त्यामुळे ओळखपत्रे वाटप करण्यात आले किंवा कशे याबाबत खात्री पटत नाही.

4) करारनाम्यातील अट क्र. 4 अन्वये साहित्य नमुना ठरल्यानुसार प्राप्त झाल्याबाबत प्रमाणित करण्यात आले नाही.

5)वर्ग निहाय विद्यार्थ्यांचे पायाचे माप न घेता खरेदी व पुरवठा केल्याचे दिसून येते त्यामुळे विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेले गणवेश/बूट/मोजे व दप्तर समाधानकारक आहेत असे म्हणता येणार नाही.

6)करारनाम्यातील अट क्रमांक 4, 6 व 7 अन्वये वर्गनिहाय बूट/मोजे व दप्तर पुरविण्याची जबाबदारी पुरवठा धारकाची असून उक्त जबाबदारी पूर्ण केली असल्याचे शाळेतील मुख्याध्यापक किंवा शिक्षण अधिकारी यांनी प्रमाणित केले नाही .

7)खरेदीच्या अनुषंगाने प्रदानार्थ सादर करण्यात आलेल्या कुठल्याही उपप्रमाणकावर शिक्षण अधिकारी यांनी प्रदानार्थ शिक्का व स्वाक्षरी नमूद केलेली नाही.

8) गणवेश/बूट/मोजे व दप्तर वापराबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र शाळेतील मुख्याध्यापक यांनी सादर केलेली नाहीत.

एकंदरीत शिक्षण विभागाकडून शाळेतील विद्यार्थ्यांसाठी केलेली खरेदी शाळेत शिकणाऱ्या वर्गनिहाय विद्यार्थ्यांचे वय, उंची व त्यांच्या मुलभूत गरजा विचारात न घेता तसेच मुख्याध्यापक यांच्यासोबाबत कोणताही समन्वय न साधता मोघम पद्धतीने केली असल्याचे दिसते विद्यार्थ्यांचे राहणीमान व दर्जा सुधारत नसेल तर करण्यात आलेली खरेदी समाधानकारक किंवा शाळेसाठी उपयुक्त आहे असे म्हणता येणार नाही.

खरेदीप्रक्रियेत वस्तू किंवा माल खरेदी करतांना सर्वत्र समान, पारदर्शकता कमी खर्चिक कार्यपध्तीचा अवलंब करणे गरजेचे आहे. तसेच खरेदी तत्वांचा योग्य विचार करून खरेदी प्रक्रिया निपक्षपणे राबविणे गरजेचे आहे. खरेदी प्रक्रियेतील उपरोक्त त्रुट्या विचारात घेता शिक्षण विभागाकडून गंभीरता, पारदर्शकपणा,व नियमसंगतबाबत आवश्यक काटेकोरपणा पाळला जात नसल्याचे नमूद करण्यात येते. याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 28 दिनांक 04/11/2020 रोजी निर्गमित करण्यात करण्यात आले मात्र विभागाकडून समर्थनीय अनुपालन प्राप्त झाले नसल्यामुळे सदर आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATSMBM7501 (Ref No : 11, Hmm No : 28)

## *68 मनपा चंद्रपूरच्या कर विभागातील वसुल होत असलेल्या महसुलाच्या मागील वर्षीच्या शिल्लक रकमा व पुढील वर्षाच्या मागणीच्या रकमेतील तफावतीबाबत.*

**कर विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**
**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

मनपा चंद्रपूर मधील कर विभागामार्फत वसुल होत असलेल्या व उपलब्ध केलेल्या विवरणपत्रात सन 2015-16

ची अखेरची शिल्लक वर्ष 2016-17 च्या थकीत मागणीमध्ये रु. 359.56 लाख तसेच सन 2016-17 ची अखेरची शिल्लक व सन 2017-18 च्या थकीत मागणीमध्ये रु. 354.00 लाखाची प्रचंड तफावत दिसुन येत आहे.

मनपाच्या उत्पन्नाचा मालमत्ता कर हा प्रमुख घटक आहे. त्यामध्ये मालमत्ता कर, वृक्ष कर, अग्निशमन कर, सफाई शुल्क, जाहिरात कर, शिक्षण कर, रोजगार हमी कर तसेच दंड वसुली याचा समावेश होतो. याशिवाय कर विभागामार्फत जाहिरात शुल्क व नामांतरण शुल्काची ही वसुली केली जाते.
कर विभागाने सन 2016-17 व 2017-18 ची मागणी वसुली व थकबाकीपोटीची विविध प्रकारच्या कराचे विवरण पत्र लेखापरीक्षणास सादर केले तपासणी अंती मागील वर्षाची शिल्लक व पुढील वर्षाच्या सुरवातीच्या शिल्ल्केमध्ये प्रचंड तफावत आहे.

| अ.क्र. | कराचा प्रकार | वर्ष 2015-16 ची अखेरची शिल्लक (विभागाने पुरविलेल्या विवरणपत्रानुसार) (रुपये) | | | वर्ष 2016-17 ची प्रारंभिक शिल्लक (रुपये) | अखेरच्या व सुरुवातीच्या शिल्लकेतील तुट (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | मागील | चालू | एकूण | | |
| 1 | मालमत्ता कर | 14391762 | 64957537 | 79349299 | 107406614 | 28057315 |
| 2 | शिक्षण कर | 4356504 | 18469228 | 22825732 | 29034272 | 6208540 |
| 3 | रोजगार हमी | 752223 | 2969119 | 3721342 | 4210026 | 488684 |
| 4 | वृक्ष कर | 260682 | 1243344 | 1504026 | 2047242 | 543216 |
| 5 | अग्निशामक कर | 236797 | 1121155 | 1357952 | 2183541 | 825589 |
| 6 | सफाई शुल्क | 271116 | 13865873 | 14136989 | 13835755 | (-)301234 |
| 7 | जाहिरात कर | -- | 175929 | 175929 | 310500 | 162571 |
| एकूण | | 20269084 | 102802185 | 123071269 | 159027950 | 35984681 |

| अ.क्र. | कराचा प्रकार | वर्ष 2016-17 ची अखेरची शिल्लक (विभागाने पुरविलेल्या विवरणपत्रानुसार) (रुपये) | | | वर्ष 2017-18 ची प्रारंभिक शिल्लक (रुपये) | अखेरच्या व सुरुवातीच्या शिल्लकेतील तुट (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | मागील | चालू | एकूण | | |
| 1 | मालमत्ता कर | 25152775 | 54957923 | 80110698 | 105573781 | 25463083 |
| 2 | शिक्षण कर | 6938503 | 17509585 | 24448088 | 29885879 | 5437791 |
| 3 | रोजगार हमी | 1443366 | 3000731 | 4444097 | 3875953 | (-)568144 |
| 4 | वृक्ष कर | 443818 | 967405 | 1411223 | 1995349 | 584126 |
| 5 | अग्निशामक कर | 519178 | 1163634 | 1682810 | 2122274 | 439464 |
| 6 | सफाई शुल्क | 1911913 | 12828170 | 14740083 | 18702682 | 3962599 |
| 7 | जाहिरात कर | -- | 744417 | 744417 | 825817 | 81400 |
| एकूण | | 36409551 | 91171865 | 127581416 | 162981734 | 35400319 |

यावरील अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

राष्ट्रीय महानगरपालिका लेखा नियमातील प्रकरण 6 (Property and other Taxes) च्या नियम 6.44 (c) नुसार लेखा विभाग प्रमुख व कर विभाग प्रमुख यांनी वर्षवार मालमत्ता आणि इतर करांच्या बाबतीत डिमांड रजिस्टरमध्ये नोंद झालेल्या वर्षाच्या एकूण रकमेची शिल्लक (मागील वर्षाच्या शिल्लक पत्रकात दिसणारी) पुढील लेखा वर्ष सुरुवातीत असल्याची मेळ घालावी व प्रकरण 21 मधील केलेल्या तरतुदीनुसार मागील वर्षाची शिल्लक ही पुढील आर्थिक वर्षाच्या सुरुवातीची रक्कम दर्शवावी असे नमुद असतांना सुध्दा त्यामध्ये ताळमेळ नसल्याचे दिसुन आले.

वर दर्शविलेल्या तक्त्यामध्ये सन 2015-16 ची अखेरची शिल्लक एकूण रु.1230.71 लाख असुन लेखापरीक्षणा दरम्यान विभागाकडून सन 2016-17 च्या प्राप्त विवरणपत्रानुसार मागील वर्षाची थकबाकी मागणी रु. 1590.27 लाख एवढी दर्शविली आहे. अर्थात रु. 359.56 लाखाची तफावत दिसून येते. तर सर्व 2016-17 ची अखेरची शिल्लक रु. 1275.81 लाख असून वर्ष 2017-18 च्या प्राप्त विवरणपत्रा नुसार सुरुवातीच्या शिल्ल्केत

थकबाकीची रक्कम रु.1629.81 लाख एवढी दर्शविली आहे. त्यामुळे ह्या वर्षात रु. 354.00 लाखाची प्रचंड तफावत आहे.
या संदर्भात अर्धसमास पत्र क्र.44 दि. 26.11.2020 नुसार खुलासा मागितला असता तो संयुक्तिक नसल्यामुळे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATVVBM6301 (Ref No : 19, Hmm No : 44)

## *69 शिक्षण कर व रोजगार हमी उपकराची वसुली झालेली रक्कम व अंदाजपत्रकात दर्शविलेली प्रत्यक्ष जमा रकमेतील तफावत तसेच इतर अनियमिततेबाबत.*

**कर विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचे शासन निर्णय क्र. रजिसी-1097/प्र.क्र.199/ल-5 मुंबई दिनांक 20/01/2003 नुसार महानगरपालिकेने शिक्षण कर व रोजगार हमी उपकाराची 2% रिबेटची रक्कम वजा करून उर्वरित रक्कम शासन कोषागारात जमा करणे आवश्यक आहे. मनपा चंद्रपूर यांनी वर्ष 2016-17 मध्ये शिक्षण कर व रोजगार हमी उपकर याबाबत अनुक्रमे रु. 5,11,57,000/- व रु.63,41,000/- तसेच वर्ष 2017-18 मध्ये रु.5,91,52,000/- व 76,02,000/- येवढी वसुल झाल्याचे प्राप्त विवरण पत्रावरून दिसून येते.
मात्र वर्ष 2016-17 मध्ये अंदाजपत्रकात दर्शविलेल्या प्रत्यक्ष जमा रकमेत रु.43,33,995/- तर वर्ष 2017-18 मध्ये रु.1,03,67,607/- येवढी तफावत दिसून येते. शासन निर्णयानुसार प्राप्त शिक्षण कर व रोजगार हमी उपकर या वसूल झालेल्या एकूण रकमेतून 2% रक्कम रिबेट कमी करून उर्वरित रक्कम शासनखाती जमा करावयाची आहे व उर्वरित रक्कम मनपा उत्पन्न आहे. परंतु अंदाजपत्रकात प्रत्यक्ष जमा रकमेत या रिबेटद्वारे प्राप्त रकमेचा कुठेही उल्लेख नाही त्यामुळे प्राप्त रिबेटची रक्कम रु.24,85,040/- हि लेख्याबाहेर असल्याचे दिसून येते.

महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचे शासन निर्णय क्र. रजिसी-1097/प्रक्र199/ल-5-मुंबई, दिनांक 20/01/2003 नुसार महानगरपालिकेने शिक्षण कर व रोजगार हमी उपकराची 2% रिबेटची रक्कम वजा करून

उर्वरित रक्कम शासन कोषागारात जमा करणे आवश्यक आहे.

मनपा चंद्रपूर यांनी वर्ष 2016-17 मध्ये शिक्षण कर व रोजगार हमी उपकर याबाबत अनुक्रमे रु. 5,11,57,000/- व रु.63,41,000/- व वर्ष 2017-18 मध्ये अनुक्रमे रु.5,91,52,000/- व रु.76,02,000/- येवढी वसुली झाल्याचे प्राप्त विवरण पत्रावरून दिसून येते.

वर्ष 2016-17 व 2017-18 मधील प्राप्त विवरणपत्र व अंदाजपत्रकाची दर्शविलेली शिक्षण कर व रोजगार हमी उपकराची वसुलीची रक्कम खालीलप्रमाणे दर्शविली आहे.

(A) वर्ष 2016-17

| बाब | प्राप्त विवरण पत्रानुसार वसुली | अंदाजपत्रकात दर्शविल्या प्रमाणे प्रत्यक्ष जमा रक्कम | विवरण पत्र तसेच अंदाज पत्रकात दर्शविल्या नुसार वसुली रकमेतील तफावत | विवरण पत्रानुसार प्राप्त वसुली मधून 2% रिबेट कपात रक्कम | शासनास प्रदान केलेली रकम (रुपये) |
|---|---|---|---|---|---|
| शिक्षण कर | 5,11,57,000 | 4,74,78,400 | 36,78,600 | 102,31,40 | 5,01,33,860 |
| रोजगार हमी उपकर | 63,41,000 | 56,85,605 | 6,55,395 | 1,26,820 | 62,14,180 |
| एकूण | 5,74,98,000 | 5,31,64,005 | 43,33,995 | 11,49,960 | 5,63,48,040 |

(B) वर्ष 2017-18

| बाब | प्राप्त विवरण पत्रानुसार वसुली | अंदाजपत्रकात दर्शविल्या प्रमाणे प्रत्यक्ष जमा रक्कम | विवरण पत्र तसेच अंदाज पत्रकात दर्शविल्या नुसार वसुली रकमेतील तफावत | विवरण पत्रानुसार प्राप्त वसुली मधून 2% रिबेट कपात रक्कम | शासनास प्रदान केलेली रकम (रुपये) |
|---|---|---|---|---|---|
| शिक्षण कर | 5,91,52,000 | 5,01,16,236 | 90,35,764 | 11,83,040 | 5,79,68,960 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| रोजगार हमी उपकर | 76,02,000 | 62,70,157 | 13,31,843 | 1,52,040 | 74,49,960 |
| एकूण | 6,67,54,000 | 5,63,86,393 | 1,03,67,607 | 13,35,080 | 6,54,18,920 |
| एकूण (A)+(B) | 12,42,52,000 | 10,95,50,398 | 14701602 | 24,85,040 | 12,17,66,960 |

याबाबत पुढील दर्शविल्याप्रमाणे अनियमितता असल्याचे दिसून येते.

1. वर्ष 2016-17 व 2017-18 मधील वर दर्शविलेल्या शिक्षण कर व रोजगार हमी उपकराच्या प्राप्त विवरणपत्र तसेच अंदाजपत्रकात दर्शविलेली प्रत्यक्ष जमा रकमेत वर्ष 2016-17 मध्ये रु.43,33,995/- तर वर्ष 2017-18 मध्ये रु.1,03,67,607/- येवढी तफावत दिसून येते.

2. महसूल व वन विभाग यांचे शासन निर्णय क्र. इजिसी-1097/प्रक्र199/ल-5 मुंबई, दि.20/01/2003 नुसार प्राप्त शिक्षण कर व रोजगार हमी उपकर या वसूल झालेल्या एकूण रकमेतून 2% टक्के रक्कम रिबेट कमी करून उर्वरित रक्कम शासनात जमा करण्याची तरतूद आहे व उर्वरित 2% रक्कम मनपाचे उत्पन्न आहे. वर दर्शविल्याप्रमाणे विवरणपत्रामध्ये वर्ष 2016-17 मध्ये रु. 11,49,960/- तर वर्ष 2017-18 मध्ये 13,35,080/- येवढी रक्कम रिबेट म्हणून मनपास प्राप्त झाली. परंतु प्राप्त झालेल्या या रकमेचा अंदाजपत्रकात जमा रकमेत कुठेही उल्लेख नाही.

3. वर्ष 2016-17 मध्ये शिक्षण व रोजगार हमी उपकराची रक्कम रु. 5,63,48,040/- शासनास परत करण्यात आली परंतु अंदाजपत्रकात या बाबीखाली प्रत्यक्ष खर्च किंवा शासनास परत केलेल्या रकमा दर्शविल्या नाही. तर वर्ष 2017-18 मध्ये शिक्षण व रोजगार हमी उपकराची रक्कम रु.6,54,18,920/- येवढी रक्कम शासन खात्यात जमा करण्यात आली. परंतु अंदाजपत्रकात त्या वर्षात विवरणपत्रानुसार वसूल झालेली संपूर्ण रक्कम रु.6,67,54,000/- हि रक्कम खर्च झाल्याचे नमूद केले आहे. शासनखाती जमा केलेल्या रकमेमध्ये सुध्दा प्राप्त विवरणपत्र व अंदाजपत्रकात नमूद रकमेत रु.13,35,080/- येवढी तफावत आहे.

यावरून अंदाजपत्रकातील रकमा ह्या चुकीच्या दर्शविण्यात आल्या असून त्या वर्षात शिक्षण कर व रोजगार हमी उपकराची प्राप्त रिबेटची रक्कम अंदाजपत्रकाबाहेर असल्याचे दिसते. तसेच प्रत्यक्ष झालेली वसुली व अंदाजपत्रकात दर्शविलेल्या प्रत्यक्ष वसुली मध्येही मोठी तफावत आहे.

याबाबत अर्धसमास पत्र क्र.150 दि.18/02/2021 नुसार खुलासा विचारला असता तो प्राप्त न झाल्यामुळे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATVVBM6301 (Ref No : 82, Hmm No : 150)

## *70 कर निर्धारणाच्या नस्त्या लेखा परीक्षण पथकास तपासणीस उपलब्ध न करून देण्याबाबत.*

**कर विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| महानगरपालिका चंद्रपूर अंतर्गत सन 2016-17 व 2017-18 ह्या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षण अंतर्गत कर विभागातील झोन क्र.1,2,3 चे लेखापरिक्षण करण्यात आले. परंतु सदर विभागाने कर निर्धारणाच्या नस्त्या ठेवल्या आहे किंवा कसे? याबाबत नस्त्यांची लेखा परीक्षणाकरिता मागणी केली असता कर निर्धारणाच्या नस्त्या तपासणीस उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत. |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 127 या अधिनियमान्वये मालमत्ता कर संबंधी कर विभागाने कर निर्धारणाच्या नस्त्या ठेवलेल्या नाहीत. त्यामुळे नागरीकाकडून मालमत्ता कर कोणत्या दराने वसुल केले किंवा मालमत्ता हस्तांतरण बाबतचे दस्तऐवज व क्षेत्रफळ तसेच कोणत्या दराने कर वसुली करण्यात आले. व महानगरपालिका अधिनियमाचा कलम 129 फ अन्वये दर पांच वर्षांनी मालमत्ता कर वाढवून कर निर्धारणाचा नस्तीमध्ये नोंद घेऊन नस्त्या सुधारित ठेवणे आवश्यक होते. तसेच मालमत्तेच्या पूर्ण इतिहासाची नोंद व संबंधित दस्तऐवज रजिस्ट्रीची प्रत वगैर संबंधित मालमत्ता क्रमांकाचा नस्तीसोबत असणे आवश्यक आहे. परंतु कर निर्धारणाच्या नस्त्या लेखापरीक्षणाकरिता उपलब्ध करण्यास कळविले असता कर विभागांनी झोन क्र.1,2,3 पैकी कोणत्याच झोननी कर निर्धारणाच्या नस्त्या तपासणीस उपलब्ध करून दिल्या नाहीत. यावरून असे निर्दशनास येते की कर विभागाने अशा नस्त्या ठेवल्या किंवा नाही याबाबत शंका निर्माण होते. तसेच त्यामुळे अनियमितता होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

उपरोक्त अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र.139 दि.11/02/2021 नुसार कर विभागास अनुपालन सादर करण्यास कळविण्यात आले होते. परंतु सदर विभागाकडून अनुपालन सादर न केल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATDRMM6701 (Ref No : 86, Hmm No : 139)

## *71 मोबाईल टॉवरवरील मालमत्ता कराच्या अनुषंगाने अभिलेखे सादर न करण्याबाबत.*

**कर विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 4**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

मोबाईल टॉवर प्रकरणी मिळकत कराची प्रकरणनिहाय नस्ती व नोंदवही, कर निरीक्षकांचे मोबाईल टॉवर उभारण्यात आलेल्या ठिकाणाचा स्थळ पाहणी अहवाल व नोंदवही, व विहीत पध्दतीनूसार मिळकत कर आकारणीचे देयक, मोबाईल टॉवर उभारणी करीता दिलेल्या परवानगीच्या प्रति लेखापरीक्षणासाठी सादर करण्यात आल्या नाहीत. चटई क्षेत्रानुसार मालमत्ता कराची नोंदवही सादर केलेली नाही. अनधिकृत मोबाईल टॉवर वर केलेल्या कारवाईचा तपशील सादर करण्यात आलेला नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची ldquo;डrdquo; मधील प्रकरण 8 कराधान नियमामधील तरतुदीनुसार मालमत्ता कर आकारणी करण्यात येते. सदर आकारणी मिळकतीवर त्यांच्या करपात्र बाबी उदा. क्षेत्रफळ, बांधकाम व वापर ( निवासी व अनिवासी) व परिसरातील उपलब्ध मुलभूत सोयी सुविधा यावर आधारित करयोग्य मूल्यावर आकारण्यात येते. चंद्रपूर महानगरपालिका क्षेत्रात टेलीकॉम सेवा पुरवणा-या कंपनीचे मोबाईल टॉवर असल्याचे मालमत्ता विभागाने सदर केलेल्या तपशिलावरून दिसून येते. मालमत्ता कराची बरीच रक्कम सन 2016-17 व 2017-18 वर्षाअखेर पर्यंत थकीत असल्याचे दिसून येते, त्यामुळे वसुली बाबतची कार्यवाही होणे आवश्यक आहे. महानगर पालिकेतील ज्या मालमत्तांची पुनर्बांधणी झालेली आहे किंवा नवीन बांधकाम करण्यात आलेले आहे. तसेच ज्या मिळकतीमध्ये वाढीव बांधकाम केले असेल अशा मालमत्तांचे वार्षिक भाडे ठरविणे व कर आकारणीमध्ये सुसुत्रता आणणे गरजेचे आहे. कर आकारणीसाठी गृहीत धरावयाचे चटई क्षेत्र (ब) बिगरनिवासी तपशिलातील भ्रमण दूरध्वनी कार्यालये व टॉवर यांना पूर्ण दराने आकारणी पात्र चटई क्षेत्रानुसार घरपट्टी आकारणी करणे आवश्यक आहे. ज्यामुळे मनपाच्या उत्पन्नात वाढ होऊ शकते. मात्र कर विभागाकडून वसुली केलेल्या व थकीत मालमत्ता कराच्या अनुषंगाने खालील मुद्दयाबाबतची माहिती लेखापरीक्षणासाठी सादर करण्याबाबत अर्ध समास पत्र क्र. 60 दि. 09/12/2020 अन्वये विभागास मागणी केली असता, विभागाने त्याबाबतची माहिती सादर केलेली नसल्याने, खालील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

16) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.टीपीएस-1810/1975/प्र.क्र.2417/10/नवि-13 दि.26/07/2011 अन्वये मोबाईल टॉवर उभारणी संदर्भात शासनाने धोरण निश्चित केले आहे. मोबाईल टॉवर प्रकरणी

मिळकत कराची प्रकरणनिहाय नस्ती व नोंदवही, कर निरीक्षकांचे मोबाईल टॉवर उभारण्यात आलेल्या ठिकाणाचा स्थळ पाहणी अहवाल व नोंदवही, त्याचप्रमाणे विहीत पध्दतीनूसार मिळकत कर आकारणीचे देयक तयार होते किंवा कसे इ. अभिलेख लेखापरीक्षणासाठी सादर केलेले नाहीत.

17) टेलिकॉम सेवा देणा-या कंपन्याच्या मोबाईल टॉवर उभारणी करण्यासाठी महानगरपालिकेच्या परवाना विभागाकडून दिलेल्या परवानगीच्या प्रति सादर करण्यात आलेल्या नाहीत.
18) महानगरपालिकेने परवानगी दिलेल्या दिनांकापासून व चटई क्षेत्रानुसार मालमत्ता कराची आकारणी केलेबाबतचा सविस्तर तपशील (field books सह) व मालमत्ता नोंदवही सादर केलेली नाही.
19) सदरचे मोबाईल टॉवर अनधिकृत असल्यास त्यांचेवर महापालिकेमार्फत करण्यात आलेल्या कारवाईचा तपशील सादर केलेला नाही.

सदर अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र 60 ,दि. 09.12.2020 नुसार विभागास अनुपालन अभिप्राय सादर करण्यास कळविले होते. तथापि विभागाकडून अभिप्राय प्राप्त न झाल्यामुळे परिच्छेद नोंदविण्यात येत आहे.

DATSMBM7501 (Ref No : 91, Hmm No : 60)

## *72 मनपा चंद्रपूर मधील विविध विभागात जडवस्तू संग्रह नोंदवही विहित नमुन्यात तसेच अद्यावत नसल्याबाबत.*

**Electrical Department**
**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**
**अनियमितता संख्या : 05**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

महानगरपालिका चंद्रपूर येथील सन 2016-17 व 2017-18 ह्या वित्तीय वर्षातील लेखापरीक्षणा दरम्यान विद्युत विभाग, संगणक विभाग तसेच भांडार विभाग यांचे साठा नोंदवहीची तपासणी केली असता साठा नोंदवही मध्ये खरेदी केलेल्या वस्तुची नोंद घेऊन त्याची किंमत, कोणाकडून खरेदी केली तसेच निर्लेखनाच्या नोंदी साठा पुस्तकात असणे आवश्यक आहे. परंतु साठा पुस्तक संपूर्ण नोंदीसह अद्यावत नाही.तसेच खरेदी प्रक्रियेच्या नस्त्या दरकरार किंवा निविदा प्रक्रिया याबाबत अभिलेख अद्यावत असल्याचे दिसुन आले नाही.

महाराष्ट्र शासन, शासन निर्णय, उदयोग ऊर्जा व कामगार विभाग क्र.भा.ख.स.1084/2512/उदयोग-6 दिनांक 02 जानेवारी 1992 नुसार शासकीय विभाग महामंडळे व निमशासकीय संस्थांनी वस्तु खरेदी करतांना शासन

निर्णयातील तरतुदीचे काटेकोरपणे पालन करणेबाबत कार्यवाही विषद केलेली आहे. भांडार विभागाने वस्तू खरेदी करण्यासाठी खरेदी समिती स्थापन करून समितीमार्फत दर करार करून खरेदीची कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच खरेदी केलेल्या वस्तुची नोंद साठा पुस्तकात घेऊन साठा पुस्तक अद्यावत करणे आवश्यक आहे.

याबाबत पुढील प्रमाणे अभिप्राय आहेत:-

20) महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम1965 नियम 98 च्या तरतुदीनुसार दरवर्षी 30 जुन रोजी साठा नोंदवही नुसार प्रत्यक्ष शिल्लक असलेल्या भांडार साहित्याची सक्षम प्रमाणपत्रे नोंदविणे आवश्यक आहे.ताळमेळ प्रमाणपत्र लेखापरीक्षणास आढळून आलेले नाही. सबब भांडाराची पडताळणी होत नसल्याचे दिसून येते.
21) वापरण्या योग्य नसलेल्या वस्तुंचे निर्लेखन तसेच त्यांची विल्हेवाट निर्लेखित मुल्यासह नमुद केलेले दर व निर्लेखित संख्या व परिणाम नोंदवहीत नमूद करणे आवश्यक आहे. तसेच मालमत्तेची विक्रीपासून प्राप्त झालेली किंमत आणि सदर रक्कम मनपा निधीत जमा केल्याचा तपशील बाबतची नोंदवही ठेवणे आवश्यक आहे.
22) खरेदी केलेला सर्व माल व साधन सामुग्रीची नोंद स्वतंत्रपणे संग्रह खाते पुस्तकात घेणे आवश्यक आहे. अशा प्रमाणित नोंद वह्या ठेवणे आवश्यक आहे.
23) विद्युत विभागातील साठा पुस्तकेची तपासणी केली असता सन 2016-17 व 2017-18 ची जडवस्तू संग्रह नोंदवही विहित नमुन्यात ठेवण्यात आलेली नाही. वस्तु खरेदीच्या नोंदी जसे की वस्तु कोणाकडून खरेदी केली, खरेदीची रक्कम, एकूण नग, तसेच वस्तूचे वाटप व शिल्लक बाबत नोंदी नोंदवहीत दिसुन आल्या नाहीत. तसेच वस्तुंचे निर्लेखण व अंतिम विल्हेवाट लावण्या बाबतचा नोंदी साठा पुस्तकांत घेतलेल्या नाहीत. साठा नोंदवही मध्ये प्रत्येक नोंदीवर सक्षम प्राधिकाऱ्यांची स्वाक्षरी दिसून आली नाही. ज्या आदेशान्वये वस्तुची खरेदी केली आहे तो आदेश क्रमांक साठा पुस्तिकेत नमूद नाही. तसेच वस्तुनिहाय नोंदी केल्याचे दिसुन आले नाही..
24) साठा पुस्तकात नियंत्रित करणाऱ्या सक्षम अधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही.

उपरोक्त प्रकरणी माहिती तपशील व नोंदवही इत्यादी बाबत एकूण 5 मुद्यावरील माहिती सादर करणे बाबत विद्युत विभागास अर्धसमास पत्र क्र.25, दिनांक 04/11/2020 अन्वये कळविण्यात आले होते. तसेच संगणक विभागास अर्धसमास पत्र क्र. 39,दिनांक 24/11/2020 व भांडार विभागास अर्धसमास पत्र क्र. 38,दिनांक 23/11/2020 अन्वये कळविण्यात आले. परंतु लेखापरीक्षणा दरम्यान विहित मुदतीत अर्धसमास पत्राचे उत्तर प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे. सदर प्रकरणी विभाग प्रमुखाने आवश्यक तपासणी करून उपरोक्त मुद्द्यांचा अनुषंगाने अनुपालन सादर करावे.

DATDRMM6701 (Ref No : 23, Hmm No : 25)

## *73 भांडार विभागातील सन 2016-17 व 2017-18 या वित्तीय वर्षातील छापलेल्या पावती पुस्तकाची स्वतंत्र नोंदवही न ठेवण्याबाबत झालेली अनियमितता.*

**Bhandar Vibhag**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| चंद्रपूर मनपा येथे महानगरपालिकेच्या विविध विभागाकरिता होणाऱ्या वसुली करिता पावती पुस्तकाची छपाई भांडार विभागाकडून केली जाते व विविध विभागाच्या मागणीनुसार पावतीपुस्तकाचे वाटप करण्यात येते वर्ष 2016-17 व 2017-18 च्या लेखापरिक्षणादरम्यान पडताळणी केली असता भांडार विभागामार्फत छपाई केलेल्या पावती पुस्तकांचे स्वत्रंत साठा पुस्तक ठेवण्यात आले नाही साठा पुस्तकामध्ये इतर स्टेशनरी सोबतच छपाई केलेल्या पावती पुस्तकांची नोंद केली आहे तसेच छपाई व वाटप केलेल्या तसेच शिल्लक असलेल्या पावती पुस्तकांचा साठा नोंदीवर सक्षम प्राधाकाऱ्याची स्वाक्षरी केलेली नाही त्यामुळे या महत्वाच्या बाबींवर अधिकाऱ्याचे नियंत्रण नसल्याने अनियमितता होण्याची शक्यता नाकारता येत नाही. |

महानगरपालिका चंद्रपूर अंतर्गत इतरत्र विभागाकडून छपाई साहित्याची मागणी नुसार भांडार विभागाकडून अर्ज, पावतीपुस्तके छपाई केली जातात व मनपा अंतर्गत इतर विभागांना मागणी नुसार पावती पुस्तकांचे वाटप करण्यात येते. परंतु सन 2016-17 व 2017-18 मधील लेखापरीक्षणा अंती असे आढळून आले की छपाई केलेले अर्जाचे नमुने, पावती पुस्तके एकत्रित साठा पुस्तकांत नोंदी घेतल्यामुळे एकूण छपाई केलेल्या पावती पुस्तकांचा हिशेब तपासण्यास अडचण निर्माण होते. पावती पुस्तके हे रोख जमा करणारे माध्यम असल्यामुळे भांडार विभागाकडून एकूण छपाई केलेल्या पावती पुस्तकांची संख्या व इतर विभागांना मागणी नुसार वाटप केलेली संख्या व अखेरीस शिल्लक पावती पुस्तकांची संख्या याबाबतची स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात आलेली नसल्यामुळे कोणत्या विभागास किती पावती पुस्तके वितरीत करण्यात आले. याबाबतच्या हिशेब तपासण्यास अडचण निर्माण होते. त्यामुळे अनियमितता होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच पावती पुस्तकाच्या साठा पुस्तकामध्ये सक्षम प्राधिकाऱ्याची कुठेही स्वाक्षरी दिसून आली नाही.त्यामुळे या महत्वाच्या रोख जमा करण्यात येणाऱ्या पावती पुस्तकाच्या छपाई, वाटप व शिल्लक यावर अधिकाऱ्याचे नियंत्रण नसल्याने अनियमितता होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

याबाबत अर्धसमास पत्र क्र.38 दि.23/11/2020 नुसार खुलासा मागितला असता खुलासा सादर न केल्यामुळे आक्षेप नोंदविण्यात येत आहे. सदर प्रकरणी विभाग प्रमुखाने आवश्यक तपासणी करून मुद्द्याचा अनुषंगाने कार्यवाही करून अनुपालन सादर करावे

DATDRMM6701 (Ref No : 25, Hmm No : 38)

## *74 उद्यान विभागांतर्गत घेण्यात आलेल्या 'वन महोत्सव' कार्यक्रमासंबंधी असलेल्या खरेदी प्रक्रीयीतील व कार्यवाहीतील अनियमिततेबाबत.*

**Van Mahotsav**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक : साववि-2016/प्र.क्र.80/फ-11, दि.10 ऑक्टोबर 2016 अनुसार वन महोत्सव या कार्यक्रमांतर्गत 2017, 2018 व 2019 या 3 वर्षात 50 कोटी वृक्ष लावण्याचे लक्ष असून 2017-18 या वर्षात चंद्रपूर महानगरपालिकेत एकूण 34000 वृक्ष लावण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते, या कार्यक्रमासंबंधी असलेल्या खरेदी प्रक्रीयेत व कार्यवाहीत अनियमितता आढळून आल्या आहेत.

महानगरपालिका चंद्रपूर येथील सन 2017-18 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण सुरु असून सदर लेखापरीक्षणात असे आढळून आले की महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक : साववि-2016/प्र.क्र.80/फ-11, दि.10 ऑक्टोबर 2016 अनुसार वन महोत्सव या कार्यक्रमांतर्गत 2017, 2018 व 2019 या 3 वर्षात 50 कोटी वृक्ष लावण्याचे लक्ष असून 2017-18 या वर्षात चंद्रपूर महानगरपालिका अंतर्गत जागेवर एकूण 34000 वृक्ष लावण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते, या कार्यक्रमासंबंधी असलेल्या खरेदी प्रक्रीयेत व कार्यवाहीत खालीलप्रमाणे अनियमितता आढळून आल्या आहेत.

25) उद्योग,उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक : भाखंस-2014/प्र.क्र.82/भाग-3/उद्याग-4, दि.1 डिसेंबर 2016 अनुसार खरेदी धोरणानुसार यशस्वी निविदाकाराला खरेदी प्रधीकाऱ्याकडे आदेशाच्या मूल्याच्या कमीत कमी तीन टक्के (3%) इतकी अनामत रक्कम जमा करणे आवश्यक आहे परंतु निविदा धारकाने 3% अनामत रक्कम जमा केलेली नाही.

26) महसूल व वन विभाग शासन निर्णय 10 ऑक्टोबर 2016 अनुसार वृक्ष लागवडीच्या एकंदर

उद्दिष्टांमध्ये वृक्षछाया वाढविणे, गरीब व अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती व इतर लोकांना रोजगाराची ; उपजीविकेची आणि उत्पन्नाची साधने उपलब्ध होण्यासाठी कमीत कमी 10% बांबू प्रजातींची लागवड व्हावी असे नमूद आहे. व करारनाम्यातही बांबू लागवडीचा उल्लेख आहे परंतु कंत्राटदारामार्फत याची प्रत्यक्ष कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही.महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय 28 सप्टेंबर 2006 अनुसार कंत्राटदाराने निविदा सुचनांचे पालन करणे बंधनकारक आहे व करारनामा हा निविदा प्रक्रियेचा भाग येतो.

या बाबत उद्यान विभागाला अर्धसमास पत्र क्र. 45 दि. 26-11-2020 ला निर्गमित करुन विचारणा केली असता संबंधित विभागाद्वारे जागा उपलब्ध नसल्याने बांबू लागवड केली नाही असे उत्तर प्राप्त झाले आहे, प्राप्त उत्तर संयुक्तिक नसल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DLFYBPF9301 (Ref No : 26, Hmm No : 45)

## *75 बांधकाम विभागात ठेवण्यात आलेल्या साठा नोंदवहीतील अनियमिततेबाबत.*

**बांधकाम विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 7**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम 1965 मधील उपविभाग 24 मध्ये नियम क्रमांक 95 ,97, व 98 मध्ये साठा नोंदवही/जडसंग्रह नोंदवहीतील वस्तुसुची अभिरक्षित करून ठेवण्याबाबत नमूद करण्यात आले आहे. सन 2016-17 व 2017-18 वर्षातील लेखापरीक्षणाच्या अनुषंगाने सा.बा.विभागातील साठा नोंदवहीची तपासणी केली असता बऱ्याच उणीवा दिसून येत आहेत.

महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम 1965 मधील उपविभाग 24 मध्ये नियम क्रमांक 95 ,97, व 98 मध्ये साठा नोंदवही/जडसंग्रह नोंदवहीतील वस्तुसुची अभिरक्षित करून ठेवण्याबाबत नमूद करण्यात आले आहे. सन 2016-17 व 2017-18 वर्षातील लेखापरीक्षणाच्या अनुषंगाने सा.बा.विभागातील साठा नोंदवहीची तपासणी केली असता खालील अनियमितता निदर्शनास येत आहेत.

01) नियम क्र.95 अन्वये साठा नोंदवही हि विहित नमुन्यात (नमुना क्र.-8 ) मध्ये ठेवण्यात आलेली नाही.

02) नियम क्र.97 अन्वये साठा नोंदवहीतील शेरा स्तंभात जादा वस्तूची किंवा ज्या वस्तूची आवश्यकता राहिलेली नाही त्याची नोंद घेण्यात आलेली नाही तसेच कुठलाही शेरा नमूद करण्यात आलेला नाही.

03) नियम क्र.98 अन्वये साठा नोंदवहितील प्रत्यक्ष संग्रह आणि नोंदवहीतील नोंदीनुसार वस्तू संग्रहाची पडताळणी सक्षम अधिकाऱ्यामार्फत करण्यात आलेली नसून जून महिन्यात त्या आशयाचे प्रमाणपत्र कार्यालय प्रमुखास सादर करण्यात आलेले नाही.

04) वस्तूच्या निर्लेखन व अंतिम विल्हेवाट लावण्याबाबतच्या नोंदी साठा पुस्तकात नमूद नाही.

05) नोंदवहीत वस्तू निहाय नोंदी घेण्यात आलेल्या नसून वस्तू खरेदीचे आदेश क्रमांक नोंदविण्यात आलेले नाहीत.

06) साठा नोंदवहीत मोघम स्वरूपाच्या नोंदी घेण्यात आलेल्या असून सा.बा.विभागाच्या जंगम मालमत्तेबाबत स्पष्टता दिसत नाही. नाशवंत वस्तुच्या बाबतीत दर सहा महिन्यांनी व इतर वस्तूच्या बाबतीत वर्षातून एकदा तपासणी होणे गरजेचे असतांना सन 2016-17 व 17-18 या दोन्ही वर्षांत सक्षम अधिकाऱ्यामार्फत तपासणी करण्यात आलेली नाही.

07) साठा नोंदवहीत मासिक गोषावरे काढण्यात आलेले नाहीत तसेच नोंदवही सक्षम प्राधिकारी यांच्या स्वाक्षरी व शिक्क्याने प्राधिकृत नाही त्यामुळे उक्त नोंदवही हि लेखापरीक्षणासाठी ग्राह्य धरण्यात येत नाही.

सदर अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र 42 ,दि. 25.11.2020 नुसार विभागास अनुपालन अभिप्राय सादर करण्यास कळविले होते. तथापि विभागाकडून समर्पक अनुपालन / अभिप्राय प्राप्त न झाल्यामुळे परिच्छेद नोंदविण्यात येत आहे.

DATSMBM7501 (Ref No : 30, Hmm No : 42)

## *76 क्रिडा क्षेत्रावर एकूण वार्षिक खर्चाच्या 5 % रक्कम खर्च न करणेबाबत.*

**Sport Department**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

नगरविकास विभाग परिपत्रक क्र जीन-1098/प्रक्र-21/98/नावि-24 मंत्रालय मुंबई दिनांक 09/03/1998 अन्वये व महाराष्ट्र राज्य क्रीडा धोरण 2012 मधील मुद्दा क्र.4.8 नुसार महानगरपालिकांनी आपल्या वार्षिक अंदाजपत्रकापैकी किमान 5% खर्च क्रीडा क्षेत्रासाठी करणे आवश्यक असून चंद्रपूर मनपामार्फत तशी कार्यवाही झालेली नाही.

महानगरपालिका चंद्रपूर येथील सन 2016-17 व 2017-18 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण सुरु असून चंद्रपूर महानगरपालिकेने क्रीडा क्षेत्रासाठी मंजूर अर्थसंकल्पात तरतूद केलेली आहे. त्यासंबंधात नगरविकास विभाग परिपत्रक क्र जीन-1098/प्रक्र-21/98/नावि-24 मंत्रालय मुंबई दिनांक 09/03/1998 अन्वये महानगरपालिकांनी आपल्या वार्षिक अंदाजपत्रकापैकी किमान 5% खर्च क्रीडा क्षेत्रासाठी करावा असे बंधन आहे. तसेच महाराष्ट्र राज्य क्रीडा धोरण 2012 मधील मुद्दा क्र.4.8 नुसार महानगरपालिकेस एकूण बजेटच्या 5% रक्कम क्रिडा क्षेत्राशी निगडीत बाबीवर करण्यात यावे असे सांगितले आहे. चंद्रपूर महानगरपालिकेने क्रीडा क्षेत्रासाठी विशिष्ट लेखाशिर्षा अंतर्गत खालीलप्रमाणे खर्च केल्याचे अंदाजपत्रकानुसार निदर्शनास येते .

| अ.क्र. | लेखाशीर्ष | 2016-17 मध्ये केलेला खर्च | 2017-18 मध्ये केलेला खर्च |
|---|---|---|---|
| 1 | क्रीडासत्र | 2,75782 | 3,58,058 |
| 2 | महापौर चषक स्पर्धा | 14,99.131 | 17,65,540 |
| 3 | क्रीडा साहित्य | -- | 5,96,000 |
| | एकूण | 17,74,913 | 27,19,598 |

चंद्रपूर महानगरपालिकेचा 2016-17 मधील अंदाजपत्रकातील एकूण खर्च 1,01,59,58,364 रुपये व 2017-18 मधील अंदाजपत्रकातील एकूण खर्च 86,31,11,645 रुपये असा असून वरील संदभीय निर्देशानुसार 5% प्रमाणे 2016-17 मध्ये 5,07,97,918 रुपये व 2017-18 मध्ये 4,31,55,582 रुपये क्रीडा क्षेत्राशी निगडीत खर्च करणे गरजेचे असताना 2016-17 व 2017-18 मध्ये अनुक्रमे 17,74,913 रुपये व 27,19,598 रुपये इतका अत्यल खर्च झालेला आहे. एकूण अंदाजपत्रकाच्या 5% खर्च क्रीडा क्षेत्रावर झाला नसल्यामुळे शासन निर्णयाची अंमलबजावणी झाल्याचे दिसून येत नाही.

याबाबत अर्ध समास क्र. 83 दिनांक 04/01/2021 द्वारा विचारणा केली असता त्याबाबत परिच्छेद अंतिम

करेपर्यंत कोणतेही उत्तर प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DLFARKM9301 (Ref No : 33, Hmm No : 83)

## *77 नागरी आरोग्य केंद्राकरिता खरेदी तसेच वितरीत करण्यात येत असलेल्या औषधीमधील अनियमिततेबाबत*

**HEALTH**
**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**
**अनियमितता संख्या : 2**

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

NMAM 15.6 नुसार आरोग्य विभागात जमा व खर्चा संबंधी सर्व अभिलेखे ठेवणे आवश्यक असताना आरोग्य विभागात औषधीची मुदतबाह्य नोंदवही न ठेवणे. तसेच नागरी आरोग्य केंद्रामधील औषधी साठा नोंदवही अद्यावत न ठेवणे.

चंद्रपूर शहर महानगरपालिका मधील आरोग्य विभागातील अभिलेखे तपासले असता पुढील अनियमितता दिसून आल्या आहेत.

1) NMAM 15.6 नुसार आरोग्य विभागात जमा व खर्चा संबंधी सर्व अभिलेखे ठेवणे आवश्यक आहे. परंतु वित्तीय वर्ष 2016-17 व 2017-18 मधील औषधीची मुदतबाह्य नोंदवही लेखापरीक्षणास सादर करण्याबाबत सांगितले असता विभागात औषधीची मुदतबाह्य नोंदवही ठेवण्यात येत नसल्याचे कळविले. मनपा चंद्रपूर मधील आरोग्य विभागाद्वारे साथीचे रोग तसेच इतर आजाराकरिता औषधीची खरेदी करून नागरी आरोग्य केंद्राला औषधीचा पुरवठा करण्यात येतो. करिता विभागात औषधीची मुदतबाह्य नोंदवही ठेवणे आवश्यक होते. परंतु वित्तीय वर्ष 2016-17 व 2017-18 मध्ये मुदतबाह्य औषधीची नोंदवही ठेवण्यात आली नाही त्यामुळे कालबाह्य औषधीचे वाटप होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच सदर आर्थिक वर्षात किती औषधी मुदतबाह्य झाल्या याची पडताळणी करता आली नाही.

2)पावसाळ्यातील साथीचे रोग तसेच इतर आजाराकरिता नागरी आरोग्य केंद्राला मनपाच्या आरोग्य विभागामार्फत औषधींचा पुरवठा करण्यात येतो. नागरी आरोग्य केंद्रामधील औषधी साठा पुस्तकाचा आरोग्य विभागातील औषधी साठा पुस्तकाशी ताळमेळ घेतला असता आरोग्य विभागामार्फत पुरविण्यात आलेल्या

औषधीची नोंद नागरी आरोग्य केंद्रातील औषधी साठा पुस्तकात विलंबाने घेण्यात येते किंवा कधी घेण्यात येत नाही. नागरी आरोग्य केंद्रामधील औषधी साठा नेमका किती आहे करिता केंद्रामधील औषधी साठा नोंदवही अद्यावत ठेवणे आवश्यक आहे. परंतु वित्तीय वर्ष 2016-17 व 2017-18 मधील नागरी आरोग्य केंद्रामधील औषधी साठा नोंदवही अद्यावत नसल्याचे दिसून येत आहे.

यासंदर्भात अर्धसमास पत्र क्र.48, दि.03/12/2020 नुसार खुलासा मागितला असता संयुक्तिक खुलासा प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DLFIBBM9301 (Ref No : 34, Hmm No : 48)

## *78 सर्वसाधारण सभा तसेच स्थायी सभा बैठक इतिवृत्त वाचन करताना आढळलेल्या अनियमिततेबाबत .*

**नगर सचिव विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 2**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसूची (ड) प्रकरण 2(1) मध्ये सर्वसाधारण समितीचे कामकाजाचे नियमन करण्यासंबंधी तरतुदी विषद असून त्यातील उपपरिच्छेद (अ) नुसार सर्वसाधारण सभा प्रत्येक महिन्यात किमान एक तरी भरविण्यात आली पाहिजे व ती महिन्याच्या 20 तारखेच्या आत भरविण्यात आली पाहिजे अशी तरतूद आहे परंतु महानगरपालिकेने तसे केल्याचे आढळून आले नाही. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसूची lsquo;डrsquo; प्रकरण 2(3) मध्ये स्थायी समितीचे कामकाजाचे नियमन करण्यासंबंधीतील तरतुदी विषद असून त्यातील उपपरिच्छेद नुसार प्रत्येक आठवड्यात बैठक घेणे आवश्यक असताना महानगरपालिकेने तसे केल्याचे आढळून आले नाही.

27) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसूची (ड) प्रकरण 2(1) मध्ये सर्वसाधारण समितीचे कामकाजाचे नियमन करण्यासंबंधीतील तरतुदी विषद असून त्यातील उपपरिच्छेद (अ) नुसार सर्वसाधारण सभा प्रत्येक महिन्यात किमान एक तरी भरवण्यात आली पाहिजे व ती महिन्याच्या 20 तारखेच्या आत भरविण्यात आली पाहिजे अशी तरतूद आहे. परंतु उपरोक्त तरतुदींच्या अनुषगाने

कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही.

| अ.क्र. | दिनांक | ठराव क्र. |
|---|---|---|
| 1 | 27/04/2016 | 01 ते 06 |
| 2 | 30/05/2016 | 07 ते 10 |
| 3 | 19/11/2016 | 48 ते 53 |
| 4 | 28/12/2016 | 54 ते 58 |
| 5 | 16/02/2017 | 59 ते 76 |
| 6 | 29/05/2017 | 01 ते 08 |

28) 2.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसूची (ड) प्रकरण 2(3) मध्ये स्थायी समितीचे कामकाजाचे नियमन करण्यासंबंधीतील तरतुदी विषद असून त्यातील उपपरिच्छेद नुसार प्रत्येक आठवड्यात बैठक घेणे आवश्यक असताना महानगरपालिकेने तसे केल्याचे आढळून आले नाही.

| अ.क्र. | दिनांक | ठराव क्र. |
|---|---|---|
| 1 | 16-03-2017 | 228 ते 239 |
| 2 | 11-05-2017 | 1 ते 4 |
| 3 | 24-05-2017 | 5 ते 11 |
| 4 | 06-06-2017 | 12 ते 16 |
| 5 | 20-06-2017 | 17 ते 26 |
| 6 | 04-07-2017 | 27 ते 30 |

29) याबाबत अर्धासामास पत्र क्र.107 दि. 20/01/2021 चे अनुषगाने खुलासा मागितला असता परिच्छेद तयार करेपर्यंत कोणताही खुलासा प्राप्त झाला नसल्याने परिच्छेद नोंदविण्यात येत आहे.

DLFYBPF9301 (Ref No : 39, Hmm No : 107)

## *79 महात्मा ज्योतीबा फुले मार्केट व टिळक मैदान ओटा मार्केट मधील जवळपास 80% गाळे रिक्त असल्याबद्दल*

**परवाना व मंडई विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 1**

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

महानगरपालिकेने महात्मा ज्योतीबा फुले मार्केट व टिळक मैदान ओटा मार्केट मधील जवळपास 80% गाळे रिक्त ठेवल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 79 नुसार चंद्रपूर शहर महानगरपालिकेने वित्तीय वर्ष 2016-17 व 2017-18 मध्ये मालमत्तेचा विनियोग केल्याचे दिसून येत नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 79 नुसार महानगरपालिकेने स्वतःच्या मालकीच्या किंवा संपादित केलेल्या मालमत्तेचा विनियोग करून महानगरपालिकेचे उत्त्पन वाढवणे गरजेचे आहे. परंतु वित्तीय वर्ष 2016-17 व 2017-18 मध्ये चंद्रपूर महानगरपालिकेने महात्मा ज्योतीबा फुले मार्केट व टिळक मैदान ओटा मार्केट मधील जवळपास 80% गाळे रिक्त ठेवल्याने महानगरपालिकेने स्वतःच्या मालमत्तेचा विनियोग केल्याचे दिसून येत नाही.

| अ.क्र. | मार्केट | मालमत्ता क्रमांक | एकूण गाळे | रिक्त असलेले गाळे | रिक्त गाळ्यांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | महात्मा ज्योतिबा फुले मार्केट | 661-689 | 29 | 23 | 79.31% |
| 2 | टिळक मैदान ओटा मार्केट | 690-820 | 131 | 105 | 80.15% |

तसेच अर्धसमास पत्र क्रमांक 76 दि.29/12/2020 नुसार महात्मा ज्योतीबा फुले मार्केट व टिळक मैदान ओटा मार्केट च्या बांधकामची मूळ नस्ती लेखापरीक्षणास उपलब्ध करण्याबाबत सांगितले असता नस्ती उपलब्ध करण्यात न आल्याने सदर मालमत्तेच्या बांधकामावर मनपाने किती खर्च केला याबाबत माहिती मिळू शकली नाही. तरी महात्मा ज्योतीबा फुले मार्केट व टिळक मैदान ओटा मार्केट बांधकामासाठी मनपाने निरर्थक खर्च केला असल्याने झालेला संपूर्ण खर्च आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 76 दि.29/12/2020 अन्वये खुलासा मागितला असता समाधानकारक खुलासा प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DLFIBBM9301 (Ref No : 40, Hmm No : 76)

## *80 चंद्रपूर शहर मनपाने फेरीवाल्यांच्या संदर्भात राष्ट्रीय फेरीवाला धोरण लागु न करण्याबाबतची अनियमितता*

**परवाना व मंडई विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 1**

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

चंद्रपूर शहर महानगरपालिकेने शासन निर्णय नगरविकास विभाग क्र. राफेधो-0309/प्र.क्र.20/नवि-34 दि.02 मार्च 2009 मध्ये महानगरपालिकांनी करावयाची प्राथमिक कार्ये व फेरीवाला व्यवसायाच्या विनियमनासाठी उपविधी तयार करण्याबाबत कालबध्द कार्यक्रम ठरवुन दिला आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राष्ट्रीय फेरीवाला धोरण 2009 ची अमलबजावणी विहीत कालावधीत करण्याबाबत शासननिर्णय नगरविकास विभाग क्र. राफेधो-2013/ प्र.क्र.39/नवि-34 दि.21/10/2013 नुसार राज्यातील महानगरपालिकांना पुन्हा निर्देश देण्यात आले त्याची अंमलबजावणी मनपाने केली नाही. राष्ट्रीय फेरीवाला धोरण लागु न केल्याने मनपाला उत्पन्नाच्या ठोस स्त्रोतापासुन वंचित राहावे लागले आहे.

1.शासन निर्णय नगरविकास विभाग क्र. राफेधो-0309/प्र.क्र.20/नवि-34 दि.02 मार्च 2009 मध्ये महानगरपालीकांनी करावयाची प्राथमीक कार्ये व फेरीवाला व्यवसायाच्या विनीयमनासाठी उपविधी तयार करण्याबाबत कालबध्द कार्यक्रम ठरवुन दिलेला आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे आढळून येत नाही.

2.मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राष्ट्रीय फेरीवाला धोरण 2009 ची अमलबजावणी विहीत कालावधीत करण्याबाबत शासननिर्णय नगरविकास विभाग क्र. राफेधो-2013/प्र.क्र.39/नवि-34 दि.21/10/2013 नुसार राज्यातील महानगरपालीकांना पुन्हा निर्देश देण्यात आले असुन यातील परि. क्र.04 नुसार शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासुन 02 महिन्याच्या आत शहर फेरीवाला समिती स्थापन करणे व परि.08 नुसार 04 महिन्याच्या विहीत कालावधीत सर्व फेरीवाल्यांचे नोंदणीकरण करण्याची कार्यवाही बाबत स्पष्ट

निर्देश असताना लेखापरिक्षण वर्ष 2017-18 अखेर पर्यंत फक्त मा. आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली शहर फेरीवाला समिती स्थापन करण्यात आली परंतु उर्वरीत कार्यवाही करण्यात आली नाही.

3.शासन निर्णय दि.02 मार्च 2009 व दि.21/10/2013 मधील सुचनेनुसार विहीत कालमर्यादेत राष्ट्रीय फेरीवाला धोरण लागु करण्याबाबत महानगरपालिकेने वेळीच कार्यवाही केली नसल्याने महानगरपालिकेला उत्पन्नाच्या ठोस स्त्रोतापासुन वंचित राहिल्याचे स्पष्ट होते.

4.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील नियम 313,376,377,378 व 386 अन्वये चंद्रपूर शहर महानगरपालिकेने त्यांच्या क्षेत्रातील विविध व्यवसाय, उद्योगधंद्यांना व्यवसाय परवाना घेणे बंधनकारक असताना मनपा चंद्रपूर शहरने सदर नियमांची अमलबजावणी केल्याचे दिसुन येत नाही.

5.शासन निर्णय क्रमांक राफेधो-0309/प्र.क्र.20/नवि-34/दि.02/03/2009 नुसार राज्याच्या नागरी भागातील फेरीवाल्याच्या संदर्भात राष्ट्रीय फेरीवाला धोरण लागू करण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना सन 2009 ते 2018 या कालावधीत लागू झाली असती तर मनपाला निश्चित आर्थिक फायदा झाला असता.

याबाबत अर्धसमास पत्र क्र.121 दिनांक 03/02/2021 नुसार खुलासा विचारला असता तो प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DLFIBBM9301 (Ref No : 41, Hmm No : 121)

## *81 यांत्रिकी विभागातील वाहनाच्या लॉगबुक मधील अनियमिततेबाबत.*

**VEHICAL DEPARTMENT**
**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**
**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

महाराष्ट्र आकस्मिक खर्च अधिनियम 1965 मधील नियम क्र. 69 (तीन) नुसार वाहनाचे लॉगबुक व त्यामधील नोंदी घेण्यात येतात. वाहनाचे परिचलन बाबत सर्व प्रकारच्या नोंदी वाहनाच्या लॉगबुक मध्ये घेऊन त्यावर सक्षम प्राधिकारीची स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे. परंतु मनपाद्वारे त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

महाराष्ट्र आकस्मिक खर्च अधिनियम 1965 मधील नियम क्र. 69 (तीन) नुसार वाहनाचे लॉगबुक व त्यामधील

नोंदी घेण्यात येतात व त्यानुसार वाहनाचे परिचलन बाबतच्या सर्व नोंदी जसे वाहन केव्हा व कुठे, कोणी कशासाठी वापरले, वाहनाचे एकूण चाललेले किलोमीटर, वाहनामध्ये भरलेले इंधन इत्यादी सर्व प्रकारच्या नोंदी लॉगबुक मध्ये घेण्यात येऊन लॉगबुक मध्ये वाहन वापरणाऱ्या सक्षम प्राधिकारी यांची स्वाक्षरी घेण्यात येते. मनपा चंद्रपूर अंतर्गत एकूण 28 वाहने कार्यरत असल्याची माहिती विभागाने दिली. त्यापैकी काही वाहनाचे लॉग बुकची पडताळणी केली असता त्यामध्ये खालील दर्शविल्याप्रमाणे अनियमितता दिसून आल्या.

1. लॉगबुक मध्ये गाडीचा वापर करणारे किंवा सक्षम प्राधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत.

2. लॉगबुकमध्ये दर महिन्याला महिन्याचे शेवटी गोषवारा काढलेल्या नाही त्यामुळे सरासरी प्रती लिटर वाहन किती चालले याबाबत माहिती मिळाली नाही.

3. लॉगबुकच्या प्रत्येक पानावर पृष्ठ क्रमांक टाकून लॉगबुकचे एकूण पृष्ठे प्रमाणित केलेलं नाही.

4. काही वाहनाच्या लॉगबुक मध्ये वाहन चालल्याचे किलोमीटरसची नोंद नाही. (MH-34 A-7027)

5. वाहन क्र. MH-34-9798 या वाहनावर सन 2017-18 मध्ये वापरलेले इंधन व चालेले एकूण किमी. याची सरासरी काढली असता प्रत्येक महिन्याला प्रतिलिटर चाललेले सरासरी किलोमीटर मध्ये बरेच अंतर असल्याचे दिसून येते. उदा :- सप्टेंबर 2017 मध्ये 8.62 किमी. प्रतिलिटर तर ऑक्टो. 2017 मध्ये 14.3 किमी. प्रतिलिटर.

उपरोक्त मुद्द्याबाबत अर्धसमास पत्र क्र. 114 दि.28.01.2021 नुसार खुलासा मागितला असता संयुक्तिक खुलासा नसल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे. तरी उपरोक्त मुद्द्यावर आक्षेपाची पूर्तता करून अनुपालन सादर करावे.

DATVVBM6301 (Ref No : 42, Hmm No : 114)

## *82 कालमर्यादा पुर्ण झालेल्या वाहनावर दुरुस्ती व सुटे भाग यावरील झालेल्या अतिरिक्त खर्चाबाबत.*

**यांत्रिकी विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 3**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

शासन निर्णय वित्त विभाग क्र. विअप्र.-10.08/प्रक्र-70/2008/ विनिगम दि.15 मे 2009 मधील भाग पहिला उपविभाग 2 अक्र.19 नियम क्र. 69 नुसार पेट्रोलवर चालणाऱ्या वाहनाकरीता रु. 40,000/- प्रतिवर्ष तसेच

| |
|---|
| डिझेलवर चालणाऱ्या वाहनाकरीता रु. 50,000/- प्रतिवर्षपर्यंत वाहनाचे देखभाल / दुरुस्तीचा खर्च करण्यात मर्यादा घालून दिलेली आहे. मनपाने त्यांचे अधिनिस्थ वाहनावर मर्यादेबाहेर व वाहनाच्या मूळ किमतीपेक्षाही अधिक खर्च केला आहे. तसेच वाहनावरील दुरुस्ती खर्चाच्या नोंदीचे हिस्ट्रीबुक स्वाक्षरीसह अद्यावत नसल्याची अनियमितता केली आहे. |

शासन निर्णय वित्त विभाग क्र. विअप्र.-10.08/प्रक्र-70/2008/ विनिगम दि.15 मे 2009 मधील भाग पहिला उपविभाग 2 अक्र.19 नियम क्र. 69 नुसार पेट्रोलवर चालणाऱ्या वाहनाकरीता रु.40,000/- प्रतिवर्ष तसेच डिझेलवर चालणाऱ्या वाहनाकरीता रु. 50,000/- प्रतिवर्षपर्यंत वाहनाचे देखभाल / दुरुस्तीचा खर्च करण्यात मर्यादा घालून दिलेली आहे. मनपाने त्यांचे अधिनिस्थ वाहनावर मर्यादेबाहेर व वाहनाच्या मूळ किमतीपेक्षाही अधिक खर्च केला आहे.

1) मनपा चंद्रपूर येथील यांत्रिकी विभागातील वाहन क्र. MH-34 A 7027 ॲम्बुलन्स हे वाहन 2001 या वर्षी खरेदी करण्यात आले. सदरहु वाहनाचे हिस्ट्रीबुक वाहन खरेदीच्या दिनांकापासून अद्यावत नसल्याने सदर वाहनाचा खरेदीच्या दिनांकापासून दुरुस्ती व सुटे भाग यावर किती खर्च झाला याबाबत माहिती उपलब्ध झाली नाही. विभागाद्वारे उपलब्ध केलेल्या साठापुस्तक व हिस्ट्री बुक नुसार उपरोक्त वाहनावर वर्ष 2016-17 पासून एकूण रु.5,74,155/- येवढा खर्च दुरुस्ती व सुटेभाग यावर करण्यात आले. वाहनाच्या खरेदी दिनांकापासून ते वर्ष 2016-17 पर्यंतच्या झालेल्या वाहन दुरुस्तीचा खर्च सामील केला तर वाहनाच्या मूळ किमतीपेक्षा अधिक खर्च झाल्याचे दिसून येते.

वाहनाच्या आर.सी. बुकनुसार वाहनाची खरेदी व नोंदणी दिनांक 20/07/2001 रोजीची असल्याने वाहनाची कालमर्यादा पूर्ण झाल्यामुळे वाहनाचे निर्लेखन करून नवीन वाहन खरेदी करण्याची कार्यवाही करणे आवश्यक होते. परंतु वाहनावर मूळ किमतीपेक्षा अधिकचा खर्च दुरुस्ती व सुटे भाग याबाबीवर केल्याची अनियमितता करण्यात आली.

2) विभागाद्वारे वाहनावरील झालेल्या खर्चाचे प्रत्येक वाहनाचे खरेदीच्या दिनांकापासून झालेल्या खर्चाची नोंद करण्याकरिता वाहनाचे हिस्ट्रीबुक अद्यावत असणे आवश्यक आहे. परंतु हिस्ट्री बुकमध्ये वाहनाच्या खरेदीपासून खर्चाच्या नोंदी केलेल्या नाही. त्यामुळे वाहनावर दुरुस्ती व सुटे भाग यावर झालेला एकूण खर्च दिसून येत नाही.

3) वाहनावरील खर्च ज्याच्या देखरेखी खाली केला जातो अशा सक्षम अधिकारी याची स्वाक्षरी हिस्ट्री बुक तसेच साठा पुस्तकामध्ये नाही.

याबाबत अर्धसमास पत्र क्र.51 दिनांक 04/12/2020 नुसार संयुक्तिक खुलासा प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATVVBM6301 (Ref No : 64, Hmm No : 51)

## *83 शासन निर्णयानुसार अपंग कल्याणाकरिता महसुली उत्पन्नाच्या 3% रक्कम खर्च न करणे तसेच इतर अनियमितते बाबत.*

**अपंग विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 2**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 98039755.00/-

सन 1995 च्या अपंग पुनर्वसन कायद्यातील कलम 40 अन्वये सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना अपंगांच्या कल्याणार्थ महानागरपालीकेच्या अर्थसंकल्पात 3% निधी अपंग कल्याणाकरिता राखीव ठेवण्याबाबत महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, शासन परिपत्र क्र.संकीर्ण/2010/ प्र.क्र. 146/2010 दिनांक 30 ऑक्टोबर 2010 नुसार निर्देश देण्यात आले आहे. तसेच नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.2015/प्र.क्र.118/नवि-20दि.28/10/2015 नुसार समितीच्या मागणीनुसार त्यातून अपंगांच्या उन्नतीसाठी विविध योजना राबवून खर्च करणे आवश्यक आहे.

वरील शासन निर्णयाची अंमलबजावणी होण्याकरिता शहरातील अपंग नागरिकांची माहिती महानागरपालीकेकडे उपलव्ध राहणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण 2013/मुमंस-31/प्र.क्र.88/नवि20 मुंबई, दिनांक 4/ऑक्टोबर/2013 सोबत अपंगाच्या नोंदणीकरिता विहित नमुना दिलेला आहे. त्यानुसार शहरातील सर्व अपंगाच्या नोंदी परिपत्रक निर्गमित झालेल्या दिनाकापासून नोंदणी रजिस्टर मध्ये घेणे आवश्यक आहे. परंतु असे केल्याचे आढळून आले नाही.

(1)केंद्र शासनाने अपंग व्यक्तीच्या कल्याणाकरिता अपंग व्यक्तीसाठी समान संधी, संरक्षण व समान सहभाग कायदा 1995 चे कलम 40 नुसार व महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, शासन परिपत्र क्र.संकीर्ण/2010/प्र.क्र.146/2010 दिनांक 30 ऑक्टोबर 2010 नुसार अर्थ संकल्पात 3% निधी राखीव ठेवून खर्च करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. तासेच नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.2015/प्र.क्र.118/नवि-20दि.28/10/2015 मधील प्रयोजनार्थ अपंग कल्याण निधी खर्च करण्याबाबत पुढील प्रमाणे सूचना देण्यात आलेले आहेत.

(अ)अपंग कल्याण निधी खर्च करण्याबाबत देण्यात आलेल्या सूचना :

1.अपंगांच्या शालेय शिक्षण /उच्च शिक्षण/खेळाडूकरिता (जिल्हास्तर/राज्यस्तर/राष्ट्रीयस्तर /आंतरराष्ट्रीय)

शिष्यवृत्ती देण्यात यावी.

2.उत्पन्नाच्या अटीवर घरकुलांसाठी अर्थसहाय्य देणे.

3.अपंगाच्या मागणीनुसार त्यांना उदरनिर्वाह/ व्यवसाय/ साहित्य खरेदी करण्याकरिता निधी थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात (NEFT/ RTGS द्वारे ) जमा करावा.

4.अपंगांना वैद्यकीय खर्चाकरिता निधी उपलब्ध करावा.

5.नागरी वाहतूक व्यवस्थेमध्ये अपंगांकरिता प्रवासात सवलत देणे व याकरिता होणाऱ्या तोट्याची भरपाई करणे.

6.शॉपिंग मॉल, मंड्या, इत्यादीमध्ये अपंगांना स्टॉल उभारण्याकरिता अर्थ साहाय्य करणे.

7.महत्वाच्या स्थानिक बस स्टॉप/ डेपोमध्ये व्हीलचेअर उपलब्ध करणे.

8.सार्वजनिक वाचनालयामध्ये अंध व्यक्तीकरिता ऑडीओ लायब्ररी निर्माण करणे.

9.महानगरपालिका / नगरपालिकेच्याशाळांमध्ये अपंग विध्यार्थ्यांकरिता सोयीसुविधा उपलब्ध करणे.

10.अपंगाच्या क्रीडा, चित्रकला, हस्तकला, इ.स्पर्धा आयोजित करणे.

11.अपंगांकरिता व्यायाम शाळा उभारणे.

12.अपंगांच्या बचत गटांना अर्थसहाय्य करणे.

13.अपंगांच्या लग्नासाठी अर्थसहाय्य करणे.

14.अपंगांकरिता वेगळे भुवन/ रात्र निवारा उभारणे.

15.अपंगांना पेन्शन योजना सुरु करणे.

16.अपंग बेरोजगारांना भत्ता देणे.

17.अपंगांच्या कल्याणार्थ राबविण्यात येणाऱ्या योजनांचा प्रचार/प्रसार करणे.

18.उपरोक्त व्यतिरिक्त तिथल्या स्थानिक परीस्थितीनुसार आवश्यक असलेल्या महत्त्वाकांक्षी योजना अंमलात आणणे.

(ब)उपरोक्त मार्गदर्शक सूचनानुसार निधीचे वाटप करताना खालील बाबींना प्राधान्य द्यावे:-

1.एखाद्या कुटुंबात एकापेक्षा जास्त अपंग व्यक्ती असल्यास त्यांना त्यांच्या उत्पन्नानुसार प्राध्यान्य द्यावे.

2.80 ते 100% अपंग व्यक्ती

3.60 ते 80 % अपंग व्यक्ती

4.40ते 60% अपंग व्यक्ती

महानगरपालिका चंद्रपूर येथील वर्ष 2016-17 व 2017-18 चे अंदाजपत्रकानुसार निव्वळ महसुली उत्पन्नाच्या 3% रक्कम

वर्ष 2016-17

| | |
|---|---|
| वर्ष 2016-17 चे प्रत्यक्ष महसुली उत्पन्न | 172,84,18,402 |
| बांधील खर्च (प्रत्यक्ष) | 37,12,65,388 |
| निव्वळ महसुली उत्पन्न | 135,71,53,014 |
| 3% रक्कम | 4,07,14,590 |

वर्ष 2017-18

| | |
|---|---|
| वर्ष 2017-18 चे प्रत्यक्ष महसुली उत्पन्न | 241,53,22,565 |
| बांधील खर्च (प्रत्यक्ष) | 50,44,83,718 |
| निव्वळ महसुली उत्पन्न | 191,08,38,847 |
| 3% रक्कम | 5,73,25,165 |

उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका चंद्रपूर येथील वर्ष 2016-17 च्या अंदाजपत्रकानुसार मनपाचे बांधील खर्च वजा जाता या वर्षाचे एकूण निव्वळ महसुली उत्पन्न 135,71,53,014 एवढे होते. प्राप्त झालेल्या महसुली उत्पन्नाच्या 3% प्रमाणे 4,07,14,590एवढे रुपये अपंग कल्याणाकरिता वर दर्शविल्यानुसार शासन निर्णयातील अपंग कल्याणाच्या योजनावर खर्च होणे आवश्यक होते. प्रत्यक्षात मात्र कुठलाही खर्च करण्यात आल्याचे दिसून आले नाही.

तसेच वर्ष 2017-18 च्या अंदाजपत्रकानुसार मनपाचे बांधील खर्च वजा जाता या वर्षाचे एकूण निव्वळ महसुली उत्पन्न 191,08,38,847 एवढे होते. प्राप्त झालेल्या महसुली उत्पन्नाच्या 3% प्रमाणे 5,73,25,165एवढे अपंग कल्याणाकरिता वर दर्शविल्यानुसार शासन निर्णयातील अपंग कल्याणच्या योजनावर खर्च होणे आवश्यक

होते. प्रत्यक्षात मात्र कुठलाही खर्च करण्यात आल्याचे दिसून आले नाही.

शासन निर्देशाप्रमाणे वर्ष 2016-17 मधील आवश्यक 3% रक्कम 4,07,14,590/- व वर्ष 2017-18 मधील आवश्यक 3% रक्कम 5,73,25,165/- अपंग कल्याणावर झाला नसल्याने सदर रक्कम इतर बाबींवर झाल्याची शक्यता नाकारता येत नाही, म्हणून सदर रकमेवरील खर्च आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

(2)वरील शासन निर्णयाची अंमलबजावणी होण्याकरिता शहरातील अपंग नागरिकांची माहिती महानागरपालीकेकडे उपलव्ध राहणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण 2013/मुमंस-31/प्र.क्र.88/नवि20 मुंबई, दिनांक 4ऑक्टोबर2013 सोबत अपंगाच्या नोंदणीकरिता विहित नमुना दिलेला आहे. त्यानुसार शहरातील सर्व अपंगाच्या नोंदी परिपत्रक निर्गमित झालेल्या दिनाकापासून नोंदणी रजिस्टर मध्ये घेणे आवश्यक आहे.

याबाबत अर्धासामास पत्र क्र. 113 दि. 21/01/2021 चे अनुषगाने खुलासा मागितला असता संयुक्तिक उत्तर प्राप्त न झाल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

DLFYBPF9301 (Ref No : 47, Hmm No : 113)

## *84 चंद्रपूर मनपाच्या नवीन कार्यालयीन इमारतीवर तसेच म.गांधी पुतळा व अशोक स्तंभावर विद्यूत रोषणाई व मंडप सजावट करण्याच्या कामातील अनियमिततेबाबत*

**क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 2**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 249900.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 249900.00/-

चंद्रपूर मनपाच्या नवीन कार्यालयीन इमारतीवर तसेच म.गांधी पुतळा व अशोक स्तंभावर विद्यूत रोषणाई व मंडप सजावट करण्याचे काम देताना विहित प्रशासकीय कार्यपद्धतीचा अवलंब न करता काम देण्यात आलेले आहे.

कंत्राटदाराचे नाव:- राम डेकोरेशन अँड साउंड सर्व्हिसेस

कामाची ऑर्डर शीटः- मनपा/वाहन/30/2014-15 दि.15/02/201

प्रशासकिय वित्तीय मंजूरीः- मा.आयुक्त यांची चंशमनपा/लाईट/429/2016 दि.15/02/2016 अन्वये.

स्थायी समिती मंजुरीः- नस्तीत अभिलेखे उपलब्ध नाही.

कार्यादेशः- 1) चंशमनपा/लाईट/2015-16/43319 दि.22/02/16,

महानगरपालिका चंद्रपूर येथील सन 2016-17 व 2017-18 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणा दरम्यान विद्युत विभागातर्फे चंद्रपूर मनपाच्या नवीन कार्यालयीन इमारतीवर तसेच म.गांधी पुतळा व अशोक स्तंभावर विद्यूत रोषणाई व मंडप सजावट करण्याचे काम राम डेकोरेशन,चंद्रपूर यांना देण्यात आले असून प्रमाणक क्र. 27 दिनांक 26/04/2016 नुसार 2,49,900 रुपये प्रदान करण्यात आले आहे. सदर कामात पुढील अनियमितता दिसून आल्या.

1) सादर कामाचा करारनामा ज्या मुद्रांकावर करण्यात आला आहे तो मुद्रांक श्रीमती एन टी तवेटकर या मुद्रांक विक्रेत्यामार्फत दिनांक 24/02/2016 ला वितरीत करण्यात आल्याचे मुद्रांकावर नमूद असून करारनामा मात्र 22/02/2016 ला केल्याचे दर्शविण्यात आले आहे त्यामुळे करारनामाच बेकायदेशीर ठरतो. उपरोक्त खरेदीबाबत कार्यवाही आक्षेपार्ह असल्याचे दिसून आल्यामुळे पुरवठादाराला दिलेले देयक 2,49,900 रूपये आक्षेपाधिन ठरते.

2) स्थायी समिती मंजुरीबाबतचे अभिलेखे नस्तीत उपलब्ध नाही.

याबाबत अर्ध समास क्र. 98 दिनांक 13/01/2021 द्वारा विचारणा केली असता त्यामध्ये दिनांक टाकताना चूक झाल्याचे नमूद केले असून त्याचे कोणतेही संयुक्तिक स्पष्टीकरण न दिल्यामुळे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DLFARKM9301 (Ref No : 52, Hmm No : 98)

## *85 वैयक्तिक शौचालय बांधकामाचे Geo Tag असलेले फोटो काढून अपलोड करण्याच्या कामातील अनियमिततेबाबत*

**वैयक्तिक शौचालय योजना**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 3**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व-निधी व शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 101381086.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 181627.00/-

मनपातर्फे शासन निर्णय क्र.स्वभाअ/2015/ प्र.क्र.23/नवि-34/ दि.15 मे 2015 नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक शौचालय योजने अंतर्गत वैयक्तिक शौचालय बांधकामाचे Geo Tag असलेले फोटो काढून www.swachbharaturban.go.in या सांकेतस्थळावर अपलोड करण्याच्या कामासाठी फेरम सर्व्हिसेस यांना देण्यात आले असून त्यामध्ये काही अनियमितता दिसून आल्या असून सदर कामासाठी मंजूर रकमेपेक्षा 181627 रुपये जास्त खर्च करण्यात आला आहे.

| | |
|---|---|
| कामाचे नाव: | वैयक्तिक शौचालय बांधकामाचे Geo Tag असलेले फोटो काढून www.swachbharaturban.go.in या सांकेतस्थळावर अपलोड करणे. |
| कंत्राटदाराचे नाव: | फेरम सर्व्हिसेस |
| कोटेशन नोटीस: | चंशमनपा/संगणक विभाग/3185/2016 दि.08/01/2016 |
| प्रशासकिय मंजूरी: | मा.उपायुक्त यांची चंशमनपा/संगणक/2016/3312 दि.19/01/2016 अन्वये |
| स्थायी समिती मंजुरी: | नस्तीत अभिलेखे उपलब्ध नाही. |
| कार्यादेश: | 1) फेरम सर्व्हिसेस यांना चंशमनपा/संगणक/2016/331 दि.19/01/2016 अन्वये. |
| अंदाज पत्रकिय रक्कम: | रु.2,83,330 रक्कम/- |

महानगरपालिका चंद्रपूर येथील सन 2016-17 व 2017-18 या वित्तीय वर्षामध्ये स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत सुरु असलेल्या वैयक्तिक शौचालय योजनेवर सन 2016-17 मध्ये 80515198 रुपये व 2017-18 मध्ये 20865888 रुपये असे एकूण 101381086 रुपये खर्च झाले आहेत. या योजनेंतर्गत बांधकामाचे 2 टप्प्यामध्ये Geo Tag असलेले फोटो काढून www.swachbharaturban.go.in या सांकेतस्थळावर अपलोड करण्याचे काम दिले आहे त्यासाठी प्रती लाभार्थी 80.15 रुपये दर निश्चित करण्यात आला आहे. सदर कामात पुढील प्रमाणे अनियमितता दिसून आल्या.

1)काम देण्यात आलेल्या पुरवठादाराचे उद्योग उर्जा व कामगार विभागाचे नोंदणी प्रमाणपत्र, अनुभवाचा दाखला, आयकर-विक्रीकर विभागाचे आवश्यक प्रमाणपत्र नस्तीसोबत जोडण्यात आले नाही. त्यामुळे नोंदणीकृत पुरवठादारालाच काम दिले आहे कि नाही याबाबत पुष्टी होत नाही.

2)शासन निर्णय उद्योग उर्जा व कामगार विभागाचे /क्र.भांखस-2014/प्र.क्र.-82/भाग-III/ उद्योग-4 दिनांक 30 ऑक्टोबर 2015 मधील मुद्दा क्र.11 नुसार कार्यालयीन खरेदीच्या नियमपुस्तीकेतील परिच्छेद क्र.3.1.1.2 मध्ये नमूद केल्यानुसार खरेदीदार कार्यालयांनी प्रशासकीय मान्यतेनंतरच संबंधित कामाबाबत खरेदी प्रक्रिया

अवलंबिण्यात यावी असे स्पष्ट निर्देश असताना उपरोक्त कामात प्रशासकीय मान्यतेच्या आगोदर खरेदी प्रक्रिया करण्यात आली आहे. त्यामुळे सदर खरेदी प्रक्रियेत शासन निर्देशांचे पालन झाले नाही.

3)सन 2016-17 व 2017-18 मधील योजनेच्या रोखपुस्तकानुसार पुढीलप्रमाणे एकूण 464957 रुपये खर्च करण्यात आला आहे. परंतु मंजूर अंदाजपत्रकीय रक्कम 283330 रुपये असून वाढीव खर्चासाठी मंजुरी प्रदान केलेली नाही.त्यामुळे वाढीव खर्च रुपये 181627 आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

| अ.क्र. | प्रमाणक नं. | दिनांक | देय रक्कम | लाभार्थी |
|---|---|---|---|---|
| 1 | 496 | 14/06/2016 | 47901 | Ferum servicses |
| 2 | 1659 | 05/10/2016 | 38640 | Ferum servicses |
| 3 | 1735 | 27/10/2016 | 46942 | Ferum servicses |
| 4 | 1898 | 10/02/2017 | 47901 | Ferum servicses |
| 5 | 18 | 26/05/2017 | 82070 | Ferum servicses |
| 6 | 62 | 01/09/2017 | 81751 | Ferum servicses |
| 7 | 122 | 04/01/2017 | 119752 | Ferum servicses |
| | | | | |
| | | एकूण | 464957 | |

या प्रकरणी अर्धसमासपत्र क्र.129 दिनांक 05/02/2021 नुसार विचारणा केली असता परिच्छेद अंतिम करेपर्यंत कोणतेही उत्तर प्राप्त झाले नाही त्यामुळ आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DLFARKM9301 (Ref No : 60, Hmm No : 129)

## *86 निवडणुकीचे कामाकरिता खरेदी करण्यात आलेल्या स्टेशनरी व लेखनसामग्री खरेदीमधील अनियमितताबाबत.*

**निवडणुक विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ङ*

| |
|---|
| मनपा चंद्रपूर येथील वर्ष 2017 च्या महानगरपालिकेचा सार्वजनिक निवडणुकीकरिता लागणारी स्टेशनरी व साहित्य तसेच छपाई करण्याकरिता मे. श्री ट्रेडर्स यांना कंत्राट देण्यात आले. त्यांचेकडून एकूण रु.85,84,285/- चे स्टेशनरी व छपाई करून घेऊन रक्कम प्रदान करण्यात आले. परंतु प्रदान केलेल्या देयकासोबत खर्चाची प्रमाणके जोडलेली नाहीत. उपप्रमाणके नस्तीला जोडलेली आहेत. खर्चाच्या उपप्रमाणकावर साठा पुस्तकात नोंद घेतलाचा पृष्ठ क्रमांक, प्रदानाची मंजूर रक्कम, सक्षम प्राधिकाऱ्यांची स्वाक्षरी इत्यादी बाबी नमूद केल्या नाहीत. तसेच खरेदी किंवा छपाई केलेले साहित्याची नोंद साठा पुस्तकात दर्शवून वितरीत केलेले साहित्य व शिल्लक साहित्य या नोंदी स्वाक्षरीसह दिसुन आल्या नाही. |

मनपा चंद्रपूर येथील वर्ष 2017 मधील महानगरपालिकेच्या सर्वसाधारण निवणूकीकरिता मोठया प्रमाणात स्टेशनरी साहित्य खरेदी तसेच छपाई करण्यात आले. लेखनसामग्री खरेदी व छपाई करिता निविदा प्रक्रिया पुर्ण करून याबाबतचे कंत्राट मे. श्री ट्रेडर्स चंद्रपूर यांना देण्यात आले.

स्टेशनरी व साहित्य पुरवठा तसेच छपाईकरिता पुढीलप्रमाणे खर्च करण्यात आला.

1. प्रमाणक क्र. 122 दि. 06.05.2017 रु. 45,51,469 (स्टेशनरी)

2. प्रमाणक क्र. 123 दि. 06.05.2017 रु. 40,32,816 (छपाई)

उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे प्रमाणकाद्वारे खरेदी केलेला स्टेशनरी पुरवठा व छपाई बाबतचे देयकाची तपासणी केली असता. खालीलप्रमाणे अनियमितता दिसुन आली.

1. उपरोक्त प्रमाणकाद्वारे प्रदान केलेल्या देयकासोबत खर्चाची उपप्रमाणके जोडलेली नाहीत. उपप्रमाणके खर्चाच्या नस्तीत जोडलेली आहेत.

2. स्टेशनरी पुरवठा तसेच छपाईच्या नस्तीत जोडलेल्या उपप्रमाणकावर शासन निर्णय दि.02.01.1992 नुसार आवश्यक प्रमाणपत्रे नमूद नाही. तसेच जेवढया रकमेचे देयक मंजुरी केली त्याबाबत प्रदानार्थ रक्कम मंजूर करून सक्षम प्राधिकाऱ्यांची स्वाक्षरी केलेली नाही.

3. निवडणुकीचे कामाकरिता मोठया प्रमाणात लेखनसामग्री खरेदी व छपाई करण्यात आली. परंतु खरेदी तसेच छपाई केलेली लेखनसामग्री नोंद साठा पुस्तकात घेणे आवश्यक आहे. परंतु खरेदी व छपाई केलेली लेखन सामग्रीची नोंद साठा पुस्तकात दिसून आली नाही.

खरेदी केलेली सामग्री तसेच छपाई केलेली सामग्री नोंद साठा पुस्तकात घेऊन साठा पुस्तकांचा पृष्ठ क्रमांक उपप्रमाणकावर नोंदविणे आवश्यक आहे. परंतु तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

4. खरेदी केलेले साहित्य साठा पुस्तकात नोंदवुन त्यामधून वितरीत केलेले साहित्य व शिल्लक साहित्याची नोंद

स्वाक्षरीसह साठा पुस्तकात दिसून आल्या नाही.
याबाबत अर्धसमास पत्र क्र.151 दि. 22/02/2021 नुसार खुलासा विचारला असता तो प्राप्त न झाल्यमुळे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATVVBM6301 (Ref No : 90, Hmm No : 151)

## *87 अर्धसमासाच्या अनुषंगाने अभिलेखे/माहिती/खुलासा सादर न करणेबाबत.*

**इतर विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

वर्ष 2016-17 व 2017-18 च्या मनपा चंद्रपूर येथील लेखापरीक्षणाच्या अनुषंगाने विविध अर्धसमास पत्रे मनपास निर्गमित करण्यात आली होती. त्यापैकी महत्वाचे विषयांशी संबंधित माहिती/ अभिलेखे/खुलासा/अनुपालन लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आले नाही.

मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 (व त्यातील सुधारणा 2011) मधील नियम 6 नुसार मनपातील जबाबदार असणाऱ्या किंवा अभिलेख ज्यांच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असतील अशा स्थानिक प्राधिकरणाच्या कोणालाही वेतनी कर्मचाऱ्याने लेखापरिक्षण पथकाने निर्गमित केलेल्या अर्धसमासाची त्वरित दखल घेऊन आवश्यक अभिलेखे/माहिती सादर करणे बंधनकारक आहे. असे असतांना महत्वाचे विषय असलेल्या पुढील प्रकरणात अभिलेख उपलब्ध करून देण्यात आले नाही.

| अ. क्र. | अर्धसमास पत्र क्रमांक व दिनांक | विभाग | विषय |
|---|---|---|---|
| 1. | 43, 26/11/2020<br>57, 09/12/2020 | सामान्य प्रशासन | प्रवास भत्ता देयके, मोबाईल व टेलिफोन वरील खर्च बाबत माहिती |
| 2. | 99, 13/01/2021 | अतिक्रमण | अतिक्रमण विभागातील अभिलेखे उपलब्ध |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | करण्याबाबत. |
| 3. | 99, 13/01/2021<br>156, 24/02/2021 | एल.बी.टी. | एल.बी.टी. विभागातील अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करण्याबाबत. |
| 4. | 110, 21/01/2021 | बांधकाम | वर्ष 2016-17 व 2017-18 मधील पूर्ण व अपूर्ण बांधकामाची यादी उपलब्ध करणे. |
| 5. | 141, 12/02/2021 | बांधकाम | बांधकाम विभागातील खडीच्या थराच्या जागेची नोंदवही लेखापरीक्षणास सादर करणे. |
| 6. | 142, 12/02/2021 | स्वच्छता | विभागातील वर्ष 2016-17 व 2017-18 मधील खर्चाचे अभिलेख उपलब्ध करून देण्यात आले नाही. नाली व चेंबर दुरुस्ती, आकस्मिक खर्च, नाली सफाई, चंद्रपूर स्वच्छ अभियान, कचरा कुंडी खरेदी, संडास मुत्रीघर देखभाल दुरुस्ती खर्च, गणवेष, गमबूट, रेनकोट व घनकचरा व्यवस्थापन खर्च. |
| 7. | 122, 03/02/2021 | कर विभाग | नगर रचना विभागामार्फत बांधकाम पूर्ण होऊन संबंधित घर मालकास घराचा ताबा देण्यात आलेला आहे व त्या अनुषंगाने कर विभागास सुधारित कराधान करण्याबाबत सूचित केल्याचे बांधकाम परवाना नोंदवहीवरून दिसून येते. मात्र कर विभागामार्फत उक्त प्रकरणात कराधान केले किंवा कसे याबाबतची माहिती लेखापरीक्षणास सादर केलेली नाही. |
| 8. | 69, 17/12/2020 | लेखा विभाग | भविष्य निर्वाह निधी योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने समाविष्ट कर्मचाऱ्यांस वाटप केलेले वर्ष निहाय जमा चिठ्ठी किंवा वार्षिक विवरणपत्र आणि वर्ष 2017-18 चे भविष्य निर्वाह निधी बाबतचे रोख पुस्तक. |

## *88 स्थानिक संस्था कराच्या सन 2016-17 आणि 2017-18 मधील महसुली जमेचे अभिलेखे न मिळण्याबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**
**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 51025240.00 /-

महानगरपालिकेच्या येथील सन 2016-17 आणि 2017-18च्या अंदाजपत्रकानुसार स्थानिक संस्था कराशी निगडीत एकूण 51025240 रुपये जमा झाले आहेत. परंतु मनपाने कोणतेही अभिलेखे उपलब्ध करून न दिल्यामुळे जमेची पडताळणी करता आली नाही.

महानगरपालिकेच्या येथील सन 2016-17 आणि 2017-18च्या अंदाजपत्रकानुसार स्थानिक संस्था कराशी संबंधित महसुल सन 2016-17 मध्ये 37845243 रुपये आणि सन 2017-18 मध्ये पहिल्या आठ महिन्यात 13179997 रुपये असे एकूण 51025240 रुपये जमा झाले आहेत. परंतु स्थानिक संस्था कराशी निगडीत अभिलेखे उपलब्ध करून देण्यासाठी अर्धसमासपत्र क्र.99 दिनांक13/01/2021 नुसार पुढील माहिती उपलब्ध करून देण्याबाबत कळविले असता विभागाने कोणतेही अभिलेखे लेखापरीक्षणाकरिता उपलब्ध करून दिले नाहीत.

1)स्थानिक संस्था कर वसुली नोंदवही

2)चंद्रपूर महानगरपालिके अंतर्गत नोंदणीकृत व्यापाऱ्यांची सूची व संबंधित नस्त्या

3)चंद्रपूर महानगरपालिके अंतर्गत नोंदणीकृत बांधकाम व्यावसायिकांची सूची व संबंधित नस्त्या

4)पुढील विवरणपत्रात माहिती भरून द्यावी

| अ.क्र. | एकूण कारादात्यांची संख्या | सन 2016-17 पर्यंतची थकबाकी | सन 2016-17 मधील वसुली | 2017-18 मधील वसुली | सन 2017-18 अखेर थकबाकी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

5)दैनंदिन दाखल झालेल्या विवरणपत्राच्या नोंदणीसाठी ठेवण्यात आलेले नोंदीचे रजिस्टर

6)अभय योजनेचा लाभ घेतलेल्या एकूण व्यापाऱ्याची नोंदवही व योजनेंतर्गत एकूण जमा स्थानिक संस्था कर

7) वर्ष 2016-17 आणि 2017-18 मध्ये पुढील प्रमाणकाद्वारे झालेल्या खर्चाबाबतच्या नस्त्या

| अ.क्र. | प्रमाणक क्र. | दिनांक | देय रक्कम | खर्चाचा तपशील | लाभार्थी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 191 | 24/05/2016 | 90,000 | 104 व्यापाऱ्याचे कर निर्धारनाचे बिल | दावा असोसिएशन |
| 2 | 3093 | 30/03/2017 | 68000 | वार्षिक विवरणपत्र करण्यात आल्याचे 68 केसेस चे बिल | दावा असोसिएशन |

त्यामुळे अंदाजपत्रकातील स्थानिक संस्था कराबाबत महसुली जमे संबंधित कोणतीही पडताळणी करता आली नाही. तसेच स्थानिक संस्था कराची 2017-18 या वित्तीय वर्षाअखेर एकूण किती थकबाकी आहे याबाबतही पडताळणी करता आली नाही.

या प्रकरणी अर्धसमासपत्र क्र.156 दिनांक 24/02/2021 नुसार विचारणा केली असता परिच्छेद अंतिम करेपर्यंत कोणतेही उत्तर देण्यात न आल्यामुळे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DLFARKM9301 (Ref No : 73, Hmm No : 156)

## *89 कंत्राटी नागरी पोलिसांमार्फत होत असलेल्या अल्प वसुलीमुळे महानगरपालिकेच्या होणाऱ्या आर्थिक नुकसानीबाबत.*

**अतिक्रमण विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 1200000.00 /-

चंद्रपूर महानगरपालिका यांचे आदेश क्र. चशमनपा/ साप्रआ/213/2016 दिनांक 22/04/2016 नुसार 10 नागरी पोलिसांची नेमणूक कंत्राटी पद्धतीने केली असून त्यांनी केलेली मासिक वसुली ही त्यांच्या वेतनावर होणाऱ्या खर्चापेक्षाही कमी होत असून त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान होत आहे.

महानगरपालिका चंद्रपूर यांचे आदेश क्र. चशमनपा/ साप्रआ/213/2016 दिनांक 22/04/2016 नुसार 10 नागरी पोलिसांची नेमणूक कंत्राटी पद्धतीने केली गेली असून त्यांना वेळोवेळी मुदतवाढ दिलेली आहे. या नागरी पोलिसांना शहरातील वर्दळीचे रस्ते व फुटपाथवर होणारे अतिक्रमण, रस्त्यावर टाकण्यात येणारे बांधकाम साहित्य, अवैध्य होर्डिंग बोर्ड, नो- पार्किंग मध्ये असलेल्या गाड्या इत्यादीवर प्रतिबंध ठेवण्याकरिता नागरी शुल्क आकारण्याचे काम देण्यात आले आहे.त्यांना अतिक्रमण विभागाच्या प्रमाणपत्रानंतर प्रतीमाह 120000/- वेतन प्रदान करण्यात आले आहे.

परंतु या नागरी पोलीसामार्फत झालेल्या मासिक वसुलीच्या विवरणपत्रानुसार असे निदर्शनास येते कि एकूण मासिक वसुली हि अतिशय कमी असून त्यामुळे महापालिकेचे महसूल जमा करण्याचे उद्दिष्ट्य साध्य होत नाही.तसेच काही महिन्यात तर नागरी पोलीसानी केलेली एकूण मासिक वसुली हि त्यांना देण्यात येणाऱ्या वेतनापेक्षाही कमी असून त्यामुळे मनपाचा महसूल वाढण्यापेक्षा मनपाचे नुकसान होत आहे.

| अ.क्र. | महिना | वसूल रक्कम | वेतनावरील खर्च | वसुलीमुळे महानगरपालिकेला झालेला निव्वळ लाभ / तोटा |
|---|---|---|---|---|
| 1 | एप्रिल 2016 | 112850 | 120000 | 7150 रु तोटा |
| 2 | मे 2016 | 160550 | 120000 | 40550 रु फायदा |
| 3 | जून 2016 | 133400 | 120000 | 13400 रु फायदा |
| 4 | जुलै 2016 | 132400 | 120000 | 12400 रु फायदा |
| 5 | ऑगस्ट 2016 | 144350 | 120000 | 24350 रु फायदा |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 6 | सप्टेंबर 2016 | 58750 | 120000 | 61250 रु तोटा |
| 7 | ऑक्टोबर 2016 | 99250 | 120000 | 20750 रु तोटा |
| 8 | नोव्हेंबर 2016 | 72850 | 120000 | 47150 रु तोटा |
| 9 | डिसेंबर 2016 | 109600 | 120000 | 10400 रु तोटा |
| 10 | जानेवारी व फेब्रुवारी 2017 | माहिती उपलब्ध झाली नाही | माहिती उपलब्ध झाली नाही | माहिती उपलब्ध झाली नाही |
| 11 | मार्च 2017 | 54400 | 120000 | 65600 रु तोटा |
| | एकूण | 1078400 | 1200000 | 121600 रु तोटा. |

चंद्रपूर महानगरपालिकेचे सन 2016-17 या वर्षात उपलब्ध अभिलेख्यातील दहा महिन्यांच्या मासिक अहवालानुसार एकूण 121600 रुपयाचे नुकसान झाले आहे. त्यामुळे नेमलेले नागरी पोलीस अकार्यक्षम असल्याचे किंवा त्याच्याद्वारे नियमबाह्य वसुली होऊन त्याचा लाभ महानगरपालिकेला झालेला नसल्याचे दिसून येते. म्हणून नागरी पोलिसांची नेमणूक ही महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान करणारी ठरते.

याबाबत अर्धसमासपत्र क्र. 148 दिनांक 17/02/2021 द्वारा विचारणा केली असता नागरी पोलिसांनी केलेल्या प्रतिबंधात्मक कार्यवाहीमुळे वसुली कमी होत असल्याचे नमूद केले आहे. परंतु कोणती प्रतिबंधात्मक कार्यवाही केली याचे स्पष्टीकरण किंवा त्यासंबंधित अभिलेखे सादर केलेले नाहीत. सदर उत्तर संयुक्तिक नसल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DLFARKM9301 (Ref No : 81, Hmm No : 148)

## *90 मनपा हद्दीतील अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण या विरोधात शासन निर्देशानुसार कार्यवाही न केल्यामुळे होणाऱ्या नुकसानाबाबत*

**अतिक्रमण विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 10**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

चंद्रपूर महानगरपालिकेने सन 2016-17 व 2017-18 या वर्षात अतिक्रमण विरोधी कार्यवाही करताना विवध शासन निर्देशांचे व नियमांचे पालन न केल्यामुळे महानगरपालिका आपल्या महसुलापासून वंचित राहिली असून मनपाचे आर्थिक नुकसान झाले आहे.

महानगरपालिका चंद्रपूर मधील अतिक्रमण विभाग व प्रभाग क्र.1,2,3 यांना अर्धसमास पत्र क्र.100 दिनांक 13/01/2021 नुसार चंद्रपूर महानगरपालिकेच्या हद्दीतील अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण या विरोधात करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत माहिती मागितली असता संबंधित अर्धसमास पत्राला दिनांक 21/01/2021 रोजी अतिक्रमण विभागाने दिलेल्या उत्तरात विभागाकडे कोणतेही अभिलेखे उपलब्ध नसून फक्त मनुष्यबळ पुरविण्यात येत असल्याचे नमूद केले आहे.केले आहे. त्यामुळे चंद्रपूर महानगरपालिका अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणा विरोधात पूर्ण कार्यक्षमतेने कार्यवाही करत नसल्याचे आढळून येते. त्यामुळे चंद्रापुर महानगरपालिका अतिक्रमण विरोधी कार्यवाहीला प्राधान्य देत नसून अशा कार्यवाहीतून मिळणाऱ्या आर्थिक लाभापासूनही वंचित राहत आहे. पुढे नमूद शासन निर्णय, कायदे व परिपत्रकानुसार अनधिकृत बांधकाम /अतिक्रमणा विरोधातील कार्यवाहीसाठी महानगरपालीकेची जबाबदारी निर्धारित केली असून कार्यवाहीबाबत कायदेशीर व मार्गदर्शन तरतुदी केल्या आहेत. तरी सन 2016-17 व 2017-18 मध्ये खाली दिलेल्या शासननिर्देशानुसार चंद्रपूर महानगरपालिकेने कार्यवाही केली नाही.

1) शासन निर्णय क्र. कांडोमपा-1006/प्र.क्र.192/2006/नवि-28 दिनांक 02/03/2009 मधील भाग क्र. 1 मधील मुद्दा क्र.1(अ) नुसार मुख्यालय स्तरावर व प्रत्येक प्रभाग स्तरावर वेगवेगळे अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलन पथक निर्माण करण्यात यावीत असे नमूद असताना चंद्रपूर मनपाने अशी कोणती प्रशासकीय संरचना कार्यान्वित केलेली नाही. त्यामुळे अतिक्रमणावरील कार्यवाहीच्या एकूण कार्यक्षमतेवर नकारात्मक परिणाम होऊन त्यातून मिळणाऱ्या महसुलापासून मनपा वंचित राहत आहे.

2) शासन निर्णय क्र. कांडोमपा-1006/प्र.क्र.192/2006/नवि-28 दिनांक 02/03/2009 मधील भाग क्र. 2 मधील मुद्दा क्र. 2(अ) नुसार शहराची बिट-निहाय विभागणी करुन बिट निरीक्षकाची नेमणूक करुन मुद्दा क्र. 2(ब) नुसार

बिटमधील अनधिकृत बांधकामे / अतिक्रमणाबाबत नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. पण अशी नोंदवही चंद्रपूर मनपाद्वारे ठेवण्यात आलेली नाही.

3) शासन निर्णय क्र. कांडोमपा-1006/प्र.क्र.192/2006/नवि-28 दिनांक 02/03/2009 मधील भाग क्र. 2 मधील मुद्दा क्र. 2(ड) नुसार अनधिकृत बांधकामे / अतिक्रमणा विरोधात केलेल्या निष्कासन कार्यवहीचा दैनंदिन अहवाल प्रभाग प्रमुखाने तयार करुन अतिक्रमन विभाग प्रमुखामार्फात आयुक्तांना सदर करणे बंधनकारक आहे. पण चंद्रपूर मनपाद्वारे अशी कोणतीही कार्यवाही केल्याचे निदर्शनास आले नाही.

4) शासन निर्णय क्र. कांडोमपा-1006/प्र.क्र.192/2006/नवि-28 दिनांक 02/03/2009 मधील भाग क्र. 2 मधील मुद्दा क्र. 5 नुसार अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण इत्यादीबाबत विहित मुदतीत नोटीस देऊन कार्यवाही करणे बंधनकारक आहे परंतु चंद्रपूर मनपा मार्फत अशी कोणती कार्यवाही केल्याचे निदर्शनास आले नाही.

5) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 264 नुसार मोडकळीस आलेली किंवा पडण्याचा संभव असलेल्या बांधकामावर कार्यवाही करण्यात आली कि नाही हे स्पष्ट होत नाही. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 267 नुसार बेकायदेशीररीत्या बांधलेल्या बांधकामावर कार्यवाही केली कि नाही, आणि कार्यवाही केली असल्यास त्याचा खर्च संबंधित व्यक्तीकडून वसूल केला कि नाही याबाबत खुलासा केलेला नाही. तसेच उपरोक्त अधिनियमाच्या कलम 267अ नुसार अवैध बांधकामावर मालमत्ता कराच्या दुप्पट रकमेच्या शास्तीची तरतूद असून अशाप्रकारे शास्तीची कार्यवाही करण्यात आली कि नाही, आणि शास्तीची कार्यवाहीची रक्कम न भरल्यास हि वसुलयोग्य रक्कम समजून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 439 नुसार मालमत्ता कराच्या थकबाकीप्रमाणे वसूल करण्यात आली कि नाही याबाबतचे अभिलेखे उपलब्ध झाले नाही.

6) Maharashtra Regional and Town Planning Act,1966 मधील कलम 52 नुसार अनधिकृत बांधकामावर शास्तीची कार्यवाही केलेले अभिलेखे. तसेच MRTP Act मधील कलम 53 नुसार अनधिकृत बांधकाम हटवण्याची व कलम 54 नुसार अनधिकृत बांधकाम थांबवण्याची कार्यवाही केली असल्याचे कोणतेही अभिलेखे उपलब्ध केले नाहीत

7) चंद्रपूर महानगरपालीकेमार्फत शासन निर्णय क्र. न्यायप्र 2016/प्र.क्र. 127/नवि-16 दिनांक 19/11/ 2016 मधील मुद्दा क्र. 6 नुसार पूर्वपरवानगीशिवाय उभारण्यात येणाऱ्या तात्पुरत्या स्वरूपातील मंडप,कमानी निष्कासित करण्याची कार्यवाही करण्यात आली नाही.

8) चंद्रपूर महानगरपालीकेमार्फत शासन निर्णय क्र. डीएपी-1014/प्र.क्र.165/ का.1481 दिनांक 22/05/2013 नुसार सार्वजनिक जागेवर अतिक्रमण रोखण्यासाठी अशा जागांभोवती संरक्षक भिंत बांधण्याची कार्यवाही करण्यात आली असल्याचे कोणतही अभिलेखे उपलब्ध झाले नाहीत.

9) शासन परिपत्रक क्र. जमीन-07/2013/प्र.क्र.374/ज-1 दिनांक 10/10/2013 मधील मुद्दा क्र. 2 नुसार स्थानिक

स्वराज्य संस्थांच्या सार्वजनिक जागेत अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आल्यास सदर अतिक्रमण तत्काळ निष्कासित करण्याची कार्यवाही करावी असे निर्देश आहेत. तसेच मुद्दा क्र. 3 नुसार सार्वजनिक जागेवर अतिक्रमण आढळल्यास संबंधित अधिकार्याने तत्काळ पोलिसात फिर्याद देण्याबाबत निर्देश दिले आहेत. चंद्रपूर महानगरपालिकेने वरील परिपत्रकानुसार कार्यवाही केली की नाही हे स्पष्ट होत नाही.

10) अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण विरोधातील कार्यवाहीत जप्त केलेल्या वस्तू व इतर बाबींची नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. जप्त वस्तूवर दंड भरून किंवा त्यांचा लिलाव करुन अशा वस्तूंचे निर्लेखन करणे आवश्यक आहे. जप्त केलेल्या वसुलीतून सन 2016-17 व 2017-18 मध्ये किती महसूल मिळाला याबाबत कोणतेही अभिलेखे मिळाले नाहीत. त्यामुळे अशा वस्तूंचे निर्लेखन नियमबाह्यपणे झाले असण्याची शक्यता आहे. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झाले आहे.

याबाबत अर्ध समास क्र. 140 दिनांक 12/02/2021 द्वारा विचारणा केली असता त्याबाबत परिच्छेद अंतिम करेपर्यंत कोणतेही उत्तर प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DLFARKM9301 (Ref No : 85, Hmm No : 140)

## *91 स्वच्छता विभागातील फागिंग मशिनच्या परिचलन नोंदवहीतील अनियमिततेबाबत.*

**स्वच्छता विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 4**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| महाराष्ट्र आकस्मिक खर्च अधिनियम 1965 मधील नियम क्र. 69 (3) तसेच मोटार वाहन लेखा नियम 153 नुसार वाहनाच्या परीचलनाबाबतच्या सर्व नोंदी वाहन परिचलन नोंदवहीत घेऊन त्या सक्षम प्राधिकारी यांच्या सही शिक्क्याने अद्यावत करणे अनिवार्य आहे. मात्र स्वच्छता विभागातील फागिंग मशिन नोंद्वहीत वाहनाच्या परीचलनाबाबतच्या नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत. तसेच परिचलन / लागबुक नोंदवही मध्ये गाडीच्या वापराबाबत नोंदीवर सक्षम प्राधिकार यांची स्वाक्षरी नमूद नाही. |

महाराष्ट्र आकस्मिक खर्च अधिनियम 1965 मधील नियम क्र. 69 (3) तसेच मोटार वाहन लेखा नियम 153 नुसार वाहनाच्या परीचलनाबाबतच्या सर्व नोंदी वाहन परिचलन नोंदवहीत घेऊन त्या सक्षम प्राधिकारी यांच्या

सही शिक्क्याने अद्यावत करणे अनिवार्य आहे. स्वच्छता विभागातील फागिंग मशिन नोंद्वहीचे अवलोकन केले असता खालील प्रमाणे अनियमितता निदर्शनास येत आहेत.

1)परिचलन / लागबुक नोंदवही मध्ये गाडीच्या वापराबाबत नोंदीवर सक्षम प्राधिकार यांची स्वाक्षरी नमूद नाही.

2)नोंदवहीत मासिक गोषवारे काढण्यात आलेले नसल्यामुळे महिनाअखेर शिल्लक पेट्रोल / डीझेल किती तसेच प्राप्त पेट्रोल / डीझेल किती , सरासरी वाहनावर किती पेट्रोल / डीझेल खर्च करण्यात आला याबाबतचा तपशील उपलब्ध नाही.

3)वाहनाच्या परीचलनाबाबतच्या सर्व नोंदी जसे, गाडीचा वाहन क्र,, दिनांक निहाय शिल्लक पेट्रोल / डीझेल प्राप्त झाल्याची नोंद, प्रवासाचे अंतर, धावलेल्या मैलाचे अंतर, वाहनामध्ये भरलेले इंधन इत्यादीची नोंद नोंदवहीत करण्यात आलेली नाही.

4)सर्व नोंदवहया ह्या सक्षम प्राधिकारी यांच्या स्वाक्षरी व शिक्क्यासह प्राधिकृत करण्यात आलेल्या नसल्यामुळे त्यामुळे उक्त नोंदवहया लेखापरीक्षाणासाठी अधिकृत नाहीत.

सदर अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र 152 ,दि. 24.02.2021 नुसार विभागास अनुपालन/अभिप्राय सादर करण्यास कळविले होते. तथापि विभागाकडून अभिप्राय प्राप्त न झाल्यामुळे परिच्छेद नोंदविण्यात येत आहे.

DATSMBM7501 (Ref No : 83, Hmm No : 152)

## *92 जैविक कचरा व्यवस्थापन व हाताळणी बाबतच्या अनियमिततेबाबत.*

**स्वच्छता विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 3**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

जैविक वैद्यकीय कचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम 1998 मध्ये Schedule 1 schedule 5 (rule 5) मध्ये व शासन निर्णय,नगर विकास विभाग,क्रमांक घवव्या/1006/प्र.क्र.53/नवि16, दिनांक 26/10/2006 कृती मुद्दा क्र 9 तसेच आरोग्य सेवा कचरा व्यवस्थापन व जैविक कचरा व्यवस्थापन नियम 2016 मधील मार्गदर्शक सूचना मध्ये जैविक वैद्यकीय कचरा व्यवस्थापन व हाताळणी बाबत निर्देश आहेत.चंद्रपूर शहर मनपामध्ये जैविक वैद्यकीय कचरा व्यवस्थापन व हाताळणी केली जात नसल्याचे आढळून आले.

चंद्रपूर शहर महानगरपालिकेचे मधील सन 2016 -17 सन 2017-18 वर्षातील स्वच्छता विभागाचे लेखापरीक्षण केले असता जैविक वैद्यकीय कचरा (व्यवस्थापन व हाताळणी) बाबत खालील अनियमितता आढळून आलेल्या आहेत.

1)जैविक वैद्यकीय कचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम 1998 मध्ये Schedule 1 schedule 5 (rule5) मध्ये व शासन निर्णय,नगर विकास विभाग,क्रमांक घवव्या/1006/प्र.क्र.53/नवि16, दिनांक 26/10/2006 कृती मुद्दा क्र 9 तसेच आरोग्य सेवा कचरा व्यवस्थापन व जैविक कचरा व्यवस्थापन नियम 2016 मधील मार्गदर्शक सूचना मध्ये जैविक वैद्यकीय कचरा व्यवस्थापन व हाताळणी बाबत निर्देश आहेत. उक्त शासन निर्देशाच्या अनुषंगाने चंद्रपूर शहर मनपामध्ये जैविकवैद्यकीय कचरा व्यवस्थापन व हाताळणी केली जात नाही.

2)जैविक वैद्यकीय कचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम 1998 मध्ये Schedule 1 schedule 5 (rule 5) मध्ये नमुद केल्याप्रमाणे जैविक वैद्यकीय कच-याचे संकलन वाहतुक, विलीनीकरण व विल्हेवाट लावणे तसेच कचरा विल्हेवाटीची गुणवत्ता (Standard) राखले जाते काय त्याचे पर्यवेक्षण सल्लागार समीतीने व आरोग्य विभागाने केल्याबाबत तपशिल उपलब्ध करून देण्यात आले नाही.

3)नोंदणीकृत वैद्यकीय अध्यापनामधील खांटाच्या संख्येची पडताळणी दर 6 महीन्याने करून जैविक वैद्यकीय कचरा व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. अशी पडताळणी विभागाने केल्याचे दिसुन येत नाही.

सदर अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र 155 ,दि. 04.03.2021 नुसार विभागास अनुपालन अभिप्राय सादर करण्यास कळविले होते. तथापि विभागाकडून अभिप्राय प्राप्त न झाल्यामुळे परिच्छेद नोंदविण्यात येत आहे.

DATSMBM7501 (Ref No : 84, Hmm No : 155)

## *93 अग्निशमन विभागामार्फत शहरातील रुग्णालयाचे फायर ऑडीट प्रमाणपत्र नुतनीकरण न करणे.*

**अग्निशमन विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2016-2017 ते 2017-2018**

**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 अंतर्गत Chapta 3(3) व 4(2) नुसार शहरातील रुग्णालये व इतर प्रतिष्ठान यांना अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र घेऊन अग्निशमन प्रतिबंधक उपाययोजनेची तपासणी दर सहा महिन्यात मनपाने निश्चित केलेल्या एजन्सी कडून करवून त्याचे नुतनीकरण करणे बंधनकारक आहे.
परंतु मनपाद्वारे शहरातील पडताळणी केलेल्या रुग्णालयापैकी 19 रुग्णालयाचे व इतर बऱ्याच रुग्णालय व प्रतिष्ठाने यांचे फायर ऑडीट प्रमाणपत्राचे नुतनीकरण करण्यात आले नाही.

आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 अंतर्गत Chapta 3(3) व 4(2) नुसार शहरातील रुग्णालये व इतर प्रतिष्ठान यांना अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र घेऊन अग्निशमन प्रतिबंधक उपाययोजनेची तपासणी दर सहा महिन्यात मनपाने निश्चित केलेल्या एजन्सी कडून करवून त्याचे नुतनीकरण करणे बंधनकारक आहे.
असे असतांना मनपा चंद्रपूर येथील अग्निशमन विभागाने खाली दर्शविलेल्या व पडताळणी केलेल्या काही मोठया रुग्णालयाचे फायर ऑडीट प्रमाणपत्राचे नुतनीकरण केल्याचे नस्तीत दिसुन आले नाही.

| अं. क्र. | रुग्णालयाचे नाव व पत्ता | अग्निशमन ना हरकत प्रमाण पत्र नुतनीकरण केले नसल्याचा कालावधी (पासून) |
|---|---|---|
| 1. | डॉ. प्रकाश मामीडवार<br>बापट नगर | जुन 2017 |
| 2. | डॉ. राजीव धानोरकर | जुलै 2016 |
| 3. | निकुंज हॉस्पिटल | जुन 2016 (NOC नाही) |
| 4. | चैतन्य प्रसूतिगृह | डिसेंबर 2017 |
| 5. | अग्रवाल नर्सिंग होम, कस्तुरबा रोड | जुलै 2017 |
| 6. | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर | जुलै 2017 (NOC नस्तीत नाही) |

| | | |
|---|---|---|
| 7. | मोगरे हॉस्पिटल | डिसेंबर 2017 |
| 8. | अक्षय मॅटरनिटी होम | जुलै 2018 |
| 9. | दुधलवार हॉस्पिटल, कस्तुरबा रोड | जुन 2016 |
| 10. | साई गजानन हॉस्पिटल, कस्तुरबा रोड | डिसेंबर 2017 |
| 11. | श्वेता हॉस्पिटल, हवेली कॉम्प्लेक्स | जुन 2017 |
| 12. | घाटे सर्जिकल व प्रस्तुतीगृह | जानेवारी 2017 |
| 13. | अमेय प्रस्तुतीगृह, तुकुम | डिसेंबर 2017 |
| 14. | किड्स हॉस्पिटल. तुकूम | जुलै 2017 |
| 15. | इंगळे नर्सिंग होम | डिसेंबर 2017 |
| 16. | शिशु हॉस्पिटल, डॉ.खान | जुन 2016 |
| 17. | देवतळे नर्सिंग होम | डिसेंबर 2017 |
| 18. | गांधी हॉस्पिटल | जुन 2018 |
| 19. | डॉ. सल्का मामीडवार,<br>आझाद गार्डनजवळ | जुन 2016 |

वर दर्शविलेल्या व पडताळणी केलेल्या रुग्णालयाचे अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्राचे तीन-चार वर्षापासूनचे नुतनीकरण केले नसल्याचे दिसून येते. स्त्री प्रसूतिगृह व शिशु हॉस्पिटल मध्ये स्त्रीया व नवजात बालकाचा समावेश असल्यामुळे व रुग्णालयात आगप्रतिबंधक व जीव संरक्षण उपाययोजना आवश्यक असल्याने फायर

ऑडीट प्रमाणपत्र घेऊन व त्याचे नुतनीकरण करणे आवश्यक आहे. कारण अनावधानाने आगीच्या घटना घडल्यास रुग्णालयाला जबाबदार धरण्यात येते. परंतु मनपा चंद्रपूर येथील अग्निशामक विभागाने बऱ्याच रुग्णालयाचे फायर ऑडीट प्रमाणपत्राचे नुतनीकरण केलेले नाही किंवा फायर ऑडीट प्रमाणपत्राचे नुतनीकरण न करणाऱ्या रुग्णालयावर कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

याबाबत अर्धसमास पत्र क्र.134 दि. 10/02/2021 नुसार खुलासा मागितल्या असता विभागाचे पत्र क्र.353 दि. 15/02/2021 नुसार संयुक्तिक खुलासा नसल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATVVBM6301 (Ref No : 89, Hmm No : 134)

**अनुपालन व पोहोच**

या लेखापरीक्षण अहवालातील आक्षेपांवरील अनूपालन अहवाल,महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930(सुधारणा 2011) मधील कलम 10 (1) मधील तरतुदीनुसार हा अहवाल प्राप्त झाल्यापासून चार महिन्यांचे आत महासभेपुढे मांडून या अहवालात निदर्शनास आणून दिलेले दोष किंवा नियमबाहयतेचे अनुपालन मा.आयुक्त, चंद्रपूर महानगर पालीका चंद्रपूर यांच्या स्वाक्षरीने तिन प्रतित या कार्यालयास पाठवावे. तत्पूर्वी हा लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झाल्याचा दिनांक नमूद करून पोहोच पाठवावी.

(रा.दें.माने)
उपसंचालक (मनपालेप),(प्रभारी)
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
औरंगाबाद उपविभाग-3.

प्रत अग्रेषित -

1. मा.प्रधान महालेखापाल (लेखापरिक्षा) दोन, नागपूर(ई-मेल व्दारे)
2. मा.प्रधान सचिव-2, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई-32.(ई-मेल व्दारे)
3. मा.विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय नागपूर.(ई-मेल व्दारे)
4. मा.संचालक स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई. (महानगरपालिका अहवाल व पुनर्विलोकनन शाखा,नवी मुंबई प्रत्येकी 1 प्रत)
5. सहसंचालक (मनपालेप) स्थानिक निधी लेखापरीक्षा, रायगड भवन, नवि मुंबई.
6. कार्यालयीन प्रत.

(रा.दे.माने)
उपसंचालक (मनपालेप),(प्रभारी)
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
औरंगाबाद उपविभाग-3.

Signature Not Verified
Digitally signed by
Rajeshwar Devrao Mane
Date : 10-12-2021 16:33:28

Manoj Shrinivas Gaggad
Assistant Director,
Deputy Director, Municipal Corporation Audit,
Division-3, Local Fund Accounts Audit Office,
Aurangabad.

## *लेखा परीक्षकनिहाय परिच्छेदांचे विवरणपत्र*

| नाव | परिच्छेद क्रमांक |
|---|---|
| धर्मराज रामरतन मुरोडीया, सहाय्यक लेखापरिक्षा अधिकारी | 14, 15, 26, 29, 30, 31, 42, 53, 54, 58, 60, 70, 72, 73 |
| श्री.संजय मधुकरराव बुलबुले, सहाय्यक लेखापरिक्षा अधिकारी | 13, 16, 17, 18, 19, 20, 3, 35, 36, 37, 38, 44, 45, 46, 48, 49, 56, 66, 67, 71, 75, 8, 91, 92 |
| विजय विश्वनाथ बागडे, सहाय्यक लेखापरिक्षा अधिकारी | 1, 12, 2, 21, 23, 33, 34, 47, 5, 50, 55, 57, 61, 64, 65, 68, 69, 7, 81, 82, 86, 87, 9, 93 |
| अदिनाथ राजेंद्र काळे, कनिष्ठ लेखापरिक्षक | 10, 11, 24, 25, 32, 39, 76, 84, 85, 88, 89, 90 |
| इंद्रजीत बबनराव बोबडे, कनिष्ठ लेखापरिक्षक | 22, 4, 40, 43, 51, 52, 59, 6, 62, 63, 77, 79, 80 |
| योगेश्वरी बाबुराव पांचाळ, कनिष्ठ लेखापरिक्षक | 27, 28, 41, 74, 78, 83 |

## विवरणपत्रे व जोडपत्रे

| अ.क्र. | परिच्छेद क्र. | आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 5 | 181906.00 | ---- | ---- | ---- | 181906.00 |
| 2 | 7 | 47138629.00 | ---- | ---- | ---- | 47138629.00 |
| 3 | 10 | ---- | 4366.00 | ---- | ---- | 36484.00 |
| 4 | 11 | 7590000.00 | ---- | ---- | ---- | 101381086.00 |
| 5 | 12 | 2758768.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| 6 | 13 | ---- | 19200.00 | ---- | ---- | 19200.00 |
| 7 | 14 | 2786460.00 | 7150.00 | ---- | ---- | 2793610.00 |
| 8 | 15 | 23510699.00 | 246193.00 | ---- | ---- | 23756892.00 |
| 9 | 17 | 41647.00 | ---- | ---- | ---- | 3419296.00 |
| 10 | 18 | 730599.00 | 135000.00 | ---- | ---- | 7491263.00 |
| 11 | 19 | ---- | 763639.00 | ---- | ---- | ---- |
| 12 | 20 | 135000.00 | ---- | ---- | ---- | 4069830.00 |
| 13 | 21 | 30786.00 | 133000.00 | ---- | ---- | ---- |
| 14 | 22 | 13256327.60 | 16100.00 | 2610131.33 | ---- | 15882559.00 |
| 15 | 23 | 268928.00 | ---- | ---- | ---- | 23121550.00 |
| 16 | 24 | ---- | 14420991.00 | ---- | ---- | 36018331.00 |
| 17 | 25 | 1690075.00 | ---- | ---- | ---- | 106892274.00 |
| 18 | 26 | 1904144.00 | ---- | ---- | ---- | 1904144.00 |
| 19 | 27 | 163399592.00 | ---- | ---- | ---- | 163399592.00 |
| 20 | 28 | 161142.00 | ---- | ---- | ---- | 257847.00 |
| 21 | 29 | ---- | 10053720.00 | ---- | ---- | 10053720.00 |
| 22 | 30 | ---- | 944246.00 | ---- | ---- | 944246.00 |
| 23 | 31 | ---- | 2242842.00 | ---- | ---- | 3844872.00 |
| 24 | 32 | ---- | 5536000.00 | ---- | ---- | 101381086.00 |
| 25 | 33 | ---- | 18817.00 | ---- | ---- | ---- |
| 26 | 37 | ---- | 234074.00 | ---- | ---- | ---- |
| 27 | 38 | ---- | 125530.00 | ---- | ---- | ---- |
| 28 | 39 | ---- | 18950.00 | ---- | ---- | 362600.00 |
| 29 | 40 | ---- | 51097.00 | ---- | ---- | ---- |
| 30 | 41 | 118000.00 | ---- | ---- | ---- | 4000000.00 |
| 31 | 42 | ---- | 187571.00 | ---- | ---- | ---- |
| 32 | 43 | 859459.00 | ---- | ---- | ---- | 859459.00 |
| 33 | 44 | 34529.00 | 345214.00 | ---- | ---- | 4861180.00 |
| 34 | 45 | 786717.00 | 496000.00 | ---- | ---- | 2514440.00 |
| 35 | 46 | 84684.00 | 75000.00 | ---- | ---- | 8480359.00 |
| 36 | 47 | 67054.00 | 59294.00 | ---- | ---- | 5442333.00 |
| 37 | 48 | 520949.00 | 521104.00 | ---- | ---- | 23406582.00 |
| 38 | 49 | 1948584.00 | 21487.00 | ---- | ---- | 22068093.00 |
| 39 | 50 | 93543.00 | 110752.00 | ---- | ---- | 10113115.00 |
| 40 | 51 | ---- | 4500.00 | ---- | ---- | ---- |
| 41 | 52 | ---- | 1762.00 | ---- | ---- | ---- |
| 42 | 53 | ---- | 185000.00 | ---- | ---- | 1287277.00 |
| 43 | 54 | ---- | 16300000.00 | ---- | ---- | 18100000.00 |

| अ.क्र. | परिच्छेद क्र. | आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 44 | 55 | ---- | 794886.00 | ---- | ---- | 5286712.00 |
| 45 | 58 | 398503.00 | ---- | ---- | ---- | 2618561.00 |
| 46 | 83 | 98039755.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| 47 | 84 | 249900.00 | ---- | ---- | ---- | 249900.00 |
| 48 | 85 | 181627.00 | ---- | ---- | ---- | 101381086.00 |
| 49 | 88 | ---- | ---- | ---- | ---- | 51025240.00 |
| 50 | 89 | ---- | ---- | ---- | ---- | 1200000.00 |
| | **एकूण रक्कम** | **368968007** | **54073485** | **2610131** | **0** | **917245354** |

## विवरणपत्र क्र. १ (अ)

### महानगरपालिका स्वनिधीची महसुली व भांडवली जमा, खर्च व शिल्लक

(रुपये लाखात)

सन २०१६-१७

| अ.क्र. | महानगरपालिका | स्वनिधी | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | आरंभीची शिल्लक | महसुली जमा | | भांडवली जमा | | एकूण प्रत्यक्ष जमा | महसुली खर्च | | भांडवली खर्च | | एकूण प्रत्यक्ष खर्च | अखेरची शिल्लक |
| | | | अंदाजपत्रकीय व जमा | प्रत्यक्ष जमा | अंदाजपत्रकीय व जमा | प्रत्यक्ष जमा | | अंदाजपत्रकीय खर्च | प्रत्यक्ष खर्च | अंदाजपत्रकीय खर्च | प्रत्यक्ष खर्च | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ (३+५+७) | ९ | १० | ११ | १२ | १३ (१०+१२) | १४ (८-१३) |
| | चंद्रपूर महानगरपालिका, चंद्रपूर | १६९१८.३३ | २०७११.८६ | १७३३५.२१ | ११ | ० | ३४२५३.५४ | ११८२१ | ८४६९.८१ | २३४७०.०० | ७०९१.०० | १५५६०.८१ | १८६९२.७३ |

५/३/१८.

मुख्य लेखाधिकारी

चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर

विवरणपत्र क्र. १ (ब)

महानगरपालिका स्वनिधी व शासकीय निधी एकत्रित जमा, खर्च व शिल्लक तपशिल

सन २०१६-१७ (रुपये लाखात)

| अ.क्र. | महानगरपालिका | शासकीय निधी | | | | | एकूण एकंदर | | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | आरंभीची शिल्लक | जमा | एकूण जमा | खर्च | अखेरची शिल्लक | आरंभीची शिल्लक | जमा | एकूण जमा | खर्च | अखेरची शिल्लक | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| | | | | (३+४) | | (५-६) | (स्वनिधी + शासकीय निधी | (स्वनिधी + शासकीय निधी | (८+९) | (स्वनिधी + शासकीय निधी | (१०-११) | |
| | चंद्रपूर महानगरपालिका, चंद्रपूर | १२१२९.९२ | ७२२४.९० | १९३५४.८२ | ७३५५.०४ | ११९९९.७८ | ४७३.०० | ४६६१.०० | ५१३४.०० | २७४८.०० | २३८६.०० | |

मुख्य लेखाधिकारी
चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर

विवरणपत्र क्र.०३

# महानगरपालिकेस योजनानिहाय प्राप्त झालेला अखर्चित शासकीय निधीबाबत

महानगरपालिकेचे नांव :- चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर

सन - २०१६-१७

## अखर्चित निधीची माहिती सन २०१६-१७

| अ.क्र | योजनेचे नांव | ०१.०४.१६ रोजीची सुरूवातीची शिल्लक | सन २०१६ - १७ मध्ये प्राप्त अनुदान | गुंतवणूक | मनपा हिस्सा | इतर जमा | व्याज | एकुण (3+7) | ३१.०३.२०१७ पावेतो खर्च | कॅश बुक नुसार अखर्चित निधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | | ७ | ८ | ९ | १० |
| १ | मुलभुत सोई सुविधा पायाभुत | १७९०१८७९४ | ० | ० | ० | | ७३९४१४८ | १८६४१२९४२ | ७४५५९४८९ | १११८५३४५३ |
| २ | अतिवृष्टीमुळे रस्त्यासाठी विशेष | ८२७१६३३७ | ० | ० | ० | | ३५५४९०४ | ८६२७१२४१ | ४५५९१६६० | ४०६७९५८१ |
| ३ | अनु. जाती व नवबौध्द घटकांचे घरकुल | ४५५०१००५ | ९२२५७००० | ० | ० | | ९८९२६९ | १३८७४७२७४ | ३५१००००० | १०३६४७२७४ |
| ४ | पंचशताब्दी महोत्सव | २०७६२०४१ | ० | ० | ० | | ७८२२९३ | २१५४४३३४ | ५९५५७७६ | १५५८८५५८ |
| ५ | यु.आय.डी.एस.एस.एम.टी | १०९७९२५१ | ० | ० | ० | | ३८७०७७ | ११३६६३२८ | २०९६१६९ | ९२७०१५९ |
| ६ | ना.द.व. | १२४३६७२०९ | ७३७०८००० | ० | ० | १५३३७२ | ६३९३३०५ | २०४६२१८८६ | ६७८९३३९५ | १३६७२८४९१ |
| ७ | बी.आर.जी.एफ. | ३४६६३०३९ | ० | ० | ० | | ११६२४३८ | ३५८२५४७७ | २९०३१०५६ | ६७९४४२१ |
| ८ | महा. सुजल निर्मल अभि. अंतर्गत अनु. जाती व नवबौध्द घटकातील नळ जोडणी व वैयक्तीक शौचालय | ३२२८०८४७ | ० | ० | ० | | ० | ३२२८०८४७ | ४०८०० | ३२२४००४७ |
| ९ | रस्ता अनुदान | ४३३१८०४४ | ७५००००० | ० | ० | ४४२७६ | २०२९४८५ | ५२८११८०५ | २४०२२७३८ | २८८६१०६७ |
| १० | बॅरिष्टर राजाभाऊ खोब्रागडे | १११३३५६१ | ० | ० | ० | | ३९८०१४ | ११५३१५७५ | ५१६१९४६ | ६३६९६२९ |
| ११ | आय.एच.एस.डी.पी | १५८२८६७९ | ० | ० | ० | | ६४३७०९ | १६४७२३८८ | २५३३४ | १६४४७०५४ |
| १२ | कमी खर्चाची स्वच्छता योजना | १३१७२२६७ | ० | ० | ० | | ० | १३१७२२६७ | १८००० | १३१५४२६७ |
| १३ | महा. नगरोत्थान अभियान | १८५६१८०८४ | ११३७२३३११ | ३००००००० | ० | | ९६६११८७ | ३३९००२५८२ | १५७९८८७६६ | १८१०१३८१६ |
| १४ | महा. सुजल निर्मल अभि. अंतर्गत पा.पू.विकास नीधी | ३०७२२१० | ० | ० | ० | | ० | ३०७२२१० | ० | ३०७२२१० |
| १५ | आय.डी.एस.एम.टी. | ९७२५१२ | ० | ० | ० | | ४६२५५ | १०१८७६७ | ० | १०१८७६७ |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १६ | पर्यटन निधी | ४४७०१९८ | ० | ० | ० | | ० | ४४७०१९८ | ० | ४४७०१९८ |
| १७ | इरई व झरपट नदी संवर्धन | १४८८७६० | ० | ० | ० | | ० | १४८८७६० | ० | १४८८७६० |
| १८ | १३ वा वित्त आयोग | ६९८३७८४ | ० | ० | ० | | २३५१३६ | ७२१८९२० | ४५९११०४ | २६२७०१६ |
| १९ | खासदार निधी | ४६५५१९२ | १७५८००० | ० | ० | | २३४९९० | ६६४८१८२ | १५३५७२७ | ५११२४५५ |
| २० | ना.द.व. व पाणी पूरवठा | १५०३४२३ | ० | ० | ० | | ० | १५०३४२३ | ० | १५०३४२३ |
| २१ | खनीज विकास निधी | २७७२०२३ | १०००७६७ | ० | ० | | १३०८०९ | ३९०३५९९ | २१३०१५३ | १७७३४४६ |
| २२ | आमदार निधी | ४१७७८०७ | ४०९२००० | ० | ० | | २९७३३४ | ८५६७१४१ | १७६९०७६ | ६७९८०६५ |
| २३ | पंतप्रधान आवास योजना | ११८७३६८ | ० | ० | ० | | ४८२१३ | १२३५५८१ | ० | १२३५५८१ |
| २४ | अल्पसंख्यांक | २५३५५९ | २००००००० | ० | ० | | १४८२५३ | २४०१८१२ | ७३८५४४ | १६६३२६८ |
| २५ | नागरी दलीतत्तेर | ४१५१००० | ० | ० | ० | | ० | ४१५१००० | ४१३२४५२ | १८५४८ |
| २७ | जिल्हा वार्षिक सर्वसाधारण | ९६०९००० | ० | ० | ० | | ० | ९६०९००० | २१६७६९ | ९३९२२३१ |
| २८ | १४ वा वित्त आयोग | १४५१५०६२५ | १२२९९१०२७ | ० | ० | | ३८८०३९३ | २७२०२२०४५ | १८८९४०४९१ | ८३८८१५५४ |
| २९ | बाबुपेठ उडाणपुल | ३०२९०३७० | ० | ० | ० | | १२६९७१७ | ३१५६००८७ | ८०००० | ३१४८००८७ |
| ३० | अमृत अभियान | १५१५१६६०३ | १२७५८४१८८ | ० | ५०५००००० | | ९२९६९५९ | ३३८८९७७५० | ४१५४९७७ | ३३४७४२७७३ |
| ३१ | स्वच्छ महाराष्ट्र अभियान | ३९३१९२४३ | १२१००००० | ० | ३२७००००० | | १३९४६४० | ८५५१३८८३ | ८०५२९१९८ | ४९८४६८५ |
| ३२ | महाराष्ट्र ऊर्जा विकास अभि | २०५९५११ | ० | ० | ० | | ० | २०५९५११ | ० | २०५९५११ |
| | एकुण | १२१२९९२३४६ | ५५८७१४२९३ | | | | | | ७३५५०४४२० | ११९९९७८३९५ |

मुख्य लेखाधिकारी
चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर

विवरणपत्र — क्रं. ४ (अ)

संकलित करांची मागणी, वसूली व शिल्लक याबाबतची माहिती

महानगरपालिकेचे नांव :- चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर

सन - २०१६-१७.

(रुपये लाखात)

| अ.क्र. | कराचे नाव | मागणी | | | वसूली | | | शिल्लक | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मागील थकबाकी | चालु | एकुण | मागील थकबाकीची वसूली | चालु | एकुण | मागील थकबाकीची शिल्लक | चालु | एकुण |
| १ | मालमत्ता कर | १०७४.०७ | १५८७.५० | २६६१.५७ | ७५८.९० | ९८८.२७ | १७४७.१७ | ३१५.१७ | ५९९.२३ | ९१४.४ |
| २ | पाणीपट्टी | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| ३ | जकात कर | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| ४ | इतर कर | ५१६.२१ | ९६३.२७ | १४७९.४८ | ३८४.७१ | ५७९.२७ | ९६३.९८ | १३१.५ | ३८४.०० | ५१५.५ |

टिप :- महानगरपालिकेने पुरविलेला माहितीनूसार.

५/३/१८.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी
चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर

विवरणपत्र — क्रं. ४ (ब)

भाडे वसूली व शिल्लक याबाबतची माहिती

महानगरपालिकेचे नांव :- चंद्रपूर महानगरपालिका, चंद्रपूर

सन - २०१६-१७.

(रुपये लाखात)

| अ.क्र. | कराचे नाव | मागणी | | | वसूली | | | शिल्लक | | | वसूलीची टक्केवारी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मागील थकबाकी | चालु | एकूण | मागील थकबाकीची वसूली | चालु | एकूण | मागील थकबाकीची शिल्लक | चालु | एकूण | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| १ | गाळा भाडे | १११.५६ | ११२.२४ | २२३.८० | ६२.३७ | ७६.४२ | १३८.८० | ४९.१८ | ३५.८२ | ८५.०० | ६२.०२ % | |
| २ | इमारत भाडे | | | | | | | | | | | |
| ३ | भुई भाडे | | | | | | | | | | | |
| ४ | शाळा व जागा भाडे | | | | | | | | | | | |
| ५ | इतर | | | | | | | | | | | |

टिप :- १) वरील माहिती देत असताना एकूण मागणी (-) वसूली (=) शिल्लक अशाप्रकारे पडताळता येणे आवश्यक आहे.

२) मागील वर्षी कळविलेल्या माहितीबरोबर थकबाकीची माहिती जुळणे आवश्यक आहे. जुळत नसल्यास त्याप्रमाणे स्पष्ट्रीकरण करणे द्यावीत.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी

चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर

# विवरणपत्र :-क्रं. ५ (ब)

महानगरपालिका यांना दिलेला प्रलंबित अग्रीम वर्षनिहाय तपशिल

**महानगरपालिकेचे नांवः- चंद्रपूर शहर माहानगरपालिका,चंद्रपूर**

(रुपये लाखात)

| अ.क्रं. | वर्ष | प्रलंबित अग्रीम रक्कम रुपये | शेरा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | २०१६-१७ | ०.२६ | |
| एकुण रक्कम :- | | ०.२६ | |

# विवरणपत्र :-क्रं. ५ (अ)

महानगरपालिका यांना दिलेला प्रलंबित अग्रीम वर्षनिहाय तपशिल

महानगरपालिकेचे नांवः- चंद्रपूर शहर माहानगरपालिका,चंद्रपूर

| अ.क्रं. | अग्रीमाचा तपशिल | मागील शिल्लक अग्रीम | चालु वर्षी दिलेली अग्रीम | एकुण | वसुली | मार्च २०१५ अखेर शिल्लक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | इतर अग्रीम | ०.२६ | ४.७१ | ४.९७ | ४.७१ | ०.२६ |

मुख्य लेखा व वित्त अधिकारी
चंद्रपूर शहर माहनगरपालिका,चंद्रपूर

## विवरणपत्र क्र. ६

### महानगरपालिका यांनी इतर संस्थाकडून घेतलेली कर्जे

महानगरपालिकेचे नांव :- चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर

सन - २०१६-१७ (रूपये लाखात)

| अ.क्र. | ज्या संस्थेकडून कर्ज घेतले त्या संस्थेचे नांव | कर्जाचा तपशिल | दि.०१/०४ २०१६ रोजीची शिल्लक | चालु वर्षाचे नविन कर्ज | एकूण | पतरफेड केलेली रक्कम | | | मार्च ...... अखेर शिल्लक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | मुद्दल | व्याज | एकूण | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ (७+८) | १० (६-९) |
| १ | मा. उपसंचालक, नगर रचना नागपूर विभाग, नागपूर | आरक्षण क्र. ५५ खाजगी वाटाघाटीणे भुसंपादन | ४.१६ | ० | ४.१६ | २.९४ | १.२२ | ४.१६ | ० |
| २ | मा. संचालक , नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पूणे | केंद्र पुरस्कृत लहान व मध्यम शहराच्या विकास योजना आय.यु.डी.पी. | | | | | | | |
| | | एकात्मीक शहर विकास योजना आय.डी.एस.एम.टी. | | | | | | | |

टिप :- दर वर्षी वार्षीक समिकृत हप्त्यात कर्ज मुद्दल व व्याज मिळुन शासनास परतफेड करीत असल्यामुळे मार्च अखेर शिल्लक निरंक आहे.

५/३/१७.

मुख्य लेखाधिकारी
चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर

विवरणपत्र क्र. ७ (अ)

अनामत रकमेबाबतची माहिती

महानगपालिकेचे नांव :- चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर

सन - २०१६-१७

(रूपये लाखात)

| अ.क्र. | तपशिल | मागील शिल्लक | चालु वर्षातील जमा | एकूण जमा | परतावा/ खर्च | व्यपगत | एकूण | शिल्लक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | (३+४) | | | (६+७) | (५-८) | सन २०१३-१४ पावेतो सुरक्षा ठेव अनामत रक्कम रू. १.४५ कोटी दि. २६/०२/२०१९ ठराव क्र. १४० अन्वये व्यपगत करण्यात आलेली आहे. |
| १ | सुरक्षा अनामत | १०८५०.१२ | २७२९.३४ | १३५७९.४६ | १३९९.३४ | ० | १३९९.३४ | १२१८०.१२ | |
| २ | निवडणूक अनामत | | | | | | | | |
| ३ | निविदा व इसारा | | | | | | | | |
| ४ | इतर | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |

टिप :- उपोक्त रखाण्यात दर्शविलेली सुरक्षा अनामत, निवडणूक अनामत, निवीदा व इसारा व इतर एकत्रित दर्शविण्यात आलेली आहे.

१/३/१७.

मुख्य लेखाधिकारी

चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर

# विवरणपत्र क्र.८

## महानगरपालिकेने केलेल्या गुंतवणुकांचा तपशिल

महानगरपालिकेचे नांव- चंद्रपुर शहर महानगरपालिका , चंद्रपुर

सन- २०१६-२०१७

| अ. क्र. | निधीचा प्रकार | बँकेचे नाव | गुंतवणुक केलेली रक्कम | मंजुर प्राधिकारी (ठराव क्र. व दि. ) | व्याज दर | गुंतवणुक कालावधी (दि. ते दि. ) | मुदत संपल्यावर प्राप्त मुद्दल व व्याज | | | मुदत संपुनही न मिळालेली रक्कम | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | मुद्दल | व्याज | पूर्नगुंतवणुक | मुद्दल | व्याज | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| १ | अनामत रक्कम | युनियन बँक ऑफ इंडिया, चंद्रपुर | ७५.०० | समापती, स्थायी समिती ठराव क्र.१३८ दि.३१/०८/२०१३ | ७.६५ | ०४/०४/२०१६-०४/०४/२०१७ | ७५.०० | ५.९० | ८०.९० | निरंक | निरंक | |
| २ | अनामत रक्कम | युनियन बँक ऑफ इंडिया, चंद्रपुर | ७५.०० | समापती, स्थायी समिती ठराव क्र.१३८ दि.३१/०८/२०१३ | ७.६५ | ०४/०४/२०१६-०४/०४/२०१७ | ७५.०० | ५.९० | ८०.९० | निरंक | निरंक | |
| ३ | अनामत रक्कम | युनियन बँक ऑफ इंडिया, चंद्रपुर | ६८.०९ | समापती, स्थायी समिती ठराव क्र.१३८ दि.३१/०८/२०१३ | ७.६५ | ०५/०४/२०१६-०५/०४/२०१७ | ६८.०९ | ५.३६ | ७३.४५ | निरंक | निरंक | |
| ४ | जीपीएफ | युनियन बँक ऑफ इंडिया, चंद्रपुर | ९९.०० | समापती, स्थायी समिती ठराव क्र.१३८ दि.३१/०८/२०१३ | ७.६५ | ०४/०४/२०१६-०४/०४/२०१७ | ९९.०० | ७.७९ | १०६.७९ | निरंक | निरंक | |
| ५ | जीपीएफ | युनियन बँक ऑफ इंडिया, चंद्रपुर | ९९.०० | समापती, स्थायी समिती ठराव क्र.१३८ दि.३१/०८/२०१३ | ७.६५ | ०४/०४/२०१६-०४/०४/२०१७ | ९९.०० | ७.७९ | १०६.७९ | निरंक | निरंक | |
| ६ | जीपीएफ | युनियन बँक ऑफ इंडिया, चंद्रपुर | ५४.७५ | समापती, स्थायी समिती ठराव क्र.१३८ दि.३१/०८/२०१३ | ७.६५ | ०४/०४/२०१६-०४/०४/२०१७ | ५४.७५ | ४.३१ | ५९.०६ | निरंक | निरंक | |
| ७ | रोड कटींग चार्जेस | युनियन बँक ऑफ इंडिया, चंद्रपुर | ९९.०० | समापती, स्थायी समिती ठराव क्र.१३८ दि.३१/०८/२०१३ | ७.६५ | ०४/०४/२०१६-०४/०४/२०१७ | ९९.०० | ७.७९ | १०६.७९ | निरंक | निरंक | |
| ८ | रोड कटींग चार्जेस | युनियन बँक ऑफ इंडिया, चंद्रपुर | ९९.०० | समापती, स्थायी समिती ठराव क्र.१३८ दि.३१/०८/२०१३ | ७.६५ | ०४/०४/२०१६-०४/०४/२०१७ | ९९.०० | ७.७९ | १०६.७९ | निरंक | निरंक | |
| ९ | रोड कटींग चार्जेस | युनियन बँक ऑफ इंडिया, चंद्रपुर | ९९.०० | समापती, स्थायी समिती ठराव क्र.१३८ दि.३१/०८/२०१३ | ७.६५ | ०४/०४/२०१६-०४/०४/२०१७ | ९९.०० | ७.७९ | १०६.७९ | निरंक | निरंक | |
| १० | रोड कटींग चार्जेस | युनियन बँक ऑफ इंडिया, चंद्रपुर | ९९.०० | समापती, स्थायी समिती ठराव क्र.१३८ दि.३१/०८/२०१३ | ७.६५ | ०४/०४/२०१६-०४/०४/२०१७ | ९९.०० | ७.७९ | १०६.७९ | निरंक | निरंक | |
| ११ | रोड कटींग चार्जेस | युनियन बँक ऑफ इंडिया, चंद्रपुर | ४१.१७ | समापती, स्थायी समिती ठराव क्र.१३८ दि.३१/०८/२०१३ | ७.६५ | ०४/०४/२०१६-०४/०४/२०१७ | ४१.१७ | ३.२४ | ४४.४१ | निरंक | निरंक | |
| १२ | जीपीएफ | युनियन बँक ऑफ इंडिया, चंद्रपुर | ९९.०० | समापती, स्थायी समिती ठराव क्र.१३८ दि.३१/०८/२०१३ | ७.६५ | ०५/०४/२०१६-०५/०४/२०१७ | ९९.०० | ७.७९ | १०६.७९ | निरंक | निरंक | |
| १३ | जीपीएफ | युनियन बँक ऑफ इंडिया, चंद्रपुर | १.६४ | समापती, स्थायी समिती ठराव क्र.१३८ दि.३१/०८/२०१३ | ७.६५ | ०५/०४/२०१६-०५/०४/२०१७ | १.६४ | ०.१३ | १.७७ | निरंक | निरंक | |
| १४ | विकास योजना फंड | कॅनरा बँक, चंद्रपुर | ११९.५० | समापती, स्थायी समिती ठराव क्र.१३८ दि.३१/०८/२०१३ | ७.५० | २१/०४/२०१६-२१/०४/२०१७ | ११९.५० | ८.६५ | १२८.१५ | निरंक | निरंक | |
| १५ | सिंकींग फंड | कॅनरा बँक, चंद्रपुर | ११९.५० | समापती, स्थायी समिती ठराव क्र.१३८ दि.३१/०८/२०१३ | ७.५० | २१/०४/२०१६-२१/०४/२०१७ | ११९.५० | ८.६५ | १२८.१५ | निरंक | निरंक | |
| १६ | जीपीएफ | बँक ऑफ महाराष्ट्र, चंद्रपुर | ९३.४७ | समापती, स्थायी समिती ठराव क्र.१३८ दि.३१/०८/२०१३ | ७.६० | २१/०४/२०१६-२१/०४/२०१७ | ९३.४७ | ७.३१ | १००.७८ | निरंक | निरंक | |

| अ. क्र. | निधीचा प्रकार | बँकेचे नाव | गुंतवणुक केलेली रक्कम | मंजुर प्राधिकारी (ठराव क्र. व दि.) | व्याज दर | गुंतवणुक कालावधी (दि. ते दि.) | मुदत संपल्यावर प्राप्त मुदल व व्याज | | | मुदत संपुनही न मिळालेली रक्कम | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | मुदल | व्याज | पूर्नगुंतवणुक | मुदल | व्याज | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| १७ | जीपीएफ | ओरीयंटल बँक ऑफ कॉमर्स, चंद्रपुर | ४२.५८ | सभापती, स्थायी समिती ठराव क्र.१३८ दि.३१/०८/२०१३ | ७.५० | १५/०५/२०१६-१५/०५/२०१७ | ४२.५८ | ३.२९ | ४५.८७ | निरंक | निरंक | |
| १८ | जीपीएफ | ओरीयंटल बँक ऑफ कॉमर्स, चंद्रपुर | २६५.४५ | सभापती, स्थायी समिती ठराव क्र.१३८ दि.३१/०८/२०१३ | ७.१६ | २५/०५/२०१६-२५/०५/२०१७ | २६५.४५ | १९.५२ | २८४.९७ | निरंक | निरंक | |
| १९ | जीपीएफ | ओरीयंटल बँक ऑफ कॉमर्स, चंद्रपुर | ५०.२५ | सभापती, स्थायी समिती ठराव क्र.१३८ दि.३१/०८/२०१३ | ७.५० | २५/०५/२०१६-२५/०५/२०१७ | ५०.२५ | ३.८८ | ५४.१३ | निरंक | निरंक | |
| २० | वेतन राखीव निधी | ओरीयंटल बँक ऑफ कॉमर्स, चंद्रपुर | ६०.८६ | सभापती, स्थायी समिती ठराव क्र.१३८ दि.३१/०८/२०१३ | ७.५० | १४/०५/२०१६-१४/०५/२०१७ | ६०.८६ | ४.६९ | ६५.५५ | निरंक | निरंक | |
| २१ | वेतन राखीव निधी | ओरीयंटल बँक ऑफ कॉमर्स, चंद्रपुर | ५५.२० | सभापती, स्थायी समिती ठराव क्र.१३८ दि.३१/०८/२०१३ | ७.५० | २४/०५/२०१६-२४/०५/२०१७ | ५५.२० | ४.२६ | ५९.४६ | निरंक | निरंक | |
| २२ | संयुक्त वेतन खाते | युनियन बँक ऑफ इंडिया, चंद्रपुर | ३००.०० | सभापती, स्थायी समिती ठराव क्र.१३८ दि.३१/०८/२०१३ | ७.२५ | २०/०५/२०१६-२०/११/२०१६ | ३००.०० | ७०.९७ | ३७०.९७ | निरंक | निरंक | |
| २३ | संयुक्त वेतन खाते | युनियन बँक ऑफ इंडिया, चंद्रपुर | ३००.०० | सभापती, स्थायी समिती ठराव क्र.१३८ दि.३१/०८/२०१३ | ७.२५ | २०/०५/२०१६-२०/१२/२०१६ | ३००.०० | १२.८३ | ३१२.८३ | निरंक | निरंक | |
| २४ | संयुक्त वेतन खाते | युनियन बँक ऑफ इंडिया, चंद्रपुर | ३००.०० | सभापती, स्थायी समिती ठराव क्र.१३८ दि.३१/०८/२०१३ | ७.२५ | २०/०५/२०१६-२०/०१/२०१७ | ३००.०० | १४.७४ | ३१४.७४ | निरंक | निरंक | |
| २५ | संयुक्त वेतन खाते | युनियन बँक ऑफ इंडिया, चंद्रपुर | ३००.०० | सभापती, स्थायी समिती ठराव क्र.१३८ दि.३१/०८/२०१३ | ७.२५ | २३/०५/२०१६-२३/०२/२०१७ | ३००.०० | १६.६१ | ३१६.६१ | निरंक | निरंक | |
| २६ | संयुक्त वेतन खाते | युनियन बँक ऑफ इंडिया, चंद्रपुर | ३००.०० | सभापती, स्थायी समिती ठराव क्र.१३८ दि.३१/०८/२०१३ | ७.२५ | २३/०५/२०१६-२३/०३/२०१७ | ३००.०० | १८.३७ | ३१८.३७ | निरंक | निरंक | |
| २७ | संयुक्त वेतन खाते | युनियन बँक ऑफ इंडिया, चंद्रपुर | ३००.०० | सभापती, स्थायी समिती ठराव क्र.१३८ दि.३१/०८/२०१३ | ७.२५ | २३/०५/२०१६-२३/०४/२०१७ | ३००.०० | २०.३२ | ३२०.३२ | निरंक | निरंक | |
| २८ | संयुक्त वेतन खाते | युनियन बँक ऑफ इंडिया, चंद्रपुर | ३००.०० | सभापती, स्थायी समिती ठराव क्र.१३८ दि.३१/०८/२०१३ | ७.३० | २४/०५/२०१६-२४/०५/२०१७ | ३००.०० | २२.५१ | ३२२.५१ | निरंक | निरंक | |
| २९ | संयुक्त वेतन खाते | ओरीयंटल बँक ऑफ कॉमर्स, चंद्रपुर | ३००.०० | सभापती, स्थायी समिती ठराव क्र.१३८ दि.३१/०८/२०१३ | ७.१६ | १९/०५/२०१६-१९/०६/२०१७ | ३००.०० | २४.०२ | ३२४.०२ | निरंक | निरंक | |
| ३० | संयुक्त वेतन खाते | ओरीयंटल बँक ऑफ कॉमर्स, चंद्रपुर | ३००.०० | सभापती, स्थायी समिती ठराव क्र.१३८ दि.३१/०८/२०१३ | ७.१६ | १९/०५/२०१६-१९/०७/२०१७ | ३००.०० | २५.९२ | ३२५.९२ | निरंक | निरंक | |
| ३१ | संयुक्त वेतन खाते | ओरीयंटल बँक ऑफ कॉमर्स, चंद्रपुर | ३००.०० | सभापती, स्थायी समिती ठराव क्र.१३८ दि.३१/०८/२०१३ | ७.१६ | १९/०५/२०१६-१९/०८/२०१७ | ३००.०० | २७.८३ | ३२७.८३ | निरंक | निरंक | |
| ३२ | वेतन राखीव निधी | बँक ऑफ महाराष्ट्र, चंद्रपुर | ५६.५७ | सभापती, स्थायी समिती ठराव क्र.१३८ दि.३१/०८/२०१३ | ७.६० | २०/०६/२०१६-२०/०६/२०१७ | ५६.५७ | ४.४२ | ६०.९९ | निरंक | निरंक | |
| ३३ | जीपीएफ | बँक ऑफ महाराष्ट्र, चंद्रपुर | ९७.६६ | सभापती, स्थायी समिती ठराव क्र.१३८ दि.३१/०८/२०१३ | ७.५० | २८/०७/२०१६-२८/०७/२०१७ | ९७.६६ | ७.५३ | १०५.१९ | निरंक | निरंक | |
| ३४ | जीपीएफ | बँक ऑफ महाराष्ट्र, चंद्रपुर | ८६.८० | सभापती, स्थायी समिती ठराव क्र.१३८ दि.३१/०८/२०१३ | ७.५० | २९/०७/२०१६-२९/०७/२०१७ | ८६.८० | ६.७ | ९३.५० | निरंक | निरंक | |
| ३५ | जीपीएफ | बँक ऑफ महाराष्ट्र, चंद्रपुर | ४१.७५ | सभापती, स्थायी समिती ठराव क्र.१३८ दि.३१/०८/२०१३ | ७.५० | २६/०८/२०१६-२६/०८/२०१७ | ४१.७५ | ३.२२ | ४४.९७ | निरंक | निरंक | |

| अ. क्र. | निधीचा प्रकार | बँकेचे नाव | गुंतवणुक केलेली रक्कम | मंजुर प्राधिकारी (ठराव क्र. व दि.) | व्याज दर | गुंतवणुक कालावधी (दि. ते दि.) | मुदत संपल्यावर प्राप्त मुद्दल व व्याज | | | मुदत संपुनही न मिळालेली रक्कम | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | मुद्दल | व्याज | पूर्नगुंतवणुक | मुद्दल | व्याज | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| ३६ | जीपीएफ | युनियन बँक ऑफ इंडिया, चंद्रपुर | ६३.७३ | सभापती, स्थायी समिती ठराव क्र.१३८ दि.३१/०८/२०१३ | ७.५५ | २६/०८/२०१६-२७/०८/२०१७ | ६३.७३ | ४.९६ | ६८.६९ | निरंक | निरंक | |
| ३७ | जीपीएफ | युको बँक, चंद्रपुर | ९९.०० | सभापती, स्थायी समिती ठराव क्र.१३८ दि.३१/०८/२०१३ | ७.५० | ०१/०९/२०१६-०१/०९/२०१७ | ९९.०० | ७.६४ | १०६.६४ | निरंक | निरंक | |
| ३८ | जीपीएफ | बँक ऑफ महाराष्ट्र, चंद्रपुर | ९९.०० | सभापती, स्थायी समिती ठराव क्र.१३८ दि.३१/०८/२०१३ | ७.५० | ३१/०८/२०१६-३१/०८/२०१७ | ९९.०० | ७.६४ | १०६.६४ | निरंक | निरंक | |
